

ब्रिगेडियर हेमंत महाजन, युद्ध सेवा मेडल, यांचे 2014 ते 2019 मध्ये वेगवेगळ्या वर्तमानपत्रांमध्ये दहशतवाद या विषयावरती प्रसिद्ध झालेले लेख

देशाकरता प्राणार्पण करणाऱ्या,

भारतीय सशस्त्र दलांतील शूर अधिकारी आणि सैनिकांना,

हे पुस्तक सादर समर्पित.

शूरांतील शूर लोकांच्या आकाशगंगेत त्यांच्या आत्म्यांना शांती लाभो.

शूर शिपायाचा पोवाडा

हे सशस्त्र बांधवा, तू ऐन तारुण्यातच दैववशात शहीद झालास.

तुझे देशबांधव किंवा राजकीय स्वामी दुःख करतील किंवा मनास लावून घेतील अशी अपेक्षा धरू नकोस, त्यांच्याकरता तू केवळ आणखी एक अश्रू आहेस.

दूरदर्शन वाहिन्या एखाद-दोन दृश्ये दाखवतील, तसेच मुद्रित माध्यमेही करतील, मग सगळेच विसरले जाईल, तुझे कुटुंबीय उर्वरित आयुष्यभर हरपलेल्या मुलाचा, भावाचा, पतीचा अथवा वडिलांचा शोक करत राहतील.

हे सशस्त्र बांधवा, तू ऐन तारुण्यातच दैववशात शहीद झालास.

अनुक्रमणिका

1. दहशतवादाच्या लढाईमध्ये देशप्रेमी नागरिकांचे कर्तव्य
2. सोशल मीडिया वरील दुष्प्रचार आणि सामान्य नागरिकांचे कर्तव्य
3. बारामुल्ला दहशतवाद मुक्त होताना..
4. पोलिस दलाच्या सक्षमीकरणाकरता काही उपाययोजना
5. खालिस्तानी दहशतवाद पुन्हा पुनरजिवित करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न
6. हिंसक आंदोलनात सुरक्षा सामान्य माणसांची
7. छत्रपतींच्या रणनितीचा वापर करुन देशासमोरची आव्हाने कमी करा
8. सॅबोटाज ,सबव्हर्जन आयएसआयची नवी रणनिती
9. दहशतवाद्यांपेक्षा त्यांचे समर्थक जास्त धोकादायक
10. इ-पुस्तक – आव्हान भारताच्या अंतर्गत सुरक्षेचे
11. पोलिस-नागरिक समन्वयाची नितान्त गरज
12. आयसिसचा भारताला धोका : प्रभाव रोखण्यासाठी उपाय योजना
13. पॅरिस हल्ला आणि भारत
14. पंजाबमध्ये दहशतवादाचे पुनर्जीवन करण्याचा प्रयत्न ?
15. दहशतवादाचे बदलते स्वरुप, एकटे दहशतवादी : गरज तरुणांशी संवाद साधण्याची

16.४० लाख तरुण व्यसनाधीन करणारा नार्को टेररिझम
17.मतपेटीच्या राजकारणामुळे पश्चिम बंगालमधे वाढता दहशतवाद
18.विळखा दहशतवादी कारवायांचा : आय.एस.आय. वर नियंत्रण करण्याची गरज
19.पुण्यातल्या फरासखाना पोलिस ठाण्यासमोर झालेला स्फोट
20.बिगर सरकारी संघटना संशयाच्या घेऱ्यात
21.पुस्तक परिचय- आव्हानः जम्मू-आणि-काश्मीर मधील छुप्या युद्धाचे
22.बनावट नोटांचा सुळसुळाट पाकिस्तान / चीन कडुन एक नवीन प्रकरचा दहशतवाद
23.काश्मीर, दहशतवाद, नक्षलवाद, राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबींवर आप पार्टीची ठोस भूमिका जरुरी
24.निवडणुक काळात सुरक्षा नेत्याची आणि सामान्य नागरिकांची
25.मानवाधिकार संस्था विरुद्ध सामान्य नागरिक :सामान्य नागरिक/पोलिसांच्या मानवाधिकारांचे काय?
26.जर्मन बेकरी पुणे, हैदराबाद ते बंगळुरू : दहशतवादी हिंसाचार वाढवण्याची शक्यता
27.जम्मू आणि काश्मीरमध्ये नव्या प्रकारचा दहशतवाद
28.शहिद अफझल गुरूचे मित्र आणि राष्ट्रीय सुरक्षा
29.अकबरुद्दीन ओवेसी की बॅरिस्टर जीनाचा पुनर्जन्म ?
30.ऑपरेशन एक्स आणि अजमल कसाबला फ़ाशी
31.<u>ब्रिगेडिअर हेमंत महाजन, युद्ध-सेवा-मेडल, यांची व्यक्तीरेखा</u>

दहशतवादाच्या लढाईमध्ये देशप्रेमी नागरिकांचे कर्तव्य

February 19, 2019 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा, विशेष लेख

जम्मू-काश्मीरमधील पुलवामा येथे सुरू अललेल्या चकमकीदरम्यान भारतीय सैन्याला जैश-ए-मोहम्मदचा कमांडर गाजी रशीद ,कामरान आणि एक स्थानिक दहशतवादी(एकुण ३) यांना ठार करण्यात यश आले आहे. गाजी रशीद यानेच पुलवामा दहशतवादी हल्ल्याचा कट रचला होता, तर कामरान हा या हल्ल्याच्या कटात सहभागी होता. ताफ्यावरील हल्ल्याचा मास्टरामाइंड अब्दुल गाझी आहे व हा मसूद अझहरचा निकटवर्तीय आहे.

दहशतवाद्यांना अमाप प्रसिध्दी, शुर विरांचे नाव पण माहित नाही

दक्षिण काश्मीरमधील पुलवामा येथे सुरू असलेली चकमक तब्बल १८ तासांनतर संपली. यात एक मेजरसह चार जवान शहीद झाले आहेत, मात्र तिन्ही दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात यश आले. मेजर डीएस ढोंढियाल, शिपाई सावे राम, शिपाई अजय कुमार आणि शिपाई हरी सिंह ही त्या शुर विरांची नावे आहेत. शिपाई गुलजार मोहम्मद हे जखमी झाले आहेत. या चकमकीत जम्मू-काश्मीरचे पोलीस उपमहानिरीक्षक,सैन्याचे ब्रिगेडियर यांच्यासह अनेक

अधिकारी व सैनिक जखमी झाले आहेत.ब्रिगेडियरना पोटात गोळी लागली. याच एन्काऊंटरमध्ये एक कॅप्टन आणि लेफ्टनंट कर्नल यांना सुद्धा गोळी लागून ते जखमी झाले आहेत. सर्वांना लष्कराच्या हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आलं आहे.मिडियाने त्यांची नावे शोधण्याचा फ़ारसा प्रयत्न केला नाही. ब्रिगेडियर हरबीर सिंग लेफ्टनंट कर्नल राहुल गुप्ता, कॅप्टन सौरभ पटणी, मेजर विनायक आणि अनेक शूर सैनिक गंभीर रित्या जखमी झाले. त्यांची नावे देशाला कळणे गरजेचे आहे. आशा करूया सर्व लवकरच बरे होतील.दहशतवाद्यांना अमाप प्रसिध्दी दिली गेली.हे थांबले पाहिजे.

भारतीय सैन्याची परंपरा आहे की सैन्याचे अधिकारी आपल्या सैनिकांचे नेतृत्व दहशतवादी विरोधी अभियानांमध्ये सर्वात पुढे राहून करतात. त्यामुळेच आपल्याला यश नक्कीच मिळते परंतु यामध्ये आपल्या अधिकार्यांना जखमी व्हावे लागते व प्राणाचे बलिदान पण करावे लागते.

आधी लग्न कोंडाण्याचे

शनिवारी नियंत्रण रेषेजवळ मेजर चित्रेश सिंह बिष्ट हे शहीद झाले. राजौरी जिल्ह्यात नियंत्रण रेषेजवळ आईडी बॉम्ब निकामी करत असताना स्फोट होऊन त्यात त्यांना वीरमरण आले.मेजर चित्रेश यांचा येत्या 7 मार्च रोजी विवाह होणार होता. इकडे वडील त्यांच्या लग्नाच्या पत्रिका वाटत होते आणि तिकडे सीमेवर त्यांना वीरमरण आले. विवाहाच्या पूर्वतयारीसाठी सुटी घेण्याचा वडिलांचा आग्रह असतानाही त्यांनी देशसेवेला प्राधान्य दिले होते.

पुलवामाचा हल्ला झाल्यापासून मिडिया, देशप्रेमी नागरिक अनेक विषयांवर चर्चा करत आहे.सरकारने काय करावे?सैन्याने काय करावे?सिआरपिएफ़ने काय चुका केल्या वगैरे वगैरे. आता कोण काय म्हणाले, त्यापेक्षा आपण काय केले पाहिजे, हे देशाच्या दृष्टीने जास्त हिताचे आहे. त्यासाठी देशवासीयांना आता जागे होण्याची वेळ आली आहे. सैन्याने नेमकी कोणती कारवाई करावी हा टीव्ही /मिडियामधे चर्चेचा विषय नाही.नेमकी कारवाई करण्याकरिता सैन्य सक्षम आहे.

राजकिय पक्षांनी, सरकारने काय करावे?

जम्मू-काश्मीरमधील पुलवामा येथील हल्ल्यानंतर आपल्या देशाने पाकिस्तानला दिलेला सर्वाधिक पसंतीचा राष्ट्र काल मागे घेतल्याचे जाहीर केले. राजकिय पक्षांनी काय करावे हा एक महत्वाचा विषय आहे. आमचे राजकीय नेते त्याचे राजकारण करत आहेत. त्यांनी व्होट बँकेसाठी काही लोकांना जवळ केले आहे. या बोटचेपी भूमिकेमुळे आमच्याकडे दहशतवाद फोफावत आहे. त्याबद्दल पुढच्या लेखात.

प्रतिकात्मक पुतळे जाळुन, बंद पाळुन, मेणबत्ती लावून दहशतवाद थांबणार नाही

सर्वांत प्रथम हुल्लडबाजी करून देशाची प्रगती थांबवण्याचा प्रयत्न करू नये. सामान्य नागरिक सैन्याच्या मागे उभा राहून दहशतवादा विरोधात नेमकी काय भूमिका निभावू शकतो?

आतंकवादी आक्रमणानंतर देशभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. देशभरात पाकिस्तान आणि आतंकवादाचे प्रतिकात्मक पुतळे जाळणे, बंद पाळणे, मेणबत्ती लावून निषेध व्यक्त करणे आदी पहायला मिळत आहेत. या आधी उरी, पठाणकोट, मुंबई आणि त्याआधी संसदेवरील आक्रमण ह्यावेळी हेच चित्र पहायला मिळाले.या मुळे आतंकवाद थांबला नाही व आता व्यक्त केलेल्या देश भक्तीमुळे पण तो थांबणार नाही.त्या करता आपल्याला अनेक वर्ष प्रयत्न करावे लागतिल.पारंमपारिक युध्दाची तयारी करावी लागेल.**त्यात सरकारवर जास्त दबाव आणून घाईघाईने काहीतरी करण्यास भाग पाडणे उचित नाही, आज आपण जर पाकिस्तानशी थेट युद्ध पुकारायचे ठरवलेच, तर आपण किती हानी सहन करू शकतो याचा विचार अगोदर केला पाहिजे.** याकरता जर सैन्याचे बजेट वाढवण्यासाठी जर कश्मिर / पुलवामा कर पेट्रोल किमतीवर लावला तर त्याकरता आपण तयार आहोत का? केवळ श्रद्धांजली न वाहता राष्ट्रीय एकात्मकता कशी निर्माण करता येईल, याचा विचार करणे आवश्यक आहे. श्रद्धांजली वाहण्याची वेळ येऊ नये यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी देशातील सर्वांनी गट-तट विसरून एकत्र आले पाहिजे. रडण्यापेक्षा लढल्याची तयारी केली पाहिजे. तरच अशा हल्ल्यांना आळा बसेल.

मेणबत्त्या जाळून किंवा घोषणा देऊन दहशतवादविरोधी अभियानात यश मिळणार नाही.नुसती देशभक्तीच्या भावना व्यक्त करुन दहशतवाद थांबणार नाही.त्याकरिता कृतिशील कारवाईची गरज आहे.

सामान्य नागरिकांनी नेमके काय करायचे?

प्रत्येक नागरिकाने आपापल्या भागामध्ये ,आपापल्या संस्थामध्ये एक सैनिक म्हणून,एक गुप्तहेर म्हणून कान आणि डोळे उघडे ठेवण्याची गरज आहे.कान आणि डोळे उघडे ठेवा ,आपला भाग सुरक्षित ठेवा.

आज ७०% भारतीय हे सोशल मीडियावर आहेत.कान आणि डोळे सोशल मीडियावर देखील उघडे ठेवा.सोशल मीडियावर देशविरोधी पोस्ट बघितली तर लगेच त्याची लिंक सायबर पोलिसांकडे पाठवा जेणेकरून त्यावर कारवाई करणे त्यांना सोपे जाईल.

हुतात्मा झालेल्या कुटुंबाची ,मानसिक मदत जास्त,आम्ही हुतात्मा झालेल्या कुटुंबांच्या पाठीशी आहोत हा विश्वास द्या.आर्थिक मदतीसाठी सैन्याचे अनेक अकाउंट्स उपलब्ध आहेत.या माध्यमातूनही आपण सैनिकांना मदत करू शकतो.

अजूनसुद्धा काही राजकीय नेते, वाट चुकलेले विचारवंत, तज्ञ देशविरोधी वक्तव्ये करून सैन्याचे मनोबल खच्ची करण्याचा प्रयत्न करतात.**काही पाकधार्जिणे फारूक अब्दुल्ला, मेहबुबा मुफ़्ती ,आणी अनेक याचे राजकारणही करताना दिसत आहेत. नेत्यांनी देशाच्या बाजूने राहण्याची बुद्धी मिळू दे. उद्याही कोणी अहिंसेचे पुजारी, कोणी मानवाधिकारी आपापले मुद्दे मांडायला आसुसलेले असतीलच. सगळे पक्ष एकदिलानं सरकारच्या बाजूने उभे ठाकल्याचे दाखवतील, पण प्रत्यक्षात अनेक नतद्रष्टे नेते त्यात खोडय़ा काढतील.**

अनेक राजकारणी समाजामधील वेगवेगळ्या घटकांना तुमच्या वरती अज्ञान होतो आहे हे सांगून ऊठसूट हिंसक आंदोलने करण्यास भाग पाडतात. यामध्ये सामील होऊ नका. कारण हिंसक आंदोलना मध्ये नुकसान हे आपल्या देशाचे होते. गेल्या वर्षभरात महाराष्ट्रात वेगवेगळ्या आंदोलनात 40% एस्टी गाड्या जाळण्यात आल्या आहेत.

कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या कामात समाजातील सर्व स्तरातील नागरिकांचे सहकार्य घेतले जावे. संबंधित पोलिस ठाण्यांच्या हद्दीत राहणार्या नागरिकांमधून कायद्याचे जाणकार, सामाजिक समस्यांचे जाणकार, राजकीय जाणकार, वकील, डॉक्टर, शिक्षक अशा सर्व क्षेत्रातील नागरिकांना निमंत्रित करून त्यांची एक समिती नेमली जावी.

सीमेपलीकडच्या शत्रूपेक्षा जास्त शत्रू सीमेच्या आत आहेत.जर देश एकत्र पाठी मागे उभा नसेल तर, का बलिदान द्यावे आमच्या सैन्याने? त्यांची नावे,त्यांची दुष्क्रुत्ये शेयर केली जावी ज्यामुळे या सगळ्या पाकप्रेमी,चीनी प्रेमींवर सामाजिक बहिष्कार घालता येइल.

पेट्रोलचे भाव वाढवावा लागला ,सैन्याच्या आधुनिकीकरणासाठी कर वाढवले गेले तरी तक्रार करू नका.मला हे हवे ते हवे असे न करता सैन्याला मजबूत करण्यासाठी सैन्याचे बजेट वाढवण्यासाठी कर भरुन हातभार लावा.एकमेकांत भांडत न बसता,समाजात तेढ न पसरवता एकत्र व्हा आणि सगळे मिळून सैन्याच्या मागे उभे रहा. चीनी मालावर बहिष्कार घाला.

देशभक्ती रोजच्या जिवनात व अनेक वर्षे

आपण भारतीय केवळ एक दिवस प्रतिकात्मक देशभक्तीचे प्रदर्शन करून उरलेले दिवस मात्र त्याच पाकिस्तान बरोबरचे क्रिकेट सामने आणि पाकिस्तानी कलाकारांचे सिनेमे पाहण्यात घालवतो. आपली एक दिवसाची राष्ट्रभक्ती जागृत व्हायला सैनिकांना हुतात्मा व्हावे लागते, हे चित्र दुर्दैवी आहे.

त्यासाठी आपले पद, पक्ष बाजूला करून सरकारला आवश्यक तो पाठिंबा देखील द्यायला हवा. एक दिवसाची मर्यादित राष्ट्रभक्ती नव्हे, आता राष्ट्रहिताच्या प्रत्येक गोष्टीसाठी प्रतिदिन राष्ट्रभक्ती जोपासायला हवी!

सोशल मीडिया वरील दुष्प्रचार आणि सामान्य नागरिकांचे कर्तव्य

February 14, 2019 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा, विशेष लेख

समाज माध्यमे (Social Media) ही एक महत्त्वाचे साधन झाले आहे. सुमारे 60-70 टक्के भारतीयांपर्यंत ही माध्यमे पोहोचली असावीत असा अंदाज आहे. समाज माध्यमांमधून सकारात्मक बातम्या आपण पोहोचवू शकतो. तर शत्रु राष्ट्रे मात्र एकमेकांविषयी वाईट बातम्या सांगण्यासाठीही व अपप्रचार करण्यासाठी त्यांचा वापर करतात. यामध्ये नवनवे संशोधन रोज होत आहे. समाज माध्यमांवरील पोस्टसाठी आर्थिक भार पडत नसल्याने प्रत्येक सामान्य व्यक्तीला स्वतःच टीव्ही, वर्तमानपत्र चालवणे किंवा एखादी विचारधारा लोकांपर्यंत पोहोचवणे शक्य झाले आहे. मात्र याचा वापर जेव्हा समाजात तेढ पसरवण्यासाठी किंवा चुकीचा विचार प्रसार करण्यासाठी केला जातो तेव्हा नागरिकांची व त्याचवेळी सरकारची जबाबदारी वाढते. गेल्या काही महिन्यांपासून आरोप प्रत्यारोप समाजमाध्यमे, टीव्ही आणि वर्तमानपत्रे यामधून केले जात आहेत. यापैकी 99 टक्के आरोप कधीच सिद्ध होणार नाहीत. मग हे आरोप जे करतात त्यांच्या विरूद्ध कायदेशिर कारवाई होणार का?. जसे तंत्रज्ञान सोपे होत सामान्य

माणसाच्या हाती जात आहे तसे देश द्रोही विचारांना विरोध करण्याची त्यांची ताकद वाढत आहे.

काही राष्ट्रांनी निवडणुका आधी डोनाल्ड ट्रम्प यांच्या बाजूने प्रचार केला व या प्रचारामुळे डोनाल्ड ट्रम्प जिंकले असावे अशी समजूत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या बाजूने रशिया आणि चीन ने प्रचार करून सोशल मिडीयावर त्यांचे विरोधक डेमोक्रॅटिक पक्षाच्या हिलरी क्लिटंन यांच्याविरोधात प्रचंड चुकीच्या बातम्या पसरवल्या अश्या बातम्या आहेत. त्यातील 99 टक्के बातम्या खोट्या होत्या.त्याचा परिणाम असा झाला की डोनाल्ड ट्रम्प जे स्वतःहून निवडणूक जिंकू शकले नसते त्यांचा विजय झाला. अमेरिके सारख्या प्रगत राष्ट्रामध्ये सुशिक्षितांचे प्रमाण सर्वाधिक असतांना सुध्दा हिलरी क्लिटंन यांचा पराभव झाला. याचा अर्थ चुकीच्या बातम्यांचा वापर समाज माध्यमांद्वारे करून एक उमेदवार विजयी झाला. त्यावरून सोशल मिडीयाची डाव पलटण्याची ताकद आपण ओळखू शकतो.

ज्या बाजूने निर्णय हवा त्या बाजूचे तज्ज्ञ बोलवायचे

दुष्प्रचारामध्ये एक महत्त्वाचे तत्व हेच की कुठलाही एक आरोप करायचा, त्यानंतर तो आरोप समाज माध्यमांचा वापर करून तो सगळीकडे पसरवायचा. त्याकरिता अनेक पक्षांनी, असे तंत्रज्ञ किंवा कन्सलटंट यांना नोकरीवर ठेवले आहे,ज्यांना सोशल मिडीयाचा वापर कसा करायचा याची माहिती आहे. त्यांचे काम हेच की दुसरे पक्ष जे काही विधान करेल त्यातील चुका शोधायच्या आणि त्यांच्या विरूद्ध दुष्प्रचार सुरू करायचा. एवढेच नव्हे तर अशा प्रकारच्या बातम्या समाज माध्यमांमध्ये पसरावयाच्या, नंतर काही टीव्ही वाहिन्यांवर त्याविषयी चर्चा घडवून आणायची. चर्चा घडवताना ज्या बाजूने निर्णय हवा त्या बाजूचे पत्रकार किंवा तज्ज्ञ बोलवायचे.

म्हणजे राफेल प्रकरणी घोटाळा झाला असे सिध्द करायचे आहे. त्याकरता काही तज्ज्ञ ज्यांचे मत राफेल घोटाळा झाला असेच असेल अशांनाच बोलावायचे. जेणेकरून टीव्हीचा कार्यक्रम पाहाणाऱ्यांना असे वाटेल की चार तज्ज्ञ म्हणतात की घोटाळा झाला तर नक्कीच घोटाळा झाला असणार. वर्तमान पत्रातही आपल्या बाजूच्या तज्ज्ञांकडून लेख लिहून घ्यायचे. त्यातून घोटाळा कसा झाला हीच गोष्ट पुढे सरकवायची. त्यासाठी काही टीव्ही वाहिन्या,वर्तमानपत्रे तज्ज्ञांना पैसा देऊन खरेदी केले जाते असे आरोप केले जात आहेत.

येत्या पाच महिन्यांच्या काळात वेगवेगळ्या प्रकारच्या माध्यमात खोट्या बातम्या पसरवण्याचा प्रयत्न होईल.रोजच्या रोज ही लढाई आपल्या विरोधातील लोकांच्या विरूद्ध एक नवा अपप्रचार करण्याची मोहिम सुरू करेल. पत्रकार परिषदा घेऊन त्याला हवा दिली जाइल. समाज माध्यमांची मुख्यालये ही अमेरिका किंवा युरोप या देशात आहे. ट्विटर, फेसबुक, व्हॉटस ॲप यांची मदत घेउन आपल्या विरूद्ध आलेल्या बातम्यांना थांबवण्याचे किंवा ब्लॉक करायचे

आणि ज्या बातम्या आपल्या सोयिस्कर बातम्या येऊ द्यायच्या असे प्रकार सुरु असावेत. सोशल मिडीयावर त्या त्या पक्षाच्या नेत्यांचे अनेक समर्थक फेक आयडेन्टिटी तयार केले जात असावेत. एखाद्या नेत्याचे 10 लाख फॉलोअर्स आहेत असे दाखवले जाते मात्र त्यातील खऱ्या फॉलोअर्सची संख्या फ़ारच कमी असेल. अशा प्रकारे अपप्रचार मोहिम ही एका मोठ्या पातळीवर पोहोचली आहे.

गोबेल्स प्रोपागंडा

दुसऱ्या महायुद्धामध्ये सायकॉलॉजिकल वॉर फेअर ही लढाई झाली. जर्मनीचा हुकुमशहा हिटलर याच्या खोट्या बातम्या पसरवणारा प्रमुख होता गोबेल्स. त्यानेच हिटलरच्या बाजूच्या बातम्या सर्वदूर पसरवल्या. काश्मिर मध्ये या सर्वांचे रूपांतर एका वेगळ्या लढाईत करण्यात आले. त्याला पर्सेप्शन मॅनेजमेंट म्हटले जाते. माध्यमांमध्ये सातत्याने अशा बातम्या दाखवायच्या की या राज्यातील निष्पाप तरूणांवर सातत्याने अत्याचार होतो आहे, त्यामुळेच ते दहशतवादी कृत्यात सामील होत आहेत. त्यावर लेख लिहिण्यासाठी वर्तमानपत्रासाठी अनेक तज्ज्ञ(??) काम करत आहे.

नेपोलियन ने 100 वर्षापुर्वी म्हटले होते की दुष्कृत्य पसरवणारी वर्तमानपत्रे ही १०,००० शत्रुसैन्यापेक्षा सुद्धा जास्त ताकदवान आहेत. नेपोलियने हे विधान केले होते तेव्हा टीव्ही, वर्तमानपत्रे नव्हती, तसेच समाज माध्यमे नावाचा भस्मासूर नव्हता. आता अपप्रचाराच्या मोहिमेला या सर्वांमुळे मोठा आयाम दिला जातो. या सर्वांसाठी इतक्या मोठ्या प्रमाणात पैसा ओतला जात आहे. त्यामुळे हे सर्व कसे थांबवायचे हे एक मोठे आव्हान आहे.

काय करावे

भारत सरकारने सोशल मिडियातील फेसबुक, ट्वीटर, व्हॉटस ॲप यांची तपासणी केली पाहिजे.जे मेसेज हिंसाचार वाढवु शकतात ते ब्लॉक केले पाहिजे. फॉलोअर्सची संख्या खोट्या पद्धतीने वाढवण्यात आली आहे का. सोशल मिडीया सारख्या प्लॅटफॉर्मवर जाताना स्वतःची ओळख करून देणे फार महत्त्वाचे आहे, ज्यामुळे फेक न्यूज म्हणजेच खोट्या बातम्या पसरवणे सोपे राहाणार नाही. व्हॉटॲपने नियमन करायला सुरूवात केली आहे. पण याची अंमलबजावणी जशी व्हायला पाहिजे तशी होत नाही.

चीन सारख्या देशात सोशल मिडीयामधली साधने जी हिंसाचार पसरवतात, द्वेष पसरवतात किंवा एकमेकांच्या विचारसरणी विरूद्ध लिहितात, त्यांच्यावर बंदी घालण्यात आली आहे. आता वेळ आली आहे की सोशल मिडीयात बदनामीकारक मजकूर प्रसृत करणाऱ्यांना हे सांगावे लागेल की भारतात अशा प्रकारचा दुष्प्रचार करून भारतीयांची मने जिंकता येणार नाही.

भारतीय मतदार हुशार आहे आणि त्याला कोणाला मत देऊन निवडून आणायचे आहे याची जाण आहे. मात्र चुकीच्या बातम्यांचा भडिमार थांबवण्याची गरज जरूर आहे.

दुष्प्रचार युद्ध काश्मिरमध्ये चालते

हाच भडिमार जसा काही राजकीय पक्ष मतदारांवर करतात तशाच प्रकारचा भडिमार लष्कर, भारतीय सुरक्षा एजन्सीवरही होतो. सुरक्षा एजन्सीच्या कामाच्या पद्धतीवर घाला घालावा त्यामुळे त्यांची कामाची क्षमता कमी होईल, अशा प्रकारचे दुष्प्रचार युद्ध काश्मिरमध्ये चालते, नक्षलवादी भागातही हा भडिमार केला जातो. ईशान्य भारतातही अशा प्रकारचे दुष्प्रचार केला जातो. म्हणून या सर्व प्रकारात सामान्य सुज्ञ नागरिकांची जबाबदारी काय तर शक्यतो समाज माध्यमांवरील अशा समूहात सामील होऊ नये. कुठलीही बातमी पुढे पाठवण्यापुर्वी विचार करावा. अशी कुठलीही बातमी हिंसाचार घडवू शकते किंवा एकमेकांविषयी वाईट बातमी असेल तर दुर्लक्ष करावे. जस संशयास्पद वाटत असेल तर असा बातमीची लिंक पोलिसांपर्यंत पोहोचवावी. जेणेकरून पोलिस त्यांच्यावर लक्ष ठेवतिल. येत्या काही महिन्यात सुरक्षा एजन्सी या सगळ्यावर लक्ष ठेवतील. जे कोणी हिंसाचार वाढवण्याचा प्रयत्न करतील त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करतील. अशा प्रकारच्या दुष्प्रचाराचा बळी आम्ही होऊ शकत नाही.

भारतामध्ये अराजक माजवायचे असेल तर त्यासाठी नक्षलवाद, माओवाद, दहशतवाद, याची काहीही गरज नाही. साधा एसएमएससुद्धा त्यासाठी पुरेसा आहे, जेव्हा इंटरनेटचा प्रसार जगभर झाला, त्यावेळी त्याच्या शिल्पकारांनी भाकित वर्तवले होते की, या तंत्राची व्यापकता आणि गती ही भविष्यकाळात सायबर क्राईम आणि सायबर वॉरला जन्म देणारी ठरू शकते. म्हणून त्याबाबत सगळ्याच देशांनी आणि समाजाने जागरुक राहिले पाहिजे.

बारामुल्ला दहशतवाद मुक्त होताना..

February 8, 2019 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) राष्ट्रीय सुरक्षा, विशेष लेख

गेल्या जवळपास तीन दशकांपासून अशांतता, हिंसाचार, दहशतवादी हल्ले यांमुळे ग्रस्त असणाऱ्या काश्मीर खोऱ्यातून एक अभिमानास्पद आणि दिलासा देणारी बातमी नुकतीच समोर आली आहे. काश्मीर खोऱ्यातील महत्त्वाचा जिल्हा असणारा बारामुल्ला हा जिल्हा दहशतवाद मुक्त म्हणून घोषित करण्यात आला आहे. आता 'बारामुल्लापॅटर्न' चा वापर करून काश्मीर खोऱ्यातील चार महत्त्वाच्या जिल्ह्यातही असे यश मिळवणे गरजेचे आहे.

काश्मीरखोरे१३५किमीलांबतर३२किमीरूंद

काश्मीर खोरे हा भारताच्या जम्मू आणि काश्मीर राज्याच्या काश्मीर भागातील एक भौगोलिक प्रदेश आहे. चारही बाजूंनी पर्वतरांगेने वेढला गेलेला हा प्रदेश सुमारे 135 किमी लांब तर 32 किमी रूंद आहे. काश्मीर खोऱ्याच्या पश्चिमेस व दक्षिणेस पीर पंजाल पर्वतरांग तर उत्तर व पूर्वेस हिमालय(शमशाबारी)पर्वतरांग आहे. झेलम ही येथील प्रमुखनदी आहे. श्रीनगर हे काश्मीर मधील प्रमुख शहर असून अनंतनाग, बारामुल्ला, कुपवाडा इत्यादी प्रमुख नगरे खोऱ्यातच स्थित आहेत. सुमारे 69 लाख लोकसंख्या असलेल्या काश्मीर खोऱ्यातील जनता प्रामुख्याने मुस्लिमधर्मीय असून उर्दू व काश्मिरी ह्या येथील प्रमुख भाषा आहेत. नैसर्गिक सौंदर्याचे वरदान लाभल्यामुळे काश्मीरला भारताचे नंदनवन म्हटले जात असले तरी गेल्या अनेक दशकांपासून दहशतवादाने काश्मीर ला ग्रासल्यामुळे या नंदनवनात सातत्याने अशांततेचे, अस्थैर्याचे वारे वाहात राहिले. आज घडीला येथे अनेक अतिरेकी व फुटीरवादी संघटना कार्यरत आहेत.

दहशतवाद हा काश्मीर खोर्यामधील चार जिल्ह्यापुरता सीमित

वास्तविक, संपूर्णजम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी कारवाया सातत्याने होत नसतात. पण माध्यमांमधून उल्लेख होताना मात्र काश्मीरमध्ये अशांतता, हिंसाचार असा उल्लेख होतो.

2011 च्या लोकसंख्या मोजणीप्रमाणे जम्मु-काश्मीरची लोकसंख्या 1.3 कोटी इतकी आहे. भौगोलीक दृष्टया कश्मीरचे तीन मोठे भाग आहेत. लेह-लडाक हा सर्वांत मोठा भाग आहे आणि त्याची लोकसंख्या अडीच ते तीन लाख आहे. या भागात दहशतवाद अजिबात नाही. दुसरा मोठा भाग आहे तो म्हणजे जम्मू आणि उधमपूर भागातले10 जिल्हे. यांची लोकसंख्या 55 ते 60 लाखांच्या आसपास आहे. येथे सुद्धा दहशतवाद नाही. या भागात जो हिंसाचार होतो तो पाकिस्तानी सैन्याने लाईन ऑफ कंट्रोल म्हणजेच प्रत्यक्षताबा रेषेच्या बाजूने गोळीबार केल्यामुळे होतो. मात्र तिथे स्थित दहशतवाद नाही. सध्याचा दहशतवाद हा काश्मीर खोऱ्यापुरता सीमित आहे. काश्मीर खोऱ्यामध्ये दहा जिल्हे आहेत. यापैकी दक्षिण काश्मीर मधील चार जिल्ह्यांत सर्वाधिक हिंसाचार होतो. बारमुल्ला जिल्हा हा काश्मीर खोऱ्याच्या दहा जिल्ह्यापैकी एक. हा काश्मीर खोऱ्यातील महत्त्वाचा जिल्हा आहे. या जिल्ह्यासंदर्भात एक अभिमानास्पद आणि ऐतिहासिक म्हणता येईल अशी उपलब्धी भारतीय लष्कराने प्राप्त केली आहे. बारमुल्ला जिल्हा हा दहशतवाद मुक्त जिल्हा म्हणून अलीकडेच घोषित करण्यात आला आहे. म्हणजेच या जिल्ह्यातील दहशतवाद पूर्णपणे संपलेला आहे. बारामुल्ला जिल्ह्यात गेल्या दोन वर्षांत 50 हून अधिक दहशतवादी ठार झाले आहेत. 24 जानेवारी ला बारामुल्ला जिल्ह्यातील बिनीर गावात तीन दहशतवादी ठार झाल्यानंतर जम्मू-कश्मीर पोलिसांनी उत्तर कश्मीर मध्ये दहशतवादी मुक्त जिल्हा घोषित केले आहे. जिल्ह्यातील एक चांगले सुरक्षा वातावरण प्रदान करण्यासाठी लष्कराने त्यांच्या समर्थनासाठी स्थानिक जनतेचा धन्य वादकेला आहे. 1984 मध्ये अतिरेकी हल्ले झाल्यापासून ही पहिलीच वेळ आहे की एक जिल्हा दहशतवादी-मुक्त म्हणून घोषित करण्यात आले आहे. आता बारामुल्ला जिल्ह्यात निवासी दहशतवादी नाही.

आपल्याला हेच डावपेच इतर भागात ही करता येईल का?

पाकिस्तान कडून एलओसी वरून दहशतवादाची जी घुसखोरी होते ती उरी आणि अशा भागातून केली जाते. या शिवाय सोपोरला काही काळापूर्वी दहशतवादाचा गडमानला जायचे. परंतु आता या भागातील ही दहशतवादाचा पूर्णपणे नयनाट करण्यात भारतीय सैन्याला यश आले आहे. भारतीय लष्कराचे याबाबत अभिनंदन करतानाच काही मुद्दे आणि प्रश्न लक्षात घ्यायला हवेत. मुळात हे असे का झाले आणि आपल्याला हेच डावपेच इतर भागातही करता येईल का हा यातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. बारामुल्ला जिल्ह्यात मिळालेल्या यशाचे मुख्य कारण म्हणजे तेथील स्थानिक रहिवाशांकडून भारतीय सैन्याला मिळणारी नेमकी गुप्त हेर माहिती. या माहितीमुळे जवानांना दहशतवाद्यांच्या ठिकाणांवर हल्लेकरून त्यांना बरबाद करणे सोपे गेले. याशिवाय आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, पाकिस्तानकडून

काश्मीरखोऱ्यातील तरुणांची माथी भडककावून त्यांना दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी जोर कसपणानेप्रयत्नहोतआहेत. या प्रयत्नांनाकाहीप्रमाणातयशहीआल्याचेमागीलकाळातदिसूनआलेआहे. पणपाकिस्तानच्यायाप्रयत्नांनाबारामुल्लाजिल्ह्यातसाफअपयशआले. याभागातीलकोणीहीदहशवादीबनण्यासाठीगेलेनाही. उलटदहशतवादासाठीगेलेल्यातरुणांनात्यांच्यानातेवाईकांच्यामदतीनेपरतआणण्यातभारतीयसुरक्षायंत्रणांनायशआले.

यशामुळेगाफिलराहूनचालणारनाही

याभागातीलस्थानिकतरुणांनादहशतवादीनेटवर्कमध्येभरतीनहोऊदिल्यामुळेआपोआपचदहशतवाद्यांचीसंख्याकमीहोतगेली. मारण्यातआलेल्यादहशतवाद्यांच्याजागीनवीनदहशतवादीमिळतनव्हते. यासाठीकश्मीरमधीलपोलिसांनीदहशतवाद्यांच्याकुटुंबियांसहकामकेलेआहे. त्यांचेसमुपदेशनकेलेआहेआणियासमुपदेशनातूनकाहींनाहिंसाचारसोडण्यासभागपाडलेआहे. भारतीयसैनिकांनीजोरदारदहशतवादीविरोधीमोहिमराबवूनदहशतवाद्यांनानष्टकरण्यातयशमिळाले, हीबाबगौरवास्पदआहे. असेयशआपल्यालादक्षिणकाश्मीरमधीलचारजिल्ह्यातमिळालेतरदहतवाद्यांचेकंबरडेमोडलेजाईल. मात्रशेजारच्याजिल्ह्यातीलदहशतवादीयेण्यासआणियेथूनकामकरण्यासवेळलागतनाही. एखाद्यानवीनव्यक्तीसजिल्ह्यातूनभरतीकेलेजाऊशकते. त्यामुळेयायशामुळेगाफिलराहूनचालणारनाही.

दुसर्याेबाजूलापाकिस्तानच्याएलओसीवरूनघुसखोरीथांबवण्यातभारतीयसुरक्षायंत्रणांना95 टक्केयशआलेआहे. हीघुसखोरीपूर्णपणेथांबवताआलीतरनवीनदहशवादीपाकिस्तानच्याबाजूनेघुसखोरीकरूशकणारनाहीत. असेमानलेजातेकीआजघडीला150 ते200 दहशतवादीकाश्मीरखोर्याणमध्येलपलेलेआहेत. गुप्तहेरमाहितीच्याआधारेशोधमोहिमराबवूनत्यांनापकडताआलेपाहिजे. यातील70 ते80 टक्केदहशवादीहेकश्मीरचेरहिवासीआहे. यादहशतवाद्यांच्याआई-वडिलांवरदबावटाकूनअशावाटचुकलेल्यातरुणांनापरतजरआणताआलेतरदहशतवाद्यांचीसंख्याआपल्यालाकमीकरण्यातयशयेईल. अलीकडीलकाळातसोशलमीडियाच्यामाध्यमातूनदहशतवादाचाप्रसारमोठ्याप्रमाणावरकेलाजातआहे. हेलक्षातघेता, सोशलमीडियावरलक्षठेवूनआक्षेपार्हकिंवामाथीभडकावणारामजकूरपोस्टकेल्याजाणाऱ्यासाईटस्बंदकरणेगरजेचेआहे. तसेचअशासाईटकिंवाब्लॉगचालवणार्याकव्यक्तींनाअटककेलीपाहिजे.

येणार्याेकाळातनवीनयुवकदहशतवादाकडेजाऊनयेतयासाठीकाश्मीरमध्येमोठ्याप्रमाणातरोजगारनिर्मितीचीगरजआहे.
सध्याकाश्मीरमध्येबर्फपडतआहेआणिगुलमर्गभागामध्येयेणार्यागपर्यटकांचीसंख्यापुष्कळवाढलेलीआहे. काश्मीरविषयीभारतासहजगभरातीलपर्यटकांमध्येआकर्षणआहे.
हेलक्षातघेताआपल्यालाकाश्मीरच्याइतरभागांमध्येपर्यटनासाठीअनुकूलस्थितीनिर्माणकरताआलीतर जेयुवकहिंसाचाराच्यामार्गाकडेजावूशकतातत्यांनारोजगारमिळूशकेलआणित्यांचीपावलेथांबवतायेतील. थोडक्यात,
आपल्यालाज्याकारणांमुळेआपल्यालाबारमुल्लाभागातयशमिळालेत्याचाचवापरकरूनकाश्मीरखोर्याातीलचारमहत्त्वाच्याजिल्ह्यातअसेयशमिळणेगरजेचेआहे.
तसेझालेआणितशाचउपायांचाउपयोगकेलातरकाश्मीरखोर्याातीलदहशतवाद्यांचेकंबरडेमोडण्यातआपल्यालायशमिळूशकते.

काश्मिर खोऱ्यात सोशल मिडीयावर दहशतवादाचा प्रसार

December 30, 2018 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा, विशेष लेख

काही दिवसापूर्वी कश्मीर खोऱ्यात तीन दहशतवाद्यांना मारण्यात सैन्याला यश मिळाले. मात्र सैन्याची कार्यवाही सुरू झाली आणी सोशल मीडिया च्या मदतीने आजूबाजूच्या भागातल्या तरुणांना या भागात येउन सैन्यावर हल्ले आणि तुफान दगडफेक करण्यात सांगितले गेले. स्वतःचे रक्षण करण्याकरता पहिले पोलिसांनी अश्रुधूर वापर केला, त्यानंतर पॅलेटचा वापर करण्यात आला. तरीही जमावाची आक्रमकता थांबली नाही म्हणून दुसरा कुठलाही पर्याय नसल्यामुळे सैन्याला जमावावर गोळीबार करावा लागला. ज्यामध्ये सात युवक मारले गेले. हा सोशल मीडिया चा केवढा गैरवापर केला जाऊ शकतो याचे एक मोठे उदाहरण आहे.

बदलत्या युगात सोशल माध्यमे ही संपर्कासाठी विशेष महत्त्वाची ठरत आहेत; पण या माध्यमांचा चांगल्या कामासाठी वापर करणारी मंडळी आपल्याकडे कमी आहेत. या माध्यमांचा गैरवापर करून समाजात तेढ निर्माण करणे, एखाद्या व्यक्तीची प्रतिमा मलीन करणे, असा अनेकांचा कार्यक्रम सुरू असतो. नेमके हेच काश्मिर खोऱ्यात होत आहे. ही बाब घातक असून त्यासाठी सर्वांनी या माध्यमाचे महत्त्व जाणून त्याचा योग्य वापर केला पाहिजे.

<u>सोशल मिडीया हिंसाचार भड्कविण्याचे साधन</u>

जी घटना सर्वात महत्त्वाची आहे ती म्हणजे काश्मिर खोर्यातील दहशतवादाचे बदलते स्वरूप. काश्मिर खोर्यात सरकारने शिक्षणाचा प्रचंड प्रसार केला आहे. बहुतांश काश्मिरी विद्यार्थ्यांना

सरकारी शिष्यवृत्ती मिळाल्याने काश्मिर खोरे मध्यमवर्गीय, सुशिक्षित झाले आहे. शिक्षणाचा उद्देश असा की ते देशाचे चांगले नागरिक होतील. मात्र ही अपेक्षा फोल ठरत हे सर्व शिक्षित युवक फेसबुक किंवा सोशल मिडीया दहशतवादी बनले आहेत. त्यांनी सोशल मिडीयामध्ये दहशतवादाचा/उग्रवादाचा प्रचार करायला सुरूवात केली आहे. आपल्या देशात अनेक सोशल मिडीयाचे प्रकार आहेत. त्यात व्हॉटस ॲप, फेसबुक, ट्वीटर, स्नॅपचॅट अशी वीस वेगवेगळी माध्यमे आहेत. याचा चांगला वापरही करता येतो तसा गैरवापरही करता येतो. याचा काश्मिर मध्ये मोठ्या प्रमाणात गैरवापरच होतो आहे. भारतीय सैन्य शोधमोहिम किंवा धरपकड करायला कोणत्याही गावात प्रवेश करते तेव्हा सोशल मिडीयाच्या माध्यमातून निरोप पाठवला जातो की सैन्य आले आहे आणि आजूबाजूच्या गावातील लोकांना सैन्यावर दगडफेक करण्यासाठी बोलावले जाते. त्यामुळे सैन्याची शोधमोहिम सुरू होते तेव्हा शेकडोंनी युवक गोळा होतात आणि सैन्यावर दगडफेक करायला सुरूवात करतात. एका बाजूला दहशतवाद्यांना तोंड द्यायचे आणि मागच्या बाजूने दगडफेकीलाही तोंड द्यायचे.

<u>सोशल मिडीयावर फेक न्यूज</u>

एवढेच नव्हे तर अनेक फेक न्यूज किंवा चुकीच्या बातम्या, फोटो पाठवले जातात. सोशल मिडीयावर एक बातमी आली होती ती म्हणजे सैन्याने एका भागात असलेल्या सर्व हातगाड्या जाळून टाकल्या त्या बातमीने हाहाकार माजला होता. मात्र नंतर ही चुकीचा बातमी असल्याचे स्पष्ट झाले. आज काश्मिर खोर्याची 70 टक्के लोकसंख्या ही तरूणवर्गातील आणि 35 वर्ष वयोगटातील आहेत. ते मोठ्या प्रमाणात सोशल मिडीयाचा वापर करतात. सोशल मिडीयाचा गैरवापर इतक्या मोठ्या प्रमाणात वाढला आहे की सरकारने त्यांच्यावर वेगवेगळे निर्बंध लावायला सुरूवात केली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्हॉटस ॲप ग्रुप च्या ॲडमिनिस्ट्रेटर्सना डीसी ऑफिस मध्ये स्वतःला नोंदणीकृत करण्यास सांगितले आहे. एवढेच नाही तर अफवा किंवा चुकीची बातमी पसरवली तर त्याला दोन वर्ष कैदेची शिक्षा होऊ शकते. काश्मिरमध्ये सरकारी कर्मचार्यांची संख्या पाच लाखाहून जास्त आहे. त्यांनाही सोशल मिडीयाचा गैरवापर करण्यापासून थांबवले जात आहे. या विरोधात तिथल्या युवक आणि कर्मचार्यांनी एक चळवळ सुरु केली आहे. यात अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सर्वात मोठे आव्हान आहे ते प्रंचड व्याप्ती असणार्या सोशल मिडीयावर नियंत्रण कसे ठेवायचे.

दुर्दैवाने अनेक वेळा व्हॉटस ॲप वर येणारे मेसेज अनेक वेळा भारतातून न येता ते पाकिस्तान किंवा इतर देशांतून येतात. त्यामुळे सोशल मिडीयाचा वापर करणार्या व्यक्तीची ओळख पटली पाहिजे. यासाठी मोबाईल क्रमांक घेताना जसे सर्व माहिती मोबाईल कंपनीला देतो तशीच ही माहिती सोशल मिडीयाच्या वापरासाठी देणेही सक्तीचे केले पाहिजे.

अनेक काश्मिरी युवक कुठलीही हिंसाचाराची घटना घडली की त्याचे लाईव्ह स्ट्रिमिंग सुरू करतात आणि त्या घटनेला मोबाईलवरून सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करतात. दहशतवादी संघटनेत नव्या तरूणांची भरती करण्यासाठी व्हॉटसॲप सारख्या माध्यमांचा वापर केला जातो. व्हॉटसॲप चा वापर युवकांना कट्टरतावादी बनवण्यासाठी केला जातो. आज काश्मिर खोर्यातील तरूण तिन प्रकारे विचार करणारे आहेत. एक म्हणजे काश्मिर खोरे स्वतंत्र हवे आहे, दुसरे ज्यांना पाकिस्तानात सामील व्हायचे आहे आणि तिसर्यांना कट्टरवादी इस्लामिक राष्ट्र होण्याची इच्छा आहे.

<u>सोशल मीडियांतून लष्कराविरुद्ध अपप्रचार</u>

ट्विटर, फेसबूक, व्हॉट्सॲप आदी सोशल मीडियांतून संरक्षण मंत्रालय तसेच लष्कर मुख्यालयाच्या काही शाखांची लेटरहेड वापरून लष्कराविरुद्ध अपप्रचार सुरू आहे. भारताच्या सीमेपलीकडील देशांतून हा गैरवापर सुरू असावा, असा संशय खुद्द लष्करानेच व्यक्त केला आहे. या अपप्रचाराला बळी पडून लष्करासंबंधी माहितीचा गैरवापर थांबवावा, असा इशारा लष्कराच्या प्रवक्त्यांनी ट्विटरवरून दिला आहे.सोशल मीडियावरील संदेशांमध्ये ॲटॅचमेण्ट म्हणून अशाप्रकारे लेटरहेडवर छापलेले संदेश वितरित झाल्याचे लक्षात आले आहे. सेवानिवृत्त सैन्याधिकारी तसेच सध्या कार्यरत असलेल्या सैन्याधिकाऱ्यांचे ब्लॉग्स किंवा त्यांच्या नावाने पेरले गेलेल्या व्हॉट्सॲप संदेशांमधून खोट्या माहितीचे दस्तऐवज किंवा छायाचित्रांचा गैरवापर केला जात असल्याचे आढळले आहे. असे लेखन करणाऱ्या अधिकाऱ्यांनी कोणत्याही माहितीवर किंवा सामग्रीवर आधारित काही लिखाण करताना ती माहिती किंवा साहित्य यांची खातरजमा लष्कर मुख्यालयाकडून करून घ्यावी. त्याद्वारे आपल्या सैन्य दलांना अडचणीत आणण्याचे प्रयोजन आहे का, याची खातरजमा करावी.अपप्रचाराचे प्रकार सोशल मीडिया निरीक्षण करणाऱ्या पथकांच्या नजरेस आल्यानंतर ही खबरदारी घेतली जात आहे.

<u>सोशल मिडीयावर लक्ष ठेवणे गरजेचे</u>

सोशल मिडीयावर लक्ष ठेवणे अतिशय गरजेचे आहे. सरकारने त्यावर अनेक निर्बंध टाकले आहेत परंतू इतर देशांपासून काही धडा घेऊ शकतो का याचा विचारही केला पाहिजे. शेजारील राष्ट्र चीनने देशात सोशल मिडीयावर पूर्णपणे निर्बंध लावले आहेत. कोणताही सोशल मिडीया चीनमध्ये कार्यरत असेल तर सर्व्हर चीनमध्ये ठेवावे लागतात. तसेच पाऊल भारताने उचलले पाहिजे .कोणतीही चुकीची बातमी किंवा अफवा पसरवण्यात येत असतील तर ते त्वरीत ब्लॉक केले पाहिजे. पोलिस खात्यामध्ये सोशल मिडीयावर लक्ष ठेवण्यासाठी एक वेगळा विभागच कार्यरत केला पाहिजे ज्यामध्ये प्रशिक्षित तंत्रशिक्षित पोलिसांचा वापर करून अश्या सोशल मिडीयावर घडणार्या गुन्हेगारी गोष्टींना थांबवणे, त्या मागच्या कर्त्यांना पकडणे किंवा त्यांना ब्लॉक करणे या प्रकारची कामे सुरू करणे हे गरजेचे आहे.

मीडियाचा उपयोग एकात्मता आणि बंधुभाव वाढविण्यासाठी

काश्मिर खोर्यातील बंदुकधारी दहशतवाद जरी कमी होत असला तरी आता कीपॅड जिहादी किंवा फेसबुक, व्हॉटस ॲप दहशतवादी हा नवा वर्ग सुरू होत आहे. जो चुकीच्या बातम्या पसरवून कट्टरतावाद पसरवण्याचा प्रयत्नात आहे. त्यामुळे सोशल मिडीयाच्या वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवर लक्ष ठेवून तिथे दुष्कृत्य करणार्यांना पकडणे गरजेचे आहे. त्यामुळे खोर्यामध्ये पसरलेल्या कट्टरतावादाला रोखण्यास मदत मिळेल.

सोशल मीडिया आणि इंटरनेटचा गैरवापर करण्याचे प्रमाण काश्मिर खोर्यांमधे फार वाढले आहे, प्रक्षोभक स्वरूपाचे संदेश सोशल मीडियावर व्हायरल होण्यापासून रोखण्यासाठी सरकारने नवा ठोस कायदा तयार करण्यावर भर द्यायला हवा. सोशल मीडियाचा चांगला वापर करा, नाहीतर चीनसारख्या देशांकडे बघा, तिथं इंटरनेटच्या वापरासाठी कडक नियम आहेत.सोशल मीडियावर टाकण्यात आलेल्या बनावट व्हिडिओमुळे दंगल भडकल्याचे उदाहरणे आहेत. हे रोखायचे असेल तर सोशल मीडियाचा गैरवापर थांबवण्याचे मार्ग शोधण्याची आवशकता आहे.या मीडियाचा उपयोग एकात्मता आणि बंधुभाव वाढविण्यासाठी व्हायला हवा. मात्र, अलीकडे चुकीच्या पद्धतीने याचा वापर केला जात आहे असे दिसते.

पोलिस दलाच्या सक्षमीकरणाकरता काही उपाययोजना

September 5, 2018 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा, विशेष लेख

गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रात आणि एकूण देशात हिंसाचाराच्या घटना वाढल्या आहेत. या हिंसाचारात सर्वाधिक बळी जातात ते सामान्य माणसांचे. स्त्रिया, लहान मुले, ज्येष्ठ

नागरिक जे हिंसाचार घडत असलेल्या ठिकाणी अडकतात आणि ते मारहाण, जाळपोळ याला बळी पडतात. कामाकरिता बाहेर पडलेल्या लोकांना अचानक उसळलेल्या हिंसाचाराला बळी पडावे लागते. मग तो हिंसाचार भीमा कोरेगावचा हिंसाचार, औरंगाबादेतला गोंधळ असो, दूध आंदोलन, शेतकरी आंदोलन आणि आता मराठा आरक्षणातला हिंसाचार, यामध्ये सामान्य माणसांची सुरक्षा धोक्यात आली आहे.

राजकीय नेते आणि त्यांचे दौरे यात पोलिस बळाचा बराच वापर होत असल्याने कायदा-सुव्यवस्थेकडे पोलिसांचे अनेकदा दुर्लक्ष होते. पोलिसांवर अनेकदा राजकीय दबाव येत असल्याने पोलिसांचे हातही बांधलेले असतात. इच्छा असूनही पोलिस कारवाई करू शकत नाहीत. अनेक ठिकाणी काही नेतेमंडळीच गुंडांची मदत घेतात. त्यामुळे गुन्हेगार बेडर होतात. यात सामान्य जनतेला त्रास होतो. भयमुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी पोलिस यंत्रणा आणखी मजबूत केली जावी आणि राज्यात कायदा-सुव्यवस्था उत्तम असावी, यादृष्टीने काही उपाययोजना नक्कीच करता येतील.

पोलिस दल सक्षम व्हावे

पोलिसांची मुख्य कर्तव्ये असल्या क्षुल्लक कामांमुळे बाजूला राहतात. पोलिसांची प्रमुख चार कामे असतात. ती म्हणजे, गुन्ह्यांचा तपास, कायदा व सुव्यवस्था राखणे, सामाजिक सुरक्षा आणि गुप्त वार्ता. परंतु याच्याशी थेट संबंध नसलेल्या कामांचा बोजा पोलिसांवर इतका असतो की मुख्य कर्तव्यांकडेच त्यांचे दुर्लक्ष होते. वाहतुकीचे नियंत्रणसुद्धा पोलिसांची जबाबदारी नाही. हे कामसुद्धा आऊटसोर्स केले पाहिजे. कायदा आणि सुव्यवस्था राखणे आणि नागरिकांच्या जीविताचे व त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याची जबाबदारी सरकारची आहे. म्हणुन राज्यातील पोलिस दल सक्षम करायला हवे. पोलिस शिपाई, पोलिस उपनिरीक्षक, सहायक पोलिस आयुक्त यांच्या रिक्त जागा कालबद्ध कार्यक्रमांतर्गत भरल्या जाव्यात. पोलिस दलात हुशार अधिकार्यांना प्राधान्याने स्थान दिले जावे. पोलिसांनी त्यांचे कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे यासाठी त्यांच्या सुवीधात वाढ केली जावी. पोलिसांवर कामाचा अतिरिक्त भार पडणार नाही या साठी ड्युटीचे तास निर्धारित केले जावेत, त्यांच्या सुट्या आवश्यकतेप्रमाणे मंजूर केल्या जाव्यात आणि त्यांना मानसिक शांती प्रदान करून एकूणच पोलिस दलाची कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न व्हावा.

प्रशिक्षणासाठी पाठवावे

पोलिसांना आयुष्यात एकदाच ट्रेनिंग दिले जाते आणि लढाई मात्र दररोज करावी लागते. सैन्यदलांतील सैनिकांना सातत्याने प्रशिक्षण दिले जाते. कोणत्याही आव्हानांना सामोरे जाणारे तत्पर पोलिस दल असावे, असे वाटत असेल तर तशा प्रशिक्षणाचीही सोय उपलब्ध करून दिली

पाहिजे. अत्याधुनिक साधने त्यांना मिळाली पाहिजेत. पोलिसांची निवड करताना त्यांची मानसिक चाचणीसुद्धा घ्यायला हवी.

पोलिस दलात काम करणार्या अधिकार्यांना त्यांचे कर्तव्य प्रभावीपणे पार पाडता यावे यादृष्टीने काही निवडक हुशार अधिकार्यांची निवड करून त्यांना विदेशात प्रशिक्षणासाठी पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी. जगात आज सगळ्यात प्रभावी पोलिस दल स्कॉटलंड यार्डचे मानले जाते. त्याठिकाणचे पोलिस गुन्हा घडल्यानंतर नेमकी कृती कशा पद्धतीने प्रारंभ करतात आणि टप्प्याटप्प्याने गुन्हेगाराला कसे पकडतात याविषयीची कार्यपद्धती आपले अधिकारी जाणून घेतील, तिथल्या पोलिस दलाची आणखी काही वैशिष्ट्ये असतील तर ती माहिती करून घेतील आणि तिथल्या कायद्यांचा, गुन्ह्यांसाठी झालेल्या शिक्षेचा बारकाईने अभ्यास करतील. याचा उपयोग त्यांना आपल्या राज्यात गुन्ह्यांचा वेगाने छडा लावण्यासाठी निश्चितपणे होईल.ब्रिटीश व अमेरिकन कार्यपद्धतींचा आणि अनुभवांचा अभ्यास करून, तसेच त्यावरून सुयोग्य धडे घेऊन आपल्याला लाभ होईल.

नैतिक मूल्य शिक्षण द्यावी

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक वा आर्थिक समस्यांची सोडवणूक पोलिस करू शकत नाहीत. चिघळलेली परिस्थिती नियंत्रणात आणण्याची जबाबदारी त्यांची असते. परंतु समस्या गंभीर रूप धारण करण्यापूर्वीच योग्य मार्ग काढता यावा, यासाठी काहीतरी सामाजिक व्यवस्था असली पाहिजे. या व्यवस्थेला मदत करण्याची भूमिका पोलिस घेऊ शकतात.

पोलिस खात्यातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी पोलिस दलात भरती होणार्या प्रत्येकाला नैतिक मूल्यांची जाणीव करून दिली द्यावी. त्यांना त्यांचे कर्तव्य आणि अधिकार याची जाणीव करून दिली जावी. देशात जो भ्रष्टाचार बोकाळला आहे, तो कमी करण्यासाठी नैतिक शिक्षणाची मदत हाईल. पोलिस शिपाई आणि अधिकार्यांच्या प्रशिक्षणात असते, ईतर अभ्यासासोबतच नैतिक मूल्यांच्या जोपासनेचेही पाठ शिकवले जावेत, जेणेकरून सेवेत रुजू होणारा पोलिस हा अत्यंत जबाबदार आणि प्रामाणिक असेल.

पोलिसांचे मनोबल वाढवावे

बरेचदा वरिष्ठाकडून पोलीस शिपायांना अपमानास्पद वागणूक मिळते. काही पोलीस अधिकारी तर गुर्मीत शिपायांना गुलामासारखे वागवितात. तथाकथित प्रतिष्ठित मंडळी व बरेच पुढारी कनिष्ठ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांशी बोलण्यासदेखील तयार नसतात . नागरिकांच्या संरक्षणासाठी लढणार्या पोलिसांचे मनोबल वाढविण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. पोलिसांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी उपाय केले जावे. पोलिसांनी मानसिक ताण घेऊन आत्महत्या करू नये याकडे विशेष लक्ष दिले जावे. त्याचे खच्चीकरण होणार नाही

आणि त्याचा कायदा-सुव्यवस्था राखण्यावर परिणाम होणार नाही, यासाठी खास कार्यक्रम राबविला जावा. मनोबल वाढविण्यासाठी वेळोवेळी आवश्यक असा रिफ्रेशर कोर्सही त्यांच्यासाठी घेतला जावा. मुंबईच्या आझाद मैदानावर पोलिसांचा जो अपमान गुंडांकडून झाला होता, त्याची पुनरावृत्ती होणार नाही असा बदल रचनेत व कार्यपद्धतीत केला जावा.

व्हिआयपी सुरक्षेचे प्रस्थही कमी करुन अधिक पोलिस कर्मचार्यांना सामान्य माणसाच्या रक्षणासाठी रस्त्यावर आणले पाहिजे. पोलिसांकडे अनेक व्यवस्थापकीय कामे आहेत. त्यातुन त्यातून पोलिसांना मुक्त करता येईल का हे सुद्धा तपासले पाहिजे.

अत्याधुनिक तंत्रज्ञान द्यावीत

पोलिसांना दंगेखोरांवर काबू करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे गरजेचे आहेत. हे तंत्रज्ञान जम्मू काश्मिर पोलिस वापरत आहेत. यामुळे पोलिस दंगलखोरांवर काबू मिळवू शकतिल. सध्या अश्रुधुराशिवाय दंगलखोरांवर काबू मिळवण्याचे इतर अनेक उपाय आहेत.

पोलिसांना गुन्हेगारांचा प्रभावीपणे सामना करता यावा आणि त्याचबरोबर स्वत:च्या व नागरिकांच्या जीविताचेही संरक्षण करता यावे यासाठी त्यांना अत्याधुनिक शस्त्रास्त्रे दिली जावीत. गुंडांजवळ असलेल्या शस्त्रास्त्रांचा प्रभावीपणे मुकाबला करता येईल अशा क्षमतेची ही शस्त्रास्त्रे असावीत. नुसते आधुनिकीकरणच करून काम भागणार नाही, तर ही शस्त्रे वापरण्याबाबतचे कौशल्यही त्यांच्यात निर्माण केले जावे. त्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जावा.
एक सत्य गोष्ट अशी आहे की हिंसक जमावाला काबूत आणण्यासाठी किंवा आवश्यक ती कठोर कारवाई करण्यासाठी महिला पोलिस सक्षम ठरू शकत नाहीत. महिला पोलिसांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

खबऱ्यांचे जाळे विणावे

पोलिस अधिकाऱ्यांनी गुप्तहेर संस्थांना कोणती माहिती मिळवावी याविषयी काम द्यावे. हिंसक आंदोलनाची आगाऊ माहिती मिळवावी. त्यासाठी सर्व गुप्तहेर संस्थांची बैठक राज्य, जिल्हा पातळीवर होणे गरजेचे आहे.अशा प्रकारच्या बैठका या मुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलिस संचालक,जिल्हा पालक मंत्री आदींनी घेतल्या पाहिजेत.

पोलिसांना मदत करण्याच्या दृष्टीने राज्यभर खबर्यांचे जाळे विणले जावे आणि या खबर्यांना आर्थिक मदत दिली जावी. या खबर्यांच्या जीविताला धोका पोचणार नाही याची काळजी पोलिस दलाने घ्यावी.

स्थानिक गुप्तवार्ता विभागाची कार्यक्षमता वाढवावी

टेक्निकल इंटेलिजन्सने संशयित दंगलखोऱांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने लक्ष ठेवणे शक्य आहे. या सर्व उपायामुळे पोलिसांना कुठे काही गडबड होणार असेल तर त्याची माहिती आधीच कळेल व ते हिंसाचार वेळेवर थांबवु शकतिल.

स्थानिक गुप्तवार्ता विभाग अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने योजना आखली जावी. या विभागात नोकरभरती करताना उमेदवारांच्या बौद्धिक क्षमतेची आणि निर्णयक्षमतेची चाचणी घेतली जावी. स्थानिक गुप्त वार्ता विभागाला त्याचे काम परिणामकारक रीतीने करता यावे यादृष्टीने आवश्यक सगळी यंत्रणा उपलब्ध करून दिली जावी.

नागरिकांनी पोलिसांचे कान डोळे व बनले पाहिजे

सामान्य माणसांनीही पोलिसांचे कान डोळे व बनले पाहिजे.कायदा-सुव्यवस्था राखणे ही जरी पोलिसांची जबाबदारी असली तरी नागरिकांच्या सहभागाशिवाय पोलिसांना उद्दिष्टपूर्ती करता येणे शक्य नाही. त्यामुळे कायदा-सुव्यवस्था राखण्याच्या कामात समाजातील सर्व स्तरातील नागरिकांचे सहकार्य घेतले जावे.स्थानिक नागरिकांना गुप्त माहिती देण्यासाठी एक टोल फ्री फोन क्रमांक दिला पाहिजे. जेणेकरून सामान्य नागरिक त्यांच्याकडील माहिती जलद पोलिसांपर्यंत पोहोचू शकतात. त्यांच्या नावाची गुप्तता बाळगली पाहिजे. मोबाईल फोन वरून हिंसक घटनेचे चित्रण करुन पोलिसांकडे पाठवले पाहिजे. जेणेकरुन हिंसक आंदोलकांना पकडणे सोपे जाईल.

येत्या २०१८ – २०१९ मध्ये अनेक निवडणुका होत आहेत. त्या पार्श्वभुमीवर या हिंसांचे, आंदोलनांचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. अशा प्रकारच्या हिंसाचाराला रोखून सामान्य माणसाचे रक्षण केले पाहिजे. राजकीय इच्छाशक्ती असल्याशिवाय पोलिस दलाच्या कार्यपद्धतीत सुधारणा होणे शक्य नाही.

खालिस्तानी दहशतवाद पुन्हा पुनरजिवित करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न

August 29, 2018 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा

12 ऑगस्ट रोजी लंडनमधील ट्रफाल्गर स्क्वेअर येथे खलिस्तानवाद्यांच्या एकत्र येण्याला भारताने कडाडून विरोध केला होता.भारताने हा प्रस्तावित मोर्चा होऊ नये अशी मागणीही इंग्लंडकडे केली होती. मात्र इंग्लडने तसे करण्यास नकार दिला. यावर भारताने प्रचंड नाराजी व्यक्त केली .हा मोर्चा म्हणजे भारताच्या प्रादेशिक एकात्मतेला धोका पोहोचेल, असे फुटिरतावाद्यांनी केलेले कृत्य आहे अशा शब्दंमध्ये भारताने म्हटले आहे.

काश्मिरातील हिंसाचाराला पायबंद घालण्यात लष्कराला यश मिळू लागल्याने पाकिस्तान विचलीत झाला आहे. त्यांनी विविध नव्या आघाड्या उघडण्याचे काम आरंभले आहे. पाक हेरखात्याने बांगलादेशातील आपले हस्तकही आसाम बंगालमध्ये क्रियाशील केलेले आहेत. त्यापैकी खलीस्तान सार्वमताची मागणी व वेगळ्या शीख राष्ट्राची मागणी आहे. म्हणून तर ट्राफ़ाल्गार चौकातील निदर्शनाच्या प्रसंगी मुठभर शीख व अधिक संख्येने विविध पाकिस्तानी आणि काश्मिरी फुटीरवादी राजकारण्यांनी पुढे येऊन पाठींबा दिलेला आहे. हे सगळे गट पाकिस्तानी हेरसंस्थेच्या आश्रयाने व पैशानेच चाललात, हे उघड गुपीत आहे. परंतु जितका झटपट भडका आसाम बंगालमधील निर्वासित घुसखोर बांगलादेशींमध्ये उडवता येईल, तितका खलीस्तानची आग लावता येणार नाही, हे पाकलाही पक्के ठाउक आहे. म्हणूनच त्यांनी खलीस्तानसाठी २०२० सालचे उद्दीष्ट ठेवले आहे.

पाकिस्तानी मुळाचे लंडनचे महापौर सादिक खान यांनी प्रो खालिस्तान सम्मेलनाला/ मेळाव्याला/ (रॅलीला) ट्रॅफ़ेलगार उपनगरात भरवण्याची परवानगी दिली. मात्र त्याच दिवशी भारताच्या बाजूने असलेल्या सम्मेलनाला/मेळाव्याला मात्र परवानगी नाकारली. कारण त्यांनी ही परवानगी वेळेवर मागितली नव्हती.खालिस्तानसाठी मेळावा"लंडन डिक्लेरेशन" नावाने ओळखला जातो आणि अमेरिकेत स्थित 'सीख फॉर जस्टिस' या संस्थेने तो आयोजित केला

होता. या बैठकीचा मुख्य उद्देश होता की 2020 मध्ये जगभर सार्वमत घेतले जावे आणी भारतातील पंजाबला स्वातंत्र्य मिळावे.या सार्वमतामध्ये 3 कोटी शीख सहभाग घेतील आणि स्वतंत्र खलिस्तानसाठी मतदान करतील असे सीख फॉर जस्टीसने जाहीर केले आहे. भारतातील शीखांनाही यामध्ये सहभाग घेता येईल असे या संघटनेने म्हटले आहे.भारत व जगातील वीस शहरांत सार्वमत घ्यावे आणि 50 लाख मतांचा त्याला पाठिंबा मिळवावा अशी धडपड सुरु आहे.नंतर त्याचा निकाल युनोत पाठवण्यात येणार आहे.

महापौर सादिक खान महत्त्वाचे आहेत की भारत ब्रिटन संबंध?

लंडनस्थित भारतियांनी प्रो खालिस्तान सम्मेलना विरुद्ध "आम्ही भारतीय" म्हणून एक संस्था सहा महिन्यापूर्वी उभारली. त्यांनी ठरवले की 15 ऑगस्टच्या निमित्ताने ते भारताचा स्वातंत्र्यदिन लंडनमध्ये साजरा करतील. मात्र या बैठकीला लंडनचे महापौर पाकिस्तानी मूळचे सादिक खान यांनी परवानगी दिली नाही.त्यांच्या या कारवाईला भारत विरोधी मानले जावे.

आपल्या दोन्ही देशांच्या संबंधांचा विचार करुन इंग्लंडने अशी प्रकरणे हाताळावीत. याआधीच भारताने इंग्लंडकडे पत्राद्वारे आणि दोन बैठकांमध्ये हा मुद्दा उपस्थित करुन निदर्शनांना परवानगी देऊ नये अशी विनंती केली होती. लंडनला निरोप देण्याची गरज आहे की जर तुम्ही एका पाकिस्तानी मूळ नागरिकांमुळे जर भारतविरोधी तत्त्वांना समर्थन देणार असाल तर आम्हाला मान्य नाही. यामुळे भारत आणि ब्रिटन यांचे संबंध खराब होऊ शकतात. लक्षात ठेवा की आम्ही पण ब्रिटन विरोधी कारवायांना भारतात प्रसिद्धी देऊ शकतो. हे आपल्याला आवडेल का? फैसला करा की तुम्हाला लंडनचे महापौर सादिक खान महत्त्वाचे आहेत की भारत ब्रिटन संबंध?

पाकिस्तानी अधिकारी युरोपातील खलिस्तानवादी आंदोलनाचा सूत्रधार

स्वतंत्र खालिस्तानच्या मागणीसाठी कॅनडा आणि युरोपात सुरू असलेल्या रेफरेंडम २०२० या मोहिमेचा सूत्रधार एक पाकिस्तानी लष्करी अधिकारी असल्याचे समोर येत आहे. पाकिस्तानी सैन्यातील चौधरी साहब अर्थात लेफ्टनंट कर्नल शाहिद मोहम्मद मलही हा अधिकारी युरोपात नव्याने सुरू झालेल्या खलिस्तानवाद्यांच्या भारतविरोधी आंदोलनाचा सूत्रधार आहे.चौधरीच्या पर्सनल कॉम्प्युटरमधून अनेक दस्तऐवज आढळून आले आहेत. ज्यामध्ये रेफरेंडम २०२० चळवळीचा विस्तृत आराखडा सापडला आहे. या मोहिमेच्या मागे अमेरिकेतील 'सीख फॉर जस्टिस' ही संस्था मुखवटा आहे. पाकिस्तानची गुप्तचर यंत्रणा आयएसआय या मागणीची मुख्य सूत्रधार आहे. आयएसआय पाकिस्तानसह जगातील इतर काही ठिकाणच्या मुखवटा संघटनांसोबत काम करीत आहे.

गेल्या दोन वर्षांत पंजाबमध्ये झालेल्या हिंदू नेत्यांच्या हत्यांमध्येही या चौधरीचा हात असल्याचा संशय व्यक्त होत आहे.आयएसआयने युरोपात सुरू असलेल्या रेफरेंडम २०२०ला 'ऑपरेशन एक्स्प्रेस' असे नाव देण्यात आले आहे.६ जून २०२०मध्ये हे रेफरेंडम २०२० सुरू करण्यात येणार आहे.याच दिवशी पंजाबमध्ये माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राबवलेल्या 'ऑपरेशन ब्लू स्टार' या मोहिमेला ३५ वर्षे पूर्ण होत आहेत.खलिस्तानवाद्यांना पाकिस्तानातील अनेक संस्थांकडून आर्थिक मदत मिळत आहे.

८०-९० च्या दशकातील खलिस्तानची चळवळ भारतातून नष्ट करण्यात आली असली तरी इंग्लंड, कॅनडासारख्या देशांमध्ये काही मोजक्या लोकांनी खलिस्तान प्रश्नाचा निखारा धगधगत ठेवला आहे. यामुळे भारत आणि कॅनडा यांच्या परस्परसंबंधांवर अनेकदा परिणाम झाला आहे.

दहशतवात पुन्हा पुनरजिवित करण्याचा प्रयत्न

अमेरिकेतील दहशतवादी हल्ल्यानंतर जगातील सर्वच राष्ट्रांनी दहशतवादाच्या विरोधात कठोर पावले उलचण्यास प्रारंभ केला, त्यानंतर या खलिस्तानवाद्यांनी आपला पवित्रा बदलून स्वतंत्र राज्याची उघड मागणी करण्याचे बाजूला ठेवले. त्याऐवजी ते शीखांवर होणारा अन्याय आणि अल्पसंख्यकांचे अधिकार याबद्दल बोलू लागले. त्यात पंजाबातील बेरोजगारी आणि ड्रग माफियांचा उदय या समस्यांनी गेली दहा वर्षे थैमान घातले आहे. याचा फ़ायदा घेउन पाकिस्तान पंजाब मध्ये दहशतवात पुन्हा पुनरजिवित करण्याचा प्रयत्न करत आहे

काश्मीर फुटीरतावाद्यांचा खलिस्तानला पाठिंबा

पंजाब हे काश्मीरच्या शेजारचे राज्य आहे, आणि स्वतंत्र काश्मीरला सक्रिय पाठिंबा देणारा खलिद आवान हा पकिस्तानी वंशाचा कॅनडियन नागरिक 'खलिस्तान कमांडो फोर्स'ला शस्त्रपुरवठा केल्याचा आरोप सिद्ध होऊन अमेरिकेतील तुरुंगात 14 वर्षांची सजा भोगत आहे.

पंजाब स्वतंत्र झाल्यास स्वतंत्र काश्मीर निर्माण करणे सोपे जाईल अशी अटकळ बांधून काश्मीर फुटीरतावादी खलिस्तानला पाठिंबा देत आहेत. ज्यावेळेस खालिस्तान दहशतवाद चळवळ भारतात सुरु झाली, त्यावेळी एक प्रमुख नेते व समर्थक कट्टवादी जगजीतसिंह हे कॅनडात राहात होते व अनिवासी भारतिय होते. कॅनडामध्ये एका भारतीय मंत्र्याचा खून करण्यात आला आणि आपले एक विमानही पाडले होते. अशा प्रकारचे प्रयत्न अनेक देशात होत आहेत.

खालिस्तानी दहशतवादी भिंद्रनवाले यांचे उद्दातीकरण पंजाबमधील काही संस्थांकडुन करण्यात येत आहेत. पंजाबमध्ये अनेक ठिकाणी त्याकरता पोस्टर लावली गेली. या कागदपत्रांमध्ये पंजाब पोलिसांना आवाहन करण्यात आले होते की त्यांनी पंजाबच्या मुख्यमंत्र्यांचे आदेश पाळू

नये. या पत्रकातून त्यांना बंड करण्यास सांगत होते. खालिस्तानवाद्यांचे साहित्य, फोटो गुरुद्वाराबाहेर विक्रीला ठेवण्यात येते,मात्र अशा प्रकारे त्यांचा फोटो दरबार साहिबमध्ये लावण्याचा प्रयत्न हा पहिल्यांदाच होतो आहे. त्यांचे उद्दात्तीकरण करुन आणि खालिस्तानविषयी तरुणांना भडकवून खालिस्तानी दहशतवाद पुन्हा सुरु करण्याचा प्रयत्न केला जात आहे. भारतीय शिख हे देशप्रेमी आहे. पण काही वाट चुकलेल्या शिखांच्या संघटना अमेरिका, युरोप आणि कॅनडा मध्ये तयार होत आहेत.

भारतविरोधाचा बीमोड कसा करावा?

खोटी माहिती सर्वदूर पसरवून शिखांवर भारतात अन्याय होत असल्याची बातमी पसरवली जाते. या सर्वच घटनांवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. कॅनडात होणार्या भारतविरोधी खालिस्तानी कारवायांवर लक्ष ठेवून त्याला विरोध झाला व्हायला हवा.दुसर्या देशामध्ये भारतविरोधी कारवाया करणार्यांविरोधात कारवाई अनेक स्तरांवर करावी लागेल. इस्राईलचे गुप्तहेर खाते देशाच्या शत्रुंना इतर देशांत जाऊन पकडते तसे आपण करु शकतो का? मुत्सद्देगिरीच्या जोरावर अशा देशांना भारतविरोधी कारवायांवर लक्ष ठेवून त्या त्या देशातील कायद्यांतर्गत त्यांच्यावर कठोर कारवाई करावी लागेल. आमच्यावर अन्याय होतो म्हणुन जो दुष्प्रचार केला जातो त्याविरोधात त्या देशातील स्थानिक माध्यमांतून लिहून हा विरोध मोडून काढण्याची गरज आहे. खालिस्तान समर्थकांना आंतरराष्ट्रीय कायद्यांतर्गत पकडून त्यांच्यावर कारवाई करण्याची गरज आहे. भारतविरोधी कारवाया या परदेशी भुमीवर होत असताना त्यावर लक्ष ठेवून त्यावर हल्ला व प्रतिहल्ला करणे गरजेचे आहे. भारत सरकार परदेशातिल भारतविरोधी कारवाया थांबवण्याचा प्रयत्न करेल का?.

हिंसक आंदोलनात सुरक्षा सामान्य माणसांची

August 29, 2018 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा, विशेष लेख

सर्वात मोठा दुष्परिणाम सामान्य माणसांवर

राज्यकर्त्यांचे सर्वात महत्त्वाचे काम आहे सामान्य जनतेची सुरक्षा करणे. त्याकरता कायदा सुव्यवस्था राखणारे पोलिस अजुन सक्षम करण्याची गरज आहे. गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रात आणि एकूण देशात हिंसाचाराच्या घटना वाढल्या आहेत. या हिंसाचारात सर्वाधिक बळी जातात ते सामान्य माणसांचे. स्त्रिया, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक जे हिंसाचार घडत असलेल्या ठिकाणी अडकतात आणि ते मारहाण, जाळपोळ याला बळी पडतात. कामाकरिता बाहेर पडलेल्या लोकांना अचानक उसळलेल्या हिंसाचाराला बळी पडावे लागते. मग तो हिंसाचार भीमा कोरेगावचा हिंसाचार, औरंगाबादेतला गोंधळ असो, दूध आंदोलन, शेतकरी आंदोलन आणि आता मराठा आरक्षणातला हिंसाचार, यामध्ये सामान्य माणसांची सुरक्षा धोक्यात आली आहे. ज्यानी ही आंदोलने पुकारले त्यात शेकडो कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. सरकारी संपत्तीचे,राज्य परिवहनच्या बसेस, खाजगी वाहाने आणि खाजगी संपत्तीचे नुकसान झाले आहे. एसटी हे गरीब सामान्य जनतेच्या प्रवासाचे महत्त्वाचे साधन मानले जाते. त्यामुळे एसटी नुकसानीचा सर्वात मोठा दुष्परिणाम हा सामान्य माणसांवर होतो.

शाळेतील विद्यार्थ्यांचे नुकसान होते.रोजची रोटी रोज कमावणार्यांना रोजी रोटी मिळत नाही.आजारी पडलेल्याना हॉस्पिटल किंवा डॉक्टरांकडे जाता येत नाही. प्रवासाकरता गावाच्या बाहेर पडलेल्याचे रस्ते बंद पडतात. राज्यातील महत्त्वाचे रस्ते बंद केल्यास अर्थव्यवस्थेचे प्रचंड प्रमाणामध्ये नुकसान होते.

सर्व हिंसाचारात सामान्य नागरिक बळी

गुजरात मध्ये पटेलांचे, पाटीदारांचे आंदोलन, हरियाणात जाट आंदोलन, राजस्थानात गुज्जरांचे आंदोलन या सर्वांतील हिंसाचारात सामान्य नागरिक मारले गेले व जखमी झाले. सार्वजनिक

संपत्तीचे मोठे नुकसान झाले. तिथल्या स्थानिक अर्थव्यवस्थेलाही धक्का पोहोचला. त्यामुळे महागाई वाढली.हिंसक आंदोलने हा सुद्धा दहशतवादाचा एक प्रकार मानला पाहिजे. देशातील एखाद्या समाजावर अन्याय होत असेल तर त्या अन्यायाला प्रत्युत्तर म्हणुन हिंसा हा उपाय नाही. भारतीय कायदा हिंसाचाराचे समर्थन करत नाही. एखाद्या समाजाला, संस्थांना सरकारकडून कोणतीही मागणी मान्य करुन घ्यायची असेल ती कायद्याच्या चौकटीत राहून केली पाहिजे. अशा प्रकारचा बंद आणि हिंसाचारामुळे फक्त देशाचेच नुकसान होते. येत्या 2018-2019 मध्ये अनेक निवडणुका होत आहेत. त्या पार्श्वभुमीवर या हिंसांचे, आंदोलनांचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. अशा प्रकारच्या हिंसाचाराला रोखून सामान्य माणसाचे रक्षण केले पाहिजे. गेल्या काही काळात झालेल्या हिंसाचाराला अनेक संस्था,अनेक राजकिय पक्ष जबाबदार आहे.टीव्ही मिडीया,सोशल मिडीया, वृत्तसंस्था अशा प्रकारच्या हिंसक आंदोलनांना विना कारण अतिरेकी प्रसिध्दी देतात आणि एकच एक दृष्य, फोटो सतत दाखवली जातात. या प्रकारचे वृत्तांकन थोडक्या शब्दांत न करता सतत तेच ते दाखवून त्यात तेल ओतण्याचे काम का केले जाते?.हिंसाचाराच्या बातम्यांना पान १ वरुन काढुन पान आठवर नेले पाहिजे.

मतपेटीच्या राजकारणासाठी हिंसाचार

अशा प्रकारच्या हिंसाचाराला तोंड देण्याचे सामर्थ्य पोलिस,राजकिय पक्ष/राज्यकर्त्यांमध्ये असलेच पाहिजे. मतपेटीच्या राजकारणासाठी हिंसाचार कोण घडवतो आहे हे माहित असूनही तो थांबवण्याचा प्रयत्न केला जात नाही. अशा हिंसक आंदोलनात एक लक्ष्मणरेषा असली पाहिजे.लक्ष्मणरेषा ओलांडली जाते जेंव्हा आंदोलक सार्वजनिक आणि खाजगी संपत्तीची नासधूस करतात. तेव्हा त्यांना थांबवणे हे पोलिसांचे,राजकिय पक्ष/राज्यकर्त्यांचे व सर्वांचे काम आहे. मतपेटीसाठी हे सर्व गप्प बसतात. आंदोलक एकत्र येतात आणि हिंसाचार भडकवण्याची साधने बरोबर बाळगतात. पोलिसांची संख्या कमी पडते. त्यामुळे हिंसाचार नियंत्रित करण्यावर मर्यादा येतात. जिथे हिंसाचार होतो तिथे पोलिस आणि सुरक्षा दले यांची संख्या वाढवण्याचीही गरज आहे. जेणेकरून रस्त्यावरील लोकांची सुरक्षा शक्य होईल.

व्हिआयपी सुरक्षेचे प्रस्थही कमी करुन अधिक पोलिस कर्मचार्यांना सामान्य माणसाच्या रक्षणासाठी रस्त्यावर आणले पाहिजे. पोलिसांकडे अनेक व्यवस्थापकीय कामे आहेत. त्यातुन त्यातून पोलिसांना मुक्त करता येईल का हे सुद्धा तपासले पाहिजे.

पोलिसांची संख्या लगेच वाढवण्यासाठी

आज महाराष्ट्रात अडीच ते तीन लाख निवृत्त पोलिस कर्मचारी आहेत त्यामधून 50 ते 60 हजार व पोलिस अधिकारी ज्यांनी आपल्या कारकीर्दीत उत्तम काम केले होते आणि ते शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या आज सक्षम आहेत, त्यांना पुन्हा पोलिस दलात काही काळासाठी का आणले जाऊ शकत नाही. अर्थातच त्यांची पोलिसदलात काम करण्याची तयारी हवी.

राज्याकडे होम गार्डची संख्या वाढवून कार्यालयीन कामकाज,व्हीआयपी सेक्युरीटी त्यांना दिल्या जाऊ शकतात. प्रशिक्षित पोलिस हे रस्त्यावर हिंसाचाराचा सामना करण्यासाठी उतरु शकतात. निवृत्त अनुभवी पोलिसांचा वापर आपण का करु शकत नाही?

हिंसाचाराविषयी गुप्तहेर माहिती मिळणे महत्त्वाचे आहे. त्याकरता गुप्तहेर खात्याची ताकद व क्षमता वाढवणे आवश्यक आहे. त्याकरता निवृत्त सक्षम गुप्तहेर अधिकार्यांचा पुन्हा एकदा वापर करु शकतो. आज जम्मू काश्मिर, ईशान्य भारतात आणि इतर ठिकाणी देशात अनेक गुप्तहेर संस्था काम करतात. त्यात गुप्तहेर खाते, रिसर्च अनालिसिस विंग, सैन्य गुप्तहेर खाते, महसूल, आयकर या विभागांची गुप्तहेर खाती कार्यरत असतात. त्यांनी प्रत्येक महिन्याला एकत्र येऊन गुप्तहेर माहितीचे आदानप्रदान केले पाहिजे.पोलिस अधिकार्यांनी गुप्तहेर संस्थांना कोणती माहिती मिळवावी याविषयी काम द्यावे. हिंसक आंदोलनाची आगाऊ माहिती मिळवावी. त्यासाठी सर्व गुप्तहेर संस्थांची बैठक राज्य, जिल्हा पातळीवर होणे गरजेचे आहे.अशा प्रकारच्या बैठका या मुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलिस संचालक,जिल्हा पालक मंत्री आदींनी घेतल्या पाहिजेत.

टेक्निकल इंटेलिजन्सने संशयित दंगलखोरांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने लक्ष ठेवणे शक्य आहे. या सर्व उपायामुळे पोलिसांना कुठे काही गडबड होणार असेल तर त्याची माहिती आधीच कळेल व ते हिंसाचार वेळेवर थांबवु शकतिल.

अर्धसैनिक दले, सैन्य,तैनात करा

राज्यात सीआरपीएफ, बीएसएफ यांचे प्रशिक्षण केंद्रे आहेत तसेच गरज भासल्यास गृहमंत्रालयाकडून आपल्याला अर्धसैनिक दले तैनात करता येतिल. म्हणून राज्यातील राज्य राखीव पोलिस दलाबरोबर या अशा प्रकारच्या अर्धसैनिक दलांची मदत घेऊन लवकरच हिंसाचार थांबवला पाहिजे.हिंसाचाराची व्याप्ती राज्यभर पसरली तर पोलिसांची संख्या कमी पडते.

आज राज्यात सैन्याच्या अनेक कॅन्टोन्मेंट मुंबई, पुणे, भुसावळ, औरंगाबाद,नाशिक अशा ठिकाणी आहेत. सैन्याचा वापर पण हिंसाचार गंभिर झाल्यास केला जाऊ शकतो. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सैन्याचा वापर देशात अनेकदा केला गेला आहे. जाट आणि गुज्जर आंदोलनाच्या वेळी हरियाणा आणि राजस्थानमध्ये पोलिसांना हिंसाचार थांबवता आला नाही, तेव्हा सैन्याला पाचारण करण्यात आले होते. म्हणून हिंसाचार अधिक भडकण्याची वाट न पाहता तो नियंत्रित करण्यासाठी कारवाई केली पाहिजे.

आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करणे गरजेचे

पोलिसांना दंगेखोरांवर काबू करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे गरजेचे आहेत. हे तंत्रज्ञान जम्मू काश्मिर पोलिस वापरत आहेत. यामुळे पोलिस दंगलखोरांवर काबू मिळवू शकतिल. सध्या अश्रुधुराशिवाय दंगलखोरांवर काबू मिळवण्याचे इतर अनेक उपाय आहेत.

आंदोलक संघटनांना आंदोलनात झालेले नुकसान भरून देणे न्यायालयाने बंधनकारक केले पाहिजे. जेणेकरून भविष्यातील हिंसाचार, नुकसान टाळण्यास मदत होईल. आंदोलकांवर खटले जलदगती न्यायालयात चालवून आंदोलकांना शिक्षा मिळाली पाहिजे, जेणेकरून कायद्याची भीती आंदोलकांना बसेल.

यात सोशल माध्यमे, छापील माध्यमांनी आंदोलनांचे वार्तांकन करताना हिंसाचाराला महत्त्व न देता वार्तांकन करावे. हिंसक आंदोलनांला अनेक संस्था आर्थिक मदत करतात. त्यांच्यावरही कारवाई करावी. जसे राष्ट्रीय गुप्तहेर संस्थेने हुरियत कॉन्फरन्सच्या आर्थिक नाड्या आवळते आहे तशाच पद्धतीने या आंदोलकांच्या आर्थिक नाड्या आवळल्या पाहिजेत.

स्थानिक नागरिकांना गुप्त माहिती देण्यासाठी एक टोल फ्री फोन क्रमांक दिला पाहिजे. जेणेकरून सामान्य नागरिक त्यांच्याकडील माहिती जलद पोलिसांपर्यंत पोहोचू शकतात. त्यांच्या नावाची गुप्तता बाळगली पाहिजे. मोबाईल फोन वरून हिंसक घटनेचे चित्रण करुन पोलिसांकडे पाठवले पाहिजे. जेणेकरुन हिंसक आंदोलकांना पकडणे सोपे जाईल. हिंसक आंदोलक आंदोलनाचे विविध मार्ग अनुसरतात पोलिसांनीही एक पाऊल पुढे जाऊन हा हिंसाचार थांबवला पाहिजे. त्याकरता सामान्य माणसांनीही पोलिसांचे कान डोळे व बनले पाहिजे.म्हणुनच हिंसक आंदोलने थांबवण्याकरता सर्व समावेशक उपाय जरुरी आहेत.

छत्रपतींच्या रणनितीचा वापर करुन देशासमोरची आव्हाने कमी करा

March 3, 2018 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा, विशेष लेख

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती महाराष्ट्रात अत्यंत मोठ्या प्रमाणात साजरी होत असते. शिवछत्रपतींनी अनेक अद्भुत भासणारे पराक्रम करून आदिलशहा, कुतुबशहा व मोगलांस जेरीस आणून स्वराज्याची स्थापना केली. शिवरायांच्या या पराक्रम गाथेतील एक सुवर्णपान म्हणजे, मध्यरात्री बारानंतर महाराजांनी शाहिस्तेखानावर घातलेला छापा!

शाहिस्तेखान स्वराज्यात धुमाकूळ घालत होता.शाहिस्तेखानाने तळ ठोकलेल्या लाल महालावरच हल्ला करण्याची, कल्पनेच्याही पलीकडील अशी योजना आखली. शिवरायांनी त्यांचे बालपणीचे सवंगडी बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी देशकुळकर्णी यांच्यासह काही निवडक, जीवाला जीव देणाऱ्या अत्यंत शूर साथीदारांसह लाल महालावर छापा घातला. महाराज, बाबाजी व चिमणाजी यांना लाल महालाची माहिती होती. त्यांनी भटारखान्यातून महालात सहज प्रवेश केला व कापाकापीस सुरुवात केली. अंधाराचा फायदा घेऊन खान पळण्याच्या बेतात होता. परंतु महाराजांनी चपळाईने त्याच्यावर घाव घातला.त्याच्या हाताची तीन बोटेच तुटली, उजवा हात थोटा झाला.

शाहिस्तेखानावरील यशस्वी झडपेआधी सतत तीन वर्षे महाराजांनी अनेक संकटांना तोंड देत त्यांच्यावर विजिगीषु वृत्तीने मात केली. अफझलखानाशी मुकाबला करण्यासाठी महाराज राजगडावरून ११ जुलै १६५९ रोजी प्रतापगडाकडे जाण्यास निघाले आणि महाराजांच्या आयुष्यातील, स्वराज्याच्या उभारणीतील एका महत्त्वपूर्ण अवघड कालखंडास सुरुवात झाली. अफझलखान वधानंतर महाराजांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अथक मेहनत करून स्वराज्य वाढवले. याच दरम्यान त्यांनी विलक्षण धाडसाने सिद्दी जौहरच्या वेढ्यातून आपली सुटका करून घेतली होती.

स्वत: आघाडीवर राहून योजना कार्यान्वित करणे हे देदीप्यमान यशाचे सूत्र

मानवी स्वभावाचा अतिसूक्ष्म अभ्यास महाराजांनी केला होता. अहंकारी, आत्ममग्न माणसे खोट्या स्तुतीला भाळतात, मोहात पडतात याचा उपयोग करून अफझलखानास त्यांनी आपल्याला सोयिस्कर अशा रणक्षेत्रात खेचून आणले. तहाचा आभास निर्माण करून सिद्दी जौहर व त्याच्या सैन्याला गाफील बनवून ते पन्हाळ्यावरून निसटले. शाहिस्तेखानाला स्वराज्यातून हुसकावण्यासाठी आक्रमण हेच संरक्षणाचे उत्तम साधन असते व अनपेक्षित धक्क्यांतून सावरताना बेसावध माणसाला वेळ लागतो (धक्का तंत्र) याचा यशस्वी वापर त्यांनी केला. काटेकोर नियोजन, वेळेची अचूक निवड, वेगवान हालचाली व स्वत: आघाडीवर राहून योजना कार्यान्वित करणे हे त्यांच्या देदीप्यमान यशाचे सूत्र होते. बलाढ्य शत्रूंचा पराभव त्यांनी युक्तीच्या व बुद्धीच्या बळावर आपल्या मर्यादित सामर्थ्याचा कौशल्याने उपयोग करून केला.

शिवरायांचे पराकोटीचे प्रगल्भ हेरखाते

छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत आदर्श राज्यव्यवस्था निर्माण केली. हे स्वराज्य निर्माण करताना शिवरायांसारख्या द्रष्ट्या राजाचे 'गुप्तचर विभाग' या राज्याच्या महत्त्वाच्या अंगाकडे दुर्लक्ष होणे शक्य नव्हते. शिवरायांचे हेरखाते एवढे पराकोटीचे प्रगल्भ होते की, त्यांची तुलना जगातल्या कुठल्याही हेरयंत्रणेशी होऊ शकत नाही.

एखाद्या मोहिमेचे पूर्वनियोजन तसेच प्रत्यक्ष मोहिमेची आखणी यात हेरांचे महत्त्वपूर्ण योगदान असे. ज्यायोगे शिवरायांचे पुढील बरेचसे काम सोपे व सुलभ होई. पराक्रम, धाडस व हेरांनी योग्य वेळी पुरवलेली माहिती या समन्वयावर शिवराय अत्यंत यशस्वीपणे मोहीम पूर्ण करीत असत!

बहिर्जी व त्यांच्या साथीदारांनी इतिहासात महत्त्वाची कामगिरी बजावली

शिवरायांच्या संकल्पनेतील हेरखात्याला प्रत्यक्षात मूर्त स्वरूपात आणले ते बहिर्जी नाईक यांनी! अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्ता, समयसुचकता, धाडसीपणा, साहसाची अंगभूत जोड आदी गुणांवर बहिर्जी व त्यांच्या साथीदारांनी इतिहासात अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली आहे यास तोड नाही! बहिर्जी नाईक, सुंदरजी, कर्माजी, विश्वास मुसेखारेकर, विश्वास दिघे, विठोजी माणके, अप्पा रामोशी, महादेव अशी काही नावे जरी आपल्याला परिचित असली तरी शिवरायांच्या गुप्तहेर खात्याची पूर्ण माहिती इतिहासाला नाही. इतिहास इथे मुका होतो. कदाचित हेच शिवरायांच्या हेरगिरी खात्याचे यश म्हणावे लागेल!

शिवरायांचे हेरखाते हे आजच्या कुठल्याही देशाच्या 'इंटेलिजन्स ब्युरो'पेक्षा कमी नव्हते. किंबहुना काकणभर सरसच ठरेल. शिवराय व बहिर्जी यांच्या बुद्धिचातुर्यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिमेच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून काही मार्गदर्शक तत्त्वांचा वापर केला जाई.

वेशांतर करून हेरगिरी करणे हा शिवरायांच्या हेरखात्याचा, पर्यायाने बहिर्जी नाईक आणि इतर हेरांचा हातखंडा होता. बहिर्जी व त्यांचे हेर परमुलखात, साधू, भिकारी, सोगांडे, गोंधळी, जादूगार, भविष्य सांगणारे, ज्योतिष इत्यादी वेषांतर करून इत्थंभूत माहिती घेत असत. ही वेषांतरे इतकी चपखल असत की प्रत्यक्ष शत्रूलासुद्धा यांचा थांगपत्ता लागत नसे. स्वराज्यापासून अनेक कोस दूर असलेल्या सुरतेची माहिती काढणे हे अत्यंत धोकादायक काम, परंतु बहिर्जीच्या नेतृत्वाखाली विठोजी माणके, अप्पा रामोशी हे बाबुल, मोमीन व रामशरण या नावाने सुरतेत वावरत होते. यात मोमीन म्हणजे बहिर्जी भिकाऱ्याच्या वेशात, तर विठोजी माणके म्हणजे बाबुल नावाने घोड्याला नाल लावण्याचे काम तर अप्पा रामोशी रामशरण या नावाने वावरताना सुरतेची खडान्खडा माहिती काढली व पुढे शिवरायांनी आपले काम फत्ते केले!

सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ हेरयंत्रणा

इतक्या जुन्या काळात आजच्यासारखे मोबाईल, विविध गॅझेट्स, वेबकॅम, सेटॅलाईट नसताना, तंत्रज्ञानाची जोड नसताना बहिर्जी नाईक व त्यांच्या हेरांनी मिळालेल्या माहितीचे संकलन, विश्लेषण इतक्या अचूकपणे कसे केले असेल! परमुलखातील भौगोलिक ज्ञान मिळवून प्रतिस्पर्धांच्या सणावारांची, बलस्थाने, कमकुवत स्थाने यांची माहिती योग्य वेळेत घेऊन ती महाराजांना योग्य वेळेत कशी दिली असेल ?

बहिर्जी आणि त्यांची त्यांच्या काळातील सर्वोत्तम हेरयंत्रणा निर्विवाद सर्वश्रेष्ठ होती यात कोणाचेही दुमत होणे नाही. स्वराज्यावर सर्वांत पहिले व भीषण संकट घोंघावत आले ते अफजलखानाचे. याप्रसंगी सर्वांचीच कसोटी पणाला लागली होती. मात्र अशाप्रसंगी बहिर्जी व त्यांच्या हेरांमार्फत शिवरायांना खानाची, खानाच्या गोटाची व त्यांच्या मनसुब्यांची माहिती अचूक मिळाली. इतकेच नव्हे तर भेटीची कलमे ठरवायला गेलेल्या गोपीनाथ पतांच्या माध्यमातून अफझलखानाच्या डेऱ्यामध्ये कशाची चर्चा चालू आहे, इतकेच नव्हे तर खानाचे अंगरक्षक कोणे होते, सय्यद बंडाची माहिती, खानाचे मनसुबे काय आहेत ही माहिती हेरखात्याने अचूकपणे काढली. या जोरावर सय्यद बंडाला पर्याय म्हणून जीवा महालाला उभे केले गेले; तर खान अंगचटीला आला तर त्याच्याच ताकदीचा विसाजी मुरंबकदेखील अंगरक्षकांत सामील केला होता. हे निर्णय किती अचुकपणे घेतले गेले याची साक्ष आपल्याला पटते!

पुढे पन्हाळगड प्रसंगात शिवरायांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी बहिर्जी नाईक व त्यांच्या हेरांमार्फत पन्हाळगड, सिद्धी गौहरच्या वेढ्यांची अचूक व तंतोतंत माहिती शिवरायांच्या हेरखात्याने काढली व त्यानंतरच शिवराय पन्हाळ्यावरून निसटू शकले!

गुप्तहेरांच्या संदर्भात केलेली मांडणी आजच्या काळापेक्षाही आधुनिक

त्यांच्या युद्धनीती, राजनीती, समाजनीतीमध्ये अनेकदा कौटिल्याच्या नीतीचे प्रभाव दिसतात. सुरत लूट, बसनुरची स्वारी, आग्रा-भेट व सुटका, दक्षिण दिग्विजय अशा अनेक घटनांमध्ये मोहिमांमध्ये सुरक्षित मार्ग शोधण्यापासून शत्रूच्या हालचालीची बित्तमबातमी घेऊन ते सुरक्षितपणे पोहोचवणे या गोष्टी मुरब्बी हेर व हेरखाते असल्याशिवाय संभवनीय नाही!

छत्रपतींच्या रणनितीचा वापर

घसरत चाललेल्या नीती मूल्यांबरोबर, जोर धरत असलेली स्वार्थी वृत्ती, व्यभिचार, स्त्रियांवरील अत्याचार, शिक्षणाचे बाजारीकरण, बेरोजगारी, आर्थिक विषमतेतील वाढती दरी आणि समाजातील तेढ. असा कल्लोळ आजूबाजूला दिसत आहे. या सगळ्या परिस्थितीला राजकारण आणि राजकीय पक्षांना जबाबदार ठरवून समाजातील प्रत्येक घटक आपले उत्तरदायित्व झटकण्याचा प्रयत्न करत आहे. पण सगळ्यात मी कुठे असं स्वतःच मूल्यमापन करण्याची तसदी मात्र घेत नाही. या सामाजिक असमतोलात आपण किती जबाबदार आहोत हे, जाणून घेण्याची तसदी घेतली तर, प्रत्येकाला आपल्या शिवाजी महाराजांचा विचार आपल्या कृतीतून हरवला आहे यांची जाणीव होईल. ही जाणीव होणं कदाचित नव्या समाज निर्मितीच बीज असेल.

शिवाजी महाराजांच्या कार्यपद्धती पाहिले की, दूरदृष्टी असलेली माणसे कोणत्याही काळात जन्माला आली तरी कालातीतच असतात आणि म्हणूनच शिवरायांचा आठव केवळ घोषणा किंवा जयजयकारांच्या गदारोळात न अडकता शिवरायांच्या कर्तृत्वगुणांची आठवण ठेवणे जरुरी आहे.

देशप्रेम ही केवळ सोयीने वापरण्यापुरती किंवा, पोलिसांवर, लष्करांवर सोपविलेली गोष्ट नसावी. आज आपला देश सुरक्षित आहे का? त्यासंदर्भात देशासमोर कोणती आव्हाने आहेत आणि छत्रपतींच्या रणनितीचा वापर करुन ही आव्हाने कमी करु शकतो का? याचा विचार केला पाहिजे.

सॅबोटाज ,सबव्हर्जन आयएसआयची नवी रणनिती

February 5, 2017 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) राष्ट्रीय सुरक्षा

पाकिस्तानने आपल्याविरुद्ध पुकारलेल्या छुप्या युद्धाचा आणखी एक प्रकार नेपाळमध्ये पकडलेल्या आयएसआय एजंटाकडून समोर आलेला आहे. देशाविषयीची संवेदनशील माहिती शत्रूपर्यंत जायला नको (सिक्युरिटी ऑफ इन्फर्मेशन), नागरिकांना दुष्कृत्य करण्यास प्रवृत्त करणे (सबव्हर्शन) आणि राष्ट्रीय मालमत्तेचे नुकसान (सॅबोटाज) या तीन पातळ्यांवर पाकिस्तानी आयएसआय सध्या आपल्या देशाला धोका पोहोचवत आहे.

आंध्र प्रदेशमधील कुनेरूजवळ जगदलपूर – भुवनेश्वर हिराखंड एक्सप्रेसचे आठ डबे रुळावरुन घसरल्याने २६ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची घटना घडली.

अपघाताच्या या घटनांमागे घातपाताची शक्यता व्यक्त होत असून पाकिस्तानची गुप्तहेर संस्था आयएसआय आणि भारतातील नक्षलवादी संघटनांनी हातमिळवणी केली आहे.ज्या परिसरात हा अपघात झाला तो परिसरत नक्षलप्रभावित असून या परिसरात नक्षलवाद्यांनी शहीद दिवस साजरा करण्याचे आवाहन ही केले होते. रेल्वे रुळांत बिघाड घडवून हा अपघात घडवून आणण्यात आला असावा.

या रेल्वे मार्गावरून एक मालवाहतूक रेल्वे १० वाजून ५ मिनिटांनी गेली होती. १० वाजून ४० मिनिटांनी रेल्वे कर्मचाऱ्यांनी या मार्गाची तपासणी ही केली होती, त्यानंतर १० वाजून ५२ मिनिटांनी आणखी एक रेल्वे याचा मार्गावरून गेली. पण ११ वाजून १५ मिनिटांनी आलेल्या हिराखंड एक्सप्रेसला मात्र अपघात झाला. दोन्ही बाजुचे ट्रॅक ज्या पद्धतीने तुटले आहेत, तो प्रकार संशयास्पद आहे.

गेल्या काही महिन्यांमध्ये रेल्वे अपघातात वाढ झाली आहे. नोव्हेंबर २०१६ मध्ये कानपूरमध्ये झालेल्या रेल्वे अपघातात १४० प्रवाशांचा मृत्यू झाला होता.डिसेंबरमध्ये सियालदाह – अजमेर एक्सप्रेसला अपघात झाला होता. यातील कानपूरमधील रेल्वे अपघातामागे पाकिस्तानमधील गुप्तचर यंत्रणेचा हात असल्याची बिहार पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे.

भारताने पाकव्याप्त काश्मिरमध्ये केलेल्या सर्जिकल स्ट्राईकचा बदला घेण्यासाठी कानपूर येथील दुर्घटना घडवल्याचे कबुली बिहार पोलिसांच्या ताब्यातील आरोपींनी दिला आहे. इंदौर पाटणा एक्सप्रेस आणि सियालदा अजमेर एक्सप्रेस या दोन रेल्वेच्या अपघातात उमाकांत पटेल, मोतीलाल पास्वान, मुकेश यादव या तिघांवरही रेल्वे रुळावर कुकर बॉम्ब ठेवल्याचा संशय आहे.

भारत नेपाळ सीमा धोकादायक

यापुर्वी नेपाळ पोलिसांनी आयएसआयचा हँडलर ब्रिज किशोर गिरी ,मुजाहिर अन्सारी यालाही ताब्यात घेतले. यावरून नेपाळ सीमा किती धोकादायक आहे याची गंभीरता आपल्याला समजून येईल. आत्तापर्यंत काश्मिरच्या सीमारेषेवरुन जितके दहशतवादी आत आले नसतील तेवढे दहशतवादी नेपाळ सीमेवरून घुसखोरी करत आहेत.कानपूरमधील रेल्वे अपघात पुर्वनियोजित कटाचा भाग होता. या अपघाताशी इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्स ही संबंधित आहे असे स्पष्ट आहे. या सर्व घटनाक्रमात शमशुल शुदा आघाडीवर होता. तो नेपाळमधील आपल्या एजंटच्या मार्फत बेरोजगार तरुणांना जाळ्यात ओढत होता. पैशाचे आमीष दाखवून दहशतवादी कृत्य करण्यास प्रवृत्त केले जायचे. याच पद्धतीने नेपाळमधून दोन आणि भारतातून ३ जणांना या कटात सामील केले होते. भारत नेपाळ सीमा धोकादायक बनली आहे.भारत-बांगलादेश आणि भारत-नेपाळ सीमेवरील मदरशांच्या संख्येत लक्षणीय वाढ करण्यात आलेली आहे.मदरशांचा वापर उग्रवादाचा प्रसार करण्याकरता केला जातो.सिमा सुरक्षा बल या सिमेवर तैनात आहे .त्यांना घुसखोरी थांबवण्यात अपयश आले आहे.सिमा सुरक्षा बलाने नेपाळच्या आत जाउन हस्तकांना पकडले पाहिजे.

भारतविरोधी कारवायांची माहिती

भारताच्या नॅशनल इन्व्हेस्टीगेशन आणि रॉ यांचे अधिकारी पुढील चौकशी करत आहेत. मुख्य आरोपी दुबईत पळून गेला आहे. त्याला नेपाळ सरकारच्या मदतीने भारतात आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. एका अंदाजाप्रमाणे भारतात २०० ते २५० दहशतवादी सेल असावेत, ज्यांना विविध प्रकारची दहशतवादी कृत्ये करण्यास प्रवृत्त केले जाते. प्रत्येक वर्षी २० ते २५ अशा प्रकारच्या सेलचा छडा लावून बरबाद केले जाते.

(http://www.satp.org/satporgtp/countries/india/timeline/index.html या दुव्यावर माहिती उपलध्द आहे)मात्र त्यांच्या जागी अजून नवीन सेल तयार केले जातात. या प्रत्येक सेलमध्ये पाच ते दहा दहशतवादी प्रवृत्तीचे युवक असू शकतात. मग ते आयएसआयच्या इशार्या वरुन विविध दहशतवादी कारवाया करत असतात.

२०१६ मध्ये नॅशनल इन्व्हेटिगेशन एजन्सीने ५२ भारतिय आयसिस दहशतवाद्यांना अटक केली. त्यातील १२ महाराष्ट्र १० केरळ, १० तेलंगणा, ५कर्नाटक, ४ उत्तर प्रदेश आणि पाच

पश्चिम बंगाल इत्यादी ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आले. जम्मू काश्मिर, मध्यप्रदेश, दिल्ली इथून एक एक दहशतवाद्यांना अटक केली गेली. बहुतेक अटक झालेले दहशतवादी हे २५-३५ वर्षाचे आहेत. या बहुतेकांवर जहाल विचारसरणीचा परिणाम झालेला होता. बहुतेक हे सुशिक्षित आणि चांगल्या आर्थिक पाश्र्वभुमी असलेल्या घरातून आलेले आहेत.यापुर्वी फक्त गरीब युवकच दहशतवादात सामील होत होते. आता मात्र इंटरनेटच्या जाळ्यातून फसलेले मध्यमवर्गीय अनेक युवक दहशतवादी संघटनेत सामील होत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या मधील ५०% हे अल हेदीत, ३० % तब्लगी आणि २० % देओबंदी विचारसरणीचे आहेत. त्यातील ८५ टक्के हे सुन्नी आहेत तर १५ टक्के हे इतर धर्मांतून इस्लाममध्ये धर्मांतरीत झालेले आहेत. यावरुन आयएसआय आणि आयसिस या दोन्ही संघटनांचा किती खोलवर प्रभाव पडला आहे याचा अंदाज येतो. पकडलेले गेलेले युवक हे हिमनगाचे टोक आहेत. त्याव्यतिरिक्त अनेक तरुण देशात काम करत असतील.

युद्धाची रणनिती काय

राष्ट्राची संपत्ती तीन मोठ्या भागात विभागली जाऊ शकते. पहिले राष्ट्रांविषयी गुप्त माहिती(Security of Information) शत्रुपर्यंत पोहोचायला नको. जसे – संरक्षण सिद्धता,आपल्याकडे असलेली शस्त्रे. दुसरे राष्ट्राची जनता. काही आपल्या नागरिकांना दुष्कृत्य करण्यासाठी प्रवृत्त केले जाते. ज्याला सबव्हर्जन(Subversion) म्हटले जाते. तिसरा धोका म्हणजे राष्ट्रीय मालमत्तेचे नुकसान ज्याला सॅबोटाज(Sabotage) असे म्हटले जाते.

नागपुरजवळच्या पुलगाव इथल्या दारुगोळा कारखान्यात आग लागली होती. तिथे १० हजार कोटीहुन अधिक किंमतीचा दारुगोळा खाक झाला होता. हा एक घातपात आयएसआयच्या हस्तकांनी घडवून आणला असावा.यापुर्वी दारुगोळा कारखान्यात लागलेल्या आगीचे कारण घातपात हे होते. आज आयएसआयने आपल्या देशातील कॅन्टोन्मेंट किंवा मोठ्या शस्त्र बनवणार्या फॅक्टरीच्या आसपास आपल्या हस्तकांना बसवले आहे. आपल्या गुप्तचर यंत्रणा/सुरक्षा यंत्रणा ढिल्या झाल्या की आत प्रवेश करुन मोठी घातपाताची काम ते करतात.

काय करावे

तीन पातळीवर हा बचाव करावा लागेल. राष्ट्राची गुप्त माहिती सुरक्षितच ठेवावी लागेल त्यासाठी सायबर सुरक्षा, दूरध्वनीवरील संभाषण शत्रुच्या कानी पडू नये म्हणून प्रयत्न, कॉम्प्युटरवरील माहितीचे संरक्षण,विविध सरकारी कार्यालयातिल महत्वाच्या कागज पत्राचे संरक्षण करावे लागेल.कोणी देशद्रोही नागरिक जर ही माहिती विकायचा प्रयत्न करत असेल तर त्याला पकडावे लागेल.

याशिवाय सबव्हर्शन म्हणजे युवकांचे मनपरिवर्तन करुन त्यांना दहशतवादी कृत्य करण्यास भाग पाडणे. अशा युवकांवरही लक्ष ठेवावे लागेल. कुठलाही युवक जिहादी किंवा अति डाव्या

विचारसरणीचा प्रभावाखाली येत असेल किंवा दहशतवादी संघटनेत सामील होत असेल किंवा अशा प्रकारचे कृत्य करण्यास प्रवृत्त होत असेल तर त्याला थांबवावे लागेल.पूर्ण देशावरती लक्ष ठेवणे कोणत्याही गुप्तचर यंत्रणेला शक्य नाही. त्यामुळे सामान्य जनतेने आपल्या आजुबाजुला काय सुरु आहे यावर नजर ठेवणे गरजेचे आहे.

एक मोठा धोका राष्ट्रीय मालमत्तेच्या नासधुसीचा आहे. अगदी बसस्टँड असो की रेल्वे ही राष्ट्रीय संपत्ती आहे. त्यामुळे कोणतीही संघटना किंवा युवक ही संपत्ती नष्ट करण्याचा प्रयत्न करीत असेल तर ही माहिती सुरक्षा एजन्सीला देणे आवश्यक आहे.

थोडक्यात पाकिस्तानने आपल्याविरुद्ध पुकारलेल्या युद्धाचा आणखीन एक प्रकार नेपाळमध्ये पकडलेल्या आयएसआय एजंटकडून समोर आलेला आहे. आपले खरे शत्रु चीन, पाकिस्तान, बांग्लादेश, डावे दहशतवादी/नक्षलवादी, जिहादी दहशतवादी आणि भारतविरोधी संस्था आणि भारतविरोधी नागरिक आहेत. सर्व देश एकत्र आल्यास आपण देशासमोरील बहुआयामी धोक्यांना उत्तर देण्यास समर्थ होऊ शकतो. आपसातील मतभेद कमी करुन देशवासियांनी शत्रुवर नजर ठेवण्यास मदत करावी.राजकीय इच्छाशक्ती असल्यास आणि मतपेटीचे राजकारण दूर ठेवल्यास आयएसआयला ताळ्यावर आणणे शक्य आहे.

दहशतवाद्यांपेक्षा त्यांचे समर्थक जास्त धोकादायक

November 22, 2016 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा

आपले सैन्य देशाच्या सीमांचे संरक्षण डोळ्यात तेल घालून करीत आहेत. हे करीत असताना पाकिस्तानच्या घुसखोर दहशतवाद्यांच्या हल्ल्यात अनेक जवान शहीद होत आहेत, तर काहींना दहशतवाद्यांशी लढतालढता वीरमरण येत आहे.आताही मध्यप्रदेशच्या भोपाळ मध्यवर्ती कारागृहातून `सिमी' या बंदी घालण्यात आलेल्या दहशतवादी संघटनेचे आठ दहशतवादी

रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास निसटल्याची घटना घडली. मात्र, कारागृहातून पळालेल्या या आठ दहशतवाद्यांना आठ तासांतच सोमवारी चकमकीत ठार करण्यात आल्याने पुढील फार मोठा अनर्थ टळला. या दहशतवाद्यांनी तुरुंगातून निसटताना सुरक्षा रक्षकाची गळा चिरून हत्या केली.

वाहिन्यांवर उथळ चर्चा बंद करा

भोपाळच्या तुरुंगातून सिमीचे जिहादी पळाल्याची बातमी ०१ ओक्टोबरचा सकाळी कळाली. अनेक वाहिन्यांवर मध्य प्रदेश सरकार, पोलिस आणि तिथल्या तुरुंग प्रशासनाला निष्काळजी,निक्कमे ठरवण्याची स्पर्धा चालू झाली. हल्ली जनता अशा बातम्या फारशा मनावर घेत नाहीत. कारण वाहिन्यांवर फार उथळ चर्चा चालतात आणि बातमीही सनसनाटी माजवण्यासाठीच चालते.

काही तासातच तुरुंगातून फरारी झालेल्या त्या आठ सिमी अतिरेक्यांचा खात्मा चकमकीत झाल्याची बातमी आली. मग थोड्या वेळापूर्वी जे पोलिस गाफील, नालायक व नाकर्ते होते, त्यांच्यावरच आता खोट्या चकमकीचा आरोप सुरू झाला. त्यासाठी सरकार व मंत्र्यांना जाब विचारण्याची स्पर्धा सुरू झाली.चर्चेत काही गांभीर्य नव्हते. अल्पावधीतच त्याच घटनेचे अन्य कोणी मोबाईल कॅमेर्याने केलेले चित्रण समोर आले. एक नव्हेतर तीन वेगवेगळी चित्रणे समोर आली. त्यातून चकमक खोटी ठरवण्यासाठी युक्तिवाद सुरू झाले. देशांच्या नागरिकांमधे भांडाभांडी लावणे,अतिरेकी विचार सरणीच्या लोकांना विना कारण प्रसिध्दी देणे,पुरेशी माहीती नसतांना अतिरंजीत बातम्या प्रसीध्द करणे बंद केले पाहीजे.

या दहशतवाद्यांना मध्यवर्ती कारागृहाच्या `बी' ब्लॉकमध्ये ठेवण्यात आले होते. त्यांनी पळून जाण्यासाठी चादरींचा उपयोग करत कारागृहाची भिंत ओलांडली. या सार्यांना `बी' ब्लॉकमध्ये ठेवण्यात आले होते. रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास या दहशतवाद्यांनी बराक तोडल्यानंतर मुख्य सुरक्षारक्षक रामाशंकर याची स्टिलच्या जेवणाच्या प्लेटने गळा चिरून हत्या केली. दुसर्या पोलिसाचे त्यांनी हात-पाय बांधून ठेवले होते.मानिखेडा येथे हे दहशतवादी लपले असल्याचे पोलिसांना समजले. मनिखेडा येथे काही ग्रामस्थांनी त्यांना खडसावले असता त्यांनी ग्रामस्थांवर दगडफेक सुरू केली.

ग्रामस्थांना सुरुवातीला हे लोक चोर असावेत असा संशय आला. पोलिसांनी शोधमोहीम राबवली असता नजिकच्या गावातील डोंगराळ भागात ते दडून राहिल्याची माहिती गावकर्यांनी दिली. त्यानंतर पोलिस आणि एटीएसने 10.30 वाजता भोपाळपासून 10 किलोमीटर दूर पर्वतावर या दहशतवाद्यांना घेरले. त्यांना प्रथम शरण येण्यास सांगितल्यावर पोलिसांनी गोळीबार सुरू केला. सुमारे 45 मिनिटे चाललेल्या चकमकीत सर्व दहशतवादी ठार झाले.

पोलिस, सैन्यात भरती झालेला अतिरेककडून मारला जाण्यासाठीच

आठ खतरनाक आरोपी पोलिस गोळीबारात मारले गेले, त्याची चिंता व्यक्त करणार्यांना तुरुंगात बळी घेतला गेलेल्या रखवालदाराच्या मरणाची फिकीर नव्हती.पोलिस वा सैन्यात भरती झालेला माणूस हा अतिरेकी, खुनी वा जिहादी यांच्याकडून हकनाक मारला जाण्यासाठीच जन्माला आलेला असतो, असा काहींचा समज आहे. चर्चेत मारल्या गेलेल्या तुरुंग रक्षकाच्या हत्येविषयी एक खेदाचा दु:खाचा शब्द उच्चारला नाही. तो नि:शस्त्र मारला गेल्याची कुठली वेदना बातमीत वा चर्चेत दिसली नाही; पण आठ अतिरेकी मारले गेल्यावर चिकित्सा सुरू झाली. गुन्हेगार वा घातपाती असणे म्हणजेच निरपराध असणे आणि म्हणून चकमकीत तशा कुणाचा मृत्यू म्हणजे भयंकर गुन्हा घडल्याची चर्चा होते.उंटावरुन शेळ्या हाकणार्या तद्यांना हे कळत नाही हीच खरी समस्या आहे.

यापैकी दोघे 2013 मध्येही कारागृहातून पळाले होते. 2013 मध्ये सिमीचे सात दहशतवादी खांडवा तुरुंगातून पळाले होते.त्या सात दहशतवाद्यांना तीन वर्षांनी अटक करण्यात आली होती. याप्रकरणी तुरुंग अधीक्षकासह 4 जणांना निलंबित करण्यात आले आहे. काँग्रेसने या चकमकीवर प्रश्नचिन्ह लावत घटनेच्या न्यायालयीन चौकशीची मागणी केली आहे. तर आम आदमी पक्षानेही चकमकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

मानवतावाद्यांची दहशतवादी पकड्ण्यासाठी खास पथके बनवावी

चकमक झाली तर त्यात पोलिस कसा मारला गेला नाही? कोणी पोलिस जखमी कसा झाला नाही? मारले गेले त्यांना शरण येण्याची संधी दिली होती काय? त्यांना जिवंत पकडणे शक्य असतानाही मारले काय? किती प्रश्नह विचारले जातात; पण अशा हत्यारबंद वा खतरनाक गुन्हेगारांना पकडणे म्हणजे कसा जीवावरचा खेळ असतो, याचे तरी भान प्रश्न विचारणार्यांना उरलेले आहे काय? पोलिसांनी जीवावर उदार होऊन गुन्हेगारांना सुखरूप पकडले पाहिजे, ही कुठली अमानुष अपेक्षा आहे?

मानवतेचा इतकाच पुळका ज्यांना आलेला असतो, त्यांनी आपली खास पथके बनवावीत आणि असे प्रसंग येतील, तेव्हा पुढाकार घेऊन कोंडीत सापडलेल्या दहशतवादी वा गुन्हेगारांना सुखरूप पकडण्यासाठी सज्ज रहावे. म्हणजे मग पोलिसांना खोट्या चकमकी करण्याची गरज भासणार नाही, की संधीही मिळणार नाही. किती मानवतावादी त्यासाठी आपला जीव धोक्यात घालायला तयार होतील? ज्यांचा मानवतावाद गुन्हेगारांच्या सुरक्षेसाठीच राखीव आहे आणि पोलिसांचा बळी जाण्याच्या बळावर उभा आहे, त्यांच्या कुठल्याही शब्दावर विश्वायस ठेवण्याची गरज नाही. इतकाच भोपाळच्या घटनेने दिलेला धडा आहे. कुठूनही सरकारी यंत्रणेला किंवा पोलिस सेनादलाला नामोहरम करण्यापलीकडे अशा लोकांचा कुठला अन्य हेतू नसतो.या सगळ्यांनवर कायदेशीर कारवायी केली पाहिजे.

दहशतवाद्यांचे मनोबल वाढविण्याची स्पर्धा

कैदी पळाले म्हणून सरकारची निंदा करायची.मात्र अल्पावधीत कैदी सापडले आणि चकमकीत मारले गेल्यास सरकार पोलिसांवर हत्याकांडाचा आरोप करायचा.असे बोलणारे, प्रश्नल विचारणारे किंवा शंका निर्माण करणारे ठराविक लोक; आपल्या ओळखीचे झाले आहेत. सीमेवर किंवा अन्य कुठल्या चकमकीत नागरिक वा पोलिस मारले जातात, तेव्हा यापैकी कोणी एकही अश्रू ढाळायला पुढे आलेला दिसणार नाही. विविध बॉम्बस्फोट व मुंबईतला कसाब टोळीचा हल्ला, यात शेकड्यांनी माणसे किडामुंगीसारखी मारली गेली. तेव्हा यापैकी एकही मानवतावादी पुढे आला नाही; पण त्यापैकी कसाब वा याकुब मेमन, अफजल गुरू यांना फाशी देण्याच्या वेळी आकांत करायला हीच मंडळी पुढे होती. हे आता नेहमीचे नाटक झाले आहे.जिहादी, नक्षलवादी वा दहशतवादी यांची पाठराखण करणार्यांचे चेहरे आता आपल्याला माहित आहेत. आपल्याच देशातील काही लोकात 'पोलिसांनी काय हे क्रौर्य केले? पोलिसांनी काय हे अमानुष व निर्घृण काम केले?' असे वक्तव्य करून दहशतवाद्यांचे मनोबल वाढविण्याची जणू स्पर्धाच सुरू आहे. राष्ट्रीय सुरक्षेचा हा खेळखंडोबाच आहे. त्याचे समर्थन कोणी करू नये. दिवाळीच्या धामधुमीचा फायदा घेत तुरुंगातून पळून जाण्याचा कट 'सिमी'च्या आठ अतिरेक्यांनी रचला व त्यात ते यशस्वी झाले. रामशंकर या तुरुंग रक्षकाची गळा चिरून हत्या केली. चादरीचा दोरासारखा वापर करून भिंतीवरूनच उड्या मारून सिमीचे हे अतिरेकी पसार झाले, पण भोपाळपासून जवळच पोलिसांनी त्यांना घेरले व ठार केले. प्रश्न आहे की, अतिरेकी चकमकीत मारले गेले म्हणून सरकारचे कौतुक करायचे, की तुरुंग फोडून अतिरेकी पळून गेले म्हणून सरकारवर फ़क्त टिका करायची?

कुचकामी सुरक्षा यंत्रणा व गुप्तचर विभाग

भोपाळच्या मध्यवर्ती तुरुंगात हे एव्हढे मोठे व वेगळेच कारस्थान शिजत असताना तेथील सुरक्षायंत्रणा, तेथील गुप्तहेर किंवा तत्सम यंत्रणा काय करीत होत्या?. कारण हा मोठा कट शिजत असल्याचा सुगावाच कुणाला लागू नये हे कसले द्योतक आहे? जेलमधून पळून जाण्यास यांना कोणी मदत केली याचा कसून तपास सुरू असून घरभेद्यांच्या मुसक्या आवळल्या गेल्या पाहिजेत.या अक्षम्य हेळसांडीची चौकशी झालीच पाहिजे व सत्य लवकरात लवकर बाहेर येऊन दोषींना कठोर शासन होणे गरजेचे आहे.

हे आठही दहशतवादी 'सिमी'चे आहेत व त्यांचे कारनामे राष्ट्रद्रोही आहेत. त्यामुळे त्यांना तुरुंगात इतकी मोकळीक कोणी मिळवून दिली? बाहेरून त्यांना मदत झाली आहे व याबाबत माहिती मिळवण्यात आपली सुरक्षा यंत्रणा, गुप्तचर विभाग कुचकामी ठरला आहे. भोपाळ तुरुंगात अनागोंदी होती, भिंती कमकुवत असल्याचे आता उघड झाले आहे हे गंभीरच आहे. भोपाळातील चकमककांडावर नेहमीप्रमाणे प्रश्नचिन्ह निर्माण केले जात असले तरी जे मारले

गेले ते सर्वच जण बॉम्ब बनविण्यात तरबेज होते. तुरुंग फोडून पळून जाण्यामागे त्यांचे भयंकर कारस्थान होते.

दरम्यान, कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत मध्य प्रदेश तुरुंग उपमहानिरीक्षक, भोपाळ मध्यवर्ती तुरुंग अधीक्षक, उपतुरुंग अधीक्षक आणि सहायक तुरुंग अधीक्षक या चार वरिष्ठ अधिकार्यांना निलंबित करण्यात आले आहे. याप्रकरणी अधिकार्यांचे केवळ निलंबन करून भागणार नाही तर या घटनेच्या मुळाशी जाऊन त्याला खतपाणी घालणार्यांच्या मुसक्या आवळल्या तरच सर्वसामान्यांना शासनाबाबत विश्वास वाटू लागेल.

चौकशी होण्याआधीच दहशतवाद्यांना निरपराध ठरविण्याची स्पर्धा

अजून या घटनेची चौकशी होण्याआधीच, या भयंकर दहशतवाद्यांना निरपराध ठरविण्याचा चंग बांधल्यासारखी विधाने होत आहेत. जेल तोडून पळणारे अतिशय गंभीर गुन्हे करणारे आरोपी होते, दहशतवादी होते, हे न पाहता त्यांना चकमकीत पोलिसांनी ठार का मारले? असा प्रश्न विचारला जात आहे. जेल तोडून पळून जाताना या दहशतवाद्यांनी जेलमधील मारलेल्या पोलिस शिपाई रमाशंकर यांच्याबद्दल सहानुभूतीचा एकही शब्द तोंडातून निघत नाही. जेलमधून या आठ जणांना मुद्दाम सोडण्यात आले की काय? यांना दहशतवाद्यांचे समर्थकच म्हणावे लागेल! दहशतवादी मारले गेल्याबद्दल यांना दुःख होते. पोलिस शिपाई मारल्या गेल्याचे यांना दुःख नाही. अर्थात, ज्यांची मनोवृत्ती भारतीय सैन्यांनी पाकिस्तानमधील दहशतवाद्यांवर 'सर्जिकल अटॅक' करून त्यांना ठार मारले, तर सैन्याला पुरावे मागण्याइतकी असेल, तर ते दहशतवाद्यांची बाजू घेणे साहजिकच आहे. २००८ मध्ये अहमदाबाद येथे झालेल्या बॉम्बस्फोटांच्या मालिकेत अनेक निरपराध लोक मारले गेले होते. त्यामध्ये या भोपाळ जेल फोडणार्या आठ दहशतवाद्यांचा हात होता. खांडवा येथे जातीय दंगली घडवून अनेकांचे प्राण आणि मालमत्तेचे नुकसान करण्यात कारणीभूत असल्याचा यांच्यावर आरोप होता.

राजकारणातील दहशतवाद्यांचे समर्थक धोकादायक

निरपराध नागरिकांच्या रक्ताला चटावलेले तर अधिकच भयंकर गुन्हेगार असतात. ते हिंदू आहेत की मुसलमान, हे पाहून त्यांच्याशी व्यवहार करायचा नसतो. ते गुन्हेगार आहेत, जेल तोडून पळालेले आहेत, पोलिस शिपायाचा खून करून पळालेले आहेत, अशा खुनी गुन्हेगारांना दिसताक्षणी गोळी घातलीच पाहिजे. त्यांनी प्रत्युत्तर दिले की नाही, त्यांनी पोलिसांवर गोळी चालविली की नाही, असले प्रश्न उपस्थित करून काही राजकारणी जातीय खेळ खेळत आहेत. जेवढे हे सिमीचे दहशतवादी धोकादायक आणि दोषी आहेत त्यापेक्षाही जास्त त्यांचे हे राजकारणातील समर्थक धोकादायक आणि खतरनाक आहेत. हे देशाच्या सैन्यावर संशय घेतात, हे पोलिसांवर संशय घेतात, एवढेच नाही, तर हे पाकिस्तानी मीडिया आणि पाक

सैन्यावर विश्वास ठेवतात, हे दहशतवाद्यांचा कैवार घेतात. यांना जनतेने संधी मिळताच अद्दल घडविली पाहिजे

आर्य चाणक्य याने सुमारे २५०० वर्षांपूर्वी सांगितले होते की, ज्या वेळेस देशातील गुंड, राजकीय नेते आणि बुद्धीजीवी अस्वस्थ होतील आणि कोणत्याही फूटकळ मुद्यांवरून आकांडतांडव करायला सुरूवात करतील तेव्हा त्या देशातील सरकार अत्यंत चांगले, लोककल्याणकारक असा जनताभिमुख कारभार करत आहे असे जनतेने बेमालूम समजावे. आर्य चाणक्याचे हे वक्तव्य सद्यपरिस्थितीला शंभर टक्के लागू होते आहे.

दहशतवादाला राजकीय हत्यार बनविणे गैर आहे. दहशतवाद व मानवाधिकार यांचे संतुलन कसे साधायचे? भोपाळची चकमक खरी असेल तर पोलिसांचे कौतुक केले पाहिजे आणि चमकम 'बनावट' असली तरी देशाविरुद्ध कट रचणारे व बॉम्ब बनवणारे लोक मारले गेले आहेत हे विसरू नये.अनावधाने झालेली चुक चकमकी सारख्या कारवायात माफ़ असते, पण जाणुन बुजुन घेतलेला निर्णय माफ़ केला जाउ नये.

मुख्यमंत्री चौहान यांनी या प्रकरणाच्या न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले आहे.आरोप करणार्यांना आता न्यायालयीन चौकशी समीतीसमोर साक्ष देण्यात भाग पाड्ले पाहीजे.आशा करुया की या सगळ्या पैलुवर न्यायालयीन चौकशी समीती विचार करेल

इ-पुस्तक – आव्हान भारताच्या अंतर्गत सुरक्षेचे

E-BOOK : THE CHALLENGE OF INDIA'S INTERNAL SECURITY

January 25, 2016 निनाद प्रधान परिक्षणे - परिचय, पुस्तके, राष्ट्रीय सुरक्षा



मराठीसृष्टी या आघाडीच्या आणि लोकप्रिय मराठी वेबपोर्टलवर ब्रिगेडिअर हेमंत महाजन हे गेली अनेक वर्षे "राष्ट्रीय सुरक्षा" या विषयावर नियमितपणे लेखन करत आहेत. हे लेख अल्पावधीतच आमच्या हजारो वाचकांच्या पसंतीला उतरले असून अतिशय लोकप्रिय झाले आहेत.

BUY NOW **इ-पुस्तक फक्त रु. १००/-**

"भारताची सुरक्षा" हा विषय नेहमीच लोकांच्या जिव्हाळ्याचा राहिला असून २६/११ च्या हल्ल्यांनंतर तर तो मोठ्या प्रमाणात नागरिकांच्या चिंतेचा विषयही झाला आहे. `**आव्हान भारताच्या अंतर्गत सुरक्षेचे**` या इ-पुस्तकात भारताच्या "अंतर्गत सुरक्षे"शी संबंधित लेखांचे संकलन करुन ते वाचकांपर्यंत आणले आहे. ब्रिगेडिअर हेमंत महाजन यांनी हा विषय अतिशय सोप्या पद्धतीने समजावून सांगितला आहे.

स्वत: युद्धभूमीवर शत्रूचा सामना केल्यामुळे त्यांच्या लिखाणात सुरक्षेविषयीची कळकळ आणि ढोंगी राजकारणाबद्दलची चिड जाणवते. त्यांचे लिखाण अत्यंत मोकळेपणाने आणि कोणतीही भीड न ठेवता केलेले असते. त्यामुळेच ते वाचकांना भावते. वातानुकुलित केबीनमध्ये बसून पत्रकारिता करणाऱ्या किंवा दूरदर्शन चॅनेलवर भडकाऊ चर्चा करणाऱ्या पत्रकार आणि नेत्यांपेक्षा प्रत्यक्ष सीमारेषेवर जवानांचे नेतृत्व केलेल्या एका सेनाधिकाऱ्याने सत्ताधाऱ्यांना सुनावलेले खडे बोलही वाचकाला आपलेसे वाटतात.

पोलिस-नागरिक समन्वयाची नितान्त गरज

POLICE-PEOPLE CO-ORDINATION IS NECESSARY IN INDIA

January 14, 2016 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा

पठाणकोट येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात हुतात्मा झालेल्यांना संपूर्ण लष्करी इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. त्यावेळी या शूरवीरांना श्रद्धांजली वाहण्यासाठी हजारो लोक एकत्र आले होते, त्यावेळचे दृश्य मन हेलावून टाकणारे होते. बॉम्बतज्ज्ञ असलेले लेफ्टनंट कर्नल इ. के. निरंजन यांचाही पठाणकोट येथील हल्ल्यात स्फोटके निकामी करताना मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी डॉ. राधिका व १८ महिन्यांची मुलगी आहे. सूबेदार फतेह सिंह (कॉमनवेल्थ गेम्स स्वर्ण व रजत पदक विजेते) यांच्या पार्थिवाला त्यांच्या मुलीनेच खांदा दिला.शहिदांमधले ६ सैन्याचे तर एक हवाइदलाचे होते. पठाणकोट येथील तळावर चाललेली दहशत विरोधी शोध मोहिम लेख लिही पर्यंत ९६ तासांनंतरही संपली नव्हती.

गुजरातच्या कच्छमधे देशातील पोलीस महासंचालकांची तीन दिवसीय ५०वी परिषद रविवारी संपन्न झाली.पंतप्रधान नरेंद्र मोदी पूर्ण वेळ परिषदेला उपस्थित होते. आतापर्यंतचे पंतप्रधान येत आणि एक-दीड तासानंतर निघून जात. पूर्णवेळ उपस्थित राहणारे मोदी हे पहिले पंतप्रधान ठरले आहेत.

तिन्ही दिवस झालेली चर्चा पंतप्रधानांनी गांभीर्याने ऐकल्यामुळे पोलिस वरिष्ठ अधिकार्यांना दिलासा मिळाला. तिन दिवसांत संपूर्ण देशातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती काय आहे, ती कशा पद्धतीने हाताळली जात आहे, कोणत्या त्रुटी आहेत या सर्व बाबींची माहिती त्यांनी घेतली.

पंतप्रधानांनी आपल्या भाषणात सायबर सुरक्षा, डिजिटल तंत्रज्ञान आणि सोशल मीडिया या विषयांना स्पर्श केला आणि पोलिस अधिकार्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा आपल्या कामात प्रभावीपणे वापर करण्याचे आवाहन केले. टेरोरिझम पोलिसिंग, आपत्ती व्यवस्थापन आणि पोलिस प्रशिक्षणाबाबतही पंतप्रधानांनी आपली मते मांडली.देशाचे पंतप्रधान पोलीस दलाबाबत किती गंभीर आहे, याची जाणीव महासंचालकांना झाली. अंतर्गत सुरक्षेच्या बाबतीत ही अत्यंत शुभ घटना आहे.

पोलिस संवेदनशीलता अतिशय महत्त्वाची

पोलिसांचे कर्तव्य पार पाडताना संवेदनशीलता अतिशय महत्त्वाची आहे, असे मोदी म्हणाले. पोलीस आपले कर्तव्य करताना साधारणत: संवेदनशीलता दाखवित नाहीत. देशातील कुणीही नागरिक याच्याशी सहमत होईल. जनतेला पोलिसांबाबत धाक न वाटता पोलिसांचा आधार वाटला पाहिजे. धाक गुन्हेगारांना वाटायला हवा; सर्वसामान्य नागरिकांना नाही.

परिस्थिती कुठली आहे, याचा विचार न करता, पोलीस आपल्या ठरलेल्या चौकटीत काम करतात. पोलिसांचे कार्य हे समाजातील सर्व लोकांसाठी आहे.देशातील सर्वसामान्य जनतेचे रक्षण करणे, समाजातील कुठल्याही उपद्रवी घटकापासून त्यांना आधार देणे, हे खरे पोलिसांचे मूळ कार्य आहे. त्यासाठी पोलिसांनी संवेदनशील राहून लवचिकपणे आपले कार्य केले पाहिजे, असे मोदींना सुचवायचे होते. त्यासाठी प्रसंगी लवचिकता दाखविली गेली पाहिजे. चौकट लवचिक असावी, नरम असू नये.

पोलिसांचा समाजात धाक नसला पाहिजे, असे कुणीच म्हणणार नाही. परंतु, धाक व भीती या दोन्ही वेगळ्या गोष्टी आहेत. पोलिसांबाबत समाजात भीती असेल तर त्याची कारणे पोलिसांनी शोधून काढली पाहिजेत.

पोलिसांनी आपली प्रतिमा सुधारावी

पोलीस आणि समाज यांच्यात संवाद असला पाहिजे, म्हणजे पोलिसांनी नेमके काय केले पाहिजे? स्थानिक लोकांसोबत पोलिसांचा सतत संवाद असला पाहिजे., समाजात कुणी चांगली गोष्ट साध्य केली, तर पोलिसांना त्यात सहभागी होता येईल काय, याचाही विचार पोलिसांनी केला पाहिजे. अशा व्यक्ती अथवा संस्थांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांच्या कर्तृत्वाची दखल घ्यावी, जमल्यास त्यासाठी एक छोटेखानी समारंभदेखील आयोजित करता येईल. या अशा आदान-प्रदानातून सर्वसामान्य व्यक्तींमध्ये पोलिसांना समजून घेण्याची वृत्ती वाढेल. असे झाले तर समाजातील लोक पोलीस ठाण्यासोबत स्वत:ला जोडण्याचा प्रयत्न करतील.

सर्वसामान्य जनता केवळ तक्रार करण्यासाठीच पोलीस ठाण्याची पायरी चढते. हे दळणवळण वाढले की, मी अमुक अमुक पोलीस ठाण्याच्या हद्दीतला आहे, असे लोक अभिमानाने सांगतील. थोडक्यात आज पोलिसांची जी प्रतिमा जनसामान्यांच्या मनात तयार झाली आहे, ती बदलली पाहिजे, असे मोदींना वाटते .

पोलीस म्हणून पोलिसांच्या समस्या निश्चितच आहेत. त्यांना २४ तास करावे लागणारे कर्तव्य, साप्ताहिक सुटी न मिळणे, समाजात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रसंगी जनतेचे शिव्याशाप, रोष, आक्रोश सर्व काही सहन करणे इत्यादी समस्या आहेत. पण म्हणून, त्यांना जनतेशी अतिशय कठोर वागण्याची परवानगी मिळत नाही. जनतेशी वागताना आपण सेवक आहोत, हा भाव सतत मनात असला पाहिजे.

पोलिसांनी आपली प्रतिमा सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एखादा माणूस लहानशी खबरही घेऊन आला तर त्याला सन्मानाची वागणूक मिळायला हवी. अनुभव असा आहे की, पोलिस आधी खबर देण्यासाठी आलेल्यालाच विविध प्रश्न विचारून भंडावून सोडतात.आपली जबाबदारी काय याचाही सर्व पोलिसांनी विचार केला पाहिजे. स्वातंत्र्यानंतर इतकी वर्षे झालीत, पोलीस आणि जनता यांच्यात दुरावा का आहे?.

नागरिकांनीही आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवावी

देशाच्या सुरक्षेसारख्या मुद्यावर पंतप्रधान जर एवढ्या गंभीरपणे विचार करणार असतील तर देशाच्या नागरिकांनीही आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवली पाहिजे. आपल्या अवतीभवती काय सुरू आहे, यावर बारीक नजर सर्वसामान्य नागरिकाची असली पाहिजे. भारताने इसिसच्या धोक्यापासून सतत सतर्क राहणे गरजेचे आहे.

आज इंटरनेटच्या महाजालामुळे जग खूपच जवळ आले आहे.इसिसने त्याचा लाभ उठवून तरुण-तरुणींना आपल्या जाळ्यात ओढण्याचे कारस्थान रचले आहे. त्यांच्या या कारस्थानाला भारतातीलच काही युवक आणि तरुणी बळी पडल्या आहे. परवा नागपुरात हैदराबादच्या तीन तरुणांना विमानतळावर एटीएसने पकडले. यापैकी दोघे हे यापूर्वी अन्य दोन मित्रांसह इसिसमध्ये सामील होण्यासाठी निघाले असता, कोलकाता विमानतळावर पकडले गेले होते.

इसिसचे भूत दोघांच्या मानगुटीवर असे काही बसले होते की, ते पुन्हा त्याच मार्गाने लागले आणि नागपुरात दुसर्यांदा पकडले गेले. याचा अर्थ भारतात इसिसचे स्लीपर सेल कार्यरत आहे. काही दिवसांपूर्वी यवतमाळच्या काही युवकांनी इसिसमध्ये जाण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना पकडण्यात आले. पुण्यातील एका शाळकरी मुलीने स्वत: मानवी बॉम्ब बनण्याच्या लालसेपोटी इसिससोबत संपर्क स्थापित केला होता. सायबर सेलच्या लक्षात आल्याने तिला रोखण्यात आले.

पोलिस-नागरिक समन्वयाची नितान्त गरज

तिकडे पाकिस्तानचा कुख्यात दहशतवादी हाफीज सईद यानेही भारतातील युवकांना आपल्या संघटनेत ओढण्यासाठी खास सेल सुरू करण्याचे जाहीर केले आहे. आम्हाला किती सतर्क रहावे लागेल, याची कल्पना यावी., विविध दहशतवादी गट भारताला वेढा घालण्याचा प्रयत्न करीत आहेत.ते कोणत्याही राष्ट्रप्रेमी भारतीयासाठी एक आव्हान आहे. या आव्हानाचा मुकाबला करण्यासाठी सरकार, पोलिस यंत्रणा आणि नागरिकांना एकत्र येण्याची गरज आहे.

देशातही इसिस आणि पाकपुरस्कृत दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी पोलिस यंत्रणेने संवेदनशील असावे, स्थानिकांचा विश्वास संपादन करावे. केवळ इसिस आणि पाकिस्तानच नव्हे, तर देशाला माओवाद्यांकडूनही मोठा धोका आहे.

टेक्नोसॅव्ही युवकांना आपले कान आणि डोळे बनवा

आज भारताची सायबर यंत्रणा सक्षम नाही. त्यासाठी तरुणाईची मदत घेणे शक्य आहे. आजचा शिक्षित युवक हा टेक्नोसॅव्ही आहे. इंटरनेटची माहिती असणारे हजारो युवक आज भारतात आहेत. अशा युवकांचे लहान लहान मेळावे ठाणे,विभाग, शहर आणि जिल्हा पातळीवर भरवून देशाच्या सुरक्षेसाठी त्यांची मदत घेता येईल. यातून ज्यांच्याकडे अधिक कसब आहे, त्यांनी अन्य युवकांना प्रशिक्षण देणे हा कार्यक्रमही हाती घेता येईल.

अनेक पोलिस निरीक्षकांना इंटरनेट काय आहे, हे माहीत नाही. शेकडो जिल्ह्यांमध्ये सायबर सेल नाही. आज शत्रू चोहोबाजूने भारतावर टपून बसला असताना भारताने इंटरनेटसाठी अत्यावश्यक आणि अनिवार्य साधनसामुग्री, उपकरणे, यंत्रे खरेदी करून त्यासाठी वेगळी यंत्रणा उभारण्याची गरज आहे. तरच इंटरनेटवरून कोण इसिसशी संपर्क साधत आहे, हे लक्षात येऊ शकेल.

आज भारतातच इंटरनेटचे अनेक तज्ञ आहेत. त्यांचा वापर याकामासाठी करता येईल. आज खरी गरज , प्रत्येक पोलिस ठाण्यात एक सायबर सेल निर्माण करणे. तेव्हाच इसिस आणि हाफीज सईदचे मनसुबे आम्ही उधळून लावू शकतो.पोलिसांनी गुन्ह्यांचा सामना करताना स्थानिकांना विश्वासात घ्यावे आणि या कामी तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करावा.युवकांना कट्टरवादापासून परावृत्त करण्यासाठी आंतरराज्य सीमेवर असलेल्या जिल्ह्यातील पोलिस दलांमध्येही योग्य समन्वय असावा.

२६/११ दहशतवादी हल्ल्यातील पाकिस्तानचा खरा चेहरा उघड होणार

PAKISTAN GETTING EXPOSED IN 26/11 ATTACKS

January 2, 2016 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा

१० डिसेंबरला मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्यातील प्रमुख सुत्रधार डेव्हिड हेडलीची व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे कोर्टात साक्ष नोंदविण्यात आली. यावेळी त्याने शिक्षा माफ झाली तर माफीचा साक्षीदार होण्यास तयार असल्याचे कोर्टात सांगितले. त्यानंतर कोर्टाने त्याला माफी देऊन माफीचा साक्षीदार बनविले.

मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्यातील गुन्ह्यांची कबुली त्याने दिली. यावेळी त्याने शिक्षा माफ झाली तर माफीचा साक्षीदार होण्यास तयार असल्याचे सांगितले. दरम्यान याप्रकरणी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी तपास अधिका-यांसोबत सल्ला-मसलत करण्यासाठी काही वेळ मागितला. त्यानंतर त्याला कोर्टाने माफी देऊन माफीचा साक्षीदार बनविण्याचा निर्णय घेतला. डेविड हेडली हा लष्कर-ए-तयब्बाचा या दहशतवादी संघटनेचा सदस्य असून मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्याप्रकरणी अमेरिकेतील तुरुंगात तो ३५ वर्षांची शिक्षा भोगत आहे.

हेडली ४ अटींवर माफीचा साक्षीदार बनला

26/11च्या दहशतवादी हल्ल्यातील आरोपी डेव्हिड कोलमन हेडली माफीचा साक्षीदार झाल्याने पाकिस्तानचा खऱा चेहरा उघड होणार आहेत.मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या कटाची माहिती जगासमोर येणार असून पाकिस्तान आणि आयएसआयचं पितळ उघड पडणार आहे.कारण मुंबई हल्ल्यातील एक प्रमुख आरोप डेव्हिड कोलमन हेडली माफीचा साक्षिदार बनला आहे.हा हल्ला कोणी ? आणि कसा केला ? त्याचं षडयंत्र कोणी रचलं होतं? हे सगळं काही उघ़ड होणार आहे. अमेरिकेच्या ताब्यात असलेला हेडली भारतीय कोर्टाला ही सगळी माहिती देणार आहे.

मुंबई सत्र न्यायालयात सुरु असलेल्या २६/११ च्या खटल्यात हेडली ४ अटींवर माफीचा साक्षीदार बनला आहे. जकीउर रेहमान लखवी, अबू जुंदाल आणि डेव्हिड हेडली हे तिघेजण 26/11 च्या हल्ल्याचे मुख्य सूत्रधार असल्याचं तपासात उघड झालं आहे.भारताने अमेरिकेकडे डेव्हिड हेडलीला भारताच्या ताब्यात देण्याची मागणी केली होती. तो अमेरीकन नागरीक असल्याने आणि त्याने स्वत: गुन्हे कबुल केल्याने अमेरिकेने हेडलीला भारताच्या स्वाधीन करण्यास नकार दिला. मात्र भारत सरकारच्या पाठपुराव्यामुळे त्याची व्हिडिओ कॉन्फन्र्सिंग द्वारे साक्ष घेणे शक्य झाले. जकीउर रेहमान लखवीचे पाकिस्तान सरकार, आयएसआय आणि लष्कर ए तैय्यबाशी असलेले संबंध उघड होणार आहेत. या दहशतवादी हल्ल्यातील फरार आणि संशयीत आरोपींची माहिती मिळणार आहे. हेडलीच्या साक्षीचे अनेक फायदे या खटल्यासाठी होणार आहेत.

चार अटी

१) मुंबईवर झालेल्या २६/११ या दहशतवादी हल्ल्यासंदर्भातील सर्व माहिती तुला सांगावी लागणार.
२) २६/११ दहशतवादी हल्ल्यातील तुझी काय भूमिका होती.
३) २६/११ च्या हल्ल्यातील सर्व संशयीतांबद्द्ल तू विशेष न्यायालयाला सर्व माहिती द्यायची. जी तू अमेरिका न्यायालयाला दिली आहेस ती.
४) तू माफीचा साक्षीदार झाल्यास तुला विशेष सरकारी वकील सुनावणी दरम्यान जे प्रश्न विचारतील त्याची सर्व खरी आणि स्पष्ट उत्तरे द्यावी लागतील.

इशरत जहां लष्कर ए तोयबाची आत्मघातकी दहशतवादी हल्लेखोर

गुजरात पोलिसांच्या एन्काऊंटरमध्ये मारली गेलेली इशरत जहां ही लष्कर ए तोयबाची आत्मघातकी दहशतवादी हल्लेखोर होती. इशरत हिला लष्करच्या मुजामिल यानं आपल्या ग्रुपमध्ये सामील केलं होतं.मुंबई दहशतवादी हल्याचा मास्टरमाईंड डेव्हिड हेडली यानं एनआयए आणि विधी विभागाच्या टीमला शिकागोमध्ये ही माहिती दिली. हेडलीच्या या खुलाशानंतर गुजरात पोलीस आणि केंद्राच्या भूमिकेला पृष्टी मिळाली. इशरत 15 जून 2004 रोजी जावेद शेख ऊर्फ प्रणेश पिल्लई आणि पाक तरुण अमजद अली आणि जीशान जोहर अब्दुल गनी यांच्यासोबत एन्काऊंटरमध्ये मारली गेली होती.

हेडली सध्या मुंबईवरच्या हल्ला प्रकरणी शिकागोमध्ये २५ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा भोगत आहे.इशरत जहॉ ही कॉलेज तरुणी होती, सेल्समन होती. निरपराध होती. तिला विनाकारण पोलिसांनी बनावट चकमक करून मारले. तिचा खून केला, असा कांगावा करून प्रचंड गदारोळ माजविला गेला.काही आमदारांनी आमदारनिधीतून इशरत जहॉच्या कुटुंबीयांना मदतही केली होती. वास्तविक इशरत जहॉ ही अतिरेकी होती ही काही माहिती आता हेडलीने माफीचा

साक्षीदार म्हणून साक्ष दिली आणि पुढे आली असे नाही. ही घटना घडली त्यावेळी दहा वर्षांपूर्वीही याबाबत पुष्टी करणारे अनेक मुद्दे पुढे आले होते. मात्र, या माहितीकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले गेले.

तपास यंत्रणेचे अधिकारी जेव्हा अमेरिकेत हेडलीचा जबाब घेण्यासाठी गेले होते, तेव्हा त्यांनाही हेडलीने इशरत जहॉ लष्कर ए तोयबाच्या आत्मघातकी पथकाची सदस्य होती हे सांगितले होते. मात्र, या हेडलीच्या दाव्याला सिद्ध करणारे पुरावे नाहीत, असे कारण सांगून त्याच्या जबाबातील हा भाग काढून टाकण्यात आला.
अनेक प्रसारमाध्यमे यांची विश्वाससार्हता या इशरत प्रकरणात पूर्णपणे मोडीत निघाली आहे. माफीचा साक्षीदार हेडली झाल्याने २६/११च्या हल्ल्याचा तपासात अनेक गोष्टी पुढे येण्याची शक्यता आहे. हेडलीने चार अटी मान्य केल्याने या अटींवर आधारित २६/११ च्या दहशतवादी खटल्यायाठी डेव्हिड हेडलीची जबाब ८ फेब्रवारी २०१६ रोजी रेकॉर्ड केला जाईल. या खटल्याची पुढील सुनावणी ८ फेब्रुवारी रोजी ठेवण्यात आली आहे.

हेडली आणि २६/११: अमेरिकेचे कारस्थान!

हेडली डबल नव्हे चौघांचा हा एजन्ट होता, तो अमेरिकेच्या ड्रग इनफोर्सेंट ॲडमिनीस्ट्रेशन (डीइए), द फेडरल ब्युरो ऑफइनव्हेस्टिगेशन (एफबीआय), द सेंटरल इन्टेलिजन्स एजन्सी (सीआयए) आणि लष्कर-ए-तोयबा (एलइटी)यांच्यासाठी काम करत होता. त्याचे अमेरिकेच्या गुप्तहेर खात्याशी असणारे संबंध न्यायालयात समोर येऊ नयेत यासाठी सर्व पुरावे नष्ट करण्याचा करार एफबीआयने त्याच्या बरोबर आधीच केला होता.एफबीआय त्याला भारताच्या हवाली करणार नाही आणि त्याचे अमेरिकेच्या व पाकिस्तानच्या गुप्तहेर खात्याबरोबर असणाऱ्या संबंधांबाबत भारतीय एजन्सीजने त्याला कोणतेही प्रश्न विचारू नयेत, यासाठी भारतीयएजन्सीला त्याची चौकशी करण्याची परवानगी अमेरिका कधीही देणार नाही. त्याच्या विरोधात कोणतीही उलट तपासणी होणार नाही.एफबीआयला हे महत्वाचे आहे की एलइटीला मुंबईवरील हल्ल्यासाठी जबाबदार धरावे ज्यामुळे त्यावर पाकिस्तानला कारवाई करावी लागेल.

अमेरिकेच्या यंत्रणांचा अभ्यास करा

लष्कर-ए-तोयबाविरुद्ध कारवाई करण्यासाठी पाकिस्तानवर फ़ारसा दबाव अमेरिकेने आणला नाही. त्याचे कारण हेडलीचा अमेरिकेसाठीच्या हेरगिरीत दडले आहे. थोडक्यात हेडली हा डबल एजंट होता. उद्या हेडलीची खरीखुरी माहिती जगापुढे आली तर अमेरिकेचा दुटप्पीपणा जगापुढे येईल, अशी शक्यता होती. पण अमेरिकेने मोठ्या मुत्सद्दीपणे हा प्रकरण हाताळले. अमेरिकेच्या या प्रकरणातील एकंदर वागण्यावरून भारतीय यंत्रणेने बोध घ्यायला हरकत नाही. यापूर्वी भारतात झालेल्या अनेक घातपातांचे धागेदोरे हाती आलेले नाहीत. या उलट आपले सहा नागरिक मुंबई हल्ल्यात मारले गेल्यानंतर ज्या गतीने अमेरिकेने हेडली आणि राणा

यांना अटक केली, त्यावरून या देशांची गुप्तचर यंत्रणांची ताकद किती आहे ते दिसून आले. भविष्यात अमेरिकेच्या यंत्रणांचा अभ्यास करून त्याचा आदर्श ठेवण्यात भारताला हरकत नसावी.

मुंबईवरच्या हल्ल्यातील प्रमुख आरोपी डेव्हिड हेडली हा माफीचा साक्षीदार बनला आहे. त्याच्या साक्षीमुळे मुंबईवरच्या दहशतवादी हल्ल्यामागचा पाकिस्तानचा नापाक आणि हिंस्र चेहरा जगासमोर उघडा पडणार आहे. या देशात राहूनही जिथे तिथे राजकीय फायदा पाहणाऱ्या , त्यासाठी वाट्टेल त्या थराला जाऊन देशाचे नुकसान करणाऱ्यांचे बुरखेही फाटणार आहेत

आयसिसचा भारताला धोका : प्रभाव रोखण्यासाठी उपाय योजना

ISIS DANGER TO INDIA

December 9, 2015 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा

भारतीय वंशाच्या अमेरिकी नागरिक अनिता अशोक दातार (४१) यांचा माली येथे झालेल्या हल्ल्यात मरण पावलेल्या २७ जणांमध्ये समावेश आहे. 'आयसिस'शी संबंधित ऑनलाइन कारवाया करणाऱ्या भटकळमधील (कर्नाटक) एका ३३ वर्षीय युवकाला दुबई पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. 'आयसिस'साठी ऑनलाइन भरती करण्याचे काम तो करीत होता.

फ्रान्सचे अध्यक्ष फ्रान्स्वॉ ओलांद हे पुढील वर्षी होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. जागतिक महासत्तांनी आपल्या स्वार्थासाठी वेगवेगळ्या प्रकारांचे दहशतवादी भस्मासूर जन्माला घातले, त्यांना पोसले आणि आपल्या स्वार्थासाठी या दहशतवाद्यांचा वापर सुद्धा केला. मात्र आता हेच दहशतवादी भस्मासूराप्रमाणे

खुद्द आपल्या जन्मदात्या देशांच्याच डोक्यावर हात ठेवायला निघाले तेव्हा हे दहशतवाद्यांचे जन्मदाते आता ओरडू लागले आहेत. आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या सर्वात मोठा पोशिंदा पाकिस्तानकडे सुद्धा आपला तिसरा डोळा उघडून या देशांनी बघितलेच पाहिजे.

आयसिसचा भारताला धोका आहे का?

आयसिसचा भारताला धोका आहे का? भारतातील काही मुस्लीम तरुण आयसिसकडे आकर्षित होत आहेत. तरुणांना त्यापासून परावृत्त करणे महत्त्वाचे आहे.पूर्वी आपल्याकडील भरकटलेल्या तरुणाईला नक्षलवाद, माओवाद, लष्कर-ए-तय्यबा, हुर्रियत, सिमी, इंडियन मुजाहिदीन, तालिबान, अल-कायदा, लष्कर-ए-दावा आदी संघटना आणि त्यांचे आचार-विचार आकृष्ट करीत असत. पण आता युवावर्ग इसिसच्याच्या नादी लागत आहे.

आयसिसच्या कारवायांना आळा घालायचा असेल तर त्यांची आर्थिक आणि मनुष्यबळाची रसद तोडणे हे अत्यावश्यक आहे. त्यासाठी आयसिसला जिहादी मिळतात तरी कसे या विषयाच्या मुळाशी जाऊन भिडायला हवे. त्यांची मोडस ऑपरेंडी समजावून घ्यायला हवी.

भारतातील १५० हून अधिक तरुण आयसिसच्या संपर्कात

इसिसचे हिंसाचाराचे क्रौर्यदेखील भरकटलेल्या तरुणाईला आवडत आहे. भारतातील १५० हून अधिक तरुण या संघटनेच्या संपर्कात आहे. ३३ भारतीय तरुण इसिसच्या टोळीत सामील झाले असून, त्यांनी जिहाद पुकारला आहे. यातील ६ जण हिंसाचारात मारले गेले, तर मुम्ब्र्याचा एक युवक माघारी परतला आहे. इसिसकडून लढणाऱ्या भारतीय युवकांमध्ये कल्याणचे दोन, ऑस्ट्रेलियात वास्तव्यास असलेला एक काश्मिरी, कर्नाटक व तेलंगणा राज्यातील प्रत्येकी एक तसेच ओमान आणि सिंगापूर येथील प्रत्येकी एका भारतीयाचा समावेश आहे. मध्यंतरी एक भारतीय युवतीसुद्धा इसिससाठी काम करण्यास तयार झाली होती.पण तिचा डाव भारतीय सुरक्षा यंत्रणेने हाणून पाडला.युवकांचा हा आकडा फार मोठा नसला तरी प्राण हातावर घेऊन मुस्लिमेतरांविरुद्ध लढण्याच्या प्रेरणेमागे कोण, याची मुळातून चौकशी होण्याची गरज आहे.इसिसमधल्या काहींना परत आणण्यात आपल्याला यश मिळाले आहे.अनेक शिया युवकांना इसिसविरुध्द लढाइत सामिल व्हयायचे होते.पण त्यांना वेळीच थांबवले गेले.भारत सरकार इसिसवर नजर ठेउन आहे.आणी यात आपल्याला बर्यापैकी यश मिळाले आहे.

संशयित सुरक्षा दलांच्या देखरेखीखाली

सध्या एनआयए/ गुप्तचर यंत्रणा याचे विश्लेषण करण्यात गुंतली आहे. या तरुणांना आपल्याकडे खेचण्यासाठी आयसिसने मोठय़ा प्रमाणावर सोशल मीडियाचा वापर केला आहे. त्यातही खास करून फेसबुक आणि ट्वीटर. त्या खालोखाल वापर झाला आहे तो यूटय़ूब

आणि ई-मेल्सचा. यामधून तरुणांना प्रक्षोभक माहिती पुरविण्यात आली. यूट्यूबवर अतिशय प्रक्षोभक असे व्हिडीओज टाकण्यात आले आहेत. सायबर गुन्ह्यांच्या क्षेत्रात भारताने घेतलेली भरारी इसिसवाद्यांच्या प्रगतीआड येत आहे. त्यातूनच भारतीय गुप्तचर संस्थांनी १५० भारतीयांच्या इसिसच्या संपर्कयात्रेचा भंडाफोड केला आहे. या साऱ्यांना सुरक्षा दलांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले आहे.

'डी रॅडिकलायझेशन' व 'सोशल आऊटरीच'

गेली अनेक वर्षे मुस्लीम तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण होत असलेली धर्मांधता लक्षात घेता त्याला त्यापासून परावृत्त करण्याचेही प्रयत्न मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. हे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे तुरुंगाधारित आणि समाजाधारित. तुरुंगातील अशा तरुणांची कट्टर मने वळविणे ही कसरत आहे. २ ते ४ नोव्हेंबरदरम्यान महाराष्ट्र पोलिसांनीही अशी कार्यशाळा आयोजित केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा कार्यशाळांना 'डी रॅडिकलायझेशन' असे संबोधण्यापेक्षा 'सोशल आऊटरीच' असे म्हणणे योग्य ठरेल, असे नमूद करून या प्रयत्नांना जोरदार पाठिंबा दिला.या पार्श्वभूमीवर मला काय त्याचे, असा विचार करून चालणार नाही. प्रत्येक सजग भारतीयाने सावधपणे आपल्या वस्तीतील कोणते कुटुंब, कोणती व्यक्ती अशा कारवायांमध्ये गुंतली आहे का, यावर डोळ्यात तेल घालून पाहणी केली पाहिजे. एकही भारतीय युवक इसिसच्या जाळ्यात अडकणार नाही, याची काळजी आपल्यालाच घ्यावी लागणार आहे.भविष्यात आपल्या देशात हे टाळायचे असेल तर पालकांचा मुलांशी असलेला सततचा संवाद महत्त्वाचा असणार आहे. सध्या हा संवाद कमी झाला आहे.

कामगारांवर करडी नजर ठेवणे आवश्यक

मोठ्या प्रमाणात होत असलेले ऑनलाइन धर्मांधनुकरण आणि मध्य-पूर्व देशांत मोठ्या संख्येने कामगार म्हणून वावरणारे असंख्य मुस्लीम तरुण यांवर आयसिसची भर असण्याची शक्यता आहे. इराकमध्ये १८ हजार भारतीय कामगार असल्याचे भारताबाहेरील परराष्ट्रविषयक खात्याच्या वार्षिक अहवालात म्हटले आहे. यापैकी काही धर्मांधनुकरण होऊन भारतात परतले तर ते धोकादायक ठरणार आहे. आयसिसचा धोका टाळण्यासाठी अशा कामगारांवर करडी नजर ठेवणे आवश्यक आहे.

भारताने काय करावे

आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेत फारसे भारतीय यापूर्वी कधी दिसत नव्हते. इसिसमुळे चित्र बदलतंय की काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे.समाजातल्या सगळ्या घटकांनी जागृत राहायची गरज आहे.इंटरनेटवरील प्रचाराला आळा घालण्याची मोहीम सुरू झाली असली, तरी डिजिटल रणभूमीवर आजमितीला तरी इसीसचाच वरचष्मा आहे.

दहशतवादी इंटरनेटच्या सहाय्याने टेरोरिझम निर्माण करू शकतात तर त्याच इंटरनेटचा उपयोग करून आपणच आपली सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत बनविली पाहिजे. त्यामुळे दहशतवादी कारवायांना जरब तर बसेलच, परंतु काट्यानेच काटा काढल्यासारखे होईल. खालील उपाय करून आपण त्यावर यश मिळवू शकतो.

प्रचार करणारे भारताच्या बाहेरचे इंटरनेट साईट,सोशल नेटवर्क साईट ब्लोक केले पाहीजे.भारतामधल्या इसीस समर्थकांच्या साईट/ फ़ेस बुक,ट्विटर अकाऊंट धारकांना लगेच पकडुन त्यांच्या वर कायदेशिर कारवाइ केली पाहिजे.पूर्ण ब्लॉग्ज डोमेनवर बंदी घालण्यात यावी.इंटरनेट ट्राफिक सतत मॉनिटर करावे. ते करण्यासाठी अनेक सोयी/(SOFT WARES) सध्या उपलब्ध आहेत.सायबर सेक्युरीटी विभाग जास्त मजबुत करावा. पोलिसांना फॉरेन्सिकचे योग्य प्रशिक्षण देण्यात यावे. कम्प्युटर तज्ज्ञांच्या मदतीने ईमेल किंवा ब्लॉग्जवरील मजूकर कुठून आले, कोणी पाठविले हे शोधून काढत रहावे.

भारतिय इंटरनेट वापरणार्या नागरिकांनी दहशतवादी साईट, फ़ेस बुक,ट्विटर अकाऊंट,आढलळ्यास ही माहीती लगेच पोलिस सायबर सेलना द्यावी.देशभक्त नागरिकांनी पोलिसांचे कान आणि डोळे बनावे.सर्वानी मदत केली तरच आपण इसीस दहशतवादाचा मुकाबला करु शकतो.

दहशतवादाविरुद्ध सर्वसमावेशक व्यापक धोरण जरुरी

२६/११चा अतिरेकी हल्ला मुंबईत झाला होता. त्यानंतर अनेक उपाययोजना करण्याचा निर्णय सरकारने घेतला असला तरी प्रत्यक्षात मात्र या उपाययोजना कागदोपत्रीच आहे.पोलिसांसाठी अत्याधुनिक शस्त्रे, लष्करी गाड्या, घेण्यात आल्या. सागरी सुरक्षेसाठी स्वतंत्र पोलिसठाणी निर्माण करण्यात आली. तटरक्षक दलाच्या मदतीसाठी पोलिसांनाही गस्ता नौका पुरवण्यात आल्या. पण आज यातील अर्ध्या नौका बंद आहेत. सागरी चौक्या ओस पडल्या आहेत. दहशतवादाचा सर्वाधिक धोका असणाऱ्या इस्त्रायल या देशाने स्वत: भोवती जे सुरक्षाकवच उभारले आहे त्याचा अवलंब जगातील सर्वच शहरांना करावा लागणार आहे. इस्त्रायलच्या जेरूसलेम आणि अन्य शहरांवर दहशतवादाचे सतत सावट असते. त्यांची नजर असते ती शहरभर बसवलेल्या कॅमेरतून.कुठेही वाजवीपेक्षा अधिक वेगाने वाहन जात असेल. चुकीच्या बाजूने एखादे वाहन पुढे सरकत असेल वा पळापळ झाल्याचे चित्र कॅमेऱ्यात टिपले जाताच अत्याधुनिक स्वयंचलित यंत्रणेद्वारे तत्काळ धोक्याचा इशारा दिला जातो.
त्याबरोबरच पोलीस दलाच्या सक्षमीकरण, सागरी सुरक्षा आणि गुप्तवार्ता विभागाची पुनर्बांधणी या महत्त्वाच्या बाबींकडे अधिक देणे जरुरी आहे. 2008 च्या दहशतवादी हल्ल्यानंतर सर्व सुरक्षा यंत्रणात समन्वय राखण्यासाठी एक स्वतंत्र यंत्रणा उभी करण्याचे ठरले होते ते अद्याप झालेले नाही. दर वर्षी राज्यातील सर्व प्रमुख शहरांचे सुरक्षा ऑडिट होणे आवश्यक आहे.

तेथील स्थिती, महत्त्वाची ठिकाणे, मध्यंतरीच्या काळात जगभरात घडलेल्या घटनांचा विचार करून त्या अनुषंगाने सुरक्षा व्यवस्थेत बदल करणे आवश्यक आहेत.

दहशतवादाविरुद्ध लढाई ही स्वत:पुरतीच

दुर्दैवाने पाश्चिमात्त्य देश दहशतवादाविरुद्धच्या लढाईत दुहेरी मापदंड अवलंबत आहे. पाकिस्तानविरुद्ध भारताने अनेक वेळा भक्कम पुरावे दिल्यानंतरही अमेरिकेने त्याकडे डोळेझाक केली. अमेरिकेकडून पाकिस्तानला जी आर्थिक मदत केली जाते, त्यातूनच पाकचे सरकार अतिरेकी संघटनांना पैसा आणि शस्त्रास्त्रे, दारुगोळा पुरविते.

पाकिस्तानसारखी राष्ट्रेसुद्धा अशा दहशतवादी हल्ल्याचा निषेध करतात तेव्हा हसू येते. पाकिस्तान दहशतवादाची जागतिक कंपनी आहे. हे सत्य सगळ्यांनी स्वीकारायला हवे, पण जोपर्यंत स्वत:च्या खुर्चीखाली बॉम्ब फुटत नाहीत तोपर्यंत अमेरिका व युरोपियन राष्ट्रांना भारताची तडफड समजणार नाही. दहशतवादाविरुद्ध लढाई ही स्वत:पुरतीच असते. भारतानेदेखील हे सत्य स्वीकारले पाहिजे. दहशतवादाविरुद्ध ही लढाई आपल्याला स्वतंत्ररीत्या लढावी लागेल

पॅरिस हल्ला आणि भारत

PARIS ATTACKS AND INDIA

November 24, 2015 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा

फ्रान्स एक सहिष्णूत देश

फ्रान्स हा एक आधुनिक विचार सरणीचा, व्यक्तीस्वातंत्र्याला महत्त्व देणारा एक अतिशय सहिष्णूत देश मानला जातो. फ्रान्सची अती सहिष्णूताच या हल्ल्यांकरिता जबाबदार होती का?

फ्रान्समध्ये धर्माला महत्त्व दिले जात नाही. तिथे ख्रिश्चानिटी हा सर्वांत मोठा धर्म असला तरीही तिथली चर्चेस सध्या ओसाड पडत चालली आहेत.

फ्रान्सचे प्रतिउत्तर वाखाणण्याजोगे

दहशतवादी हल्ला झाल्यानंतर ज्याप्रमाणे फ्रान्सने याला प्रतिउत्तर दिले ते वाखाणण्याजोगे आहे आणि यातील अनेक मुद्दे भारतासारख्या देशाला सुद्धा अमलात आणता येणे शक्य आहे. दहशतवादी हल्ला झाल्याबरोबर फ्रान्सच्या राष्ट्रपतींनी देशात तात्काळ राष्ट्रीय आणिबाणी जाहीर केली. यामुळे पोलिस व सैन्याला कुठल्याही शयिताला ताब्यात घेऊन चौकशी करण्याचे अधिकार मिळाले. या शिवाय पोलिस आणि सैन्याला कुठल्याही भागामध्ये दहशतवाद्यांविरुध्द शोध मोहिम करण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर फ्रान्सचे सर्व नागरिक व सरकार यांनी, आम्ही दहशतवादाविरूद्ध एकत्रपणे लढू असे जाहीर केले. भारतात मात्र अशा वेळी वेगवेगळ्या राजकीय पक्षात आपापसात वाद होतात आणि अनेक वेळा काही टीव्ही चॅनल्स आपला टीआरपी वाढवण्याकरिता राजकीय पक्षात भाडणे लावणे सुरू करतात.

जिथे स्फोट झाले होते, तो भाग रिकामी करून तिथे सुरक्षा व्यवस्था आणि तपास यंत्रणांना त्यांचे काम करण्याची पूर्ण मोकळीक दिली. आपल्या देशात मात्र याच्या नेमके उलटे होते. स्फोट झालेल्या ठिकाणी बघ्यांची मोठी गर्दी होते, मिडिया तिथे मोठ्या प्रमाणात येते आणि त्यामुळे तपास यंत्रणा, संरक्षण यंत्रणांना यांना त्यांचे काम करण्यास फार मोठा अडथळा येतो. या शिवाय ब्रेकिंग न्यूजच्या हट्टापायी दहशतवाद्यांनाच जास्त महत्त्व दिले जाते. हा हल्ला झाल्यापासून मी पाच-सहा फ्रेंच वृत्तवाहिन्यांचे वार्तांकन पाहिले, त्यात मला असे दिसून आले की, पोलिस खात्याचा फक्त जनसंपर्क अधिकारीच माहिती देत होता, बाकी सर्व पोलिस यंत्रणा आपापले काम करण्यात गुंतलेले होते. या उलट आपल्या देशात पोलिस व सुरक्षा यंत्रणांना अडथळा केला जातो आणि त्यांच्यावर अनेक प्रश्नांची सरबत्ती केली जाते.

वृत्तवाहिन्यांचे संयमित वृत्तांकन

तिथल्या वृत्तवाहिन्यांनी दिलेले वृत्त हे अत्यंत संयम राखून दिलेले वृत्त होते. असे म्हटले जाते की, दहशतवादी जेव्हा दहा लोकांना मारतात तेव्हा त्यांचा प्रयत्न हा लाखो लोकांच्या मनात भीती उत्पन्न करणे हा असतो. म्हणून दहशतवाद्यांना विनाकारण प्रसिद्धी देणे हे टाळले पाहिजे, जसे फ्रान्सच्या मीडियाने केले. त्यांचे सर्व लक्ष त्यांच्या सुरक्षा यंत्रणांच्या कामाला जास्त प्रमाणात प्रसिद्धी देणे होते. तेथील सर्व नागरिक, प्रशासन व सरकार हे सर्व एकत्रपणे या दहशतवादी हल्ल्याला सामोरे गेल्याची चित्र जगासमोर आले. त्यामुळे त्यांच्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बिमोड ते फक्त तीन तासात करू शकले. हे त्यांचे यश आहे.

फ्रान्सच्या चुका

पण ज्या अर्थी असा दहशतवादी हल्ला फ्रान्सवर झाला त्या अर्थी काही चुकाही त्यांच्याकडून झालेल्या आहेत. त्यांच्या काही मोठ्या चुका अशा आहेत. आज फ्रान्समध्ये दहशतवाद पसरतो आहे, सरकार अतिरेकी विचारसरणीविरुद्ध प्रचार करत आहे. पण हे प्रयत्न फार कमी पडत आहेत.अतिरेकी विचारसरणी पसरवली जाते सोशल मीडियाद्वारे किंवा इतर प्रसारमाध्यमांचा वापर करून. त्यामुळे अशा मीडियावर लक्ष ठेवून जिथे जिथे दहशतवादाला खतपाणी देणारे प्रयत्न दिसून येतील ते तिथल्या तिथे थांबवणे फार महत्त्वाचे आहे. ताज्या माहिती प्रमाणे भारताने सर्वांत जास्त प्रमाणात दहशतवादाला खतपाणी देणारे मजाकूर फेसबुकवरून डिलीट केले आहेत. त्याचप्रमाणे सर्व सोशल मीडियावर लक्ष ठेवून जिथेजिथे असे प्रयत्न दिसतील ते ताबडतोब थांबवले पाहिजेत, त्याचबरोबर अशा प्रकारे प्रचार करणार्या व्यक्ती किंवा संस्थांना अटक करण्याचे कसोशीने प्रयत्न झाले पाहिजेत. अतिरेकी विचारसरणी ही कशी थांबवायची यासाठी अनेक उपाय योजना सुचवण्यात आल्या आहेत. पण त्यावर अंमलबजावणी करणे हे जास्त महत्त्वाचे आहे. मुंबईमधील काही युवक हे आयसीसमध्ये सामिल होण्यासाठी गेले होते. ते सर्व उच्च शिक्षित व चांगल्या कॉलेजातून शिक्षण घेतलेले सुशिक्षित तरुण होते. तरीपण ते दहशतवादाकडे वळले होते. म्हणून अशा दहशतवादाला थांबवण्याची जबाबदारी त्या त्या युवकांची आहेच पण त्याशिवाय त्यांचे आई-वडील, त्यांचे नातेवाईक, त्यांची शाळा-कॉलेजस, त्याचप्रमाणे आजूबाजूच्या सामाजिक संस्था, मीडिया तसेच अजाबाजूला राहणारा शेजारी नागरिक तसेच इतर सर्व भारतीयांची आहे. दहशतवाद थांबवण्यासाठी आपल्या प्रत्येकालाच आपापल्या स्तरावर प्रयत्न करावे लागतील.

दुसरी फ्रान्सची चूक म्हणजे, गुप्तहेर माहितीसाठी ते पूर्णपणे टेक्निकल इंटेलिजन्सवर अवलंबून राहीले होते. फ्रान्समध्ये लाखो सीसी टीव्ही कॅमेरे, सॅटेलाईट सव्हेलन्स, ड्रोन सव्हेलन्स यांचा वापर होत आहे. युरोपमधील सरकार त्यांच्या नागरिकांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवते, तरीही त्याना असा दहशतवादी हल्ला होणार आहे, हे पकडता आले नाही. त्याच्याकडे फार मोठ्या प्रमाणात माहिती जमा होते पण त्या माहितीचा अर्थ लावणे त्यांना जमलेले नाही. आपल्याकडील उदाहरण द्यायचे झाले तर, आपल्याकडील काही मोठ्या मंदिरांत सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले आहेत, पण त्या सीसीटीव्हीच्या फुटेजचे ॲनालिसिस करण्यासाठी तिथे कोणीही नाही. त्यामुळे फक्त माहिती गोळा करणे हे महत्त्वाचे नसते, तर त्या माहितीतून काय अर्थ निघतो आहे हे काढणे तितकेच महत्त्वाचे असते. याकरिता आपल्या देशाला इतर आधुनिक देशातून तंत्रज्ञान आयात करता येण्यासारखे आहे. जसे फेस रेकग्निझेशन सॉफ्टवेअर, सिग्नेचर रेकग्निझेशन सॉफ्टेवेअर, व्हाईस रेकग्निझेशन सॉप्ट वेअर अशा प्रकारची अनेक तंत्रज्ञाने विकसित करण्यात आलेली आहेत. भारताने ही सगळी तंत्रज्ञाने युरोपियन देश, अमेरिका, इस्त्रईल यांच्याकडून घेतली पाहिजेत आणि आपल्या टेक्निकल इंटेलिजन्सचा दर्जा वाढविला पाहिजे.

ह्युमन इंटेलिजन्स सर्वात महत्वाचे

पण त्याहून जास्त महत्त्वाचे आहे, म्हणजे ह्युमन इंटेलिजन्स, यासाठी आपल्या खबर्याचे जाळे पसरवून त्याद्वारे काढलेली माहिती. आज असे कुठलेही तंत्रज्ञान नाही की जे एखाद्या दहशतवाद्याच्या मनात प्रवेश करून त्याच्या मनात काय चालले आहे ते शोधू शकेल. जर आपल्याला दहशतवाद रोखायचा असेल तर या सर्व दहशतवादी गटांमध्ये आपले डमी दहशतवादी घुसवायला पाहिजेत, ज्यामुळे हल्ला होण्या आधीच आपल्याला तो थांबवता येईल. अर्थात हे करणे एवढे सोपे नाही, यासाठी फार उच्च कौशल्यांची गरज आहे. पण अशा प्रकारची कोव्हर्ट ऑपरेशन्स भारतीय सैन्याने अनेक वेळा केलेली आहेत.

आपल्याला दहशतवादाच्या मुद्यावरून सगळ्या जगाला एकत्र आणून सगळ्या जगाची मदत घ्यावी लागेल. कारण दहशतवादी अनेकवेळा परदेशातून म्हणजे, पाकिस्तान, अफगाणीस्थान, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ अशा भागातून येत असल्यामुळे या देशांवरही आपल्याला लक्ष ठेवावे लागेल. दहशतवादाविरुद्धची लढाई ही फार काळ चालणार आहे. त्यामुळे इतर देशात होणार्या दहशतवदी हल्ल्यांवरून आपण धडे घेऊन आपली दहशतवाद विरोधी कारवाई उच्च दर्जाची करणे गरजेचे आहे. त्यामुळे दहशतवादी हल्ले थांबवण्यास यश मिळेल. यासाठी आपल्याला आपल्या सर्व सीमा सुरक्षित कराव्या लागतील. जे दहशतवादी किंवा दहशतवाद्यांचे छुपे सेल भारताच्या आत लपले आहेत, अशांना गुप्तहेर खात्याच्या माहितीवरून शोधून काढावे लागेल. तसेच या दहशतवाद्यांची मुळे पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, म्यानमार अशा देशांमध्ये आहेत ती तिथेच जाऊन कापावी लागतील. अशा प्रकारे बहुआयामी उपाय केले तरच आपण दहशतवादी हल्ला थांबवू शकतो. आशा करूया आपल्या सुरक्षा यंत्रणांनी पॅरिसमधील हल्ल्यावरून वेगवेगळे धडे घेतले असतील, ज्यामुळे आपला देश जास्त सुरक्षित होण्याकरिता मदत होईल

पंजाबमध्ये दहशतवादाचे पुनर्जीवन करण्याचा प्रयत्न ?

August 1, 2015 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा

पाकिस्तानवरील विजयाचे स्मरण देणारा ‘कारगिल विजयदिन’ भारतात साजरा व्हावा आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशी गुरुदासपूर जिल्ह्यात दीनानगर येथे दहशतवाद्यांनी १२ तास धुमाकूळ घालावा, हा नियोजित हल्ला आहे. गेले काही दिवस ‘बब्बर खालसा’ ही दहशतवादी संघटना हालचाली करीत होती. गुरुदासपूर हा डावीकडे पाकिस्तानची सीमा तर डोक्यावर काश्मीरची देशांतर्गत सीमा असा भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील जिल्हा आहे. सीमा ओलांडून काश्मीरमध्ये घुसणारे दहशतवादी इतर राज्यांमध्येही कसे घुसू शकतात, याचा इशारा या हल्ल्याने नव्याने दिला आहे. अमरनाथ यात्रेला लक्ष्य करणे फ़ार कठिण असल्यामुळे त्यांनी गुरुदासपूरमध्ये हल्ला केला असावा.

पंजाबातील गुरुदासपूर, होशियारपूर आदी ठिकाणांची नावे जरी ऐकली तरी ऐंशीच्या दशकातील दहशतवादाच्या आठवणी जाग्या होतात. त्यामुळे सोमवारी पुन्हा एकदा गुरुदासपूर येथे दहशतवादी हल्ला झाल्याचे वृत्त येताच अनेकांना खालिस्तान दिवसांची आठवण आली.

सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या गणवेशात आलेल्या दहशतवाद्यांनी हल्ला करण्याचे प्रकार आपल्या देशात काही डझनांनी घडले असतील. त्यांनी खासगी मोटारचालकावर गोळीबार केला, प्रवासी बसवर हल्ला केला आणि ते पोलीस स्थानकात हल्ल्यासाठी पोहचले. दहदशवाद्यांनी ठाण्यात घुसताच पोलिस कर्मचारी रामलाल आणि एसएचओ मुख्त्यार सिंह यांनाही दहशवाद्यांनी गोळ्या मारल्या. नंतर पोलिस ठाण्याच्या मागे असलेल्या होमगार्ड कक्षात दहशतवादी पोहोचले आणि 3 होमगार्डना त्यांनी मारून टाकले. याच ठिकाणी लपून त्यांनी सायंकाळपर्यंत फायरिंग केली.

गुरुदासपूर-अमृतसर रेल्वे मार्गावरही त्यांनी अनेक ठिकाणी सुरुंग पेरून रेल्वे उडविण्याची कारवाईही आखली होती. पोलीस व लष्करी जवानांनी इमारतीला वेढा घालून तीन अतिरेक्याना कंठस्नान घातले.

<u>आर्मीला बसवून ठेवले</u>

पोलिस दलामध्ये समन्वयाचा अभाव दिसून आला. एवढेच नाही तर घटनास्थळी आलेल्या आर्मीची मदत घेतली नाही. सकाळी 7 वाजता एसपी बलजीत सिंह यांच्या नेतृत्वात दहशवाद्यांच्या विरुद्ध ऑपरेशन सुरू झाले. सकाळी 8:15 वाजता पठाणकोटवरून आर्मी कमांडो आले. नंतर आणखी तुकडी बोलावण्यात आली. मात्र पोलिसांनी आर्मीची मदत घेतली नाही. आर्मीचे फर्स्ट पॅरा कमांडो बोलवण्यात आले होते. परिसर खाली केल्यानंतरच ते ही मोहीम संभाळू शकले असते. तसे झाले असते तर ते केवळ 2 ते 3 तासातच हे ऑपरेशन संपवू शकले असते. पण, चकमकीसाठी पोलिसांनी आर्मी अधिकाऱ्यांना पाठवण्याऐवजी पोलिस आणि अमृतसरवरून आलेल्या स्पेशल काउंटर सेलच्या टीमला पाठवले. त्यामुळेच हे ऑपरेशन तब्बल 12 तास चालले. दुपारी 12 वाजेपर्यंत डीजीपी सुमेध सिंह सैनी घटनास्थळी दाखल झाले. त्यांना यश आपल्या नावावर करायचे होते. त्यामुळे आर्मीचा वापर करण्यात आला नाही.

<u>दहशतवादी हल्ला बीएसएफ, पंजाब पोलीस गुप्तचर यंत्रणांचे अपयशच</u>

दीनानगरमध्ये झालेल्या हल्ल्यातील दहशतवादी पंजाब बरोबरील पाकिस्तानी सीमेतुन भारतामध्ये घुसण्यामध्ये यशस्वी झाले. या सीमारेषेवर सीमा सुरक्षा दलाचा बंदोबस्त असतो. हे नक्कीच सीमा सुरक्षा दलाचे (बीएसएफ) मोठे अपयश आहे.

कोणताही दहशतवादी हल्ला हा गुप्तचर यंत्रणांचे अपयशच असतो. त्यामुळे पुन्हा वेगळे आरोप करण्यासारखे काहीही नसते. त्यात अनेक वेळा गुप्तचर यंत्रणांना सुगावा लागून

दहशतवादी हल्ल्याचा कट वेळीच उधळून लावला तर काही अती हुशार त्याबाबत संशय व्यक्त करतात. हा कसा बनाव आहे, अशी टीका करतात. आणि असे हल्ले जेव्हा वेळीच रोखता येत नाहीत तेव्हा गुप्तचरांच्या अपयशावर झोड उठवतात.

मुंबईवरील अतिरेकी हल्ल्याच्या वेळीही आम्ही राज्य सरकारला सावध केले होते, अतिरेकी हल्ला झाल्यानंतरही चार राज्यांना अतिरेक्यांचा धोका आहे, हे अगोदरच सांगितले होते, असे सांगून गुप्तचर यंत्रणेला आपली जबाबदारी झटकता येणार नाही. प्रत्येक घटनेनंतर 'हाय अँलर्ट' चा इशारा दिल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात घटना नेमकी कोठे आणि कधी घडणार हे त्यांना सांगता येत नाही, हे वारंवार सिद्ध झाले आहे.

<u>वाहीन्या हल्याचे प्रत्यक्ष प्रक्षेपण दाखवित होत्या</u>

अतिरेक्यांना अमरनाथ यात्रेलाच लक्ष्य करायचे असावे. दहशतवादी हल्ल्याच्या वेळी अनेक वृत्तवाहिन्यांनी दहशतवादी मोठ्या प्रमाणात फायरिंग करत आहेत असे दाखवण्याचा प्रयत्न केला. हे अर्थातच पूर्णपणे चुकीचे आहे. अशा प्रकारांमुळे सामान्य माणसांच्या मनामध्ये अकारण दहशत निर्माण होत असते. अनेक वाहीन्या हल्याचे प्रत्यक्ष प्रक्षेपण दाखवित होत्या. २६-११ च्या हल्ल्याच्या वेळीही वाहिन्यांच्या या आततायीपणाची आणि बेजबाबदारपणाची प्रचिती आली होती.

या हल्ल्याची पूर्वसूचना केंद्र सरकारला मिळाली होती. मात्र केंद्र व पंजाब सरकार यांच्यातील दळणवळणाच्या अपुरेपणामुळे वा गलथानपणामुळे ही माहिती गुरुदासपूर व दीनानगरपर्यंत पोहोचली नव्हती. खेदाची बाब ही की लोकसभा वारंवार बंद पाडायच्या ऐवजी असे हल्ले कसे टाळता येतील यावर चर्चा व्हायला हवी.

<u>खलिस्तानी शक्ती पुन्हा सक्रिय ?</u>

उघड युद्ध करण्याची पाकिस्तानची धमकच नाही. त्यामुळे 'प्रॉक्सी वॉर' खेळले जात आहे.

खालिस्तानी चळवळीचे कंबरडे मोडण्यात आपल्याला यश आल्यानंतर गेल्या २० वर्षांमध्ये या राज्यामध्ये शांतता प्रस्थापित झाली होती. त्यामुळेच काही वर्षांपासून आयएसआय ही पाकिस्तानची गुप्तहेर संस्था पंजबमध्ये पुन्हा दहशतवाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. पंजाबमधील काही दहशतवादी गट खलिस्तान कमांडो फोर्स किंवा खलिस्तानी लिबरेशन आर्मी या भारतविरोधी शक्तींना आयएसआय पुन्हा प्रोत्साहन देऊन, त्यांना बळ देऊन, त्यांचे पुनरुज्जीवन करून भारतात आणि खास करून पंजाबमध्ये पुन्हा दहशतवाद पसरवण्याचा प्रयत्न करत आहे.

पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाश सिंह बादल यांनी पाकिस्तानचे हाय कमिशनर अब्दुल बासित यांच्यासोबत मीटिंग आयोजित केली होती. पण, या हल्ल्यामुळे त्यांनी ती रद्द केली.

अमरनाथ यात्रेला लक्ष्य करणे फ़ार कठिण असल्यामुळे त्यांनी गुरुदासपूरमध्ये हल्ला केला असावा. पंजाबमधील खलिस्तानी शक्ती पुन्हा सक्रिय झाल्या आहेत. गेल्या काही महिन्यांपूर्वी अमृतसरमध्ये निर्माण झालेला तणाव आणि इंदिरा गांधींच्या मारेकऱ्यांना शहीद ठरविण्याचा झालेला प्रयत्न झाला. मुख्य मंत्री बादल यांच्या सभेत अनेक वेळा खालीस्तानी झींदाबाद अशा घोषणा अनेक वेळा देण्यात आल्या पण त्यांच्या विरुध्द मतपेटीच्या राजकारणामुळे त्यांच्या विरुध्द काहीच कारवाई करण्यात आली नाही. उग्रवादाचा सामना लगेच केला पाहिजे.

<u>पंजाब पोलीस प्रशिक्षण</u>

पोलीस जेवढी दक्षता घेतात, त्यातले कच्चे दुवे शोधून दहशतवादी टोळय़ा त्यावर मात करणारे डावपेच शोधतात. काही दिवसांपूर्वी थायलंडमध्ये जगतारसिंग तारा या शीख दहशतवाद्याला पकडण्यात आले. गुप्तहेर संघटनांकडून झालेल्या चौकशीमध्ये त्याने शीख दहशतवाद्यांसाठी थायलंडमध्ये एक लष्करी प्रशिक्षण केंद्र आयएसआयकडून चालवले जात असल्याचे म्हटले होते, तसेच जम्मू आणि काश्मीरमधील 'लष्कर-ए-तोयबा', 'बब्बर खालसा', 'खलिस्तान झिंदाबाद फोर्स', 'खलिस्तान कमांडो फोर्स', 'दल खालसा' या सर्व दहशतवादी संघटनांना एकत्र आणण्याचा प्रयत्न 'आयएसआय'कडून केला जात आहे.

पंजाब पोलिसांनी १९८० ते ९० च्या दशकामध्ये अतिशय चांगल्या पद्धतीने दहशतवाद्यांचा मुकाबला केला होता. त्यांनंतरच्या शांतता प्रस्थापित झालेल्या काळात त्यांना पुरेसे प्रशिक्षण झालेले नाही. त्यामुळेच पंजाब पोलिस दलाचे अधिकारी आणि कॉन्स्टेबल मारले गेलेले आहेत. इथे पोलिस कुठलीही हेल्मेट किंवा बुलेटप्रूफ जॅकेटशिवायच दहशतवाद्यांशी लढताना दिसत होते आणि काही छायाचित्रांमध्ये बघ्यांची गर्दी दिसत होती. मला खात्री आहे की यापासून धडा शिकून पंजाब पोलीस पुन्हा आपल्या प्रशिक्षणाचा दर्जा सुधारतील आणि ९० च्या दशकाप्रमाणे अतिरेक्यांशी लढण्याचे सामर्थ्य आणि कौशल्य आत्मसात करतील.

<u>प्रत्येकानेच सावध राहायला हवे</u>

जेव्हा सगळा देश दहशतीखाली आणण्याचा प्रयत्न दहशतवादी करतात तेव्हा केवळ पोलीस, केवळ लष्कर त्याचा प्रतिकार करू शकेल, अशा भ्रमात नागरिकांनी राहू नये. अनेक ठिकाणी असे दिसून आले आहे की, स्थानिक नागरिकही या दहशतवाद्यांना आतून सामील असतात.

महाराष्ट्रात नाशिकला कुंभमेळा सुरू आहे. सिंहस्थ पर्वणीनिमित्त देशभरातून लाखो भाविक नाशिक, त्र्यंबकेश्वरला त्याचबरोबर शिर्डीला येण्याची शक्यता आहे. लाखोंच्या गर्दीत केवळ पोलीस यंत्रणांवरच अवलंबून न राहता प्रत्येकाने सावध राहायला हवे. नागरिकांचे लाखो डोळे जास्त सजग राहिले, तर कोणतीही दुर्घटना, घातपात टाळू शकतात. पंजाबमध्ये गुरुदासपूर घटनेच्या वेळीच रेल्वे रुळावर पेरून ठेवलेले पाच जिवंत बॉंब ताब्यात घेण्यात यश एका

देशभक्त नागरिकामुळे मिळाले. गर्दीच्या ठिकाणांवर सर्वांनी डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे.

पंजाबमध्ये झालेल्या हल्ल्याचा संबंध याकूबच्या फाशीशी काही आहे का? तो असु शकेल. फाशीची जाहिरात न करता सूर्य उगवण्यापूर्वी फाशीचा कार्यक्रम आटोपायला हवा होता. देशातलीच काही अतिशहाणी मंडळी कुख्यात दहशतवाद्यांना फाशी देऊ नका, अशी मागणी करायला पुढे येतात. या अतिशहाण्या मंडळींना जागेवर आणण्याची गरज आहे. त्यांचा बुद्धिवाद आणि त्यांचा तर्कवाद याची या देशाला गरज नाही. देशाच्या सुरक्षेचा बुद्धिभेद करणाऱ्या या अतिशहाण्या मंडळींचा हातभार या दहशतवाद्यांना मिळत आहे. ही गंभीर गोष्ट आहे. म्हणून या अतिशहाण्या बुद्धिवाद्यांना 'गप्प बसा नाही तर लोक तुम्हाला गप्प बसवतील,' हे स्पष्ट सांगण्याची वेळ आलेली आहे.

<u>अंतर्गत सुरक्षेबाबत अतिशय सतर्क राहण्याची गरज</u>

दहशतवाद्यांशी चालणारी ही लढाई यापुढेही अनेक वर्षे चालणार आहे आणि ती येत्या काही काळात अधिक रक्तरंजित होऊ शकते. 'इस्लामिक स्टेट' या दहशतवादी संघटनेने आपल्या इरादापत्रावर काश्मीरचे नाव ठळक अक्षरात लिहिले आहे. श्रीनगरमध्येही 'इस्लामिक स्टेट' चे झेंडे फडकले. काश्मीरचा कब्जा करण्याची इच्छा असणाऱ्या दहशती शक्तींमध्ये उद्या संघर्ष सुरू झाला तर त्यातून अनेक हल्ले सोसावे लागू शकतात. सर्व राज्यांची पोलिसदले वेगाने सुसज्ज, प्रशिक्षित व चपळ करायला हवीत, हा धडा नव्याने मिळतो आहे. भारताने यापुढील काळात सीमेवरील सुरक्षेबाबत अंतर्गत सुरक्षेबाबत अतिशय सजग आणि सतर्क राहण्याची गरज आहे.

एकूणच, अमेरिकेने अफगाणिस्तानातून सैन्य काढून घेणे, तालिबानचे पुनरुज्जीवन, इस्लामिक स्टेटचा वाढता विस्तार, दक्षिण आशियातील इतर दहशतवादी संघटनांची त्यांच्याशी असणारी बांधिलकी या सर्व गोष्टी आपल्यापुढील आव्हाने वाढवणाऱ्या आहेत. त्यामुळेच तसेच आता आपण 'नॅशनल काउंटर टेररिझम सेंटर' (राष्ट्रीय दहशतवाद विरोधी केंद्र) लवकरात लवकर कार्यान्वित करणे आवश्यक आहे. एक राष्ट्र म्हणून भारतीय या प्रदीर्घ लढ्याची तयारी कशी करतात, यावरच या दहशतवाद्यांचे समूळ उच्चाटन अवलंबून आहे.

<u>पाकिस्तानचा दहशतवादाचा बुरखा फाडा</u>

दहशतवादाचे माहेरघर असलेल्या पाकिस्तानला चीन आणि अमेरिकेकडून शस्त्रांची होणारी मदत थांबवण्यासाठी आता भारताने अधिक ठामपणाने आणि जोरकसपणे आवाज उठवणे गरजेचे आहे. या हल्ल्याचा वापर आपण आंतरराष्ट्रीय स्तरावर करून अमेरिका आणि इतर राष्ट्रांवर दबाब आणून पाकिस्तानला लक्ष्य केले पाहिजे आणि पाकिस्तानचा दहशतवादाचा बुरखा फाडला पाहिजे

दहशतवादाचे बदलते स्वरुप, एकटे दहशतवादी : गरज तरुणांशी संवाद साधण्याची

February 18, 2015 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) कायदा, नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा

दहशतवादाचे स्वरुप अतिवेगाने बदलत आहे. तंत्रज्ञानाचा आधार घेत दहशतवादाचे जाळे फ़ार वेगाने विस्तारत आहे. तसेच एकट्याने दहशतवादी कृत्ये करण्याचा नवा प्रकार उदयास येत आहे. या प्रकारच्या दहशतवादाचा सामना करणे कठीण असते. त्यामुळे अशा दहशतवाद्यांच्या कारवायांचा पूर्ववेध घेणे आवश्यक आहे. यासाठी आपल्याला तंत्रज्ञानाची आणि प्रगत गुप्तचर माहितीची मोठी मदत होऊ शकते.

इंटरनेट आणि तंत्रज्ञानाचा वापर करुन ते भारतामध्ये दहशतवाद पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत. हे दहशतवादी अतिशय हिंसक आहेत आणि एकट्याने काम करतात. याचे सर्वांत पहिले उदाहरण २००७ मध्ये नजरेस आले. ज्यावेळेला बंगलोरच्या डॉक्टर कुटुंबातील एका तरुणाने इंग्लडमध्ये एका रेल्वे स्टेशनवर गाडीचा वापर करुन आत्मघातकी हल्ला करण्याचा प्रयत्न केला. तो त्यामध्ये अर्थातच मारला गेला. २०१४ मध्ये इसिसचा उगम झाल्यानंतर यांच्या संख्येमध्ये प्रचंड वाढ झाली. तंत्रज्ञान आणि इंटरनेटचा वापर करत असल्यामुळे ते भारतामध्ये किंवा जगामध्ये असलेल्या इतर कुठल्याही दहशतवाद्यांशी, त्यांच्या समर्थकाशी आपल्या घरामध्ये बसून संबंध ठेवू शकतात. बॉम्ब स्फोट कसे करायचे, बॉम्ब कसा तयार करायचा अशा प्रकारची माहिती सुद्धा इंटरनेटच्या माध्यमातून घरबसल्या पाठवली जाते. हल्ल्याचे प्लॅनिंग हे इंटरनेटच्या माध्यमातूनच केले जाते. इंटरनेटची व्याप्ती प्रचंड असल्यामुळे फार मोठ्या संख्येमध्ये सगळ्यांशी संबंध ठेवता येतो. आपल्या कोणी पकडू नये म्हणून आपले इंटरनेटवरिल अकौंट बदलले जातात. इमेलचा पासवर्ड बदली केला जातो. वेगवेगळ्या नावांनी फेसबुकवर अकौंट उघडले जातात. बहुतेक अकौंट हे तात्पुरते उघडले जातात. काही दिवसांसाठीच त्याचा वापर केला जातो आणि लगेच त्याला बंद केले जाते. यामुळे अशा प्रकारच्या कोट्यवधी अकौंटवर लक्ष ठेवणे हे कठिण आहे. अशा प्रकारचे दहशतवादी आपल्या सुरक्षा व्यवस्थेच्या अनेक पाऊले पुढे असतात. या सगळ्यांचा सामना करण्यासाठी आपल्या तंत्रज्ञानाची व्याप्ती ही एक पाऊल पुढेच घेऊन जावी लागेल.

गेल्या काही महिन्यांमध्ये पकडल्या गेलेल्या दहशतवाद्यांकडे पाहिल्यावर असे लक्षात येते की, हे तरुण साक्षरच नव्हे तर सुशिक्षित आहेत, तंत्रज्ञानवर त्यांची पकड आहे, चांगल्या पदांवर नोकरी करत आहेत, त्यांची मिळकतही चांगली आहे; पण तरीही ते दहशतवादाकडे वळत आहे. तंत्रज्ञानाचा गैरवापर करून सोशल मीडियाच्या माध्यमातून या सुशिक्षित तरुणांना भडकावले जात आहे. धर्माच्या नावावर त्यांच्यात विद्वेष पसरवला जात आहे.

फ्रिलान्स जिहादी अथवा एकटे दहशतवादी

दहशतवादाचा आणखी एक नविन प्रकार पाहायला मिळत आहे, तो म्हणजे एकलकोंडे किंवा एकटे काम करणारे दहशतवादी अथवा दहशतवादी संघटनांशी संबंध नसणारे दहशतवादी. इंटरनेटवर किंवा वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांना बळी पडून काही तरुण अशा प्रकारचे एकटे जिहादी दहशतवादी बनलेले दिसतात. कोणत्याही संघटनेमध्ये सामील व्हायचे नाही, एकट्यानेच काम करायचे आणि एकट्यानेच समाजाचा बदला घेण्याचा प्रयत्न करायचा अशी यांची कार्यपद्धती आहे. अशा प्रकारच्या दहशतवाद्यांना पकडणे हे कठीण काम असते. एखाद्या दहशतवादी हल्ल्यामध्ये अधिक जण सामील असतील तर त्यांना पकडणे वा त्यांचा शोध घेणे सोपे जाते. याचे कारण यापैकी एक दहशतवादी जरी पकडला गेला की इतरांबाबतची माहिती काढून घेता येते. पण दहशतवादी एकटाच असेल तर अर्थातच त्याला पकडल्याशिवाय नेमके काय झाले, का हल्ला केला, काय मागण्या आहेत याबाबतचा पत्ता लागत नाही. म्हणून अशा प्रकारच्या दहशतवाद्यांना पकडण्यासाठी ,ह्यूमन इंटिलिजन्स वा तंत्रज्ञानाच्या मदतीने यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

असे दहशतवादी इंटरनेट अथवा वर्तमानपत्र, मासिके यांच्या माध्यमातून जिहादाविषयीची माहिती मिळवतात.त्यांचे मतपरिवर्तन होते. मग एखादा दहशतवादाचा पुरस्कर्ता अथवा गुरु मतपरिवर्तन झालेल्या युवकांशी संपर्क साधून त्यांना आणखी प्रोत्साहित करण्याचा वा चिथावणी देण्याचा प्रयत्न करतो. यानंतर तरुणांना दहशतवादी प्रशिक्षण शिबिरांमध्ये पाठवले जाते. तेथे त्यांना शस्त्रास्त्रांबाबत, हल्ल्यांबाबत, प्रत्यक्ष दहशतवादी कारवायांबाबत प्रशिक्षण दिले जाते. असे प्रशिक्षण कॅम्प भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान किंवा इतर देशांमध्ये असू शकतात. सर्वांत महत्त्वाचे हा एकटाच दहशतवादी बॉम्बस्फोट कधी आणि केव्हा करायचे हे स्वःत ठरवतो. यापूर्वी दहशतवादी हल्ला होण्यापूर्वी दहशतवाद्यांना पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआयकडून टार्गेट सांगितले जात होते. धोका असूनही त्यांना पकडणे कठीण होऊन बसते. अशी काही उदाहरणे समोर आहेत. एक म्हणजे मेहेंदी मसरुल विश्वास हा इसिस या संघटनेसाठी ट्विटर अकौंट हाताळण्याचे काम करत होता; तो एकांडा शिलेदार होता.अलीकडेच पोलिसांनी हैद्राबादमधून इसिसमध्ये सामील होण्यासाठी जाणार्या शोहीब अहमद खान आणि शहा मुझफ्फर यांना पकडले. ते एकटेच काम करत होते.

सीसीटीव्ही, लॅपटॉप, सॉफ्टवेअरच्या मदतीने दहशतवादी पकडा

आपल्याला विकसित, अत्याधुनिक आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचीही गरज भासणार आहे. आज काही देशांकडे(अमेरिका,युरोप) उपयोगी तंत्रज्ञान उपलब्ध आहे. त्यानुसार आपण पकडू न शकलेल्या एखाद्या दहशतवाद्याचा फोटो उपलब्ध असेल, तर त्या फोटोच्या मदतीने हा दहशतवादी शोध मोहिमेच्या दौरान पकडला जाऊ शकतो.यासाठी हा फोटो संगणकावर घेऊन, सीसी टीव्हीच्या कॅमेर्याद्वारे दिसणार्या फुटेजमधून अचूकपणाने त्याचा शोध घेता येतो. यासाठी एका सॉफ्टवेअरची गरज भासते. हे सॉफ्टवेअर सदर फोटोशी मिळतीजुळती व्यक्ती

अचूकपणाने सीसीटीव्हीच्या फुटेजमधून हेरते. अशा सॉफाटवेअरमध्ये आपल्या तपास यंत्रणांच्या यादीतील दहशतवादी, दहशतवाद्यांना मदत करणार्या व्यक्ती, माओवादी, बांगलादेशी घुसखोर,आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांचे फोटो समाविष्ट करून त्यांचा शोध घेता येणे शक्य आहे. गुप्तचर यंत्रणांकडून एखाद्या ठिकाणी दहशतवादी हल्ला होणार असल्याची सूचना मिळते तेव्हा त्या परिसरात व इतरत्र सर्व वाहनांची तपासणी केली जाते. अशा वेळी एक सीसीटीव्ही कॅमेरा आणि एक लॅपटॉप यांच्या मदतीने या वाहनांमध्ये जर दहशतवादी आढळला तर त्याबाबत तात्काळ संदेश मिळणे शक्य आहे.

अशाच प्रकारे आवाज ओळखणारे तंत्रज्ञानही सध्या उपलब्ध आहे. अनेक वेळा दहशतवादी माध्यमांमधील काही प्रतिनिधींना अथवा कार्यालयामध्ये फोन करून काही माहिती सांगण्याचा, धमक्या देण्याचा प्रयत्न करतात. अशा प्रकारच्या आवाजाचा नमुना आपल्याकडे असेल तर त्याच्याशी फोनवरील आवाजाची पडताळणी करून तो आवाज नेमका कोणत्या दहशतवाद्याचा आहे हे समजणे शक्य आहे.

इंटरनेट कंपन्यांना भारतात सरव्हर प्रस्थापित करण्याची सक्ती करा

आपल्या देशाची आर्थिक शक्तीचा वापर करून गुगल आणि इतर इंटरनेट कंपन्यांवर त्यांचे सव्हर्स हे भारतात ठेवण्याबाबत दबाव आणण्याची गरज आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याचा मोठा फायदा आहे. याचे कारण सोशलमीडियावर जर एखाद्याने चुकीची माहिती वा धार्मिक द्वेष निर्माण करणारी माहिती अपलोड केल्यास, ते भारतातील कोणत्या भागातून करण्यात आले आहे हे तात्काळ समजू शकणार आहे. त्यातून त्या व्यक्तीला तात्काळ पकडणे शक्य होईल.

गुप्तचर माहितीची देवाणघेवाण वाढवा

दहशतवादाला प्रतिबंध करण्यासाठी भारत आणि अमेरिका या दोन देशांच्या सीआयए आणि रॉ या गुप्तचर संस्थांमध्ये गुप्तचर माहितीची देवाणघेवाण संस्थात्मक पातळीवर होणार आहे. सध्या अशी माहिती अमेरिका केवळ युरोपमधल्या काही देशांशी तसेच इस्त्राईलशी आदानप्रदान करते आहे.

दहशतवादी ईमेल, एसएमएस किंवा पत्रांच्या माध्यमातून काही संदेश पाठवतात, संवाद साधतात. ते पूर्णपणे कोड करुन अथवा सांकेतिक भाषांमध्ये पाठवले जातात. अशा प्रकारचे कोडवर्डचे जर डिकोड करता आले, सांकेतिक शब्दांमधील संदेश शोधता आला तर दहशतवाद्यांचा, त्यांना मदत करणार्या व्यक्तींचा ठावठिकाणा समजणे, तसेच त्यांच्या भविष्यातील हल्ल्यांसदर्भातील योजनांची माहिती मिळणे शक्य होते. याबाबतचे तंत्रज्ञानही अमेरिकेकडे उपलब्ध आहे. तेही आपल्याला मिळण्याची शक्यता आहे.

महाविद्यालयांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधून कट्टरवादाची पाळेमुळे नष्ट करण्याचा, तरुणांमध्ये देशभक्तीचा जागर घडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यामध्ये आपल्याला दहशतवादी युवकांच्या कुटुंबियांचा, समाजसेवी संस्थांचा, सुरक्षा यंत्रणांचा आणि समाजातील अभ्यासकांचा-विचारवंतांचा आधार घ्यावा लागेल.

ऑनलाईन जिहाद : सध्याची परिस्थिती आणि उपाय योजना

February 3, 2015 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

अजून एका तरुण जो इसिस या दहशतवादी संघटनेत सामील होण्याकरिता इराककडे जाण्याच्या वाटेवर होता, त्याला आपल्या गुप्तहेर संस्थांनी हैद्राबाद विमानतळावर रोखले. कल्याणमधून चार तरुण इसिसमध्ये जाण्याकरिता पळून गेले होते. त्यामधला एक तरुणाने २६ जानेवारीला स्फ़ोटक भरलेल्या कारने भारतात अमेरिकन राष्ट्रपतींवर आत्मघातकी हल्ला करण्याची धमकी दिली. हे सगळे ऑनलाईन जिहादला बळी पडले होते. त्यामुळे इंटरनेटवर किंवा ऑनलाईन जिहादचा प्रसार कसा केला जातो, त्याला तरुण कसे बळी पडत आहेत हे शोधणे महत्त्वाचे आहे. ताज्या अंदाजाप्रमाणे भारतात हजारो युवक आपल्या घरातून गायब झालेले आहेत. त्यामधले दोन टक्के युवक जरी जिहादी प्रचाराला बळी पडून गेले असतील तरीही हा धोका खूप आहे.

युवकांना ऑनलाईन जिहाद विषयी एवढे आकर्षण का वाटते?.
भारतीय सैन्याने केलेल्या अभ्यासाने युवक दहशतवादी का होतात याची काही कारणे शोधून काढली. पाकिस्तानची गुप्तहेर संस्था आयएसआय आणि उग्रवाद पसरवणार्या अनेक भारतीय संस्था दहशतवादी संघटनांना मनुष्य भरती करण्याकरिता मदत करतात. याकरिता अनेक युवकांचा बुद्धीभ्रंश केला जातो. एकदा बुद्धीभ्रंश झाला की त्यानंतर प्रेरणात्मक प्रशिक्षण दिले जाते. यानंतर त्यांना एका मोठ्या दहशतवादी संघटनांमध्ये ट्रेनिंगसाठी इराण, अफगाणिस्तान, सिरिया किंवा पाकिस्तानमध्ये पाठवले जाते. सुरुवातीला त्यांना दहशतवाद्यांची प्रशासकीय कामे दिली जातात. त्यानंतर जर लक्षात आले की हा युवक एक चांगला दहशतवादी बनू शकतो तरच त्याला बॉम्ब स्फोट करणे, आत्मघातकी हल्ला करणे अशी कामे दिली जातात.

दहशतवादी होण्या मागची कारणे
४० ते ४५ टक्के युवकांना बळजबरीने दहशतवादी संघटनेत पाठवले जाते.३० ते ३५ टक्के युवक आर्थिक कारणामुळे दहशतवादाचा रस्ता पकडतात. दहशतवादी संघटनेत सामील झाले की त्यांना खूप पैसे मिळतात. एखादी नोकरी केल्यासारखा त्यांना पगार दिला जातो. एखादे

मोठे दहशतवादी काम केले तर त्यांना अजून जास्त पैसा मिळतो. ३० ते ३५ टक्के लोक धार्मिक कारणामुळे दहशतवादी बनतात. जर आपण युवकांना काम देवू शकलो तर अनेकांना आपण दहशतवादाकडे जाण्यापासून रोखू शकू.

ऑनलाईन/ इंटरनेटवर दुषप्रचार थांबवा

सध्या ऑनलाईन किंवा इंटरनेटवर प्रचंड प्रमाणामध्ये दुषप्रचार सुरु आहे. यात त्यांच्या धर्मावर किती अन्याय, कसा हल्ला केलेला आहे हे दाखवले जाते. म्हणून अशा प्रकारच्या होणार्या दुषप्रचाराला इंटरनेटवरच प्रत्युत्तर देण्याची गरज आहे.

अनेक वेबसाईटस्, ब्लॉग्ज् स्पॉटस्, ट्विटर अकौंटस्, ईमेल आणि एसएमएसने अशा प्रकारचा दुषप्रचार केला जातो. म्हणून अशा सगळ्या दुषप्रसार करणार्या इंटरनेटवरील साधनांवर लक्ष ठेवणे महत्त्वाचे आहे. यांना गुगल व इंटरनेट कंपन्यांची मदत घेऊन थांबवणे आवश्यक आहे. बहुतेक दहशतवाद्यांच्या मनावर तात्पुरता अतिरेकी विचाराचा प्रभाव झालेला असतो. अनेकांना आयुष्यामध्ये फारसे यश मिळालेले नसते, म्हणून बंदूकीच्या बळावर त्यांना समाजामध्ये मिळालेले स्थान त्यांना महत्त्वाचे असते. बहुतेक युवक हे २० ते ३० वयामधले असतात, लग्न झालेले नसते. काही तरी कारणावरुन त्यांच्या कुटुंबाशी असलेला संबंध हा कमी कमी होत असतो.

आपण जर अशा युवकांकडे लक्ष ठेवले, आर्थिक उपाय, मानसिक उपाय केले, त्यांच्या मनाच्या विचारसरणीमध्ये जर बदल करुन आणता आला, तर दहशतवादाकडे जाणार्या युवकांवर घात करणारे घटक आपण नक्कीच कमी करु शकतो. याकरिता गरज आहे ती आर्थिक आणि मानसिक लढाई जिंकण्याची. दहशतवादाचे स्वरुप हे कायम बदलत असते. यामुळे त्यावरिल उपाय योजना सक्षम, तत्पर आणि परिस्थिती अनुरुप पाहिजे. आपल्याला दहशतवादाचा प्रसार करणार्या यंत्रणांच्या एक पाऊल पुढे राहण्याची गरज आहे.

सरकारने उग्रवादाचा प्रतिकार कसा करावा

डिसेंबरमध्ये राज्याच्या डीजीपींची केंद्रीय गृहमंत्र्यांशी झालेल्या मीटींगमध्ये ऑनलाईन जिहादवर विचार करण्यात आला आणि दुषप्रचार थांबवण्याकरिता एक ॲक्शन प्लॅन करण्याकरिता सांगण्यात आले. इंटरनेटची व्याप्ती खूप मोठी आहे त्यामुळे एक संस्था त्यावर लक्ष ठेवू शकत नाही. गरज आहे की या सगळ्या संस्थांशिवाय इतर देशप्रेमी, देशभक्त नागरिकांचा सुद्धा आपण लक्ष ठेवण्याकरिता वापर केला पाहिजे. कारण आज भारतामध्येच जवळजवळ २० कोटींहून जास्त नागरिक इंटरनेटचा वापर करत आहेत. फेसबूक आणि इतर सोशल मीडियामध्ये असलेल्या युवकांची संख्या सुद्धा प्रचंड आहे. म्हणून एखाद्या सॉफ्टवेअरचा वापर करून जे अशा प्रकारे चॅटिंग इंटरनेटवर चालते त्याच्यावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. आज युटयूबवर भडकवण्याकरिता अनेक व्हिडीओज अपलोड केले जातात. अशा

प्रकारचे व्हिडिओज, अशा प्रकारची चुकीची माहिती देणारे लेख लगेच इंटरनेटवरुन ब्लॉक करायला पाहिजे. देशद्रोही व्हिडीओज, फ़ोटो, लेख अपलोड करणार्यांना शिक्षा दिली पाहीजे.

युवकांवर लक्ष ठेवण्यासाठी 'ऑपरेशन चक्रव्यूह

आज अनेक संस्था ऑनलाईन रिक्रूट झालेल्या युवकांना भारताच्या आतच अतिरेकी बनवण्याचा प्रयत्न करतात. काही संस्था/ धर्म शिक्षक, अशा प्रकारचे प्रशिक्षण या युवकांना भारतामध्येच देतात. आज परदेशामधून खास तर सौदी अरेबियामधून मोठ्या प्रमाणामध्ये पैसा अतिरेकीवाद पसरवण्याकरिता भारतामध्ये येत आहे. ते थांबवले पाहिजे. भारतामधील काही धार्मिक स्थळेपण अशा प्रकारचा अतिरेकी वाद वाढण्याकरिता पैसे खर्च करतात. म्हणून प्रचंड उत्पन्न असलेल्या धार्मिक स्थानावर लक्ष ठेवण्याची गरज आहे. अनेक श्रीमंत व्यापारी आपल्या उत्पन्नातील काही पैसा अतिरेकीवाद वाढवण्याकरिता खर्च करतात. कल्याण मधल्या युवकांना इराकमध्ये पाठवण्यामध्ये तिथल्या काही व्यापार्याचा हात होता. त्यांच्यावर सुद्धा लक्ष ठेवून त्यांना पकडणे महत्त्वाचे आहे.

सोशल मीडियामध्ये ऑनलाईन चॉट करण्याकरिता अनेक वेगवेगळी साधने उपलब्ध आहेत. गरज आहे ती अशा प्रकारच्या प्रचारावर लक्ष ठेवण्याची. गृहमंत्रालयाने 'ऑपरेशन चक्रव्यूह नावाचे एक नविन ऑपरेशन सध्या इंटरनेटवर सुरु केलेले आहे. याचा उद्देश आहे की अशा प्रकारच्या युवकांवर लक्ष ठेवणे.

इतर देशांकडून मदत घेणे जरुरी

युरोपमधल्या अनेक देशांमध्ये अशा प्रकारच्या युवकांवर लक्ष ठेवण्याकरिता मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जात आहेत. त्यांच्या अनुभवाचा वापर करुन आपण पटकन पुढे जायला पाहिजे. अनेक ऊपाय या देशांकडून शिकता येतील. एखादा युवक जर ऑनलाईन जिहादामध्ये पकडला गेला तर लगेच त्याच्यावर लक्ष ठेवण्यात येते. दुर्दैवाने त्यांची संख्या हजारोंची असल्यामुळे त्यांच्यावर लक्ष ठेवणे कठिण आहे. अशा वेळी गरज असते ती त्याच्या कुंटबाला, त्याच्या नातेवाईकांना त्याच्यावर नजर ठेवण्याची. कारण २४ तास कुठल्याही युवकावर गुप्तहेर संस्था ही लक्ष ठेवू शकत नाही.

कौसींलिग सेंटर उभारण्याची गरज

युरोपमध्ये याला सांस्कृतिक दहशतवाद असे म्हटले जाते. ज्यावेळी आपल्याला आपल्या धर्माविषयी जास्त प्रेम निर्माण होते, केवळ आपण आपल्याच धर्माचा प्रचार करायला लागतो आणि ज्यावेळेस आपण इतरांच्या विरुद्ध बोलायला सुरुवात करतो त्यावेळेस आपले आणि इतर समाजामधल्या घटकांमधले सांस्कृतिक अंतर वाढत जाते.

अशा प्रकारे उग्रवादाकडे झुकणार्या युवकांकरता देशामध्ये कौसींलिग सेंटर तयार करायला पाहिजे. जसे आपण आफू, गांजा, चरस किंवा दारु पिणार्या युवकांकरिता तयार केलेले आहे.

यामध्ये अशा युवकांना एक्सपर्टकडून त्यांच्या मनामध्ये झालेल्या अतिरेकी विचारांना थांबवण्याकरिता मदत करता येईल. जास्त महत्त्वाचे हे आहे की सगळ्याच युवकांवर हा धोका किती भयंकर आहे याविषयी ज्ञान पुढे पसरवण्याची गरज आहे. सर्वसमावेशक उपाय करुन वैचारिक दहशतवादाला रोखले पाहिजे. दहशतवाद रोखण्यासाठी सर्वसमावेशक उपायावर लवकर अंमलबजावणी करण्याची गरज आहे. या कट्टरवादाचा प्रतिबंध करण्यासाठी शासनाला आक्रमक आणि सक्रिय भूमिका वापरावी लागेल.

४० लाख तरुण व्यसनाधीन करणारा नार्को टेररिझम

January 23, 2015 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

जम्मू –काश्मीर, पंजाब आदी सीमावर्ती राज्यांत घुसखोरांबरोबरच शस्त्रास्त्रे आणि अमली पदार्थांची तस्करी करून तेथे अशांतता माजविण्याची व तरुण पिढी बरबाद करण्याची कुटिल खेळीही पाकिस्तान खेळत आहे. हा गंभीर धोका ओळखून त्याचा एकजुटीने मुकाबला केला पाहिजे. या भस्मासुराचा बंदोबस्त करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती दाखविण्याची आणि राज्य व केंद्राने समन्वयाने काम करण्याची गरज आहे.

आपल्या देशात इस्लामी दहशतवादासोबतच नार्को टेररिझम'चा देखील धोका वाढला आहे. या दहशतवादाने भारताची पूर्ण पिढी बरबाद होत आहे. रक्तरंजित दहशतवादापेक्षाही हा धोका अधिक गंभीर आणि घातक आहे. सरकारी आकडेवारीनुसार नार्को टेररिझम'मुळे सध्या देशातील 40 लाखांहून तरुण व्यसनाधीन झाले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार, दक्षिण आशियात तयार होणार्या 40 टन ब्राऊन शुगरपैकी 14 टन ब्राऊन शुगर ही केवळ भारतामध्ये व्यसनासाठी वापरली जाते.

दहशतवादामुळे भारतीय तरुणांमधे नशेचे प्रमाण वाढून अतोनात नुकसान होत आहे. याशिवाय दहशतवाद्यांना उत्पन्नाचे एक फार मोठे साधन मिळाले आहे. यामुळे दहशतवाद वाढण्यात मदत होते आहे. नशा आणि आनंदाच्या नावाखाली पार्टीत घुसखोरी केलेले ड्रग्ज दहशतवादाचे रुप घेत आहे. पाकिस्तान आणि आयएसआय भारतीय तरुणांमध्ये ड्रग्जचे व्यसन वाढावे म्हणून आटोकाट प्रयत्न करत आहेत. धक्कादायक म्हणजे देशातीलच अनेक विघातक शक्तीही यात उतरल्याने हा दहशतवाद विक्राळ रूप धारण करत आहे.

पाकिस्तानच्या सीमेला अगदी लागून असलेल्या पंजाबमधील काझीकोटच्या बरोबरीनेच माळवा, माझा आणि दोआबा गावांचीही ड्रग्जच्या वाहतुकीचा महामार्ग ही ख्याती आहे. ईशान्य भारतात पण ड्रग्जचा व्यापार आणि व्यवसाय याची पाळेमुळे खोलवर रुजली आहेत. पाकिस्तानातील वझिरीस्तानमधून मोठय़ा प्रमाणात येणारी अफू देशात विविध मार्गांनी प्रवेश करते.

सीमेपलीकडून येणार्या ड्रग्जशिवाय एक नवे संकट देशात दाखल झाले आहे. ते म्हणजे क्रिस्टल मेथ. एफेड्रीन आणि स्युडोएफेड्रीन यांच्यापासून तयार झालेल्या मेथचे रासायनिक नाव मेथाम्फिटामाईन. या ड्रगला 'आईस' असेही म्हटले जाते. पण, तरुणांमध्ये हे ड्रग लोकप्रिय आहे ते क्रिस्टल मेथ म्हणूनच. एकीकडे हेरॉईन, कोकेन यांची उपलब्धता आणि त्यांची किंमत पाहता एका ग्रमला दहा हजार रुपये (दहा लाखांना एक किलो) इतक्या 'स्वस्त' दरात उपलब्ध असलेले क्रिस्टल मेथ लोकप्रिय झाले आहे. हे ड्रग अधिकाधिक तरुणांपर्यंत पोहचावे यासाठी ड्रग पेडलर्स प्रयत्नशील असतात. कमालीच्या तणावाखाली असलेले विद्यार्थी, व्यावसायिक आणि कलाकार यांना ते आपले लक्ष्य करतात. याविरुध्द सर्व सुरक्षा एजन्सीजने बहुआयामी अभियान चालवायला पाहिजे.

एकेकाळी दहशतवादाच्या संकटातले राज्य, अशी पंजाबची ओळख होती. आता अमली पदार्थांच्या विळख्याचे संकट त्या राज्याला ग्रासून टाकत आहे. पंजाबमध्ये सत्तेवर असलेले सरकार या गंभीर प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यापासून फारच दूर आहे. तेथील सत्तर टक्के तरुण व्यसनांच्या विळख्यात अडकले आहेत.
राज्य सरकारच्या आकडेवारीप्रमाणे शाळेत जाणारी 66% मुले गुटखा – तंबाखूचे सेवन करतात. दर तीन विद्यार्थ्यांपैकी एक, तर दहा विद्यार्थिनींपैकी एकीने अमली पदार्थांची चव चाखली आहे. महाविद्यालयांत जाणारे दहापैकी सात जण हेरॉइन, अफूचे शौकीन आहेत. ग्रामीण भागात 67% घरांतील किमान एक तरी व्यक्ती अमली पदार्थांच्या आहारी गेली आहे. पंजाबमध्ये सीमेवर तब्बल 700 कोटींचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. परिस्थिती किती भयावह झाली आहे, याचेच हे निदर्शक आहे. प्रामुख्याने पाकिस्तानातून अमली पदार्थांची तस्करी होते आणि सीमेच्या संरक्षणाची जबाबदारी केंद्रीय दलांची असल्याने या प्रकाराला केंद्र सरकारही जबाबदार आहे. अमली पदार्थांचा सुळसुळाट होण्यास माफियांशी असलेले राजकारण्यांचे लागेबांधे पण कारणीभूत आहेत. अमली पदार्थांची तस्करी करणार्या माफियांना राजकारण्यांचा वरदहस्त आहे, अमली पदार्थाच्या बाबतीत नेता कुठल्याही राजकीय पक्षातील असू दे, त्याला कठोर शिक्षा झालीच पाहिजे.

कायदेशीर अफू उत्पादनात भारत अग्रेसर आहे. अफू हा नशा आणणारा, मादक पदार्थ असल्याने त्याचे उत्पादन करण्यावर कायद्याने बंधने आहेत. अफूची शेती करण्यासाठी रितसर परवानगी घेण्याची गरज असते. आपल्या देशात मध्य प्रदेश, राजस्थान, झारखंड आणि प. बंगालमध्ये अफूची लागवड करण्यास परवानगी आहे. उत्तराखंड, छत्तीसगड, ईशान्येकडील राज्यात अफूची बेकायदेशीर लागवड मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे त्या शेतकऱ्यांवरही कायदेशीर कारवाई झाली पाहिजे.

गेल्या वीस एक वर्षांत अमली पदार्थांच्या जागतिक नकाशावर भारताची ओळख कॅरियर' म्हणून झाली. मध्यपूर्व आशियातून निर्माण होणारे अमली पदार्थ युरोप, अमेरिका आणि

आखाती देशांमध्ये पाठविण्याच्या मार्गावरील एक महत्त्वाचे ठिकाण म्हणून भारताचे नाव पुढे आले. आपल्याकडे तुलनेने कमी सुरक्षा आणि सैल कायदे असल्याने तस्करांना हा मार्ग सुरक्षित वाटतो.

नशिल्या पदार्थाला आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचे मोल आहे. या तस्करीतून मिळणाऱ्या कोट्यवधी रुपयांची रसद अतिरेक्यांची फळी उभारण्यास कारणीभूत ठरली. संयुक्त राष्ट्रांच्या जीनिव्हा येथे 1971 साली झालेल्या परिषदेने या प्रकाराची गांभीर्याने दखल घेतली. भारतात या पदार्थाच्या विक्रीला किमान 10 वर्षांची सक्तमजुरी व 5 लाख रुपये दंडाची शिक्षा आहे. तर, युरोपीय राष्ट्रांमध्ये कायद्यातील शिक्षेची तरतूद पाहून कोणी पदार्थाच्या निर्मितीचे स्वप्नही पाहू शकत नाही.

अंमली पदार्थ विरोधी कायद्यामध्ये हेरॉईन, कोकेन, मरीजुआना यांचा समावेश 'शेडयुल वन'मध्ये करण्यात आला आहे. या ड्रग्जची वाहतूक, खरेदी विक्री आणि सेवन करताना आढळणाऱ्या व्यक्तीला कमीत कमी 10 वर्षे किंवा जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते. परंतु, क्रिस्टल मेथ हे सिंथेटीक ड्रग्ज `शेडयुल टू'मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. याचा अर्थ या पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांना अधिकाधिक दोन ते तीन वर्षे शिक्षा होऊ शकते. मेथचा समावेश `शेडयुल वन' मध्ये व्हायला पाहिजे.

बनावट नोटा मोठया प्रमाणात चलनात आणून भारतीय अर्थव्यवस्था अडचणीत आणण्याचा उद्योग पाकिस्तान करीत आहे. जम्मू–काश्मीर, पंजाब आदी सीमावर्ती राज्यांत घुसखोरांबरोबरच शस्त्रास्त्रे आणि अमली पदार्थांची तस्करी करून तेथे अशांतता माजविण्याची व तरुण पिढी बरबाद करण्याची कुटिल खेळीही पाकिस्तान खेळत आहे. हा गंभीर धोका ओळखून त्याचा एकजुटीने मुकाबला केला पाहिजे. या भस्मासुराचा बंदोबस्त करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती दाखविण्याची आणि राज्य व केंद्राने समन्वयाने काम करण्याची गरज आहे.

रिकाम्या हातांना काम उपलब्ध करून देणे, हा भरकटलेल्या तरुणाईला योग्य मार्गावर आणण्याचा एक महत्वाचा उपाय आहे. परकीय शक्तींबरोबर लढत असताना देशातील विघातक शक्ती सामाजिक समतोल आणि आरोग्य बिघडवण्याचा छुपा मार्ग अनुसरत आहेत. याला तोंड देण्यासाठी सर्वांनाच तयार व्हावे लागेल.

मतपेटीच्या राजकारणामुळे पश्चिम बंगालमधे वाढता दहशतवाद

October 29, 2014 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा

पश्चिम बंगालमध्ये १८० दहशतवादी, ७० दहशतवादी छुपे सेल ?

पश्चिम बंगालच्या बर्दवानमधील खागरागड येथे बॉम्बस्फोट झालेल्या ठिकाणाला सोमवारी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोवल, गुप्तचर विभागाचे (आयबी) प्रमुख इब्राहिम, एनएसजीचे महासंचालक चौधरी, रॉ आणि एनआयएचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट दिली.या वरुन पश्चिम बंगालमध्ये फ़ोफ़ावल्या दहशतवादाची कल्पना यावी.श्री अजित दोवल यांनी पश्चिम बंगालमधे लपलेल्या १८० दहशतवाद्यांची, राज्यातील शेकडो मदरसामधील दहशतवादी ट्रेनिंग केंद्राची आणि ७० दहशतवादी छुप्या सेलची यादी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना दिली.

इतक्या मोठ्या प्रमाणावर आतंकी कारवाया ज्या ठिकाणी चालत असतील, तेथे स्थानिक प्रशासन, पोलीस यांना याविषयी माहिती कशी मिळत नाही? कि माहिती मिळूनही पोलीस-प्रशासन त्याकडे कानाडोळा करते कि पोलीसही त्यात सामील असतात? तृणमूलच्या नेत्याच्या घरी झालेल्या स्फोटाच्या प्रकरणात पोलिसांनीच पुरावे नष्ट केले आहेत. बंगलादेशची राजधानी ढाका येथे मोठ्या प्रमाणात रक्तपात घडवून आणण्याची हुजी अतिरेक्यांची योजना असल्याची माहिती आहे व काही राजकीय नेत्यांना, नामवंत व्यक्तींनाही ठार मारण्याची हुजीची योजना होती, असे इतके दिवस झोपलेले पश्चिम बंगालचे पोलिस आता सांगत आहेत.

बर्दवान, जर्मन बेकरी, पाटण्यातील बॉम्बस्फोटांत साम्य

२ ऑक्टोबर रोजी वर्धमान जिल्ह्याच्या खागरागढ येथे तृणमूल नेत्याच्या घरी बॉम्ब बनविताना झालेल्या स्फोटात दोन दहशतवादी ठार झाले. एक जण जखमी झाला. यावेळी पश्चिम बंगालच्या ‘सरकारने सर्वात पहिले कोणते काम केले असेल तर ते म्हणजे घटनास्थळावरून जप्त करण्यात आलेली स्फोटके आणि पुरावे नष्ट करण्याचे. मात्र घटनास्थळावरून वृत्त स्थानिक वर्तमानपत्रात फोटोंसह छापून आले. नंतर गृहमंत्रालय अधिकाऱ्यांनी खुलासा केला आहे की, प. बंगाल पोलिस या प्रकरणी अजीबात सहकार्य करीत नाही. आता जसजशी अधिक सखोल चौकशी होत आहे, तसतसे ममता बॅनर्जी सरकारचे जिहादींशी असलेले जिव्हाळ्याचे संबंधही उघड होत आहेत. ज्या तृणमूल कॉंग्रेस पक्षाच्या नेत्याच्या घरी बॉम्बस्फोट झाला, त्याचे बांगला देशातील दहशतवादी संघटना जमात उल मुजाहिदीनशी अतिशय निकटचे संबंध आहे. दहशतवाद्यांना पैसा पुरविण्यात देखील वरील नेत्याची मोठी भूमिका आहे.

बर्दवानमधील खागरागड, पुण्यातील जर्मन बेकरी आणि पाटण्यातील बॉम्बस्फोटांत मोठे साम्य आढळून आले होते. बर्दवानमधील एका घरातून ५९ आयईडी, ५५ ग्रेनेड्स जप्त करण्यात आले. यामध्ये रशियन ग्रेनेड लॉंचर्सचाही समावेश आहे. आसाममधील बोडोंवर हल्ला करण्यासाठी,

बांगलादेशातील दहशतवाद्यांसाठी आणि भारतात इतरत्र बॉम्बस्फोट करण्याकरता ही शस्त्रे तयार केली असावीत.

वर्धमान जिल्ह्यात दहशतवाद्यांचे जाळे कुठपर्यंत पसरले आहे आणि त्यांची काय योजना होती, याचे पुरावे राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) च्या हाती लागले आहेत. खागरागढ स्थित घरातून एनआयएला लेड अलाईड या अतिशय शक्तिशाली रसायनांच्या रिकाम्या बाटल्या आढळून आल्या. या स्फोटकाच्या धमाक्यात हजारो लोकांचा बळी जाऊ शकला असता. एनआयएने दहशतवाद्यांच्या अन्य दोन अड्ड्यांवरून प्रचंड प्रमाणात आधुनिक शस्त्रास्त्रे आणि दारुगोळा जप्त करण्यात आला. दहशतवाद्यांच्या अड्ड्यावरून जप्त सिम कार्डच्या कॉल डिटेल्सवरून असे कळले की त्यांचा जम्मू-काश्मीर, उत्तरप्रदेश, आसाम, महाराष्ट्र, तामिळनाडू येथील राज्यातील सहकाऱ्यांशी सातत्याने संवाद होत होता. 'आझमगढ आणि दरभंगा मॉड्यूल'नंतर दहशतवादी बायका व मुलांबरोबर राहुन दहशतवादी कारवाया करत आहे. यामुळे अड्डे बनविणे सोपे होते आणि लोकांना कुठल्याही प्रकारचा संशय येत नाही.

<u>अनेक प्रांतातील युवक-युवती जिहादी संघटनांमध्ये सामील</u>

एनआयएला सिमुलियातील मदरशाविरुद्ध पुरावे मिळाले आहेत. दहशतवाद्यांना याच मदरशात जिहादी प्रशिक्षण देण्यात आले होते. रुमी आणि अमीना बीबी बांगलादेशच्या जमातुल मुजाहिदीनच्या महिला 'हिट स्क्वाड' च्या सदस्य होत्या. या दोघींच्याही शोधात बांगलादेश पोलिस होती. चौकशीत दोघींनीही कबूल केले की, सिमुलिया मदरशात त्यांना शस्त्रास्त्रे चालविण्याचे आणि जिहादचा प्रचार-प्रसार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले होते.

वर्धमान प्रकरणातील दहशतवाद्यांचा सूत्रधार आणि मदरसाचा संचालक युसुफ शेख २००७ ते २००९ पर्यंत उत्तरप्रदेशात होता, जेथे त्याला दहशतवादी प्रशिक्षण देण्यात आले. त्याने आझमगड मॉड्यूलच्या धर्तीवरच वर्धमान येथे जमातुल मुजाहिदीन बांगलादेशचे दहशतवादी मॉड्यूल बनवले होते.

गेल्या वर्षी बोधगया येथील महाबोधी मंदिरावर दहशतवाद्यांच्या हल्ल्याची चौकशी करीत असताना लक्षात आले, की या स्फोटासाठी वापरण्यात आलेली साधने आसाममधील गुवाहाटी येथून आणण्यात आली होती. या दहशतवादी हल्ल्यात म्यानमारमधून हकालपट्टी झालेल्या रोहंगिया मुसलमानांचा(हे भारतीय नाहीत) हात होता. त्यांना स्वीकारण्यास बांगलादेश तयार नाही; त्यांना कोणतेही राष्ट्र स्वीकारायला तयार नाही. आसामची सरहद्द त्यांना प्रवेश करण्यास सुलभ वाटते, म्हणून त्यांनी आसामात आश्रय घेतला आहे. अशा तऱ्हेने ३० हजार रोहंगिया मुसलमानांनी आसामात आश्रय घेतला आहे.

गेल्या दोन वर्षांत कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, आसाम, उत्तरप्रदेश, बिहार इत्यादी राज्यांत मोठ्या संख्येत युवक-युवतींना जिहादी संघटनांमध्ये सामील करण्यात आले

आहे. त्यांना प्रशिक्षणासाठी बांगलादेश मार्गे वजीरिस्तानमध्ये पाठवले जाते. तेथून परतल्यावर ते मदरशाच्या माध्यमातून अन्य लोकांना जिहादसाठी प्रेरित करतात. सिमुलिया स्थित मदरशातून एनआयएने प्रचंड प्रमाणात उर्दू आणि अरबी भाषेतील प्रकाशित जिहादी सामुग्रीचे ढीग जप्त केले. शेकडो जिहादी पुस्तके, पत्रके, प्रचार सामुग्रीने भरलेल्या १४ पेट्या आणि वाळूने भरलेली असंख्य पोती जप्त केली. मदरशातून एक नॅनो कारही जप्त करण्यात आली आहे. या कारच्या काचेवर नाशिक स्थित लष्करी छावणीत वापरण्यात येणारे स्टीकरही लावण्यात आले होते. मदरशाला गुप्त खोल्या आणि भुयारी मार्ग असल्याचेही आढळून आले आहे. एनआयएला बांगलादेशला अगदी लागूनच असलेल्या मुर्शिदाबादच्या लालगोला आणि बेलडांगा येथे दोन मदरशांची माहिती मिळाली आहे, जेथे दहशतवादी प्रशिक्षण दिले जाते.

बांगलादेशचे 'जनसंख्या-युद्ध' आणि आपले मत पेटीचे राजकारण

तिकडे आसाम पोलिसांनी बरपेटाहून सहा दहशतवाद्यांना अटक केली आहे. हे दहशतवादीसुद्धा जमातुल मुजाहिदीनचे सदस्य आहेत आणि यातील तिघांचे प्रशिक्षणही त्याच मदरशातून झाले, जेथे वर्धमान बॉम्बस्फोटातील फरार मुख्य आरोपी कौसरचे झाले होते.

आज भारतातील अनेक जागा बांगलादेशी मजूरवर्गासाठी सुरक्षित वस्ती झाल्या आहेत. मुंबई आणि दिल्लीकडे त्यांची रीघ लागली आहे. हे बेकायदेशीर स्थलांतरण जर असेच काही वर्षे चालत राहिले, तर त्याचे परिणाम साऱ्या देशासाठी भयानक होऊ शकतात. कारण प्राथमिक अवस्थेत मजूर म्हणून यांची ओळख देण्यात येत असली, तरीही अल्पावधीतच एका राजकीय शक्तीमधे/पक्षामध्ये त्यांचे रूपांतर होते. सध्या ज्या प्रकारे बांगलादेशी घुसखोर आसाममधे प्रभावी बहुसंख्यक म्हणून स्वत:ला सिद्ध करू पाहत आहेत (त्यांचे ३ खासदार आणि १७ आमदार आहेत). याचीच पुनरावृत्ती नजीकच्या काळात मुंबई आणि दिल्लीमधेही घडू शकेल. भारतीय नागरिकाच्या मताचे जे मूल्य आहे तेच, भारतातील घुसखोर बांगलादेशीचेही आहे आणि हा मताधिकार मिळविणे बांगला देशींसाठी या देशात किती सहज आहे, हे समजवण्याची गरज नाही. बांगला देशातून भारताविरुद्ध एक 'जन संख्या आक्रमणाचे-युद्ध' छेडलेले आहे, जे पाकिस्तान करीत असलेल्या सशस्त्र आक्रमणापेक्षा कितीतरी पटींनी भयावह आहे. बांगलादेशी घुसखोरीची समस्या आता नंबर एक राष्ट्रीय समस्या बनली आहे. ते आता दहशतवाद पण पसरवत आहेत. पंतप्रधान मोदींनी गेल्या निवडणुकांच्या काळात या संबंधात कठोर भाषा वापरली होती, आता ते या संकटापासून साऱ्या देशाचे रक्षण करण्यासाठी एक परिणामकारक कार्यवाही अमलात आणतील, अशी आशा वाटते.

अतिरेक्यांच्या धमक्या व 'ब्रेकिंग इंडिया' चे भाकीत

October 6, 2014 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राष्ट्रीय सुरक्षा

अल् कायदा भारतात दहशतवादी कारवायांच्या मदतीने इस्लामिक राज्य उभे करण्याच्या तयारीत आहे, याची कल्पना 'ब्रेकिंग इंडिया' या पुस्तकाचे लेखक राजीव मल्होत्रा यांनी शेकडो पुराव्यानिशी ४ वर्षांपूर्वीच दिली होती. देशात जेहादी दहशतवादी, माओवादी यांनी परस्परांना मदत करून आपल्याला योग्य अशी भूमी वाटून घेतली आहे, असे त्यांनी पुस्तकात नमूद केले होते. सर्वांत चिंतनीय बाब म्हणजे या देशातील अनेक राज्यकिय पक्ष जेहादी, माओवादी ,संघटनांनाच आपले समर्थक मानतात. भारतात २१/०९/२०१४ पर्यंत २५३ सामान्य नागरिक, ११० सैनिक, ३०३ दहशतवादी/ माओवादी,मारले गेले.

काश्मीरमधिल वाढती घुसखोरी

सीमेपलीकडून काश्मीर खोऱ्यात अतिरेक्यांच्या घुसखोरीचा आणखी एक प्रयत्न उधळून लावताना भारतीय लष्करी जवानांनी १८/०९/२०१४ ला जम्मू-काश्मीरच्या तंगधार सेक्टरमधील नियंत्रण रेषेवर लष्कर-ए-तोयबाच्या चार अतिरेक्यांना कंठस्नान घातले.

जम्मू-काश्मीरमध्ये आलेल्या पुरात लष्कराच्या अनेक छावण्यांचे प्रचंड नुकसान झाले. लष्कराचा मोठा शस्त्रसाठा पुरात वाहून गेला. पुराचे पाणी आणि चिखल यात अडकून पडल्यामुळे लष्कराच्या अनेक रायफली बिघडल्या. घरात पाणी शिरल्यामुळे शेकडोजणांना लष्कराने पूर आल्यानंतर उभारलेल्या छावण्यांमध्ये आश्रय घेण्याची वेळ आली आहे. असंख्य सैनिक मदतकार्यात गुंतले आहेत. या सगळ्याचा सीमावर्ती भागातील बंदोबस्तावर परिणाम होईल असा विचार करुनच दहशतवाद्यांनी घुसखोरीची तयारी सुरू केली आहे. एकाचवेळी संरक्षण यंत्रणा सीमावर्ती भागातील आपल्या चौक्या, बंकर, छावण्यांची डागडुजी करणे आणि नागरी वस्तीत मदतकार्य सुरू ठेवणे अशी कसरत करत आहे. पाकिस्तान दहशतवाद्यांमार्फत भारतात मोठ्या प्रमाणावर हिंसा करण्यासाठी नव्याने प्रयत्न करत आहे. नियंत्रण रेषेच्या वेगवेगळ्या भागातून दोनशे दहशतवादी भारतात घुसखोरी करण्यासाठी सज्ज आहेत.

जिहादी संघटनांच्या रडारवर भारत

अल् कायदाद्वारा इतक्यात जारी करण्यात आलेल्या व्हिडीओत 'अल् कायदा जिहाद' ला भारत, बांगलादेश आणि म्यानमारमध्ये रक्तपात घडविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जवाहिरीने भारताच्या जम्मू-काश्मीर, गुजरात आणि आसाममध्ये जिहाद प्रारंभ करण्याची धमकी दिली आहे. भारताच्या आसाम, गुजरात आणि काश्मीरची निवड आपल्या जिहादी अजेंड्यात करण्यामागे अल् कायदाची विचारपूर्वक आखलेली व्यूहरचना आहे. येथील युवकांना धर्माच्या नावाखाली भडकविणे सोपे आहे. याशिवाय अल् कायदाने केरळ, कर्नाटक आणि तामिळनाडूतील युवकांना संघटनेत सहभागी करण्याची मोहीम सुरू केली आहे. त्यांना रोजगार देण्याचे आमिष दाखवून कुवैतला पाठविण्यात येत आहे.

भारतात काश्मीरमध्ये अल कायदाचे नेटवर्क पूर्वीपासून आहेच. सिमी, इंडियन मुजाहिद्दीन या संघटनांच्या माध्यमातून त्यांनी कारवाया सुरूच ठेवलेल्या आहेत. बांगलादेशातून आपल्याकडे विविध कुरापती सुरू आहेतच. भारतातील युवकांच्या मनात विष कालवण्याचे काम मुजाहिदीन करते. त्यांना पाकव्याप्त काश्मीरमधील शिबिरात दहशतवादाचे धडे अल् कायदा देते. पाकिस्तानात बसून भारतात दहशतवादी कारवायांचे कटकारस्थान रचणाऱ्या हाफीज सईदसारख्यानेही भारतातील मुस्लिमांवर होणाऱ्या अन्यायाचा बदला घेण्यात येईल, अशी धमकी दिली आहे. शिवाय भारतात आपली पाळेमुळे पसरलेल्या सिमी या संघटनेकडून सतत धोका होत आला आहे.

इराकमध्ये आयएसआयएस या संघटनेचा स्वयंभू खलिफा अबु बकर अल् बगदादी याने इराकमध्ये नरसंहार केल्यानंतर यापुढे आपले लक्ष्य भारत असल्याचे म्हटले आहे. आयएसआयएसजवळ सध्या ३०,००० लढवय्यांची फौज आहे. या सगळ्या संघटना अचानक भारताला धमक्या का देत सुटल्या आहेत, यामागे एखादे संघटित कटकारस्थान तर नाही ना?

बगदादचे मुख्य शियापंथी अल मलिकी बगदाद यांनी जगातील सर्व शियाना शिया पंथाच्या रक्षणासाठी आमंत्रित केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, आयएसआयएस/अल कायदापासून आमचे रक्षण करा. त्यांना मान देऊन अलिगड येथून सहा हजार शिया पंथी युवकांनी बगदादला जाण्याची तयारी केली आहे. सर्व देशातून एकूण २५००० शिया नौजवान इराकला जाण्यासाठी तयार आहेत. या सर्व प्रकारात शिया व सुन्नी कोण कोणाला भारी पडेल हे काळ ठरवेल. यांच्या फंदात भारतियांनी न पडलेलेच बरे.

असुरक्षित ईशान्य भारत

आसाममधील उल्फाशी अल कायदाने संधान साधले असल्याची भीती त्या राज्याचे मुख्यमंत्री तरुण गोगोई यांनी व्यक्त केली आहे. गेल्या काही वर्षांपासून पाकिस्तानमधील भारतविरोधी दहशतवादी शक्ती नक्षलवाद्यांशी आणि ईशान्येकडील फुटीर गटांशी हातमिळवणी करण्यासाठी धडपडत असल्याच्या वार्ता गुप्तचर यंत्रणांना मिळत आल्या आहेत. त्यामुळे उल्फाशी खरोखरच अल कायदाने संपर्क प्रस्थापित केलेला असेल, तर ती चिंतेची बाब म्हणायला हवी.आसाममध्ये बांगलादेशी घुसखोर आणि स्थानिक नागरिकांमध्ये संघर्ष सारखा चालु आहे.

आसाममध्ये स्थानिक बोडो आदिवासींना हिंसेच्या बळावर हाकलून देणारे अवैध बांगलादेशी घुसखोर आहेत, ज्यांच्यामुळे केवळ असामच्याच लोकसंख्येचा समतोल बिघडला असे नसून, देशातील अन्य भागात ठाण मांडून बसलेल्या बांगलादेशी घुसखोरांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हुजीसारख्या दहशतवादी संघटनांच्या कारवाया बांगलादेशी घुसखोरांच्या मदतीने सुरू आहेत

माओवाद्यांचा सह्याद्री डोंगररांगांत प्रवेश

मध्य भारतात आपले जाळे पसवणाऱ्या माओवाद्यांनी आता पश्चिम घाटाच्या परिसराला आपले कार्यक्षेत्र बनवण्याचा निर्णय घेतला आहे. भाकप माओवादी या पक्षाच्या दशकपूर्तीच्या निमित्ताने माओवाद्यांच्या केंद्रीय समितीने सहकयाऱ्यांना पाठवलेल्या पत्रात कोकण, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ या भागांतील पश्चिम घाटांतून सरकारविरोधी कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. माओवाद्यांनी पुण्या-मुंबईपर्यंत जाळे विणल्याचे अलीकडे दिसून आले आहे. विभिन्न अतिरेकी संघटनांकडून गेल्या महिनाभरात आलेल्या धमक्या, आमच्या सरहद्दींसह अंतर्गत सुरक्षा सांभाळणाऱ्या सबंध यंत्रणांसाठी सतर्कतेचा इशारा देणाऱ्या आहेत. पाकिस्तानच्या नापाक कारवाया आणि माओवाद्यांच्या हिंसाचाराचा मुकाबला आमचे जवान करीत असतानाच, या धमक्या एकामागून एक आल्या आहेत.

दहशतवादी कारवायांसाठी संयुक्त प्रयत्न

प्रत्येकाच्या लपून बसण्याच्या जागा आहेत. काही संघटना लपून बसण्याच्या जागांमुळे प्रभावी झाल्या आहेत. प्रत्येकाजवळ दहशतवादी कारवायांसाठी लागणारी शस्त्रास्त्रे आहेत. खेळता पैसा, दळणवळण साधनेही आहेत. ती साधने एकमेकांसाठी उपलब्ध करून, भूमिगत स्वरूपाची अनेक प्रशिक्षणे एकत्र चालवणे फ़ायद्याचे असते. आजारी दहशतवाद्यांची काळजी एकत्र घेता येते. या प्रकारांची सुरुवात प्रथम ईशान्येकडील राज्यात झाली व नंतर आसाम, बिहार, बंगाल, झारखंड ओरिसामध्ये सुरू झाली. गेल्या दहा वर्षांत देशभर अनेक ठिकाणी जे स्फोट झाले त्याला यांचा संयुक्त प्रयत्न कारणीभूत होता. या संघटनानी आपापसात या देशाची वाटणी करून टाकली आहे. उत्तरेतील अनेक प्रदेश जिहादासाठी आहेत. रेड कॉरिडार हे क्षेत्र माओवाद्यांसाठी आहे.येणाऱ्या काळात भारतीय उपखंडांमध्ये दहशतवादी कारवाया वाढवणार आहे.

सामना हवा दहशतवादी मानसिकतेशी

ठाणे, हैदराबाद, केरळ, तमिळनाडू या भागांतील तरुणांना जिहादच्या नावाखाली दहशतवादासाठी बळी पाडले जात आहे. दहशतवादी संघटना आहेतच. पण, त्यांना मदत करणाऱ्या यंत्रणा आहेत तरी कुठल्या?, या भारतीय तरुणांना व्हीसा देतो तरी कोण?, त्यांना इराकमध्ये न्यायला कोण गेले होते? या प्रश्नांची उत्तरे आपल्याकडे नाहीत. दहशतवादी कारवायांचे काम अतिशय गुप्तपणे सुरू आहे .ते आपल्या जवळ येऊन ठेपले आहे. दिल्ली, बिहार, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र येथील जवळजवळ ३०० भारतीय इराक आणि सीरियात आयएसआयएसबरोबर खांद्याला खांदा लावून रक्तपात घडविण्याला गेले आहेत. या गेलेल्या तरुणांमधील काही दहशतवादी बनले, तरी तो देशासाठी मोठा धोका ठरेल. यासाठीच भारताने तरुण पिढीकडे फार बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे. दहशतवादी संघटनांना कधीही कमी लेखण्याची चूक करू नये. काही

दहशतवादी संपले म्हणून दहशतवाद संपत नसतो. दहशतवादी मानसिकतेवर प्रहार गरजेचा असतो. तो आपण करायला हवा. दहशतवादाकडे वळलेल्या तरुणाचे सरासरी आयुष्य ५-७ वर्षांचे असते. तेव्हा या मार्गाकडे वळणाऱ्या तरुणांचे प्रबोधन गरजेचे आहे. दहशतवादाचा सामना हवा, तो दहशतवादी मानसिकतेशी.

समाज एकसंध व्हायला हवा

भारतावर काही महिन्यापासुन दहशतवादी हल्ला झाला नाही, याचा अर्थ दहशतवाद संपला असा नाही. समाजात एकी असेल, तर अल कायदासारख्या कितीही दहशतवादी संघटना उभ्या राहिल्या, तरी काहीही वाईट करू शकत नाहीत; पण अल कायदाचे हे भूत उतरवायचे असेल, तर डोळे उघडून सगळीकडे सजगतेने पाहायला हवे आणि समाज म्हणून एकसंध व्हायला हवे. दहशतवादाला पाकिस्तानचे प्रोत्साहन लाभत आले आहे.

विळखा दहशतवादी कारवायांचा : आय.एस.आय. वर नियंत्रण करण्याची गरज

August 1, 2014 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

हिवाळ्यापूर्वीच भारतामध्ये घुसखोरी करण्याच्या इराद्याने २,०००-२,५०० अतिरेकी भारतात घुसण्याच्या प्रतीक्षेत असल्याचा गौप्यस्फोट लेफ्टनंट जनरल के.एच सिंग यांनी नाग्रोटा येथे २६ जुलैला केला.पाकमध्ये, ३०-३५ छुप्या अतिरेकी-प्रशिक्षण-केंद्रांतून प्रशिक्षण देणे सुरूच आहे. पाकिस्तानने जो गोळीबार केला व दोन महिन्यांत अखनूर येथे दोन हल्ले झाले, त्याला पुरेसे प्रत्युत्तर देण्यात आले असे ते म्हणाले. त्यात अनेक अतिरेकी मारले गेले आहेत.

गाझा हल्ल्यांचा आम्ही बदला घेऊ! १९९३ साली आम्हाला पकडण्यात तुम्हाला यश मिळाले. आता तुम्ही आम्हाला पकडून दाखवा, अशा धमकीचे पत्र पोलिस आयुक्त राकेश मारिया यांना २६ जुलैला मिळाले .पत्राची सत्यता पडताळून पाहण्यात येत असून, शहरात हाय ॲलर्ट घोषित केला आहे. हिंदी आणी इंग्रजीत हे पत्र लिहिण्यात आले असून, पोस्टाद्वारे ते पोलिसांना मिळाले.ईद व आगामी सण पाहता शहरात सुरक्षा व्यवस्थाची काळजी घेण्यात येत आहे.

तरुणांवर होणारे स्लो पॉयझनिंगचे प्रयोग

पुण्यात ऐन वर्दळीच्या ठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटाच्या तपासाचे आव्हान उभे असतानाच कल्याणमधील चार तरुण इराकमध्ये दहशतवाद्यांच्या संपर्कात असल्याच्या वृत्ताने खळबळ माजली. अनेक वर्षांपासून ठाणे जिल्ह्यातील १५ ते ३५ वर्षे वयोगटातील काही तरुण हरवले आहे. कल्याणमधील चार तरुण इराकमध्ये 'आयएसआयएस' मध्ये कार्यरत असल्याची बाब

त्यांच्या पालकांनी तक्रार केल्यानंतर उघड झाली. यामुळे दहशतवादी तसेच कट्टर धर्मांध गटांकडून तरुणांवर होणारे स्लो पॉयझनिंगवर प्रकाश पडला. आता त्याच्या सामाजिक पार्श्वभूमीचा अभ्यास करावा लागेल. बेपत्ता तरुणांचा डेटाबेस तयार करून तो एनआयएकडे जमा करावा लागेल. गाझा पट्टीत सध्या रणधुमाळी सुरू आहे. तिथे एका भारतीयाला आपले प्राणही गमवावे लागले आहेत. आता पुढच्या दोन महिन्यात रमजानच्या पाठोपाठ गोपाळकाला, गणेश चतुर्थी यासारखे मोठमोठे सण येऊ घातले आहेत.

तामिळनाडू मधील दहशतवाद

तामिळनाडू मध्ये दर वर्षी नवीन आव्हाने येत आहेत. एखादे प्रकरण उघडकीस आले, तर दुसरे नंतर वाट पाहत असते. 1मे ला चेन्नई स्टेशनवर रेल्वेच्या S4 व S5 या डब्यांमध्ये बॉंबस्फोट झाले. एप्रिल २०१३ मध्ये बंगळुरूच्या भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयासमोर स्फोट झाले. मार्च २००० मध्ये तामिळनाडूच्या लिबरेशन आर्मीने कडालूर या स्टेशनजवळील रेल्वे मार्गावर बॉंबस्फोट घडवून आणला.

पाकिस्तानच्या आय.एस.आय. (इंटर-सर्व्हिसेस-इंटेलिजन्स, कुप्रसिद्ध गुप्तवार्ता-संस्था) ने भारतात घातपाती कारवाया करण्याचा नवा मार्ग शोधून काढला आहे. आजपर्यंत नेपाळ, बिहारमार्गे आपले लोक भारतात घुसवून बॉंबस्फोट, गाडया पाडणे अशा घातपाती कारवाया घडवून आणीत. मुख्यत: मुंबई, दिल्ली, पाटणा, बनारस या शहरात हे स्फोट घडवून आणले जात.आता आय.एस.आय.चे श्रीलंकेतील पाकिस्तानी वकिलातीचा उपयोग करून तामिळनाडूभर त्यांचे जाळे पसरण्याचे उद्योग चालू आहेत.

थामिम अन्सारी, तिरुची या लहान गावातील एक व्यापारी बॉंबस्फोट घडवून आणण्याकरिता रेकी करताना पकडला गेला. काही काळ तुरुंगवास भोगल्यानंतर त्याला सोडण्यात आले. आता ‘National Investing Agency’ ने त्यावर खटला भरला आहे. त्याच सुमारास श्रीलंकेतील पाकिस्तानी वकिलातीत काम करणाऱ्या आय.एस.आय.च्या अधिकाऱ्याने या अन्सारीचा उपयोग करून घेतला.

त्यात वेलिंग्टनमधील मद्रास रेजिमेंटल सेंटर, नागिपट्टणमधील तटरक्षक दलाच्या व नौदलाच्या इमारती, अंदमानवर पोर्ट ब्लेअर येथील सैनिकी ठाणी, विशाखापट्टणम येथे नौदल केंद्र व कोईमतूर येथील सुलूर हवाई दलाचे केंद्र सामिल आहे. २०१२ मध्ये तिरुची येथे अन्सारीला अटक झाली. तामिळनाडू पोलिसांनी आपल्या आरोपपत्रिकेत पाकिस्तानी वकिलातीतील अधिकाऱ्याचे नाव दाखल केले आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला एक अतिरेकी हुसेन भारतात येऊन त्याने चेन्नईतील व बंगळुरूमधील अमेरिकन वकिलातींचे अनेक फोटो घेतले. यानंतर मार्चमध्ये हुसेनला श्रीलंकेतील मन्नारच्या समुद्रकिनारपट्टीवरून दोन इसमांनी भारतात आणले. त्याच वेळेस भारतात घातपाती कारवाया करण्याकरिता व्यवस्था करण्याच्या सूचना त्याला मिळाल्या. त्याने क्वालालंपुरमधील श्रीलंकेच्या महम्मद हुस्नीशी संगनमत केले. ते बंगळुरूला इस्राइलच्या वकिलातीवर घातपात करणार होते.

बनावट नोटांचा सुळसुळाट

पाकिस्तान आपल्या हस्तकांकरवी गेली कित्येक वर्षे भारतात खोटे चलन पाठवत आहे. या खोटया नोटा भारतीय नोटांची हुबेहूब प्रतिकृती आहे. या नोटा मालदीव व श्रीलंकेहून भारतात पाठवल्या जातात. त्या घातपात करण्याकरिता उपयोगात आणल्या जातात. चेन्नईमधील मन्नाडी भाग हा या दृष्टीने सुरक्षित आहे. या ठिकाणी ही पार्सले आणली जातात आणि पुढे त्यांचा प्रवास चालू होतो. बांगला देशमध्ये याचा उगम झाला. या बनावट नोटा चितगावमध्ये बंद पेटयातून पाठवल्या जात व तेथून घुसखोरांमार्फत पाठवल्या जात. गुप्तहेरांच्या म्हणण्यानुसार कराचीजवळ पाकिस्तानचा या खोटया नोटांचा कारखाना असून तो आधुनिक मशीनरीने सज्ज आहे. हेरखात्याने 2013 मध्ये लष्करे तोयबाच्या बॉंब बनवणाऱ्या अब्दुल करीम तुंडा या अतिरेक्यास पकडले असता, त्यानेही त्यास दुजोरा दिला.ही सर्व पार्सले नेपाळहून प.बंगाल, व पूर्वांचलमध्ये येतात व तेथून पुढील प्रवास चालू होतो.

एप्रिलमध्ये हुसेनला चेन्नई येथे अटक करण्यात आली, तेव्हा त्याच्याबरोबर बनावट नोटांचे दोन तज्ज्ञ – सिब्बवालन श्रीलंकेतील तामिळी, महम्मद सलीम भारतीय नागरिक – यांनासुध्दा अटक करण्यात आली. त्यांच्याजवळ जवळजवळ अडीच लाखांचे चलन मिळाले.

बांगला देशमधून बनावट नोटांचे प्रसारण अजून चालूच आहे. आतापर्यंत तामिळनाडू पोलिसांनी बऱ्याच प्रमाणात बनावट नोटा जप्त केल्या आहेत. ४ जूनला राहुल हमीद आणि रफीककडून ९ लाख रु.च्या नोटा जप्त करण्यात आल्या. प्रमुख सूत्रधार फखरूल इस्माईल याला १० जूनला बंगालमधून अटक करण्यात आली. मालदीव व श्रीलंका येथून याचा उगम असल्याचे सिध्द झाले आहे. मालदीवमधून होणारी बनावट नोटांची तस्करी शस्त्रास्त्रे व दारूगोळाही भारताला आव्हान देणारा आहे.

आय.एस.आय. वर नियंत्रण करा

आय.एस.आय.चे लक्ष्य नव्या अतिरेक्यांचा भारतामध्ये शिरकाव करणे, जिहादी उद्दिष्टांकरता त्यांना सुसज्ज करणे, भडक विचारांच्या, दंगाग्रस्त भागातील मुस्लिम तरूणांना अतिरेकी जाळ्यात समाविष्ट करणे, कोट्यावधी रुपयांच्या खोट्या नोटांचे मुद्रण करणे, आय.एस.आय.च्या प्रतिनिधींना भारताच्या प्रत्येक भागांत पेरणे आणि मुस्लिमबहुल क्षेत्रांत घुसखोरीसदृश परिस्थिती निर्माण करणे व नविनतर आघाड्या उघडणे, तुरूंगांतून शिक्षा भोगत असलेल्या अट्टल गुन्हेगारांना अतिरेकी बनवणे राहिले आहे.

बांगला देशमधील भारतविरोधी कारवाया उघडकीस आल्यानंतर आता मालदीवमध्ये व श्रीलंकेत नवी केंद्रस्थाने स्थापन करण्यात आली आहेत. भारतात अस्थिरता निर्माण करण्याकरिता श्रीलंकेतील पाकिस्तानी वकिलातीतून हे सर्व होत आहे.

सणांच्या दरम्यान घातपात होऊ नये म्हणून डोळ्यांत तेल घालून काम करावे लागणार आहे. देशभरात किंवा जगभरात काहीही झाले की त्याचे पडसाद देशात उमटतात! समाजकंटक आणि दहशतवादी देशाला लक्ष्य करतात.

आखाती देशांत कामे करणाऱ्या दक्षिण भारतीय लोकांना विद्रोहासाठी प्रवृत्त केले जात आहे. आय.एस.आय. भारतातील दहशतवादी कारवायांचे संपूर्ण सहसंयोजन करत आहे. आय.एस.आय. नावाचा राक्षस नियंत्रणात ठेवला जाऊ शकतो काय? राजकीय इच्छाशक्ती असल्यास आणि मतपेटीचे राजकारण दूर ठेवल्यास त्याला ताळ्यावर आणणे शक्य आहे. अशा प्रकारची धमकी आल्यानंतर, त्याची सत्यता किती आहे, हे तपासण्यापेक्षा अप्रिय घटना कशा रोखल्या जातील, यासाठी सरकारने प्रयास करायला हवेत. एक गोष्ट निश्चित – पाकिस्तानात कुठलेही सरकार आले तरी आय.एस.आय. व सेनेतील अधिकारी भारताविरुध्द कारवाया चालूच ठेवणार आहेत. मागच्या सरकारच्या गाफीलपणाने भारतात बाँबस्फोटात, असंख्य लोक मरण पावले. लाखो बनावट नोटा भारतात आल्या व अजून येत आहेत. मोदी सरकार या बाबतीत लक्ष घालून याला वेसण घालेल, अशी आशा करू या

पुण्यातल्या फरासखाना पोलिस ठाण्यासमोर झालेला स्फोट

July 12, 2014 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

सरकारी काम आणि थोडा वेळ थांब. कुठलेही कंत्राट निघाले की प्रत्येक जण मला किती मिळणार याचाच विचार करतो. पण सामान्य लोकांसाठी मात्र कोणीही काहीही करत नाही. भ्रष्टाचार, अप्रामाणिकपणा हा या सरकारी नोकरांच्या रक्तात इतका खोलवर मुरला आहे की त्यांना सामान्यांच्या जीवनाचे मोल जाणवत नाही. राज्यकर्ते ते अगदी शिपायाच्या पातळी पर्यंत सगळेच भ्रष्ट असल्यामुळे हे घडत आहे. कॅमेरे लावण्याचे काम कधी होईल ते कुणीही ठामपणे सांगू शकत नाही.

जोपर्यंत जाज्वल्य देशाभिमान येणार नाही तोपर्यंत असले प्रकार होत राहतील. कसलीही दया माया न दाखवता हे प्रकार चिरडून काढा. पुण्यातल्या फरासखाना पोलिस ठाण्यासमोर झालेला स्फोट हा खूपच कमी क्षमतेच्या बॉबचा असला, तरी त्यामुळे राज्य सरकारपासून ते स्थानिक पोलिस दलापर्यंतच्या सर्व यंत्रणांचा गहाळपणा मात्र तीव्रपणे समोर आला. मुंबईप्रमाणेच पुणे महानगरही दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर असल्याचे गेल्या अनेक वर्षांपासून स्पष्ट झाले आहे. त्याचे पहिले प्रत्यंतर आले ते १३ फेब्रुवारी २०१० ला कोरेगाव पार्क येथील जर्मन बेकरीत झालेल्या भीषण स्फोटाने. त्या स्फोटात सतरा जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे एक ऑगस्ट २०१२ ला जंगली महाराज रस्त्यावर साखळी पद्धतीने चार बॉबस्फोट घडवून आणण्यात आले. हे दोन्ही स्फोट इंडियन मुजाहिदीन या दहशतवादी संघटनेने केले होते. त्यातील दहशतवाद्यांचा तपास लावण्यात पोलिस यंत्रणा यशस्वी झाली असली, तरी या पुढील काळात असे स्फोट होऊ नयेत, यासाठी योग्य यंत्रणा उभारण्यात मात्र

अपयश आले आहे. एक ऑगस्ट २०१२ ला झालेल्या दुसर्याय स्फोटानंतर तर पुण्यात या पुढेही असे प्रकार करण्याचा प्रयत्न दहशतवादी संघटना करणार, हे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट झाले होते. त्यानंतर लागलीच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात येतील, अशी घोषणा केली. त्या घोषणेला आता जवळजवळ दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. या दोन वर्षांत या योजनेच्या नावाने धावले ते केवळ कागदी घोडे. निविदा प्रक्रियेतला घोळ, त्यानंतर महापालिकेकडून खोदकामाला परवानगी मिळविण्याचा घोळ, कंत्राटदाराने काम सुरू करण्यास खळखळ केल्याचा घोळ... एकूण घोळच घोळ. सामान्य पुणेकरांच्या सुरक्षेचा प्रश्नर असलेल्या या उपाययोजनांबाबत पोलिस यंत्रणा आणि पर्यायाने सरकारही उदासीन आहे, ही बाब पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

फरासखान्याजवळ सीसीटीव्ही यंत्रणा योग्य वेळी बसली असती, तर बॉब असलेली मोटारसायकल ठेवून निघून जाणार्या गुन्हेगाराची प्रतिमा पोलिसांना विनासायास मिळाली असती आणि त्यामुळे तपास सुकर झाला असता. सीसीटीव्हीची जी गत, तीच श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराच्या परिसराच्या सुरक्षेची. महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातत्तून विविध कामांसाठी नागरिक पुण्यात येत असतात आणि त्यापैकी अनेक जण जाताना दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतात. वास्तविक पुण्याच्या ऐन गर्दीच्या रस्त्यालगत दगडूशेठ हलवाई गणपतीचे मंदिर आहे. हा गर्दीचा रस्ता संकष्टी चतुर्थीच्या दिवशी तर आणखी गजबजून जातो. आता दहशतवाद्यांच्या धमक्यां नंतर मंदिरासमोर भिंतच उभारण्यात आली. या भिंतीमुळे देवळाची सुरक्षितता साध्य झाली; पण देवळाच्या आसपासच्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कुणी गांभीर्याने अन्य उपाययोजना केली नाही. देवळाच्या आसपास झालेली अतिक्रमणे हटविण्याची भाषाही अशीच काही घडले की जोर धरते. या विक्रेत्यांनी केलेले अतिक्रमण एक वेळ काढता येईल; पण देवळाच्या लगत असलेल्या मजूर अड्ड्याच्या जागेवर पोलिसच जप्त केलेल्या गाड्या उभ्या करतात, त्याचे काय? ही जागा मजुरांच्या संस्थेला दिलेली असून पोलिसांचे हे अतिक्रमण असल्याची या मजुरांची तक्रार आहे. अनेक दिवस एकाच जागी पडून राहणार्याच या गाड्यांचा वापर कुणीही बॉब ठेवण्यासाठी करण्याची शक्यता आहे.

आता पुन्हा स्फोट झाल्यानंतर सुस्त यंत्रणांना पुन्हा जाग येईल. दोन दिवस धावपळ होईल. राज्याचे गृहमंत्री असलेले आर. आर. आबा आणि पोलिस महासंचालक संजीव दयाळ यांनी घटनास्थळाला भेट दिली अन् आता "गणेशोत्सवाच्या आत पुण्यातल्या किमान दोन पोलिस विभागांत सीसीटीव्ही उभारण्याचे काम करू,' असे नवे आश्वा सन दिले. यथावकाश मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचीही फेरी होईल. प्रसारमाध्यमांच्या कॅमेर्यांच्या फ्लॅशचा चकचकाट होईल, त्यांच्याकडूनही आश्वाचसनांचे फवारे उडतील, वृत्तपत्रांचे कॉलम भरले जातील, चॅनेलवाल्यांच्या बातम्यांमधील काही मिनिटांची जागा "बाईट'ने भरून निघेल. दोन-चार दिवस माहेरी गेलेली तीच सुस्ती पुन्हा परतेल आणि पुणेकर जीव टांगणीला लावून भर गर्दीत आपापले व्यवहार करीत राहतील. यापूर्वी दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराजवळ बॉबची पिशवी ठेवून पलायन

करण्याचा प्रयत्न कतिल सिद्दिकी या दहशतवाद्याने केला होता. एका विक्रेत्याच्या सजगतेमुळे पुढील अनर्थ टळला. अन्यथा आणखी एका स्फोटाला पुणेकरांना सामोरे जावे लागले असते. या सार्या घटना घडूनही आपण धडा शिकत नाही आणि त्यामुळे पोलिसाचीच मोटारसायकल चोरून आणि पोलिस ठाण्यापासून अवघ्या काही फूट अंतरावर ती बॉबसह ठेवून उडवून देण्याची दहशतवाद्यांची हिंमत होऊ शकते. आता तरी आपण गाढ निद्रेतून किंवा निद्रेच्या सोंगातून बाहेर येणार का, एवढाच प्रश्न आहे.

बिगर सरकारी संघटना संशयाच्या घेऱ्यात

July 1, 2014 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

गृहमंत्रालयाप्रमाणे भारतात लहान-मोठे २० लाखावर एनजीओ आहेत. गेल्या दहा वर्षांत विदेशातून भारतात येणाऱ्या निधीची रक्कम सव्वा लाख कोटी आहे. यात सर्वाधिक वाटा २० हजार कोटीं अमेरिकेने, आठ हजार कोटी ब्रिटनने दिले आहेत. त्यानंतर नंबर आहे जर्मनीचा. एकूण २५ देश भारतातील एनजीओज्ना नियमित निधी पाठवीत असतात. एकट्या २०११ या वर्षात भारताला विदेशातून १० हजार ३३३ कोटी रुपये आले आहेत. हा आकडा डॉ. मनमोहनसिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात गृहमंत्रालयाने दिला होता. हे लाखो कोटी रुपये अनेक देश भारतातील एनजीओंना का देतात ?कशासाठी देतात? त्यांना भारतात एवढा मोठा पैसा पेरण्यात स्वारस्य काय आणि या पैशाचे एनजीओज् करतात काय? असे प्रश्न नवीन सरकारने उपस्थित केले, तर त्यात चूक काय?

देशाच्या विकासात खो घालण्यासाठी वावरणाऱ्या बिगर सरकारी संघटनांना त्यासाठी विदेशांतून पैसा पुरवला जातो आणि त्यांच्या अडवणुकीमुळे राष्ट्रीय उत्पन्नाचे दोन ते तीन टक्के नुकसान होत आहे असा आरोप गुप्तचर विभागाने पंतप्रधान कार्यालयाला सादर केलेल्या अहवालात केला आहे. पर्यावरणाचे आणि जनतेचे हित पुढे करून विविध विकास प्रकल्पांना विरोध करण्यासाठी पुढे सरसावलेल्या अनेक बिगर सरकारी संघटना त्यामुळे संशयाच्या घेऱ्यात आल्या आहेत. आज देशात बिगर सरकारी संघटनांचे पेव फुटले आहे. देशभरात विविध विकास प्रकल्पांविरुद्ध त्यांची आंदोलने सुरू आहेत. अशा संघटना आणि त्यांचे कार्यकर्ते हे भारताची प्रगती थांबवण्याकरता विदेशी शक्तींचे हस्तक आहेत असा या अहवालाच्या निष्कर्षांचा अर्थ होतो.
गृहमंत्रालयाने, विदेशी निधीचा ऑडिट रिपोर्ट न दिल्यामुळे चार हजार एनजीओजचे विदेशी निधी नियमन कायद्याखालील पंजीयन रद्द केल्यामुळे, एनजीओंमध्ये प्रचंड खळबळ माजली आहे. या एनजीओज्ची बाजू घेण्यासाठी अनेक विचारवंत पुढे सरसावले आहेत, तर दुसरीकडे या एनजीओज्च्या एकूणच कारभाराची सखोल चौकशी व्हावी, अशीही मागणी पुढे आली आहे.
<u>संघटनांच्या हालचालींकडे डोळे झाक?</u>

आजवरची सरकारे या संघटनांच्या आणि कार्यकर्त्यांच्या हालचालींकडे डोळेझाक करून का बसली होती ?. देशातील बिगर सरकारी संघटनांना विदेशांतून जो निधी पुरवला जातो, त्याला विदेशी योगदान नियमन कायद्याखाली (एफसीआरए) केंद्रीय गृह मंत्रालयाची मान्यता आवश्यक असते. कोणतीही बिगर सरकारी संघटना परस्पर विदेशी देणग्या स्वीकारू शकत नाही. त्यामुळे या संघटनांना निधी कुठून येतो, कोण पुरवतो याचा सर्व तपशील सरकारकडे उपलब्ध असतो.

मग या संघटनांकडून उभारली जाणारी आंदोलने आणि संघटनांना निधी पुरवणाऱ्या विदेशी शक्ती यांचा शोध घेणे हे आजवरच्या सरकारांचे कर्तव्य होते. कुडनकुलम अणुप्रकल्पाला जेव्हा तीव्र विरोध सुरू झाला तेव्हा या आंदोलनामागे विदेशी हात आहे अशी टीका तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंह यांनी केली होती. पण हा 'विदेशी हात'उघडा पाडण्याची हिंमत त्यांच्या सरकारने का दाखवली नाही? जे विदेशी कार्यकर्ते या आंदोलनांना पाठबळ देण्यासाठी भारतात येत जात होते त्यांना व्हिसा कसा दिला जात होता? म्हणजेच देशाच्या विकासात विदेशी शक्ती अडसर उत्पन्न करीत असूनही आजवरची सरकारे त्याविषयी पुरेशी गंभीर नव्हती. नर्मदा धरण वर्षानुवर्षे रखडले, कुडनकुलमसारखे अणुप्रकल्प रखडले, देशाला स्वयंपूर्ण बनवू शकेल अशा कोळसा आणि युरेनियम उत्खननात अडसर आले, अनेक विकास प्रकल्प गुंडाळावे लागले.

गुप्तचर विभागाचा आरोप गंभीर आहे. त्यांच्यापाशी तसे सबळ पुरावे असतील, तर संबंधित संघटनांच्या नेत्यांविरुद्ध देशद्रोहाचे गुन्हे नोंदवले गेले पाहिजेत. या आरोपांबाबत संबंधित संघटनांनी जनतेला जबाब दिला पाहिजे. आजवर देशात विकास प्रकल्पांविरुद्ध जी आंदोलने झाली, त्यांचा राजकीय फायदा उठवण्याचा विरोधी पक्षांनीही प्रयत्न केला. त्यामुळे बिगर सरकारी संघटनांच्या सुळसुळाटास तेही तितकेच जबाबदार ठरतात. बिगर सरकारी संघटनांची आणि त्यांच्या कार्यकर्त्यांची छाननी होण्याची तीव्र गरज आहे.

<u>पैशाचा हिशेब देणे अनिवार्य</u>

ज्यांना विदेशातून हजारो कोटी रुपये मिळतात, त्यांनी भारताच्या कायद्याचे पालन करणे अपेक्षित आहे. भारत हा सहिष्णू देश आहे. येथे आपल्याला कायदे लागु नाही, असा समज या एनजीओज्चा आहे. जो न्याय भारतीयांसाठी आहे, तो या एनजीओंनाही लागू होतो. केंद्र सरकारचा विदेशी निधी नियमन कायदा (एफसीआरए) आहे. या कायद्यानुसार भारतातील कोणत्याही व्यक्तीला विदेशातून पैसा येत असेल, तर तो निधी येण्यामागील कारण आणि त्या पैशाचा हिशेब सरकारला सादर करणे अनिवार्य आहे. असे असताना, या चार हजार एनजीओंनी हा कायदा धाब्यावर का बसविला, याचे उत्तर देणे अपेक्षित आहे.

विदेशातून येणाऱ्या निधीचा विनियोग कसा झाला, त्याचा हिशेब हे चार हजार एनजीओ का देत नाहीत, याचे उत्तर ते देत नाहीत. म्हणजे आम्ही विदेशातून कितीही पैसा आणू, कसाही खर्च करू, पण त्याचा हिशेब आम्हाला मागू नका, असा त्यांचे म्हणणे आहे.

मागच्या सरकारच्या काळात अशा सर्व एनजीओंवर आयबी लक्ष ठेवून होता. तपासात सौदी अरेबियातील २५ संघटनांनी भारतातील एनजीओंना दिलेला निधी मुंबईत आणि अन्य शहरांत बॉम्बस्फोट घडविण्यासाठी वापरण्यात आला होता, हे समोर आले होते. या घटनेची सरकारने दखल घेऊन, एफसीआरएनुसार ज्यांनी ज्यांनी पंजीयन केले आहे, अशा चार हजार एनजीओंना एक प्रश्नावली पाठवून उत्तर मागविले होते. सोबतच आपले एफसीआरए पंजीयन का रद्द करू नये, अशी नोटीसही पाठविली होती. देशातील २० लाख एनजीओज्पैकी फक्त दोन टक्के एनजीओंनी एफसीआरए नियमांतर्गत पंजीयन मिळविले आहे. त्यामुळे पंजीयनप्राप्त एनजीओंना सरकारने नोटीस पाठविली आहे.

हिशेब देण्यात भीती का वाटते?

एफसीआरए कायद्यात एक अट आहे. ज्या एनजीओंना विदेशातून निधी मिळतो, ते निवडणुकीत भाग घेऊ शकत नाही. बंद, रास्ता रोको, निदर्शने, जेल भरो हे प्रकार केल्यास ही संस्था राजकीय स्वरूपाची आहे, असे समजून संस्थेवर कारवाई होईल. हा नियम तोडला अरविंद केजरीवालनी! त्यांनी विदेशातून निधी घेतला आणि राजकीय पक्ष काढला. अजूनही केजरीवाल यांनी विदेशी निधीचा हिशेब दिलेला नाही. हिशेब देण्याची सक्ती लादू नये, हे आमच्या अधिकारावर आक्रमण आहे, इथपर्यंत त्यांच्या समर्थकांनी युक्तिवाद केला आहे. कायदा असा बदली होउ शकतो का?विदेशातून पैसा आला, मग हिशेब देण्यात भिती का वाटते? हे समर्थक सांगत नाहीत. अरुंधती रॉय, प्रशांत भूषण यासारखे अनेक लोक अशा एनजीओंना पाठिंबा देत आहेत. प्रशांत भूषण यांनी काश्मीरबाबत जे अतिशय आक्षेपार्ह विधान केले होते. विघटनवाद्यांना ते समर्थन का देत आहेत? ही मागणी करण्यासाठी प्रशांत भूषण यांना कुणी सांगितले? असा हा सगळा कथित एनजीओंच्या नावाखाली या देशात चाललेला खेळ आहे.

त्यामुळे आधीचे सरकार असो, की आताचे, सर्वांना चिंता होणे स्वाभाविक आहे. देशातील जनताही हे सर्व उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. त्यामुळे ज्या एनजीओंनी एफसीआरए अंतर्गत पंजीयन केले आहे, त्यांच्याकडून संपूर्ण माहिती मागवावी आणि त्या पैशाच्या विनियोगाची सखोल चौकशी करावी. गैरसरकारी संस्थांनीही आपला काटेकोर हिशेब द्यावा. एनजीओंना जर भारतीय कायदे मान्य नसतील, तर सरकारनेही अशा दोषींवर मुळीच दया माया न दाखविता कडक कारवाई केली पाहिजे आणि सत्य समोर मांडले पाहिजे.

ह्या संस्था दबाव गटाचे काम करतात. वृत्तपत्रे, सामाजिक संस्था, विश्वविद्यालये यांचा उपयोग करून समाजात वैचारिक भ्रम पसरवणारेच देशाचे प्रचंड नुकसान करीत आहे. यांच्यामागे पाकिस्तान, चीन आणि अनेक भारतविरोधी आंतरराष्ट्रीय संस्था आहेत. अशा संस्थांच्या विरूद्ध कायद्याप्रमाणे कारवाई करायला हवी

पुस्तक परिचय- आव्हानः जम्मू-आणि-काश्मीर मधील छुप्या युद्धाचे

May 21, 2014 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, परिक्षणे - परिचय, पुस्तके, राष्ट्रीय सुरक्षा

हे पुस्तक माधवी-प्रकाशन-पुणे येथे, खालील पत्त्यावर विक्रीस उपलब्ध आहे. किंमत रु.२२५/-.
चंद्रशेखर जोशी,दत्तकुटी, १४१६ सदाशिवपेठ, पुणे ४११०३०,दूरध्वनीः २४४७४७६२, २४४७५३७२, भ्रमणध्वनीः ९३२५०९७८९४,
ई-मेलः madhavipublisher@gmail.com

कोणकोणते धोके ह्या काळाच्या उदरात दडलेले आहेत? ते प्रत्येक सुजाण नागरिकाने समजून घेण्याची आवश्यकता आहे. मात्र ती माहिती सहजी उपलब्ध असणारी नाही. ब्रिगेडिअर हेमंत महाजन ह्यांनी ह्या पुस्तकाच्या रूपाने ती समोर आणली आहे. काश्मीरची समस्या काय आहे? हे जाणून घेण्याचा सोपा सोपान म्हणजेच, 'आव्हान जम्मू आणि काश्मीर मधील छुप्या युद्धाचे' हे पुस्तक आहे.

ह्याकरता ह्या पुस्तकातील काश्मीरच्या साद्यंत इतिहासाचे विवेचन वाचणे जरूर आहे. जम्मू आणि काश्मीर राज्याच्या इतिहासाचे अनोखे तपशील देणारा मजकूर, राज्याच्या भौगोलिक सीमांचे यथार्थ दर्शन करविणारे सुरेख मुखपृष्ठ आणि राज्याच्या वर्तमान परिस्थितीचा जणू भावार्थप्रदीप शोभेल असा आढावा, ह्यांनी हे पुस्तक सजलेले आहे.

भारत स्वतंत्र झाला तेव्हा जम्मू आणि काश्मीर हे एक स्वतंत्र राष्ट्र होते. इंग्रजांनी त्यास स्वतःचा मार्ग निवडण्याचे स्वातंत्र्य दिले होते. मुस्लिमबहुल लोकसंख्येचे आधारे, पाकिस्तान त्याचेवर पाकिस्तानात विलीन होण्याकरता दबाव टाकत होता. भारत नेहमीप्रमाणे तटस्थ होता. जम्मू आणि काश्मीरचे महाराजा हरिसिंह स्वतंत्र राहू चाहत होते. पाकिस्तानने त्या राज्यावर हल्ला चढविला. काही कळायच्या आतच, राज्याच्या मोठ्याशा भूभागावर पाकिस्तानने आपली सत्ता प्रस्थापित केली. महाराजा हरिसिंह ह्यांना भारताची मदत घेण्यावाचून पर्याय नव्हता. त्याकरता, नेहरूंनी जम्मू आणि काश्मीर भारतात विलीन करावे अशी अट घातली. महाराजा हरिसिंह ह्यांनी हा निर्णय घेण्यास लावलेल्या अक्षम्य विलंबाचे पर्यवसान, आपण आज पाकव्याप्त काश्मीरच्या स्वरूपात पाहतो आहोत. हा सर्व उत्कंठावर्धक इतिहास ह्या पुस्तकात तपशीलाने दिलेला आहे.

जम्मू आणि काश्मीर राज्याचे भारतात झालेले विलीनीकरण, सोबत अनेक समस्या घेऊनच झाले. घटनेचे ३७० कलम, पाकव्याप्त काश्मीर, पाकिस्तानने चीनला दिलेला भारतीय भूभाग आणि चीनच्या ताब्यात असणारा आकाशी चीन, मुस्लिमबहुल प्रांतातील हिंदू अल्पसंख्यांकांचे प्रश्न, घूसखोर-निर्वासित आणि विस्थापितांच्या समस्या, ह्या त्या समस्यांपैकीच काही आहेत. ह्या समस्यांच्या निरसनार्थ भारतीय संघराज्याची संसाधने मग सततच खर्च होत राहिली.

काश्मीरातील लोकांच्या समस्यांकरता भारतीय संघराज्याचा पैसा प्रमाणाबाहेर खर्च होऊ लागला. उत्तरप्रदेश, बिहारसारख्या बिमारू राज्यांनाही कधी मिळाली नाहीत, एवढी संसाधने काश्मीरावर खर्ची पडू लागली. जिथे जाऊन राहू शकत नाही, जिथली जमीन खरेदी करु शकत नाही, त्या राज्यास, इतर राज्यांनी मदत तरी किती करायची! हा आर्थिक असमतोलाचा प्रश्न मग उपस्थित झाला. ह्या आर्थिक प्रश्नाची सम्यक ओळख ब्रिगेडिअरसाहेबांनी ह्या पुस्तकात व्यवस्थित करून दिलेली आहे. त्याकरताही हे पुस्तक वाचनीय आहे.

अशीच समाज-प्रबोधक आणि शासनास ज्ञानदीप ठरावीत अशी, निरनिराळ्या विषयांवरची पुस्तके निरंतर लिहिली जावीत, अशी सदिच्छा मी ह्या निमित्ताने व्यक्त करतो.

दहशतवाद हा लघुउद्योग झाला असून मोठ्या प्रमाणावर तरुणांना याकडे खेचले जाते. या चक्रव्यूहातून त्यांना बाहेर काढणे गरजेचे आहे. काश्मीरप्रश्नी इतिहासात अनेक चुका झाल्या आहेत. राजकारण्यांच्या चुकीच्या धोरणामुळे आपल्या सहनशक्तीला दुर्बलता समजली जात आहे.

काश्मीरला भारतापासून वेगळी करेल अशी कोणतीही ताकद जगात नाही. परंतु, ते आपल्याकडे ठेवण्यासाठी किती बळी जाणार हा प्रश्न आहे. एखाद्या राष्ट्रापासून वेगळे होणे ही तेथील लोकांची मानसिक युती आहे. त्यामुळे तेथील लोकांमध्ये जोपर्यंत ही भावना निर्माण होणार नाही तोपर्यंत काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, असेही ते म्हणाले.

काश्मीर हे भारताचे डोके आहे. त्याचा एक लचका चीन तोडत आहे आणि दुसरा लचका हा पाकिस्तान तोडत आहे. हल्ले होतात तेव्हाच आम्ही एकत्र येतो. बांग्लादेश स्वतंत्र झाले त्यावेळेसच काश्मीरचा प्रश्न निकाली लागला असता. चुका लष्कराकडून घडत नसून, राजकारण्यांकडून घडत आहेत.

भारतीय सैन्यामुळे आज देश एकसंध आहे. काश्मीरमधून आज ज्या नद्या वाहत आहेत त्या पाकिस्तानला सुजलाम-सुफलाम बनवत आहेत. काश्मीर स्वतंत्र देश व्हावा, ही अमेरिकेची कुटनिती आहे.

सक्षम नेतृत्वाची गरज

सीमेपलीकडून होणारी घुसखोरी थांबवायला आणि दहशतवाद नष्ट करण्यासाठी सामर्थ्यवान शासन आणि सक्षम नेतृत्व हवे. जम्मू काश्मीरमधील तरुण सीआरपीएफ, सैन्याच्या जवानांवर दगडफेक करतात. अफवा पसरवून बंद पुकारतात. जिहादी कारखाने युवकांना पैसा पुरवितात. पाकिस्तान येथे दहशतवादाची शाळा चालविते. मात्र तिथले राज्यकर्ते या कारवाया विरोधात कारवाई न करता समर्थनच करतात. हे थांबविण्याची आज गरज आहे.

१९८० पासून काश्मीरमध्ये छुप्या युद्ध रचनेला सुरुवात झाली. ते आजही सुरु आहे. जम्मू काश्मीर समस्येचे मूळ हे ज्या काश्मीरखोऱ्यात आहे. या खोऱ्यामध्ये राहणारे लोक हे पाकधार्जिणे आहेत. येथील लोकांना भारताशी जोडून घेण्याची गरज आहे. जिहादच्या यंत्रणा सज्ज असून कोणत्याही क्षणी दगडफेकीच्या घटना, अफवा पसरविण्यामध्ये आयएसआय त्यांना मदत करते. येथील ८० टक्के नागरिकांना भारतापासून वेगळे होण्याची इच्छा नाही. काश्मीरमध्ये कुशासन आणि भ्रष्टाचार प्रचंड आहे

बनावट नोटांचा सुळसुळाट पाकिस्तान / चीन कडुन एक नवीन प्रकरचा दहशतवाद

January 30, 2014 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

भारतीय रिझर्व्ह बँकेने सन २००५ च्या आधी जारी केलेल्या सर्व चलनी नोटा येत्या काही काळात रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. काळा पैसा खणून काढणे आणि बनावट चलनी नोटांना आळा घालणे, हे या निर्णयामागचे दोन मुख्य हेतू आहेत. २००५ हे वर्ष यासाठी की, तेव्हापासून प्रत्येक नोटेच्या मागच्या बाजूला मधोमध ती नोट जारी झाल्याचे वर्ष छापण्यात आले आहे. याचवेळी, इतर अनेक वैशिष्ट्ये नोटेत समाविष्ट करण्यात आली होती. तेव्हा नोटांवर असे वर्ष छापले नसेल तर त्या नोटा रद्दबातल होतील.

सध्या १२ लाख कोटी रुपयांचे बनावट चलन भारतीय अर्थव्यवस्थेत घुसले असल्याचा एक अंदाज आहे. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार, बँकेच्या वेगवेगळ्या शाखांमधून चार लाख बनावट नोटा उघडकीस आल्या. २०००-२००१ मध्ये दहा लाखांत तीन बनावट नोटा, असे प्रमाण होते, ते दहा लाखांत आठ इतके वाढले आहे. रकमेच्या ५-१० टक्के इतक्या किंमतीच्या बनावट नोटा सध्या वापरात आहेत, असे मानले, तरी हा आकडा खूप मोठा होतो. भारताची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करायला तेवढ्या नोटा पुरेशा आहेत. बनावट नोटांचा सुळसुळाट हा एक प्रकरचा दहशतवाद आहे. पाकिस्तान भारताच्या विरोधात करीत असलेल्या करवायांमध्ये या गोष्टीचाही समावेश आहे.
पाकिस्तानकडे तंत्रज्ञान कुशलता असल्याचे आढळून आले असून, त्यामुळे खऱ्या आणि बनावट नोटा यांच्यातील फरक ओळखता येणे अवघड बनले आहे. पाकिस्तानात नोटांचे अधिकृत सरकारी छापखाने भारतीय नोटा तंतोतंत छापण्याची काळजी डोळ्यांत तेल घालून घेत असल्याने 'अवघा रंग एक झाला' आहे. अशावेळी, बनावट नोटा छापणाऱ्यांनी २००५ नंतरच्या सुधारित नोटांची नक्कल अजून केली नसेल, असे समजणे, ही आत्मवंचना आहे. देशातील सर्व सुरक्षायंत्रणा जप्त करीत असलेले बनावट चलन दोन टक्केही नसते. तेव्हा जवळपास नऊ

वर्षांपूर्वीच्या नोटा रद्द झाल्याने बनावट चलनाच्या तस्करीला कितपत धक्का बसेल, हा प्रश्न आहे.

आयएसआयचे षड्यंत्र

क्वेट्टा (बलुचिस्तान) येथे पाकिस्तानची प्रेस आहे. तेथे भारतीय चलनाच्या बनावट नोटा छापल्या जातात. कराची, लाहोर व पेशावर येथील प्रेसमध्येही बनावट नोटा छापल्या जातात व "पकिस्तान इंटरनॅशनल एअरलाइन्स' मार्फत बनावट भारतीय नोटा नेपाळ, श्रीलंका आणि बांगलादेश येथे धाडण्यात येतात. नेपाळमध्ये अशा नोटांची वाहतूक करणारी व्यक्ती सापडली. तिच्या चौकशीतून आयएसआयच्या या षड्यंत्राची माहिती बाहेर आली. बनावट नोटा भारतात चोरट्या मार्गाने आणण्यासाठी नेपाळच्या भूमीचा वापर करण्यात येतो. ढाक्यात पाकिस्ताचा एक राजनैतिक अधिकारीच बनावट नोटा वितरित करताना सापडला. त्याला अटक करण्यात आली. त्याने आपले बांगलादेशातील "हुजी' या दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याची कबुली तेव्हा दिली. मैत्री व सद्भाव यासाठी सुरू करण्यात आलेल्या थर एक्स्प्रेसमधूनच बनावट नोटा भारतात आणल्या जात होत्या.

गेल्या वर्षी बनावट नोटा भारतात घुसविणारे अनेक जाळी उघडकीस आली. काही महिलांना व मुलांना हे काम सोपविले जाते व जितक्या रकमेच्या बनावट नोटा ते भारतात आणतील त्याच्या दोन टक्के रक्कम त्यांना बक्षीस म्हणून द्यायची, असे हे कारस्थान चालू असते .भारताची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करायची, हा आयएसआयचा डाव आहे. त्यासाठीही बनावट नोटांच्या शस्त्राचा उपयोग करण्यात आला; अशा प्रकारच्या कारवायांत दाऊद टोळीही गुंतली आहे. या नोटांची छपाई, कागदाचा दर्जा व त्यावरील गव्हर्नरची स्वाक्षरी हे सर्व इतके तंतोतंत असते, की खोटी व खरी नोट यातील फरक कळणे अवघड होते.

२०१०-२०११ या आर्थिक वर्षांमध्ये ४,३५,६०७ बनावट चलनी नोटा विविध पोलिस कारवाईत जप्त करण्यात आल्या, असे रिझर्व्ह बँकेने जाहीर केले होते. तरीही ५०० व १००० च्या बनावट नोटा बँका, एटीएम यांच्यामधून तसेच रोजच्या व्यवहारांतून मिळण्याचे प्रमाण कमी झालेले नाही. पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, अफगाणिस्तान, हॉलंड, बँकॉक येथे बनावट भारतीय नोटा छापण्याचे अनेक रॅकेट्स सक्रिय आहेत. या षड्यंत्रामागे पाकिस्तानची आयएसआय ही गुप्तहेर संघटना मुख्य सूत्रधार आहे.

बँकेची क्रेडिट कार्ड व ई-मनीचा जास्तीत जास्त वापर

नोटांचे वर्गीकरण करणारी यंत्रे; तसेच एटीएम येथे बनावट नोटा उघडकीस आणणारी यंत्रणा बसवावी, अशी सूचना रिझर्व्ह बँकेने नेमलेल्या एका समितीने केली आहे. ही सूचना चांगली आहे. बँकेची क्रेडिट कार्ड व ई-मनीचा जास्तीत जास्त वापर करावा, अशीही एक शिफारस करण्यात आली आहे; परंतु भारतातील वैविध्य आणि आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक वास्तव लक्षात घेतले, तर अशा प्रकारचा बदल सावकाशच घडून येईल, हे स्पष्ट होते. देशातील आर्थिक निरक्षरतेचे प्रमाणही मोठे आहे. त्यामुळे ही सूचना लगेच व्यवहारात येणे अवघड आहे. चलनातील नोटा प्रसिद्ध करताना त्यात सुरक्षिततेची जास्तीत जास्त खबरदारी घेतली जावी.

बनावट नोटा तयार करण्यास अवसरच मिळणार नाही, अशा रीतीने साच्यात योग्य ते बदल केले पाहिजेत. देशाची अर्थव्यवस्था दुर्बल करणे; तसेच दहशतवादी कृत्यासाठी पैसा उपलब्ध करणे ही बनावट नोटा तयार करणाऱ्या टोळीची मुख्य उद्दिष्टे आहेत.
बऱ्याच वेळा एटीएम यंत्रातून काढलेल्या नोटाच बनावट असल्याचे ग्राहकांच्या लक्षात येते व ही बाब तो बँकेच्या निदर्शनास आणून देतो, तेव्हा बँक त्या जप्त करते. वास्तविक बँकेने पोलिस ठाण्यात यासंबधी प्राथमिक माहिती अहवाल (एफआयआर) दखल करणे अपेक्षित आहे. तसे झाले तरच याचा उगम कुठे आहे, याचा शोध घेण्याची प्रक्रिया सुरू होईल.
रिझर्व्ह बँकेने २००५ मध्ये चलनी नोटांच्या छपाई तंत्रात आमूलाग्र बदल केला. ते अत्याधुनिक तसेच अचूक केले. मात्र, अर्थव्यवस्थेला बसलेल्या काळ्या पैशाचा किंवा बनावट चलनाचा फास त्याने सुटेल, अशी वेडी आशा बाळगण्यात अर्थ नाही. मुळात त्यासाठी खंबीर राजकीय इच्छाशक्ती हवी. बनावट चलनाला आळा घालण्यासाठीही बँकांमधील अद्ययावत यंत्रसामग्रीशिवाय सीमेवरचा कडेकोट बंदोबस्त महत्त्वाचा असतो.
२००५ पूर्वी छापलेल्या आणि चलनात असलेल्या नोटा कायदेशीर असल्या, तरी १ एप्रिल २०१४ पासून त्या बाजारात मात्र चालणार नाहीत. १ एप्रिल २०१४ ते ३० जून २०१४ अखेर म्हणजेच तीन महिन्यांच्या कालावधीत २००५ पूर्वीच्या चलनी व्यवहारात असलेल्या सर्व नोटा जनतेने बँकातून बदलून घ्याव्यात, अशी रिझर्व्ह बँकेची अपेक्षा आहे. १ जुलै आधी जनतेने २००५ पूर्वीच्या सर्व चलनी नोटा बाजारातून काढून घ्यायच्या आणि त्या बदलात नव्या नोटा द्यायच्या असा रिझर्व्ह बँकेचा निर्धार आहे.
पाकिस्तानने पाचशे आणि हजार रुपयांच्या बनावट-खोट्या नोटा छापून त्या नेपाळ, बांगला देश मार्गे भारताच्या चलनात आणल्या. पण या बनावट नोटा नेमक्या किती रुपयांच्या चलनात असाव्यात, याचा अंदाज काही रिझर्व्ह बँकेलाही नाही. बनावट नोटांच्या सुळसुळाटामुळे निर्माण झालेल्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने अशा बनावट नोटांचे उच्चाटन करायसाठीच हे पाऊल उचलले आहे. या निर्णयाने बनावट नोटांना काही प्रमाणात आळा बसेल यात शंका नाही. मात्र, पूर्णपणे ही समस्या संपेल, असा खुळा आशावाद कोणीही मनात बाळगू नये. बनावट नोटा भारतीय चलनात आणण्याचे देशविरोधी शक्तींचे षड्यंत्र आहे. या संकटाचा मुकाबला करण्यासाठी अनेक व्यापक उपाययोजना आखल्या पाहिजेत.

काश्मीर, दहशतवाद, नक्षलवाद, राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबींवर आप पार्टीची ठोस भूमिका जरुरी

January 20, 2014 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

आता प्रशांत भूषण यांनी नक्षलग्रस्त भागातील निमलष्करी दलांच्या नियुक्तीसंदर्भात जनमत घेण्याची मागणी केली. याआधी काश्मीरमधील लष्कराच्या नियुक्तीसंदर्भात जनमत घेण्याची

मागणी त्यांनी केली होती. काश्मीर, नक्षलवाद हे राष्ट्रीय प्रश्न आहेत. या महत्त्वाच्या आणि संवेदनशील असलेल्या प्रश्नांबाबत कोणत्याही राजकीय पक्षाने उथळ भाष्य करणे चुकीचे आहे. आपल्या चुकीच्या वक्तव्यांचा परिणाम संरक्षण यंत्रणांच्या मनोधैर्यावर होऊ शकतो.

याआधी प्रशांत भूषण यांनी जम्मू-काश्मीरमधील लष्कर हटवावे, अशी मागणी केली होती. काश्मीरातील लष्कर हटविण्याची मागणी करण्यामागे अल्पसंख्यकांची गठ्ठा मते गोळा करण्याचा या पक्षाचा विचार असेल तर तो त्या पक्षालाच महागात पडणार आहे. अशा देशघातकी मागण्यांचे कोणताही देशप्रेमी समाज कदापि समर्थन करू शकणार नाही.

<u>प्रशांत भूषण नक्षलवाद्यांचे उघड समर्थन</u>

अतिरेक्यांना मदत होईल, अशी विधाने करणाऱ्या कलंकित लोकांना आप पार्टीत कशी काय जागा मिळाली? प्रशांत भूषण, अरुंधती रॉय, तिस्ता सेटलवाड असा देशविरोधी मते प्रदर्शित करणारा एक ग्रुप फार आधीपासून कार्यरत आहे. प्रशांत भूषण नक्षलवाद्यांचे उघड समर्थन करणारे आहेत. काही दिवसांपूर्वी गडचिरोलीत पकडल्या गेलेल्या दोन नक्षलसमर्थित युवकांचे संबंध दिल्ली विद्यापीठातील प्राध्यापक साईबाबा यांच्याशी असल्याचे उघड झाले होते. या साईबाबांची चौकशी करण्यासाठी गडचिरोलीचे पोलिस गेले असता, तेथे प्रशांत भूषण, तिस्ता सेटलवाड, अरुंधती रॉय या उपस्थित होत्या. हा ग्रुप छुप्या मार्गाने देशातील लोकशाही व्यवस्थेच्या विरोधात सातत्याने भूमिका मांडत असतो आणि अतिरेकी, नक्षल्यांना बळ मिळेल, अशी विधाने करीत असतो, त्यांना अप्रत्यक्षपणे मदत करीत असतो. हे लोक जर स्वस्त लोकप्रियतेच्या हवेवर स्वार होऊन सत्तेत आले, तर देशाचे भवितव्य काय असेल, याचा विचार या देशातील सुबुद्ध जनतेने करायला हवा.

जम्मू-काश्मीरमधील लष्कर हटवण्याची मागणी पाकिस्तानने वारंवार केलेली आहे. पाकिस्तानला काश्मीरमध्ये धुडगूस घालायचा आहे, परंतु जोपर्यंत तिथे लष्कर आहे तोपर्यंत त्यांना काही करता येत नाही. त्यामुळे ज्या-ज्या वेळी भारत आणि पाकिस्तान यांच्यात चर्चा झाली त्या प्रत्येक वेळी पाकिस्तानच्या नेत्यांनी काश्मीरमधील लष्कर हटवण्याची मागणी पुढे केली. भूषण यांना ही गोष्ट समजत नाही की, पाकिस्तान सरकार जी मागणी करते तीच आपण करता कामा नये. परंतु भारतामध्ये काही स्वयंघोषित मानवाधिकारवादी नेते आहेत. भारतीय लष्कराकडून काश्मिरी लोकांचा छळ होतो, अशी अधूनमधून आवई ते उठवत असतात. नेमका भूषण यांनी असे वक्तव्य करून तोच राग आळवला. काश्मीरातील फुटीर गट आणि त्यांच्या जीवावर राजकारण करणारे काही स्थानिक मतलबी राजकीय नेते त्यांच्या देशघातकी, समाजघातकी डावपेचासाठी जी मागणी सातत्याने करीत आहेत. तीच मागणी आम आदमी पार्टीच्या प्रशांत भूषण यांच्यासारख्या उच्चविद्याविभूषित आणि ज्येष्ठ नेत्याने उचलून धरावी, ही त्या पक्षाच्या भावी राजकारणाबद्दल संभ्रम निर्माण करणारी बाब आहे.

देशद्रोही भूमिका प्रशांत भूषण यांनी यापूर्वीही मांडली होती

काश्मीरला स्वातंत्र्य देण्यात यावे किंवा तेथील जनतेची इच्छा असल्यास त्यांना पाकिस्तानमध्ये समाविष्ट होऊ द्यावे, अशी अत्यंत देशद्रोही भूमिका याच प्रशांत भूषण यांनी यापूर्वी मांडली होती. त्यावेळी ते अण्णा हजारेंच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात सहभागी होते. मात्र, अण्णा हजारे यांनी त्यांच्या त्या वक्तव्याची तडकाफडकी गंभीर दखल घेऊन त्यांना खडसावले होते.

काश्मीरमधील लष्कराच्या उपस्थितीबद्दल सार्वमत घेण्यात यावे, असे सुचवून एकप्रकारे त्यांनी भारतीय लष्कराच्या तेथील अस्तित्वालाच आव्हान देण्याचा केलेला प्रयत्न आत्मघातकी स्वरुपाचाच ठरू शकतो. पाकिस्तानने १९४८ साली अचानकपणे घुसखोरी करून अर्धा काश्मीर घशाखाली घातला. १९६५ मध्ये आणि १९७१ मध्ये काश्मीरचे लचके तोडण्याचे प्रयत्न केले. पंधरा वर्षांखाली कारगिलमध्ये घुसखोरी करून भारताचा भूभाग बळकावण्याचा खटाटोप केला. गेल्या तब्बल पंचवीस वर्षांपासून पाकिस्तानी हद्दीतून घुसखोरी सुरू आहे. पाकिस्तानी हद्दीतून पुरविलेली शस्त्रे, प्रशिक्षण, पैसा आणि मनुष्यबळ यांच्या जोरावर दहशतवाद्यांचा हैदोस सातत्याने सुरू आहे. या हैदोसात हजारो निरपराधांचे बळी गेले आहेत, दहशतवाद्यांनी तेथील पर्यटनाचा व्यवसाय पूर्णपणे मोडीत काढल्याने स्थानिकांवर बेरोजगारी ओढवली आहे.

राज्यातील जनतेला सुरक्षिततेची हमी देण्यासाठी भारतीय लष्कराला तेथे रात्रंदिवस जागरुक रहावे लागते. आजवर भारतीय लष्कराच्या अक्षरशः हजारो जवानांना तेथे स्वतःचे रक्त सांडावे लागले आहे. जनतेच्या रक्षणासाठी झटणारे भारतीय लष्कराचे जवान काश्मीरात तैनात आहेत म्हणूनच काश्मीरातील जनता आपले दैनंदिन व्यवहार पार पाडू शकते. भारताचे लष्कर सध्याच्या परिस्थितीत तिथून हटविणे म्हणजे काश्मीरातील भारतीय जनतेला शत्रूच्या तोंडी देण्यासारखाच तो प्रकार ठरतो. प्रशांत भूषण यांची मागणी कोणत्याही राष्ट्रप्रेमी भारतीयाला सहन होणारी नाही. आम आदमी पार्टीने यांनी धुडकावायला हवी होती. मात्र केजरीवाल यांनी प्रशांत भूषण यांची ती मागणी वैयक्तिक आहे, एवढे मोघम सांगून एवढय़ा गंभीर विषयाला फाटा देण्याचा प्रयत्न म्हणजे एकप्रकारे भूषण यांच्या मागणीचे समर्थनच ठरते. दिल्लीतील निवडणुकीपूर्वी एका कट्टर धार्मिक नेत्याचे समर्थन घेण्याचा प्रयत्न केजरीवाल यांनी केला होता.

पक्षाच्या भावी वाटचालीचे दर्शन?

भूषण म्हणाले, 'आप' केंद्रात सत्तेत आल्यास काश्मीरातून सुरक्षा दले काढून घेणे व सशस्त्र दलाच्या विशेषाधिकारांबाबत सार्वमत आजमाजवले जाईल. भाजप प्रवक्ते मुख्तार अब्बास नक्वी म्हणाले, 'दहशतवाद्यांचीच भाषा तुम्ही बोलत आहात. हे तर दहशतवाद्यांचे प्रतिष्ठित चेहरे आहेत.'केंद्रीय मंत्री मनीष तिवारी टीका म्हणाले, 'काश्मीरसारख्या संवेदनशील मुद्यावर

बोलताना त्यांनी भान ठेवले पाहिजे.' डाव्या पक्षांनीही प्रशांत भूषण यांच्यावर परखड टीका केली.

ज्या आम आदमी पक्षाचे ते नेते आहेत त्या पक्षाचे हे धोरण आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शेवटी केजरीवाल यांनी खुलासा केला, काश्मीर हा भारताचा अविभाज्यभाग आहे. मात्र जनभावना देखील जाणून घेतल्या पाहिजेत.' असेही केजरीवाल यांनी सुनावले.ओपिनीयन पोल घेऊन तुम्ही राज्य कारभार करणार असाल तर सरकारची गरजच काय?जनतेने एकदा निर्णय घेण्यासाठी सत्ता दिल्यावर जनमताची आवश्यकता काय? राष्ट्रीय सुरक्षा, विदेश नीती, आर्थिक धोरण अशा महत्वाच्या विषयातही जनमत घेतलं जात असेल तर निर्णय घेण्यास तुम्ही सक्षम नाही असा अर्थ होतो. लोकांच्या भल्याचे निर्णय घेण्यासाठी जनतेने तुम्हाला सत्ता दिलेली असते.

काश्मीर,दहशतवाद, बाबींवर ठोस भूमिका जरुरी

राजदीप सरदेसाई यांनी केजरीवाल यांच्या घेतलेल्या मुलाखतीबाबत एक फेसबुक पोस्ट सध्या सर्वत्र फिरत आहे. त्यात युट्यूबचा संदर्भ दिला आहे. यात म्हटले आहे की, 'अरविंद केजरीवालने ऑन कॅमेरा इंटरव्यू देनेसे पहले शर्त रखी थी की उन्हे आतंकवाद, कश्मीर, बांगला घुसपैठिये इन मुद्दोंपर सवाल नही पूछे जाने चाहिए| और सवाल पूछतेही वो स्टुडियो छोडकर भाग गए'.

आता काश्मीर प्रश्नावर सरळ सरळ फुटीरतावाद्यांची भाषा प्रशांत भूषण यांच्यासारखे या पक्षाचे नेते बोलू लागले आहेत. काश्मीरमध्ये सैन्य जसे दहशतवाद्यांना डाचते आहे, तसे ते भारतातील या दीडशहाण्या बुद्धिवाद्यांना डाचते आहे. संवेदनशील प्रश्नावर आपल्या पक्षाचे मत काय आहे, हे मात्र केजरीवाल यांना ठरवावेच लागणार आहे.

निवडणुक काळात सुरक्षा नेत्याची आणि सामान्य नागरिकांची

November 12, 2013 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

आता निवडणुकांचा काळ आहे. सध्या पाच राज्यांतल्या विधानसभा निवडणुकांची धामधूम चालू आहे. सात महिन्यांवर लोकसभेच्या निवडणुका येऊन ठेपल्या आहेत. त्यामुळे हा निवडणुकांचा काळ चालू झाला आहे, भाजपने आता नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षेचा विषय उपस्थित केला आहे. आठ-दहा दिवसांपूर्वी बिहारमध्ये पाटण्यात मोदी यांचा हुंकार मेळावा

होता. या मेळाव्यात मोदी भाषण देणार होते. मात्र, मेळावा सुरू होण्यापूर्वी मेळावा परिसरात साखळी बॉम्बस्फोट झाले. यात ६ जण ठार व अनेक जण जखमी झाले. एवढय़ा माणसांचा बळी घेणारे हे बॉम्बस्फोट होऊनही मोदी यांनी ही सभा रद्द केली नाही व ठरल्याप्रमाणे ही सभा होऊन मोदी यांनी सभेत आपले राजकीय भाषण केले.

एसपीजी हे दल सध्या केवळ आजी-माजी पंतप्रधान आणि त्यांचे कुटुंबीय यांच्या संरक्षणाची काळजी घेते. तसे सुधारित कायद्यात नमूद आहे. एनएसजी अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना संरक्षण पुरविते. मोदी यांच्या पाटणा सभेत बॉम्बस्फोट झाल्याने या वादाचे गांभीर्य वाढले. मोदींना एसपीजी कवच द्यायचे, तर कायद्यात बदल करावे लागतील. कायद्यात बदल करणारा वटहुकूम राष्ट्रपतींनी काढला तर भविष्यात पंतप्रधानपदाच्या सर्व उमेदवारांना असे संरक्षण द्यावे लागेल. तसेच यासाठी एसपीजी अधिक सुसज्ज व्हावे लागेल. मोदींच्या संरक्षणात जी त्रुटी राहिली, ती बिहार सरकारच्या हलगर्जीने. बिहार पोलिसांनी त्यांचे काम चोख केले नाही. मोदी किंवा कोणत्याही नेत्याचे प्राण असे धोक्यात येता कामा नयेत. एसपीजी, एनएसजी ही दोन्ही दले इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर जन्माला आली. त्यातल्या एनएसजीचे मुख्य काम दहशतवादाशी लढा, हे आहे. अशी सुरक्षा व्यवस्था फक्त पंतप्रधान, त्यांचे कुटुंबीय आणि माजी पंतप्रधानांनाच देता येते. शिवाय अशी पंतप्रधानांना देण्यात येणारी सुरक्षा मोदींना देण्यासाठी संसदेची परवानगी घ्यावी लागेल. संसदेची ही परवानगी घ्यायला हवी.

पाटण्यातील स्फोटांमुळे सगळा देश अस्वस्थ होता आणि देशाचे गृहमंत्री एका चित्रपटाशी संबंधित कार्यक्रमात एका नटीची प्रतीक्षा करत बसलेले होते. मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला त्यावेळी कपडे बदलत फॅशन शो करणारे गृहमंत्री काय किंवा पाटण्यात बॉम्बस्फोट होत असताना चित्रपट कलाकारात स्वत:ची छबी झळकविण्यासाठी प्रतीक्षा करत बसणारे गृहमंत्री काय, हीच राजकीय नेतृत्वाची दिवाळखोरी आहे. पाटण्यासारखा प्रसंग अन्य कोठेही घडला असता तर लोक सैरावैरा धावत सुटले असते. चेंगराचेंगरी झाली असती आणि त्यात आणखी प्राणहानी होऊ शकली असती. मात्र, स्फोट झाल्याचे कळल्यानंतरही सभेत त्याचा उच्चार न करता नरेंद्र मोदी यांनी शहाणपणा दाखवला, स्फोटाचे राजकारण न करता गोंधळ होणार नाही याची काळजी घेतली.

बॉम्बस्फोटांचे मोदी हेच लक्ष्य

पाटण्यात झालेल्या बॉम्बस्फोटांचे मोदी हेच लक्ष्य होते. त्यामुळे मोदी यांच्या जिवाला धोका असून मोदी यांना पंतप्रधानांप्रमाणेच सुरक्षा व्यवस्था मिळाली पाहिजे. मोदी यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली असून त्यांना राष्ट्रीय सुरक्षा गटाची सुरक्षा दिली जात आहे. राष्ट्रीय सुरक्षारक्षक ही सुरक्षा व्यवस्थेतील सर्वोच्च सुरक्षा व्यवस्था मोदींना पुरवण्यात आली आहे.

प्रत्यक्षात या स्फोटाच्या चौकशीत इंडियन मुजाहिदीन या अतिरेकी संघटनेचा हात असल्याचे स्पष्ट झाले. सरकार नरेंद्र मोदी यांना पुरेशी सुरक्षा देण्याच्या बाबतीत राजकारणाचेच मापदंड लावत निघाली आहेत. मोदी यांना पंतप्रधानासारखी सुरक्षा दिली तर जणू ते निवडणुकीआधीच पंतप्रधान पदावर दावा सांगणार, अशी भीती वाटत असल्यासारखे ही मंडळी त्यांना सुरक्षा द्यायला तयार नाहीत. यांना प्राणांचे रक्षण महत्त्वाचे वाटत नाही, तर यांना त्यातही राजकारणाचे डावपेच खेळण्याचा मोह होतो. आजच्या स्थितीत मोदी यांना असणाऱ्या धोक्याचे मूल्यमापन संरक्षण यंत्रणांनी करावे. त्यानुसार त्यांचे संरक्षण वाढवावे किंवा त्यात अचूकता आणावी. मात्र या मुद्याचे राजकारण होता कामा नये. पाटण्याच्या सभेत स्फोट झाल्यानंतर काही दिवसांनी मोदी स्फोटग्रस्तांना भेटण्यासाठी बिहारमध्ये गेले. आहेत त्या यंत्रणा अधिक कार्यक्षम कशा होतील, याकडे लक्ष दिले पाहिजे.

राहुल गांधी मात्र नाट्यमयरीत्या आपलीही हत्या होऊ शकते असे अरण्यरुदन करत सहानुभूती मिळविण्याच्या प्रयत्नात आहेत. माझ्या आजीची हत्या झाली, माझ्या वडिलांची हत्या झाली आणि आता माझी देखील हत्या होऊ शकते, असे ते म्हणतात. विशेष म्हणजे अशा प्रकारच्या हत्येची जबाबदारी ते विरोधी पक्षांवर टाकू इच्छित आहेत. नरेंद्र मोदी यांच्या पाटणा येथील सभेतील बॉम्बस्फोटांची मालिका अतिरेक्यांनी घडविली, मोदी वास्तव्यास ज्या हॉटेलमध्ये होते ते हॉटेल उडविण्याचा इरादा होता, हेही पुढे आले आहे. पाटणा येथील सभेत सुरक्षा व्यवस्थेच्या तकलादूपणाचे पितळ उघडे पडले आहे. सरकार म्हणत आहेत तशी पुरेशी सुरक्षाव्यवस्था पाटणा येथील सभेच्या वेळी उपस्थित नव्हती हे सांगण्यासाठी आता तेथे झालेली स्फोटांची मालिकाच पुरेशी आहे.

सतर्क राहण्याची गरज

सकाळी १० वाजताच्या सुमारासच नवीन पाटणा रेल्वेस्थानकावरील प्रसाधनगृहात पहिला बॉम्बस्फोट घडून आला होता. या घटनेनंतर मोदींच्या रॅलीला संरक्षण देण्याची कडक सुरक्षा व्यवस्था बिहार सरकारला करता आली असती. कारण, मोदींची रॅली त्यानंतर चार तासांनंतर सुरू झाली होती. या चार तासांत रॅलीभोवती सुरक्षा कडे उभारता आले असते, घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, प्रत्येक कार्यकर्त्याची कसून तपासणी करता आली असती. त्याला कुणीही आक्षेप घेतला नसता. पण, तसे झालेले दिसत नाही. नितीशकुमार म्हणतात, आम्हाला अलर्ट सूचना नव्हती. पण, मोदींच्या सभेच्या चार तासांआधीच एका बॉम्बचा स्फोट झाला होता आणि पेरून ठेवलेला एक बॉम्ब निकामी करण्यात आला असतानाही, अलर्ट सूचनेची आवश्यकता होती का? चार तासांच्या आत बरेच काही करता आले असते. पण, सभामैदानाची सुरक्षा व्यवस्था चोख ठेवण्यात नितीशकुमार यांच्याकडून कसूर झाली, असेच एकंदरीत चित्र आहे. नितीशकुमार यांनी या घटनेचा निषेध केला असला, मृतकांच्या वारसांना पाच लाखांची मदत जाहीर केली असली, तरी तेवढ्याने हा प्रश्न सुटणारा नाही.

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकींच्या प्रचाराला प्रारंभ झाला आहे. त्यानंतर लगेच लोकसभेच्या निवडणुका आहेत. आज भाजपाकडून नरेंद्र मोदी आणि सत्तारूढ कॉंग्रेसकडून राहुल गांधी अनेक राज्यांमध्ये प्रचारसभा घेत आहेत. त्यामुळे केवळ भाजपाच्या सभांना सुरक्षा प्रदान करण्याचा नव्हे, तर राहुल गांधी यांच्या सभांनाही तेवढीच चोख सुरक्षा व्यवस्था प्रदान करावी लागणार आहे. अनेक राज्यांमध्ये भाजपाची, अनेक राज्यांत कॉंग्रेसची, तर अनेक राज्यांत प्रादेशिक पक्षांची सरकारे आहेत. पण, देशातील प्रमुख विरोधी पक्षांचे नेते हे येत्या लोकसभा निवडणुकीत संपूर्ण देशभर प्रचारासाठी फिरणार आहेत. त्यामुळे बिहारच्या घटनेपासून आतापासूनच सर्व राज्यांनी सावधगिरीच्या उपाययोजना आखण्यास सुरुवात केली पाहिजे. इंटेलिजन्स आणि स्थानिक विशेष शाखांनी आतापासूनच दक्ष राहण्याची गरज आहे.बिहारच्या घटनेमुळे राज्य आणि केंद्रातील इंटेलिजन्स यंत्रणा चौकस दृष्टी ठेवण्यात अपयशी ठरली आहे, असेच म्हणावे लागेल. बिहारच्या घटनेनंतर देशाच्या अन्य भागातही नेत्यांच्या सभा होतील. त्या वेळी सतर्क राहण्याची गरज आहे. सोबतच अन्य पक्षांनीही सभास्थानी लक्ष देण्यासाठी स्वत:चे स्वयंसेवक ठेवले पाहिजेत. जनतेनेही बिहारच्या घटनेमुळे क्रोधित न होता, शांतताच पाळली पाहिजे. तोच खरा मानवधर्म आहे.

मानवाधिकार संस्था विरुद्ध सामान्य नागरिक : सामान्य नागरिक/पोलिसांच्या मानवाधिकारांचे काय?

July 29, 2013 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

लखनभय्या प्रकरणात १३ पोलिसांना शिक्षा झाल्यानंतर काही दिवसांतच पुन्हा एकदा राज्य सरकारवर नामुष्की ओढवली आहे. राज्याचे मुख्य सचिव जयंत बांठिया यांना अटक टाळण्यासाठी दाऊद गँगच्या गुंडाच्या कुटुंबाला पाच लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी लागली. दाऊद इब्राहीम गँगचा गुंड रम्या पवार २००५ मध्ये वांद्रे येथे झालेल्या पोलिस चकमकीत ठार झाला होता. ही चकमक बनावट असल्याचे सांगत रम्याच्या हत्येप्रकरणी राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने राज्य सरकारने पाच लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी, असा आदेश दिला होता. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या निर्णयाविरोधात विशिष्ट मुदतीत हायकोर्टात अपिल करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे. मात्र सरकारने मुदत संपेपर्यंत अपिल केलेच नाही.

हिंसाचाऱ्यांशी लढताना बळी जाणाऱ्या पोलिसांचे, हिंसाचाऱ्यांनी ज्यांचे प्राण घेतले त्या निरपराध नागरिकांचे मानवधिकार आहेत का? हिंसाचारापासून दूर व सुरक्षित असलेल्या विचारवंतांची आणि कायद्याचा कीस काढून अशा हिंसेचा न्याय करायला बसलेल्या तटस्थ न्यायमूर्तींची याबाबत काही जबाबदारी असते की नाही? संविधानाने निर्माण केलेल्या व

त्याच्या चौकटीत राहून काम करणाऱ्या संस्था व नागरिक यांच्याकडून संविधानावर आतून होणाऱ्या हल्ल्यांना प्रतिबंध करणे एवढ्यावरच वरिष्ठ न्यायालयांची जबाबदारी संपते काय? संविधानावर बाहेरून हल्ले चढविणाऱ्यांबाबत ही न्यायालये निष्क्रिय आणि दोलायमानच राहणार आहेत काय? की न्यायदेवता नुसती आंधळीच नाही तर आपली संविधानविषयक जबाबदारी विसरणारी विसराळू व्यवस्थाही आहे? शेवटी देश, संविधान आणि लोकशाही यांच्या रक्षणाबाबत न्यायालयांनीही काही स्पष्ट व स्वच्छ भूमिका घ्यायची की त्यांनी संविधानाच्या मर्यादेत राहणाऱ्यांनाच बदडत रहायचे.

लखनभय्या एन्काउंटर हे पोलिसांनी केलेल्या खुनाचे प्रकरण ठरवून त्यात दोषी ठरलेल्या १३ पोलिसांसह २१ जणांना मुंबई सत्र न्यायालयाने शुक्रवारी जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. न्यायाधीश व्ही. डी. जाधवार यांनी हा निकाल दिला तेव्हा पोलिसांच्या कुटुंबीयांनी भर न्यायालयात एकच आक्रंदन केले. कोण कुठला उपरा गुंड.. त्याचे एन्काऊंटर केले म्हणून पोलिसांना शिक्षा. हा कुठला न्याय? असा सवाल न्यायालयाच्या परिसरात विचारला जात होता.लखनभय्याच्या एन्काऊंटरचा हा खटला प्रचंड गाजला. खतरनाक गँगस्टरचे पोलिसांनी केलेले एन्काऊंटर योग्यच होते हे जनमत आहे. मात्र न्यायालयात ही चकमक खोटी ठरली. न्यायालयाने दिलेला निकाल साफ चुकीचा आहे. आमचे पती निर्दोष आहेत. सरकारी पक्षासह सर्वांना हे माहीत आहे आणि तरीदेखील न्यायालय त्यांना जन्मठेपेची शिक्षा देत असेल तर आम्हाला फाशीची शिक्षा द्या, असा टाहो शिक्षा झालेल्या पोलिसांच्या पत्नींनी न्यायाधीश यांच्यासमोर फोडला.

गेल्या दशकात २७२ गुंड, दहशतवादी चकमकीत ठार

मुंबईत सत्तरीच्या दशकात गुंडगिरीचा फैलाव झाल्यानंतर पोलिसांनी एन्काउंटर करून गुंडांना ठार मारण्याचे प्रकार सुरू झाले. गुंडगिरीचा त्रास आणि गुंडांची दहशत याची धास्ती घेणाऱ्या सामान्य माणसास हे एन्काउंटर म्हणजे वरदानच वाटले. आता पोलिसांना एन्काउंटरच्या धोरणाचा फेरविचार करावा लागणार आहे. तसेच एन्काउंटरवर निर्बंध आले म्हणून गुंडांविरुद्धच्या कारवाईत वाढ होईल.यापुढे सिनीयर अधिकाऱ्यांचे आदेश कोणताही पोलीस अधिकारी ऐकणार नाही. संघटित गुन्हेगारी टोळ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी मुंबई पोलिसांनी १९९० च्या दशकात उगारलेले चकमकीचे (एन्काउंटर) शस्त्र आता म्यान झाले आहे. दहशतवादाने सध्या देश त्रस्त असल्यामुळे दहशतवाद्यांना असेच ठार मारणे योग्य आहे, असे सामान्य माणसाला वाटते.

गेल्या दशकात २७२ संशयित गुंड व दहशतवादी चकमकीत ठार झाले.गेल्या दशकाच्या सुरुवातीलाच म्हणजे २००१ मध्ये मुंबई पोलिसांनी ९४ एन्काऊंटर केले. या काळात मुंबई पोलिसांनी २७२ गुन्हेगारांना यमसदनी धाडले होते. त्यात छोटा राजन टोळीच्या ९७ गुंडांचा समावेश आहे. त्याखालोखाल चकमकीत दाऊद टोळीच्या ४६ गुंडांना पोलिसांनी ठार केले, गेल्या

दशकात झालेल्या चकमकींमध्ये बरेच मोठे गुंड ठार झाले; तर अर्ध्यांनी शहर आणि देश सोडला. याशिवाय मानवाधिकार आयोगाच्या वाढत्या सक्रियतेमुळेही चकमकींमध्ये बरीच घट झाली आहे.

सामान्य नागरिक/पोलिसांच्या मानवाधिकारांचे काय?

अशा गुंडांना यमसदनी पाठवले नाही तर सर्वसामान्य जनतेला रस्त्यावरून फिरणे अशक्य होईल. पुरेसे पुरावे असतील तर फासावरही चढायची तयारी आहे. लखनभय्या चकमक खटल्यातील एका आरोपी पोलिसाने न्यायालयात त्याची बाजू मांडताना वरीलप्रमाणे वक्तव्य केले आहे. समोरून गोळ्या झाडल्या जात असतील तेव्हा स्वरक्षणासाठी गोळीबारही करायचा नाही तर काय पर्याय असतो? अशा वेळी काय करायचे ते आयुक्तांना फोन करून विचारायचे का? सध्या पोलिसांची कीव यावी अशीच खाकी वर्दीची अवस्था झाली आहे. कुणीही यावे आणि टपली मारून जावे याप्रमाणे पोलिसांना वागवले जात आहे. अवघ्या मुंबईला १९८० च्या दशकात रिव्हॉल्व्हरच्या धाकावर नाचवू पाहणाऱ्या अंडरवर्ल्डचे आणि टोळीबाज संघटित गुन्हेगारांचे कंबरडे मोडणाऱ्या मुंबई पोलिस दलाची, विशेषत: सर्वसामान्य पोलिसांची अवस्था दात आणि नखे काढलेल्या सिंहासारखी झाली आहे. आणि ज्यांनी जनतेला संरक्षण द्यायचे, करायचे त्या पोलिसांच्याच अंगावर हात उचलला जातो, मारहाण केली जाते, त्यांच्याकडील शस्त्रे पळवली जातात, महिला पोलिसांच्याच अंगचटीला जाऊन छेडछाड केली जाते, त्यांचे विनयभंग होतात हे पाहून सर्वसामान्य हतबद्ध झाले आहेत. मुंबईला दहशतवादी हल्ल्यांचाही मुकाबला सध्या करावा लागतो आहे. सर्वसामान्य मुंबईकर धास्तावलेला आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये मुंबईसारखीच परिस्थिती आहे. आणि कुठल्या तरी अदृश्य धास्तीने भांबावल्यागत हात बांधलेल्या पोलिसांची शस्त्रे म्यान आहेत. दिवसाढवळ्या खंडणीखोर गोळीबार करून, निघून गेल्यावर पोलिस गोळ्यांच्या पुंगळ्या गोळा करण्यासाठी वा मृतदेह ताब्यात घेण्यासाठी तिथे पोहोचत असल्याचे दृश्य आहे.

महराष्ट्र/मुंबईबरोबर पोलिसही अंडरवर्ल्ड आणि दहशतवाद्यांच्या निशाण्यावर आहेत. संघटीत गुन्हेगारीच्या कालखंडाचे, त्या काळातील गुंडांचे उदात्तीकरण करणारे चित्रपट बनवले जात आहेत. त्या काळात मुंबईत टोळ्यांची कशी दहशत होती, ही दहशत निधडया छातीच्या पोलिस अधिकाऱ्यांनी कशी मोडून काढली या कशाकशाचीही माहिती नसलेल्या प्रेक्षकांकडून चित्रपटांची वाहवा होत आहे आणि या गुंडांचे अनुकरण करणाऱ्या अर्धवटांना जरब बसवण्याची क्षमता असलेले पोलिस निष्प्रभ ठरले आहेत. याची कारणे काय असावीत याचाही विचार करण्याची वेळ आता आली आहे.

अमेरिकेने काय केले

न्यूयॉर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर ओसामा बिन लादेनच्या दहशतवाद्यांनी हल्ला केल्यानंतर अमेरिकेने दहशतवादाविरुद्ध युद्ध सुरू केले आणि अल्कायदा या संघटनेशी संबंध

असल्याच्या संशयावरून अनेकांना ताब्यात घेतले. त्यांचे अमेरिकेने काय केले हे पाहिले, तर कसाबला वकील द्यावा की नाही, ही चर्चा निरर्थक वाटू लागेल!चौकशी आणि खटला या दोन्हींसाठी अवलंबिली गेलेली प्रक्रिया ही अमेरिकेतील न्यायव्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय करार यांनी मान्य केलेल्या हक्कांचे उल्लंघन करणारी आहे, यावर एकमत आहे! ही बंधने पाळण्याच्या जबाबदारीतून मुक्त होण्यासाठी अमेरिकन सरकारने ग्वांटानामो बेवरील तुरुंगाचा वापर केला आहे. त्यामुळे त्यांना युद्धकैद्यांचा दर्जा नाही व जीनीव्हा कन्व्हेन्शनने मान्य केलेल्या तरतुदीही त्यांना लागू होत नाहीत! अमेरिकेतील कोर्टात त्यांच्यावर खटला भरण्यात आला नसल्यामुळे, तेथील आरोपींना असलेले अधिकारही त्यांना लागू नाहीत. त्यांच्याविरुद्धचे खटले चालविण्यासाठी तुरुंगातच लष्करी न्यायाधिकरण स्थापन करण्यात आले आहे. न्यायाधिकरणाच्या निर्णयांना अमेरिकेच्या कोर्टात आव्हान देण्याचा आरोपींचा हक्क कोर्टाने मान्य केला होता. मात्र बुश प्रशासनाने नवा कायदा करून सुप्रीम कोर्टाचा निर्णय निष्प्रभ ठरवला. या कायद्याने सदस्यांच्या लष्करी आयोगापुढे खटले चालविण्याची तरतूद करण्यात आली. चौकशीसाठी छळ करण्यास मनाई करण्यात आली असली, तरी पाण्यात बुडत असल्यासारखी भावना निर्माण करून चौकशी करण्यासारख्या मार्गांना मात्र मुभा कायम होती! शिवाय या प्रक्रियेत बचावासाठी वकिलांनाही आरोप व संबंधित कागदपत्रे पुरवली जात नव्हती. या खटल्यातून कोणीही निर्दोष मुक्त होता कामा नये, असे धोरणच असल्याचे पुरावेही प्रसारमाध्यमांत उघड झाले होते.

गुंडांचे उदात्तीकरण करणारे चित्रपट

आज भारतात याच्या बरोबर उलट चित्र दिसते आहे. महराष्ट्र/मुंबईबरोबर पोलिसही अंडरवर्ल्ड आणि दहशतवाद्यांच्या निशाण्यावर आहेत. संघटीत गुन्हेगारीच्या कालखंडाचे, त्या काळातील गुंडांचे उदात्तीकरण करणारे चित्रपट बनवले जात आहेत. त्या काळात मुंबईत टोळ्यांची कशी दहशत होती, ही दहशत निधडया छातीच्या पोलिस अधिकाऱ्यांनी कशी मोडून काढली या कशाकशाचीही माहिती नसलेल्या प्रेक्षकांकडून चित्रपटांची वाहवा होत आहे आणि या गुंडांचे अनुकरण करणाऱ्या अर्धवटांना जरब बसवण्याची क्षमता असलेले पोलिस निष्प्रभ ठरले आहेत. याची कारणे काय असावीत याचाही विचार करण्याची वेळ आता आली आहे.

अंडरवर्ल्ड/गुंडांसाठी/दहशतवाद्यासाठी मानवी हक्कांच्या मर्यादा ?

दहशतवाद्यांवर कोणताही विधिनिषेध पाळण्याचे बंधन नसले, तरी कायद्याने चालणाऱ्या देशाला काही विधिनिषेध पाळावेच लागतात; कारण ते न पाळणे, हे सुद्धा दहशतवादासाठी निमित्त ठरू शकते! परिणामी अंडरवर्ल्ड/गुंडांसाठी/ दहशतवाद्यासाठी मानवी हक्कांच्या मर्यादा काय असाव्यात? निरपराधांचे बळी घेणाऱ्या दहशतवाद्यांना माणूस म्हणता येणार नाही, ती तर जनावरं. त्यांच्या बाबतीत प्राणीहक्कांच्याच भाषेत बोलायला हवं. इतर गुन्हेगार आणि दहशतवादी यांच्यासाठी तपासपद्धती व पुराव्यांचे प्रमाण या बाबतीत वेगळे निकष ठरविणे गरजेचे आणि न्यायाचेही आहे, स्वतंत्र कायदे करून या तरतुदी करणे त्यांना अभिप्रेत आहे,

दहशतवादाच्या तपासासाठी ३० दिवसांत आरोपपत्र सादर करण्याचे बंधन शिथिल करून ते ६० दिवसांचे करणे, साक्षीदारांना संरक्षण देणे, याबरोबरच एकदा कायद्याचे पालन करून दहशतवाद्यांना शिक्षा दिल्यावर तिची विनाविलंब अंमलबजावणी करणे, यासारख्या बाबींवर त्यांचा भर आहे. घटनेने प्रत्येक व्यक्तीला दिलेल्या जीवित व स्वातंत्र्याच्या हक्काचा सुप्रीम कोर्टानेच लावलेला अर्थ दहशतवाद्यांना लागू होत नाही. फौजदारी प्रक्रियेतील बारीक सारीक तरतुदींच्या काटेकोर पालनाचा आग्रह अंडरवर्ल्ड/गुंडांसाठी दहशतवाद्यांच्या बाबतीत धरण्याचे कारण नाही.

दहशतवाद्यांनी देशात ठार मारलेल्या नागरिकांची संख्या एक लाखाच्या पुढे जाणारी आहे. दहशतवाद्यांची कार्यक्रम पत्रिका एवढी राजकीय व कार्यक्रम एवढा हिंसाचारी असताना त्यांना मानवतावादाचे, पुरोगामीपणाचे किंवा क्रांतीचे नाव देऊन जी शहाणी माणसे पाठिंबा देतात त्यात आपल्या महाराष्ट्रातील अनेक अतिशहाण्यांचा समावेश आहे. दहशतवाद्यांना व त्यांच्या सहानुभूतीदारांना पाठिंबा देण्याची, त्यांचा बचाव करण्याची आणि त्यासाठी वृत्तपत्रांचे रकाने भरण्याची कोणतीही संधी ते सोडत नाहीत

जर्मन बेकरी पुणे, हैदराबाद ते बंगळुरू : दहशतवादी हिंसाचार वाढवण्याची शक्यता

April 20, 2013 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

पुण्याच्या जर्मन बेकरी बॉम्बस्फोटातला आरोपी हिमायत बेग याला या स्फोटाच्या प्रकरणात पुण्याच्या सत्र न्यायालयाने दोषी ठरवले व गुरुवारी फाशीची शिक्षा सुनावली. हा स्फोट २०१० च्या फेब्रुवारीत झाला होता. या कटातले अन्य पाच आरोपी फरार आहेत. जर्मन बेकरी स्फोटाचा कट वरच्या पातळीवर शिजला होता. हिमायत बेगला शिक्षा झाल्याने जर्मन बेकरी स्फोटाचा पूर्ण निकाल लागला, असे होणार नाही. ही शिक्षा झाली तरीही पोलिसांना फरार आरोपींचा शोध घेत राहावेच लागणार आहे.

बेंगळुरमध्ये बॉम्बस्फोट

राज्य विधानसभा निवडणुकीला जोर आलेला असतानाच बुधवारी मल्लेश्वरम येथील प्रदेश भाजप कार्यालयासमोर बॉम्बस्फोट झाला. या घटनेत ८ पोलिसांसह १६ जण जखमी झाले. इंडियन मुजाहिद्दीन संघटनेचा या घातपातामध्ये हात असावा, अशी शंका पोलिसांनी व्यक्त केली आहे. ऐन निवडणूक काळात दहशतवादी हल्ला झाला. २०१० मध्ये बेंगळुरातीलच चिन्नास्वामी स्टेडियमजवळ झालेला बॉम्बस्फोटदेखील १७ एप्रिल रोजीच झाला. दोन्ही हल्ल्यात बरेच साधर्म्य आहे. भाजप कार्यालयासमोर पार्किंग करण्यात आलेल्या सुझुकी

कंपनीच्या दुचाकीत बॉम्ब ठेवण्यात आला. टायमरच्या साहाय्याने दहशतवाद्यांनी हा स्फोट घडवून आणला. मल्लेश्वरम येथे बॉम्बस्फोटासाठी वापरण्यात आलेली दुचाकी हैदराबाद येथून चोरून आणण्यात आली आहे.

अमेरिका आणि भारत या दोन देशांना केवळ तीन दिवसांच्या अंतराने बॉम्बस्फोटांनी पुन्हा एकदा हादरा दिला आहे. सोमवारी अमेरिकेतील बोस्टन येथे जगप्रसिद्ध मॅरेथॉन स्पर्धेत झालेल्या स्फोटात तिघा जणांचा मृत्यू झाला तर १७६ लोक जखमी झाले. अमेरिकेमध्ये झालेल्या ९/११ च्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेच्या राज्यकर्त्यांनी हा हल्ला करणाऱ्यांना वेचून आणि ठेचून काढण्यात येईल अशी अमेरिकन जनतेला ग्वाही दिली होती. त्याप्रमाणे अल कायदाचा ओसामा बिन लादेन याला काही वर्षांनंतर पाकिस्तानात ठार केले. गेली १२ वर्षे अमेरिकेवर कुठलाही दहशतवादी हल्ला होऊ दिला नव्हता. पण असे दहशतवादी हल्ले कायमचे रोखणे, अमेरिकेसारख्या महासत्तेलाही शक्य नाही हे सोमवारी अमेरिकेत बोस्टन येथे झालेल्या दोन बॉम्बस्फोटांनी सिद्ध झाले आहे. या देशाने सुरक्षाव्यवस्थेवरील खर्च कितीतरी पटीने वाढवला. आपल्या गुप्तहेर यंत्रणेवरील खर्च करताना अमेरिकेला केवळ देशांतर्गत खर्चाचाच विचार करून चालत नाही तर जगात जेथे-जेथे आपल्या गुप्तहेर यंत्रणांचे जाळे आहे तेथील यंत्रणांवर हा खर्च करावा लागतो.

अस्थैर्य माजवण्याची एक दीर्घकालीन योजना

१९६५ व १९७१ च्या अपमानकारक पराभवाचा बदला घेण्यासाठी पाकिस्तानचे राष्ट्रपती जनरल झिया आणि कुख्यात आयएसआय यांनी संयुक्तपणे भारतात अस्थैर्य माजवण्याची एक दीर्घकालीन योजना आखली आहे. या योजनेला पाकिस्तानच्या काराकोरम पर्वतावरून के प्लॅन असे संबोधले गेले. भारतात द्वेषाची बीजे रोवून जातीय व धार्मिक तणाव निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य भाग होता. यातूनच स्वतंत्र खलिस्तानची मागणी, काश्मीरचे विभाजन करण्याचाही डाव रचला गेला. १९९३ मध्ये पाकिस्तानने दहशतवादी संघटनांना पैसे, शस्त्रास्त्रे, प्रशिक्षण वगरे सर्व प्रकारची मदत करून भारतात दहशतवादी हल्ले घडवून आणले व त्यानंतरच्या प्रत्येक दहशतवादी हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात आहे, भारताची प्रगती, त्याचा औद्योगिक विकास, विविध धर्मांच्या व विविध भाषिक लोकांमधील ऐक्य, नांदणारी शांतता व लोकशाही या गोष्टी पाकिस्तानी राज्यकर्त्यांच्या डोळ्यांत सलत आल्या आहेत. मुंबईच काय, भारतात कुठेही दहशतवादी हल्ले झाले तरी काही तासांतच लोक पूर्ववत आपले व्यवहार सुरू करतात. भारतात येणाऱ्या पर्यटकांवरही या दहशतवादी हल्ल्यांचा फारसा परिणाम झालेला नाही.ज्या पाकिस्तानने भारताविरुद्ध दहशतवाद पोसला त्याच पाकिस्तानमध्ये दहशतवादाने आज थैमान घातले आहे. बॉम्बस्फोटांचा उद्देश एकच आहे तो म्हणजे अधिकाधिक प्राणहानी आणि अर्थव्यवस्था खिळखिळी करणे. मात्र, आता दहशतवादाने पोळलेल्या देशांनी एकत्र येऊन वेगळी रणनीती आखणे आणि जागतिक दशतवादाचे कुरण होऊ पाहणाऱ्या पाकिस्तानावर दबाव आणणे, आवश्यक झाले आहे.

राष्ट्रीय भावनेने त्याचा मुकाबला करण्याची गरज

दहशतवाद्यांच्या हल्ल्याचे राजकारण न करता राष्ट्रीय भावनेने त्याचा मुकाबला करण्याची गरज आहे. राजकारणापलीकडे राष्ट्रकारण असते आणि देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी ते आवश्यक असते, याची आमच्या येथील राजकारण्यांना जाणीवच नाही. कॉंग्रेस प्रवक्ते शकील अहमद यांनी स्फोटाच्या या घटनेचे राजकारण करण्याचा जो प्रयत्न केला, त्याचा करावा तेवढा निषेध कमीच आहे. दहशतवाद्यांच्या कारवायामुळे जेवढे नुकसान होते, त्यापेक्षा जास्त नुकसान राजकारण्यांच्या या वृत्तीमुळे होत असते. भाजपा कार्यालयाजवळ हा स्फोट झाल्यामुळे राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्याचा फायदा भाजपाला मिळेल, असे तारे शकील अहमद यांनी तोडले आहेत. भाजपानेच आपल्या राजकीय फायद्यासाठी हा स्फोट घडवून आणला, असा शकील अहमद यांच्या विधानाचा मथितार्थ आहे. पक्षाचे महासचिव जनार्दन द्विवेदी यांनी शकील अहमद यांच्या भूमिकेशी पक्ष सहमत नसल्याचे स्पष्ट केले आहे. बंगळूरूच्या स्फोटाच्या या घटनेचे राजकारण न करता सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येण्याची गरज आहे. दहशतवाद ही गंभीर अशी राष्ट्रीय समस्या आहे. या दहशतवादानेच कॉंग्रेस पक्षाच्या दोन नेत्यांचा बळी घेतला आहे, तरीसुद्धा त्यांचे डोळे कसे उघडत नाही. त्यामुळे दहशतवाद चिरडून टाकण्याचे कठोर धोरण स्वीकारणे ही काळाची गरज झाली आहे. असे धोरण आपण सर्व पक्षीय आणि राजकीय मतभेद बाजूला ठेवत स्वीकारले नाही, तर एक दिवस दहशतवादच आपल्या देशाला चिरडून टाकेल याची जाणीव सर्वांनी ठेवली पाहिजे.

पंतप्रधान मनमोहन सिंग आणि अमेरिकेतील स्फोट

पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी अशा दहशतवादी हल्ल्याचा सामना करण्यासाठी संपूर्ण जगाने एकत्र येण्याची आवश्यकता व्यक्त केली. अमेरिकेतील स्फोट ही दुःखद घटना असून, स्फोटामध्ये मृत्युमुखी पडलेल्या व जखमी झालेल्या नागरिकांच्या दुःखामध्ये आम्ही भारतीय नागरिक सहभागी आहेत. “या घटनेची चौकशी करण्यासाठी भारत अमेरिकेला पूर्णपणे सहकार्य करेल असे सांगितले”. काय आश्वासक शब्द आहेत मनमोहनसिंग यांचे. त्यांचे हे आश्वासन ऐकून अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा धन्य झाले असतील, आश्वस्त झाले असतील. मनमोहनसिंग यांच्यासारख्या (खंबीर, कर्तव्यकठोर, पोलादी, खंबीर) पुरुष माणसाची साथ मिळाल्याने बराक ओबामा याना हायसे वाटले असेल.

आतंकवादाचा मुकाबला कसा करावा याचे धडे आपल्या कडून घेण्याची दुर्दैवी वेळ अद्याप अमेरिकेवर आलेली नाही. आतंकवादाचा मुकाबला कसा करू नये, अतिरेक्यांचे लाड कसे करावेत, त्याना करदात्यांच्या पैशाने कसे पोसावे, त्यांच्या शिक्षेवरून सत्तेचे आणि मतांचे राजकारण कसे करावे, देशहिताला आणि देशाच्या सुरक्षेला तिलांजली कशी द्यावी, बहुसंख्यांक जनतेला कसे वाऱ्यावर सोडावे याचे सोपे आणि सुलभ उपाय शिकण्याची वेळ जेव्हा अमेरिकेच्या अध्यक्षांवर येईल तेव्हा त्यांना आपण तुमची “शिकवणी” लावू, पंतप्रधान साहेब, आपण आधी आपल्या देशातील बॉम्बस्फोटांचा निकाल लावा. दुष्काळ पडला आहे तिकडे आधी

मदत करा. आधी तुम्ही आपल्या देशातील लोकांचे रक्षण करा मग तुम्ही दुसऱ्या देशाची काळजी करा ? पुढील वर्षी अफगाणिस्तानातून अमेरिका आपले सैन्य मागे घेणार आहे. त्यानंतर जी 'पोकळी' तयार होईल त्यात हिंसाचार वाढत जाणार आहे. कारण तालिबानी अतिरेकी भारतीय उपखंडात हिंस्र धिंगाणा घालायला मोकळे होतील. बोस्टन ते बंगळुरू साखळी ही त्यानजीकच्या भविष्याची नांदी आहे.

दहशतवादी आत्मसर्मपण आणि पुनर्वसन धोरण :समन्वयाचा अभाव

March 29, 2013 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

घातपाताचा कट रचल्याप्रकरणी 'हिज्ब-उल-मुजाहदीन'चा अतिरेकी लियाकत अली शाह याला दिल्ली पोलिसांनी अटक केल्याच्या मुद्द्यावर जम्मू-काश्मीर विधिमंडळ सभागृहात चर्चा करण्यासाठी सत्ताधारी पक्ष नॅशनल कॉन्फरन्सने मांडलेल्या तहकुबीच्या प्रस्तावाला विधानसभा अध्यक्षांनी परवानगी नाकारली. होळीच्या दिवशी दिल्लीत आत्मघातकी अतिरेक्यांद्वारे घातपात घडविण्याचा कट पोलिसांनी उघडकीस आणला असून कुपवाडाहून त्यासाठी दिल्लीकडे निघालेल्या हिजबुल मुजाहिद्दीनच्या सईद लियाकत अली शाह या संशयित अतिरेक्यास अटक केली आहे. दिल्लीतील जामा मशिदीजवळच्या एका गेस्टहाऊसमध्ये आपल्यासाठी शस्त्रास्त्रे ठेवल्याची माहिती त्याने पोलिसांना दिली.गेस्टहाऊसमधून एके ५६ रायफल, स्फोटके व हातबॉम्ब हस्तगत करण्यात आले आहेत. ती बाळगणारा अतिरेकी मात्र फरारी आहे. तो अतिरेकीच घातपात नेमका कुठे आणि कसा घडवायचा, हे सांगणार होता, अशी माहिती शाहने दिली आहे. दिल्लीतील घातपातानंतर काश्मीरला जाण्याचे आदेशही शाहला त्याच्या म्होरक्यांनी दिले होते.

दिल्लीत अजून काही अतिरेकी घुसले आहेत का, याचाही शोध घेतला जात आहे.जम्मू आणि काश्मीरमधील कुपवाडाचा रहिवासी असलेला शाह हा रेल्वेने दिल्लीकडे निघाला असताना त्याला बुधवारीच गोरखपूर रेल्वे स्थानकावर अटक झाली. त्याला गुरुवारी न्यायालयासमोर हजर केले असता पंधरा दिवसांची पोलीस कोठडी ठोठावण्यात आली.शाह हा १९९३ मध्येच दहशतवादी गटांत सामील झाला होता. काश्मीरमधील २०११ सालच्या एका घातपातातही त्याचा हात होता. १९९७ मध्येच तो पाकिस्तानव्याप्त काश्मिरात गेला होता. तेथे त्याला घातपाताचे प्रशिक्षण दिले गेले होते. तेथून तो पाकिस्तानच्या पासपोर्टवर विमानाने नेपाळला गेला आणि नेपाळहून सीमेवरील सोनौली ठाण्यातून त्याने भारतात प्रवेश केला. भारतात जाताच तो पासपोर्ट नष्ट करण्यास त्याला सांगण्यात आले होते. तेथून तो दिल्लीला निघाला होता.

आत्मसमर्पण केलेल्या दहशतवाद्यांना सरकारने देऊ केलेल्या सुविधा

शासनाच्या ग्रामीण विकास विभागातर्फे निवास आणि स्वंरोजगार ,शैक्षणिक आधारावर सरकारी नोकरी ,पुनर्वसनाची सुविधा ,पूर्वीच्या अपराधातून मुक्त करण्यावर विचार केला जातो.शस्त्रांच्यासह समर्पण करणाऱ्यांना 20 हजार ते 3 लाख रुपयापर्यंतचा मोबदला मिळतो. दहशतवाद्यांशी पुन्हा संबंध ठेवल्यास सर्व सुविधा बंद करण्यात येतात.दहशतवादविरोधी अभियानात विशेष मदत केल्यास पोलीस विभागांत किंवा होमगार्ड म्हणून नियुक्त करण्यात येते.मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबाला प्रतिव्यक्ती (मृत) च्या हिशोबानुसार एक लाख रुपये ,जायबंदी झालेल्यांना किंवा स्वसंपत्तीचे अंशतः नुकसान झालेल्यांना ,अपंग किंवा अर्धमृत झालेल्यांना 50 हजार रुपये दिले जातात.

शरणागती पत्करणाऱ्या दहशतवाद्यांसाठी जम्मू-काश्मीर सरकारने पुनर्वसन योजना सुरू केली आहे.पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांच्या पुनर्वसनासाठी जम्मू-काश्मीर सरकारने सुरू केलेल्या विशेष योजनेंतर्गत शरणागती पत्करून समान्य जीवन जगण्याची लियाकतची इच्छा आहे, असे जम्मू-काश्मीर पोलिसांचे म्हणणे आहे.माझ्या पतीला अडकविण्याचे दिल्ली पोलिसांचे षड्यंत्र आहे, अशी टीका सईदची पत्नी अख्तर-उ-निसा हिने केली आहे. ती म्हणाली, “”आम्ही नेपाळ सीमा ओलांडून भारतात आल्यानंतर गणवेशधारी सुरक्षा रक्षकांची गाडी आमची वाट पाहत होती. आम्हाला त्या गाडीत बसविण्यात आले. त्यातून आम्ही गोरखपूरला पोहोचलो. तेथे माझ्या पतीला गाडीतून उतरविण्यात आले .अख्तर-उ-निसा ही सईदची दुसरी पत्नी असून, ती सध्या कुपवाडामधील सईदच्या घरी पोहोचली आहे. त्याची पहिली पत्नी अमिना बानो हिने 2011मध्ये सईद शरणागती पत्करणार असून, त्याच्या पुनर्वसनासाठी राज्य सरकारकडे अर्ज दाखल केला होता. केंद्रीय गृह मंत्रालयाने हिज्बुल मुजाहिदीनच्या दहशतवादी अटक प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश राष्ट्रीय तपास संस्थेला (एनआयए) दिले. याप्रकरणी जम्मू-काश्मीर आणि दिल्ली पोलिसांनी परस्परविसंगत खुलासे केल्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश गृह मंत्रालयाने दिले.. लियाकतच्या पहिल्या पत्नीने पुनर्वसनासाठी 2011 मध्ये अर्ज दाखल केला होता. लियाकतला अशा पद्धतीने अटक होत असेल, तर शरणागती पत्करण्यास इच्छुक असलेल्या दहशतवाद्यांना चुकीचा संदेश जाईल, असे जम्मू-काश्मीर सरकारचे म्हणणे आहे

दिल्ली पोलिस जम्मू-काश्मीर पोलिस समन्वयाचा अभाव

दहशतवाद प्रतिबंधक कारवाई परिणामकारक का होत नाही, याचे मोठे कारण म्हणजे आपल्या देशातील सर्व पातळ्यांवरील समन्वयाचा अभाव. देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या या विषयात अद्यापही एकसूत्रीपणा येऊ नये, ही बाब चिंताजनक होय. समन्वयाच्या या अभावाचा प्रत्यय लियाकत अली शाह प्रकरणात पुन्हा एकदा आला. पाकव्याप्त काश्मिरातून नेपाळमार्गे भारतात येताना लियाकत अली शाह याला दिल्ली पोलिसांनी अटक केली. जम्मू-काश्मीर पोलिसांचे म्हणणे असे, की राज्य सरकारने अतिरेक्यांसाठी जे माफी देण्याचे धोरण

स्वीकारले आहे, त्यानुसार तो परतत होता. दिल्ली पोलिसांचे म्हणणे मात्र वेगळे आहे. अफजल गुरूला दिलेल्या फाशीचा बदला घेण्यासाठी दिल्लीत दहशतवादी हल्ल्याचा कट शिजत होता आणि लियाकत अली त्यात सामील असल्याची माहिती गुप्तचरांकडून मिळाल्याचा त्यांचा दावा आहे. कोणाचा दावा बरोबर हे "एनआयए'च्या चौकशीतूनच समजू शकेल. मात्र विविध राज्यांचे पोलिस, केंद्र व राज्य सरकार, गुप्तचर यंत्रणा अशा विविध पातळ्यांवरील समन्वयाचा कसा बोजवारा उडाला आहे, याचे ढळढळीत दर्शन या घटनेत जगाला झाले, हे मात्र नक्की. राष्ट्रीय दहशतवादविरोधी केंद्र (एनसीटीसी) स्थापन करण्याचा प्रस्ताव अद्याप साकारलेला नाही. अधिकारकक्षेच्या मुद्द्यावरून झालेल्या मतभेदांमुळे तो रखडला आहे. गुप्तचरांकडील माहिती एकाच केंद्राकडे एकत्रित केली जाईल आणि तिचे विश्लेषणही केले जाईल, हे या केंद्राकडून अपेक्षित होते. सध्या अशा केंद्राची किती आवश्यकता आहे, हेच या घटनेने दाखवून दिले आहे. मुळातच दहशतवाद हे राष्ट्रीय संकट मानून त्याचा एकजुटीने मुकाबला करण्याची गरज आहे, या जाणिवेचाच अद्यापही अभाव दिसतो आहे. पाकव्याप्त काश्मिरात राहणाऱ्या व दहशतीचा मार्ग सोडून देऊ इच्छिणाऱ्यांना माफी जाहीर करून त्यांना मुख्य प्रवाहात सहभागी होऊ देण्याचे धोरण चुकीचे नाही. दहशतवाद्यांना स्थानिक पातळीवर मिळणारा पाठिंबा कमी करणे, हेही दहशतवादविरोधी लढ्याचेच उद्दिष्ट आहे. त्यामुळेच शरण आलेल्या दहशतवाद्यांच्या पुनर्वसनाचे धोरण हा समग्र दहशतवादविरोधी धोरणाचाच भाग बनविला पाहिजे. शिवाय ते करीत असतानाही अखंड सावधानता ठेवायला हवी. राजकीय दृष्टिकोनातून दहशतवादाशी संबंधित घटनांकडे पाहता कामा नये.जम्मू-काश्मीर पोलिस आणि दिल्ली पोलिस यांनी परस्पर विसंगत खुलासे केल्यामुळे , गोरखपूर रेल्वे स्थानकावर पकडलेल्या हिजबुल मुजाहिदीनच्या संशयित दहशतवाद्याच्या अटकेची चौकशी होणार आहे

जम्मू आणि काश्मीरमध्ये नव्या प्रकारचा दहशतवाद

March 28, 2013 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

लोकसभेत गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असण्याची शंका उपस्थित केली मात्र, हल्ल्यातील शहीद जवानांना श्रद्धांजलीच्यावेळी सत्ताधारी बाकांवरील गृहमंत्र्यांसह एकही नेता उपस्थित नव्हता. दहशतवाद्यांच्या गोळ्या छातीवर झेलून देशाचे रक्षण करणाऱ्या सीआरपीएफच्या जवानांनी राजकीय नेत्यांवर रोष व्यक्त केला आहे. बुधवारी श्रीनगरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद जवानांच्या श्रद्धांजली सभेला राज्याचे मुख्यमंत्री उमर अब्दूल्ला यावेळी उपस्थित नव्हते. यामुळे जवानांनी मुख्यमंत्री कुठे आहेत? असा सवाल उपस्थित केला. एखाद्या सामान्य नागरिकाच्या अंत्यसंस्कारालाही सर्व राजकीय नेते हजर असतात मग देशासाठी लढणाऱ्या सैनिकासाठीच यांच्याकडे वेळ नाही का? असा रोष सैनिकांनी व्यक्त केला. या मुद्यावर वातावरण तापत असताना घाई गडबडीत मुख्यमंत्री

अब्दुल्ला श्रीनगर विमानतळावर गेले आणि त्यांनी तिथेच शहीद जवानांना श्रद्धांजली वाहिली. त्यावेळी जवानांचे मृतदेह त्यांच्या कुटुंबियांकडे सोपविण्यासाठी विमानावर चढविले जात होते.

पाकिस्तानच्या मुद्यावर सरकारचे धोरण नरमाईचे का आहे ? पाकिस्तान पंतप्रधानांच्या भारत भेटीवर अजमेर दर्ग्याचे प्रमुख कठोर भूमिका घेऊ शकतात तर, सरकार का नाही ?
सीआरपीएफ जवानांना श्रद्धांजली देण्यावेळी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे कुठे गेले होते ?

सीआरपीएफ छावणीवर हल्ला झाला त्यावेळी ७३ व्या बटालियनेचे ५० जवान तिथे उपस्थित होते. दहशतवादी तिथे खेळत असलेल्या मुलांमध्ये मिसळले होते. त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्र होते जे, पाकिस्तानी बनावटीचे होते. याशिवाय त्यांच्याकडे सापडलेल्या डायरीत पाकिस्तानातील क्रमांक सापडले.हल्ल्याची माहिती आधी होती तर, पाच सैनिकांना शहीद का व्हावे लागले, देशात असे दहशतवादी हल्ले होत असताना लष्करी विशेषाधिकार कायदा (अफस्पा) रद्द करण्याची मागणी का होत आहे. आपण पाकिस्तान आणि दहशतवादाविरोधात आक्रमक झाले पाहिजे.

जम्मू आणि काश्मीरमध्ये सुमारे २00-२50 दहशतवादी कार्यरत आहेत. याशिवाय 2000-2500 ते दहशतवादी भारतात घुसखोरीच्या तयारीत आहे. लष्कराच्या जवानांचे शौर्य आणि एकनिष्ठता यामुळे दहशतवादी आणि घुसखोरी यावर नियंत्रण मिळवणे शक्य झाले आहे. परंतु जम्मू आणि काश्मीर सरकारला याचा फायदा करून घेता आलेला नाही.

<u>नव्या प्रकारचा दहशतवाद</u>

1948 ते 1972 या सालांच्या मध्ये काश्मीर मध्ये शांती होती. 1972 पासून ऑपरेशन टॉपेझ च्या प्लॅन प्रमाणे मोठ्या प्रमाणात पाकिस्तानी घुसखोरी सुरू झाली. अनेक तरूणांना भडकवून पाकिस्तानी आतंकवादी ट्रेनींग कॅम्पस् मध्ये पाठवण्यात आले. या काळामध्ये आपले सरकार पूर्णपणे झोपले होते. 1980 पासून बंध आणि रस्त्यावर हिंसाचारास सुरूवात झाली. 1985 सालापासून काश्मीर पूर्णपणे आतंकवाद्यांच्या नियंत्रणाखाली गेले 1988 साली त्यावेळेचे पंतप्रधान व्ही.पी. सिंगाना काश्मीर कायमचे भारतापासून अलग झाले आहे असे वाटले. 1988 पासून सैन्याला काश्मीरमध्ये सीमेवर घुसखोरी थांबवण्यास **(ANTI INFILTRATION / ANTI TERRORISTS OPERATION)** आणि काश्मीरच्या आत आतंकवादी कारवाया थांबवण्याकरता बोलवण्यात आले. सैन्याने केलेल्या त्यागामुळेच आज काश्मीर भारतामध्ये आहे.

<u>काश्मीरमध्ये खोट्या बातम्या</u>

फार मोठ्या प्रमाणात राष्ट्रविरोधी पत्रकार, वर्तमान पत्रे, संकेतस्थळे () मानवाधिकार भंग होते म्हणून दुष्प्रचार करत असतात आणि आपले सरकार त्यांच्या विरुद्ध काही कारवाई करत नाही.

काही वर्तमानपत्रांचे प्रतिनिधीही दहशतवाद्यांना अपेक्षित बाजू मांडताना दिसतात. काश्मीर जळतंय? काश्मीरचा ठराविक भाग या आंदोलनाची शिकार होत आहे. आंदोलनाच्या वेळी प्रामुख्याने श्रीनगर आणि सोपोरमध्ये गडबड होते. इतर ठिकाणी शांतता असते. मात्र संपूर्ण काश्मीरच या आंदोलनांमध्ये होरपळून निघतंय असं काहीसं खोट चित्र रंगवलं जातंय.

काश्मीरमध्ये काश्मीर खोऱ्याला (130 किमी × 30 किमी) ला अवास्तव महत्त्व दिले जाते. काश्मीरची 20 टक्के लोकसंख्या येथे राहते, आकारमानाने हा काश्मीरचा 15 टक्के भाग आहे. काश्मीर खोरे हे देशविरोधी कारवायांचा अड्डा आहे. येथे वृत्तपत्रांचे वार्ताहार, हुरियतचे नेते, इतर राजकीय नेते, न्यायपालिका आणि काही पोलीस अधिकारी राष्ट्रविरोधी कामामध्ये पूर्णपणे गुंतलेले आहेत. त्यांचे सर्वांत महत्त्वाचे काम म्हणजे सैनिकांनी कुठे तरी केलेला तथाकथित अत्याचार केला ही घटना राष्ट्रीय वर्तमान पत्राच्या पहिल्या पानावर छापून आणायची. चौकशी होऊन खोटे ठरलेले आरोप मात्र वर्तमान पत्रामध्ये छापायचे पण नाहीत. देशातल्या भ्रष्ट झालेल्या बुद्धीवंतांना श्रीनगरमध्ये बोलावून त्यांच्याकडून तथाकथित अत्याचाराचा धिक्कार करून घ्यायचा. आज महाराष्ट्रात आणि देशाच्या बाकी भागात काश्मीरपेक्षा 100 पट जास्त अत्याचार होत आहेत. पण अनेक वर्तमानपत्रे त्याकडे दुर्लक्ष करतात.

<u>प्रत्येक घटनेस पाकीस्तानला अनुरुप रंग</u>

राष्ट्रीय प्रसार माध्यमांमधून काश्मीर खोऱ्यातील परिस्थिती अत्यंत भयानक असल्याचे चित्र रंगवले जात आहे. मात्र वस्तूस्थिती तशी नाही. श्रीनगर भागातील काही प्रसार माध्यमे घडणाऱ्या प्रत्येक घटनेस पाकीस्तानला अनुरुप रंग देतात. दहशतवाद्यांची मुखपत्रे असेच जणू त्यांचे रुप असते. या वृत्तपत्रे व त्यांच्या पत्रकारांवर कायदेशीर बडगा उगारला पाहिजे. तसेच राष्ट्रीय माध्यमांमधून सामान्यांना होणाऱ्या अडथळ्यांच्या आणि फुटीरवादी गटांच्या कृष्णकृत्यांना ठळक प्रसिद्धी देऊन या वृत्तपत्रांना नामोहम करता येणे शक्य आहे.

प्रसार माध्यमे ही अशा राष्ट्रविरोधी शक्तींच्या हातातील कोलित बनत चालली आहे. आणि अनेकदा हे त्यांच्याही नकळत होताना दिसत आहे. त्यामुळे या माध्यमांनी अन्य सामान्य घटनांचे वार्तांकन आणि सुरक्षाविषयक घडामोडींचे वार्तांकन यामधला फरक जाणून घेणे आवश्यक आहे. सुरक्षा संदर्भातील घटनांचे वार्तांकन हे टीआरपीच्या साठीचे आयते खाद्य समजले जाऊ नये अशा घटनांचे वार्तांकन अधिक संवेदनशीलपणे केले पाहिजे. एका वर्तमान पत्रात एक बातमी प्रसिद्ध झाली की, एका जखमी आतंकवाद्याला मातीच्या ढिगाऱ्याखालून काढल्यावर गोळी मारण्यात आली. बहुतेक या वार्ताहाराच्या मते या आतंकवाद्याला गोळी मारायच्या ऐवजी फुलांचा गुच्छ द्यायला पाहिजे होता. जखमी आतंकवादी नेहमी जवळ आलेल्या सैनिकांवर हाथ गोळा फेकून त्यांना मारतात. अशा आतंकवाद्यांना दया कशाला दाखवायची? काही वार्ताहार कायमचे आतंकवाद्यांचे मुखपत्र बनले आहेत. मुझामील जमील

शारत मसुद, बिबीसेचे युसफ. या सगळ्यांवर कायदेशीर कारवाई त्वरित व्हायला हवी. मोकळीक मिळाली तर हे वार्ताहार वाचकांचे मन कलुषित करणार यात संदेह नसावा.

<u>आतंकवादाचा बदलता चेहरा</u>

1971 चे युद्ध हरल्यावर पाकिस्तानने काश्मीरमध्ये ऑपरेशन टोपेझ सुरू केले. काश्मीर मध्ये फार मोठ्या प्रमाणात आतंकवाद्यांची घुसखोरी करण्यात आली. 1988 साली काश्मीरला वाचवण्याकरता सैन्याला बोलवण्यात आले. त्यावेळेस काश्मीरमध्ये 6000-7000 आतंकवादी होते. प्रत्येक वर्षी 2000-3000 नवीन आतंकवादी आत प्रवेश करायचे. प्रत्येक वर्षी 2500-3000 आतंकवादी काश्मीरमध्ये मारले जात होते. आता काश्मीरच्या एलओसी वरून होणारी घुसखोरी थांबवण्यात सैन्याला यश मिळाले आहे. सध्या शिल्लक राहिलेल्या आतंकवाद्यांची संख्या 500 च्या आसपास असावी. हे सगळे करताना गेल्या 22 वर्षांत प्रत्येक वर्षी 20-25 ऑफिसर्स आणि 400-750 सैनिक आपल्या प्राणांचे बलिदान करतात. काही वर्षांपासून आतंकवाद्यांची भारतीय सैन्यांशी लढण्याची हिंमत नाही. त्यामुळे गेल्या दोन वर्षांत दगडफेक **(DISINFORMATION CAMPAIGN)** खोट्या बातम्या पसरवून सामान्य काश्मिरी लोकांना भडकावणे सुरू आहे. यानुसार सैन्याविरुद्ध खोटे आरोप करण्याकरता सामान्य माणसांना भाग पाडले जाते.

आपले सरकार आपल्या सैनिकांचे रक्षण करण्यात पूर्णपणे अपयशी पडलेले आहे.अशा प्रकारचा गोबेल्स पद्धतीचा दुष्प्रचार थांबवण्याची जबाबदारी गृहमंत्रालयाची आहे. राष्ट्रविरोधी लिखाण करणारे पत्रकार, वर्तमानपत्रे, संकेतस्थळे एस एम एस पाठवणारे आणि पाकिस्तानचे पैसे घेऊन चालणाऱ्या सामाजिक संस्था या सगळ्यांवर कारवाई करायला हवी. आतंकवादाचे स्वरूप बदलते आहे पण झोपी गेलेले गृहमंत्रालय केव्हा जागे होणार. लष्कर हा राष्ट्राचा शेवटचा आधार आहे. आणि त्याचेच जर खच्चीकरण झाले लष्कराच्या मनोबलावर परिणाम झाला, तर राष्ट्रासाठी ते सर्वांत धोकादायक ठरेल. लष्कराचे सामर्थ्य कमी करण्याचा प्रयत्न हाणून पाडला पाहिजे आणि नकारात्मक प्रचाराच्या प्रभारापासून लष्कराला वाचवणे ही तर आपणा सर्वांचीच राष्ट्रीय जबाबदारी आहे. मानवी हक्कांचा सन्मान हा प्राधान्याचा विषय आहे. परंतु दहशतवाद्यांशी लढणाऱ्या जवानांना-जी लढाई सामान्य कायदा-सुव्यवस्था प्रकरणांपेक्षा मुळातच वेगळी असते. अशी लढाई लढण्यासाठी कोणतेही कायदेशीर संरक्षण न देता जवानांना वाऱ्यावर सोडू शकत नाही. आणि अशावेळी काही चूक झालीच तर त्या जवानांना सामान्य नागरी न्यायालयापुढे पाठवूही शकत नाही. त्याच्या नीतिधैर्यावर जबरदस्त आघात होऊ शकतो. काश्मीरला आज गरज आहे ती भ्रष्टाचार मुक्त राज्यकर्त्यांची जे तिथल्या जनतेला रोजगार उपलब्ध करू शकतील.

गिलानी, यासीन मलिक हे नेते पाकिस्तानी एजंट आहेत. स्वायत्ततेची मागणी केवळ 20 टक्के वहाबी पंथीयांची असून अन्य 80 टक्के जनता भारताबरोबर आहे आणि त्यांना शांतता हवी आहे. त्यामुळे हिंसाचार व चिथावणीखोरांवर सरकारने कठोर कारवाई करावी.सध्या

काश्मीरमध्ये खोट्या बातम्यांचे पेव फुटले आहे. **(DIS INFORMATION CAMPAIGN).**सामन्य माणसाला भिती वाटते की काश्मीर भारता पासुन वेगळा होईल.त्याची काळजी नको. पण काश्मीरमध्ये आतंकवादाचे स्वरुप बदली होत आहे. देश विरोधी खोटे आरोप करुन काश्मीरमध्ये मानवी हक्क भंग होतात असे दाखवायचा अतिरेकी प्रयत्न करतात.सरकारने हे रोखण्यासाठी कठोर कारवाई केली पाहिजे. फुटीरतावाद्यांना हवालाच्या माध्यमातून मिळणाऱ्या पैशांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने कठोर पावले उचलण्याची गरज आहे.

<u>सुरक्षा दलांच्या हातात रायफलींऐवजी गुलाबाची फुले द्या</u>

या सुरक्षा दलांनी किती कनवाळूपणे वागायचे, म्हणजे सुरक्षा दलांच्या हातात रायफलींऐवजी गुलाबाची फुले द्यायची की पांढरी कबूतरे द्यायची ते ठरविता येईल. काश्मिरात तैनात सुरक्षा दलांच्या कमांडर्सनी मुख्यमंत्री उमर अब्दूल्ला , पीडीपी अध्यक्षा मेहबूबा मुफ्ती, गृहमंत्री सुशीलकुमार शिंदेना काश्मिरात खास बोलावून प्रक्षुब्ध निदर्शनांना कसे हाताळायचे, त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवायची विनंती करायला हवी.

सुरक्षा जवान प्राण तळ हातांवर घेऊन भारत सरकारच्या आदेशाने काश्मिरात तैनात असतात; पर्यटक म्हणून हौसेने गेलेले नसतात. केव्हा जीव जाईल, याची त्यांनाही खात्री नसते. त्यांनाही तुमच्या-आमच्या आणि विशेषत: काश्मिरी जनतेसारख्या भावना असतात.सुरक्षा जवानांवर हल्ला करणाऱ्यांना, निदर्शनांना कसे हाताळायचे, याचे प्रशिक्षण नसण्याइतपत आपले सुरक्षा जवान दुधखुळे नाहीत. आज उर्वरित भारतातील प्रामाणिक करदात्यांचे कोट्यवधी रुपये काश्मिरात कायदा सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी ओतले जात आहेत. तिथल्या तरुणांना रोजगार नाही म्हणून, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. इतर कुठल्याही राज्यापेक्षा सर्वाधिक पैसा केंद्र सरकार त्यांना देत आहे. हा पैसा कुठे जातो, हे न सांगताही सर्वांना माहीत आहे. उर्वरित भारतातील प्रत्येक नागरिक हे योगदान गेल्या ३० वर्षांपासून देत आहे. तो काश्मीरला आपल्या देशाचा अविभाज्य व अभिमानास्पद भाग मानत आहे.

उर्वरित भारतातील नागरिकांनाही बेरोजगारीची समस्या आहे. महागाईच्या चटक्यांनी त्यांचेही जीवन होरपळून निघत आहे. तरीही देशभक्त नागरिक काश्मीरसाठी ओतल्या जाणाऱ्या प्रचंड निधीबद्दल चुकूनही शब्द काढत नाहीत, त्याची तरी कदर या राज्यकर्त्यांना आहे का? दर वर्षी साधारणत: १०-१५ अधिकारी व ३५०-५०० जवानांना काश्मीरसाठी वीरमरण येते. जबर जखमी झालेल्यांची संख्या याच्या चौपट आहे; स्वत:च्या सैन्य दलांची काळजी न घेणारे राष्ट्र अत्यंत धोकादायक परिस्थितीत नकळत जात असते. राष्ट्राचे रक्षण करणाऱ्यांची काळजी घेण्यास व त्यांचे संरक्षण करण्यास आपण कधी शिकणार?

भ्रष्टाचाराचा रोग

केंद्र सरकार दरवर्षी हजारो कोटी रुपयांचे अनुदान काश्मीरला देते. त्यात विकासासाठीच्या वेगळ्या अनुदानाची तरतूद असते. पण डॉ. अब्दुल्ला आणि ओमर या पिता-पुत्रांच्या राजवटीत काश्मीरमध्ये विकासाचा हा निधी त्या कामावर पूर्णपणे खर्च झाला नाही. प्रशासनातही भ्रष्टाचाराचा रोग शिरला आणि लाचखोरीच्या चिखलात रुतून बसला. त्यांनी विकासाला गती देत सुशिक्षित बेकारांच्या समस्यांची सोडवणूक अग्रक्रमाने केली असती तर, फुटिरतावाद्यांना पुन्हा डोके वर काढायची संधी मिळाली नसती

शहिद अफझल गुरूचे मित्र आणि राष्ट्रीय सुरक्षा

February 18, 2013 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

हुर्रियतची गरळ

पाकिस्तानच्या तालावर नाचणाऱ्या हुर्रियत परिषदेच्या नेत्यांना अफजलच्या फाशीचे हत्यार, राज्यात पुन्हा असंतोषाचा वणवा पेटवायला उपयोगी पडेल, असे वाटते. अफजल काही राष्ट्रभक्त नव्हता. तो देशद्रोही होता. पाकिस्तानातल्या जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा तो सदस्य होता. पाकिस्तानात जाऊन त्याने दहशतवादाचे प्रशिक्षण घेतले होते. संसदेवर हल्ला चढवून प्रचंड रक्तपात आणि काही लोकांचे, विशेषत: मोठ्या नेत्यांचे मुडदे पाडायचा कट त्याने रचलेला होता. पण हुर्रियतवाल्यांना मात्र तो नायक वाटत होता. त्याला फाशी दिल्यावर देशभरात जनतेने आनंद व्यक्त केला. पण लाहोर आणि रावळपिंडीत मात्र या फाशीच्या निषेधार्थ निदर्शने झाली. काश्मीरमध्ये बंदी हुकूम मोडून, निषेध मोर्चे काढायचा प्रयत्न झाला. भारताशी खुलेआम शत्रुत्व करणाऱ्या अफजलला माफी द्यावी, अशी मागणी करणाऱ्या हुर्रियतवाल्यांनी केली. भारताच्या विरोधात सतत गरळ ओकणाऱ्या हुर्रियतवाल्यांच्याकडून अन्य काही अपेक्षा करता येणार नाही.

पण ओमर अब्दुल्ला यांनीही हुर्रियतवाल्यांच्या सुरात सूर मिसळून, देशविरोधी गरळ ओकावी, हे महाभंयकर होय! ओमर अब्दुल्ला आणि त्यांचे वडिल डॉ. फारुख अब्दुल्ला यांनी काश्मीरची सत्ता आपल्याच घराण्यात रहावी, यासाठी यापूर्वीही कोलांट्या उड्या मारलेल्या आहेत. काश्मिरी जनतेच्या भावना अफजलच्या फाशीमुळे दुखावल्याचे ओमर अब्दुल्ला सांगतात. संसदेवर हल्ला चढवणाऱ्या महंमद अफजल गुरुला फाशी द्यायच्या निर्णयाची मोठी किंमत मोजायला लागेल, अफजलला फाशी दिल्यामुळे काश्मीरच्या जनतेत फुटिरतेची-अलगतेची भावना अधिक बळकट होईल, राष्ट्रीय प्रवाहापासून मुळातच बाजूला असलेल्या काश्मीर खोऱ्यातल्या जनतेला चिथावणी देणाऱ्यांना या घटनेचे भांडवल करायची संधी मिळाली, शी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. काश्मिरी नेते केंद्र सरकारचे समर्थन तर सोडाच; पण चिथावणी देत आहेत.

अलिगढ मुस्लिम विद्यापीठात झुंडशाही

होय! आम्ही सारेच अफजल आहोत...अफझलच्या वारसदारांच्या रूपात आम्ही जिवंत आहोत...आम्हा साऱ्यांनाच फासावर लटकवा...भारत मुर्दाबाद!' राष्ट्रद्रोहाच्या विखाराचे दर्शन घडविणारी व भारतीय न्यायव्यवस्थेला आव्हान देणारी ही नारेबाजी झाली...फलकबाजी झाली! मात्र कुठे? काश्मीरमधील फुटीरवाद्यांच्या बालेकिल्ल्यात नव्हे... भारताला नेहमीच पाण्यात पाहणाऱ्या पाकिस्तानातही नव्हे... तर ही नारेबाजी झाली उत्तरप्रदेशातील ज्ञानगंगेचे पाठ पढविणाऱ्या चक्क अलिगढ मुस्लिम विद्यापीठात! 'अफझल तेरी याद मे रो रही ये जमी, रो रहा आसमॉ,' असे फलक झळकवत शेकडो तरुण अफजलविषयीच्या पुळक्याने अंगात भूत संचारल्यागत नारेबाजी आज करीत राहिले. ज्या देशात आपण राहात आहोत, ज्या देशाची घटना भारतीय म्हणून आपण अंगिकारली आहे, ज्या घटनेने आपल्याला न्यायव्यवस्था दिलेली आहे, त्या न्यायव्यवस्थेवर लाथाळ्या हाणण्याचे कृत्य दांडगाई करणाऱ्या या तरुणांनी आज केले. जगातील लोकशाहीचे सर्वांत मोठे मंदिर असलेल्या भारतीय संसदेवर पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादी चाल करून येतात...त्या दुश्मनांना अफजल गुरू मदत करतो...त्यांच्या कटात सहभागी होऊन तो देशाविरुद्ध युद्ध पुकारतो...या उप्परही न्यायव्यवस्थेत त्याला त्याची बाजू मांडण्याची परवानगी देण्यात येते...त्यात तो दोषी सिद्ध होतो...सर्वोच्च न्यायालय त्याला फाशीची शिक्षा ठोठावते...राष्ट्रपती त्याची दया याचिका फेटाळून लावतात....एवढ्या साऱ्या प्रक्रियेतून त्याला फाशी झाल्यानंतरही या सर्व प्रक्रियेकडे डोळेझाक होते, झुंडशाही, दांडगाई होते... आपल्याच देशाविरुद्ध ते नारेबाजी करतात, हे देशाच्या सुरक्षेसाठी गंभीर असल्याचीच प्रतिक्रिया देशभरातून उमटली आहे. दिवसभर हा प्रकार सुरू होता. मात्र, त्याची जराही गंभीर दखल विद्यापीठाने घेतली नाही अन् अखिलेश यादव यांच्या सरकारनेही घेतली नाही!

यासिन मलिकचा देशद्रोह

अफझल गुरूला फासावर चढविल्यानंतर दोन दिवसांत 'जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंट' चा नेता यासिन मलिकने इस्लामाबादेत हफीज सईदच्या मांडीला मांडी लावून व्यासपीठावर बसावे, हा योगायोग असूच शकत नाही. हफीज सईद हा मुंबईवर झालेल्या दहशती हल्ल्याचा मुख्य सूत्रधार आहे. इस्लामाबादेतली ही शोकसभा अफझल गुरूसाठीच होती. मलिक हा पाकिस्तानचा नागरिक असणाऱ्या आपल्या पत्नीला भेटण्यासाठी तिथे अनेकदा जातो. त्याने, अफझल गुरूला फाशी होणे, हा भारतीय लोकशाहीवरचा कलंक आहे, असे तारे या सभेत तोडले. पाकिस्तानात गेल्यावर भारतावर दुगाण्या झाडायच्या, ही मलिकची जुनी सवय आहे. मात्र, यावेळी त्याने भारताचा कट्टर वैरी असलेल्या हफीज सईदसोबत व्यासपीठावर बसून देशद्रोही वर्तनाच्या सीमा ओलांडल्या. हफीज सईद त्या सभेत केवळ १५ मिनिटेच होता, असे सांगत सारवासारव मलिकनी केली. काश्मीर पाकिस्तानमध्ये विलीन करून टाका, असे म्हणणारे इतर

दहशती गट व यासिन मलिकची 'जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंट' यांचे मतभेद आहेत. फ्रंटला जम्मू-काश्मीरचे स्वतंत्र राष्ट्र हवे आहे. भारत हा दोघांचा समान वैरी आहे. त्यामुळेच, सईदच्या शेजारी बसण्यात मलिकचा हेतू सरळ नाही हे स्पष्ट आहे.

कोण आहे यासिन मलिक?

यासिन मलिक भारतविरोधी दहशतवादी आहे. जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंटचा हा नेता. त्या संघटनेतही या माणसाने आपल्या महत्त्वाकांक्षेसाठी उभी फूट पाडली. जेकेएलएफच्या एका फुटलेल्या तुकड्याचा हा प्रमुख आहे. मात्र आपले महत्त्व वाढविण्यासाठी तो भारत सरकारसोबत मवाळ होऊन चर्चा करण्याचे नाटक करतो. याची ही दुटप्पी नीती वारंवार चालू असूनही भारत सरकार पुन्हा पुन्हा त्याच्याशी लाडेलाडे वागू लागते. यासिन मलिकवर १९८७ मध्ये भारतीय वायुसेनेच्या चार जवानांची हत्या केल्याचा गंभीर आरोप होता. या आरोपाखाली याला अटक करण्यात आली होती. त्यानंतर तो एक वर्ष जेलमध्ये होता. भारतीय लष्करातील अधिकाऱ्यांचे जीव भारत सरकारला फारच स्वस्त वाटतात की काय? मग चार अधिकाऱ्यांचे खून करणाऱ्या या देशद्रोह्याची त्या प्रकरणातून सुटका कशी झाली? त्यानंतर १९९४, १९९९, २००२ या वर्षी त्याला अटक झाली आणि अर्थात सुटकाही झाली. २००२ साली तर त्याला पोटा लावला होता. मात्र तरीही तो त्यातून सुटला.

यासिन मलिक एका आजाराचे कारण दाखवून कितीतरी गंभीर आरोपातून जेलमधून सुटू कसा काय शकतो ? देशात सर्वसामान्य माणूस तुरूंगात असेल तर त्याने आजारपणाचे सोंग केले तर सरकार त्याला सोडेल काय? मग यासिन मलिकवर सरकारने मेहेरनजर का केली? सरकारच्या या मेहेरनजरेमुळेच हा माणूस खतरनाक गुन्हे करूनही वारंवार तुरुंगातून सुटला आहे. केवळ तुरुंगातून सुटला नाही तर नातेवाईकांना भेटण्याचे निमित्त करत पाकिस्तानात गेला. हा माणूस देशविरोधी आहे, पाकिस्तान धार्जिणा आहे हे सर्व माहिती असूनही सरकारने याला पाकिस्तानला जाण्याचा परवाना दिलाच कसा? देशातील सामान्य माणूस पासपोर्ट मागतो तर सरकार आणि पोलिस खाते त्यांच्या सतराशे साठ चौकशा करते, शंभर कागदपत्रे मागते. मग या उघड उघड देशद्रोही आणि लष्करी अधिकाऱ्यांच्या खुनाचे आरोप असलेल्या माणसाला सरकारने पासपोर्ट दिलाच कसा? तोही पाकिस्तानात जाण्याचा पासपोर्ट दिला कसा? वारंवार देशविरोधी गंभीर गुन्हे करणाऱ्या या माणसावर सरकारने मेहेरनजर ठेवल्यानेच हा शिरजोर झाला आहे. याच्याशी कसलीही चर्चा करता कामा नये. याला कसलीही सवलत देता कामा नये. गुडघे टेकविणाऱ्या सरकारने असे इतके दिवस का चालू दिली? यापुढेही हे चालू देणार काय? या प्रश्नांची उत्तरे भारतीय जनतेला दिली पाहिजेत. सरकारच्या कृपेने हे जर भारताचेच वाईट चिंतणार असतील तर यांची मस्ती निर्दय होऊन उतरवली पाहिजे!

अकबरुद्दीन ओवेसी की बॅरिस्टर जीनाचा पुनर्जन्म ?

January 10, 2013 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

हैदराबादमध्ये आमदार असलेले अकबरूद्दीन ओवेसी यांनी आमदार असूनही आपण पाकिस्तानमध्ये असल्याप्रमाणेच वक्तव्ये केली आहेत आणि त्यामुळे भारतातील लोकशाही धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लोकशाहीला धोका निर्माण होईल अशी वक्तव्ये हल्ली सर्रास केली जात आहेत. याला भाषण स्वातंत्र्य म्हणायचे की अभिव्यक्ती स्वातंत्र्य? संविधानाने प्रत्येकाला स्वातंत्र्य दिले आहे, याचा अर्थ लोकशाही धोक्यात येईल, असे वक्तव्य करणे कितपत योग्य आहे. आमदार अकबरूद्दीन ओवेसी यांनी भारतीय लोकशाहीच्या चिंधड्या उडवल्या आहेत. बॅ. जीना यांनी स्वतंत्र पाकचा हट्ट धरला आणि दोन देश जन्माला आले. पाकपेक्षा जास्त मुस्लिम भारतातच राहिले. आजही त्यांना जे भारतात स्वातंत्र्य मिळत आहे ते पाकमध्ये मिळाले असते का? पाकमध्ये आजची स्थिती काय आहे? पाकमध्ये मुस्लिम सुरक्षित आहेत का? आपण जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन भारताची लोकशाही जपतो आहोत. संपूर्ण जगात भारतातील लोकशाही सर्वात मोठी आणि सर्व धर्म आणि भाषा यांना एकत्रपणे नांदणारी लोकशाही म्हटले जाते. काही विघ्नसंतोषी लोक या सलोख्याला तोडायचा प्रयत्न करतात. आजही भारतात असे काही भाग आहेत जिथे पाकिस्तानची क्रिकेट टीम जिंकल्यानंतर फटाके वाजवले जातात. अकबरूद्दीनसारखे लोक लोकशाहीच्या आडून धर्मांधता वाढवत आहेत.

अकबरुद्दीन ओवेसी यांची यापूर्वीची वादग्रस्त वक्तव्यं

२००७ – सलमान रश्दींना जीवे मारण्याचा फतवा

२००७ – बांगलादेशी लेखिका तस्लिमा नसरीन यांना जीवे मारण्याचा फतवा

२०१२ – प्रक्षोभक भाषण केल्याप्रकरणी गेल्या डिसेंबर महिन्यात एफआयआर दाखल

देशद्रोही वक्तव्ये करणाऱ्या अकबरुद्दीनने डिसेंबरमध्ये सगळीच पातळी सोडली. आंध्र प्रदेशमध्ये आदिलाबाद येथे २४ डिसेंबरला झालेल्या जाहीर सभेत देशद्रोही वक्तव्याबरोबरच देशाला शिव्यांची लाखोलीही वाहिली होती. हा देश, या देशातील बहुसंख्याक आमचे शत्रू असून त्यांना धुळीला मिळवू, त्यांना कधीही शांततेने जगू देणार नाही, असे या सभेत जाहीरपणे म्हणायला अकबरुद्दीन कचरत नाही. आंध्र प्रदेशमधील कुनुल येथे २०११ मध्ये जाहीर सभेत बोलताना माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांचे निधन झाले नसते तर मी त्यांना माझ्या हाताने ठार मारले असते, असे विधान केले होते. हिंदूंना नपुंसक आणि पोलिसांना नपुंसकाचे लष्कर म्हणणाऱ्या अकबरुद्दीनवर आतापर्यंत पोलिसांनी कोणतीही कारवाई केली

नाही, ही आश्चर्याची गोष्ट आहे. मात्र, जनहित याचिकेवरील सुनावणीनंतर ओवेसीविरोधात कारवाईचे आदेश न्यायालयाने दिले. त्यानंतर अकबरुद्दीनला त्याच्या सोयीने इंग्लंडवरून परतल्यानंतर एखाद्या ज्येष्ठ राजकीय नेत्याप्रमाणे ८ जानेवारीला अटक करण्यात आली. स्वातंत्र्यापूर्वीच्या हैदराबाद संस्थानात निजामाने पायाभरणी केलेल्या या 'एमआयएम' पक्षाचा प्रमुख अकबरुद्दीनचा मोठा भाऊ असाऊद्दीन ओवेसी हा खासदार आणि बॅरिस्टर आहे. आंध्र प्रदेशात सात आमदार असलेल्या या पक्षाची विचारसरणी देशाचा समूळ विनाश या मुद्दयावरच तयार झालेली दिसते. राज्यातल्या नांदेड जिल्ह्यात अलीकडे झालेल्या निवडणुकीत 'एमआयएम'चे ११ नगरसेवक निवडून आले आहेत. राज्यातील स्फोटांप्रकरणी 'लष्कर-ए-तोयबा' च्या हस्तकांना, दहशतवाद्यांना अटक करण्यात आली होती. त्यात 'एमआयएम' च्या नांदेडमधील एका कार्यकर्त्यांचा समावेश आहे. थोडक्यात, 'एमआयएम' ची वाटचाल देशात बंदी घालण्यात आलेल्या 'सिमी' च्या मार्गाने होऊ लागल्याचे चित्र आहे. केवळ १५ मिनिटांसाठी पोलीस हटवा, २५ कोटी मुसलमान १०० कोटी हिंदूंना आपली ताकद दाखवतील, 'अशी गरळ ओकून देशात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणारे हैदराबादचे आमदार अबरउद्दीन ओवेसी (४२) यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. ओवेंसीं विरोधात भारतीय दंड विधान कलम १५३ अ (धार्मिक तेढ निर्माण करणे) , २९५ अ (मुद्दाम धार्मिक भावना दुखावणे) आणि १२१ (देशाविरुद्ध युद्ध पुकारण्याचा प्रयत्न) अंतर्गत उस्मानिया विद्यापीठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

<u>जुन्या हैदराबाद शहरात प्रचंड तणाव</u>

त्याच्या अटकेच्या वृत्ताने जुन्या हैदराबाद शहरात प्रचंड तणाव निर्माण झाला होता. पोलिस बंदोबस्तामुळे कुठलीही अनुचित घटना घडली नाही. सौम्य लाठीमार करून पोलिसांनी ओवेसी समर्थकांना शांत केले. ओवेसीला अटक करण्यात येणार असल्याचे वृत्त जुन्या हैदराबाद शहरात वाऱ्यासारखे पसरल्यानंतर एमआयएमचे शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. पोलिसांनी आधीच जलद कृती दलाचे जवान आणि राज्य पोलिसांना मोठ्या संख्येत तैनात केले होते. ओवेसीला गांधी रुग्णालयातच अटक करण्यात आल्यानंतर अतिशय कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत २०० किलोमीटरचे अंतर पार करून त्याला अदिलाबाद जिल्ह्यातील निर्मल शहरात आणण्यात आले. हैदराबादमधील चारमिनार भागातील भाग्यलक्ष्मी मंदिराबाबत बोलताना प्रक्षोभक भाषण केल्याबद्दल ओवैसी यांच्याविरोधात निर्मल व हैदराबादखेरीज राज्यात अन्य ठिकाणीही गुन्हे नोंदविले आहेत. भारतात मुसलमानांना पुरेसे संरक्षण नाही इथपासून त्यांचे जीवित व मालमत्ता येथे सुरक्षित नाही एवढे बोलूनच तो थांबला नाही तर भारत आणि आंध्रचे सरकार मुसलमान समाजाच्या सुरक्षेकडे व हिताकडे लक्ष देत नाही असेही तो म्हणाला आहे. ही व्यवस्था बदलण्याची व त्यासाठी पडेल तो संघर्ष करण्याची भाषा त्याने वापरली आहे. याच भाषणासाठी त्याच्याविरुद्ध सरकारने पोलिसात तक्रार दाखल करून त्याला अटक केली आहे. अकबरुद्दीनचे पाठिराखे व इत्तेहादूलचे सभासद त्याच्या अटकेविरद्ध निदर्शने करायला

निर्मलमध्ये जमले तेव्हा त्या छोट्याशा व शांत शहराला लष्करी छावणीचे स्वरूप प्राप्त झाल्याचे साऱ्यांना दिसले.

प्रक्षोभक भाषणविरोधी कायदे

1) कलम १५३ – प्रक्षोभक भाषण करून दंगली भडकवणे

– वॉरंटशिवाय पोलीस थेट अटक करू शकतात- अजामीनपात्र गुन्हा- ३ वर्षांची शिक्षा किंवा जेल किंवा दोन्हीही – जर असं भाषण धार्मिक स्थळावरून केलं असल्यास ५ वर्षांची शिक्षा

2) कलम १५३ अ – प्रक्षोभक भाषण करून दोन धर्मांमध्ये शत्रुत्व निर्माण करणे

– वॉरंटशिवाय पोलीस थेट अटक करू शकतात- अजामीनपात्र गुन्हा- ३ वर्षांची शिक्षा किंवा जेल किंवा दोन्हीही

3) कलम १५३ ब – प्रक्षोभक भाषण करून देशाची एकता धोक्यात आणणे

– वॉरंटशिवाय पोलीस थेट अटक करू शकतात- अजामीनपात्र गुन्हा- ३ वर्षांची शिक्षा किंवा जेल किंवा दोन्हीही

<u>एमआयएम चा ईतिहास</u>

मजलिश-ए-इत्तेहादूल मुसलमीन (एमआयएम) ही १९२७ मध्ये जुन्या हैदराबाद संस्थानात स्थापन झालेली भारतविरोधी संघटना आहे. तिचा संस्थापक पुढारी बहादूर यारजंग हा कमालीचा भारतद्वेष्टा आणि हैदराबाद संस्थानच्या भारतातील विलिनीकरणाचा कडवा विरोधक होता. आपल्या संघटनेची तशी घटना, ध्वज व भूमिका जाहीर करून त्याने तेव्हाच्या मुस्लीम लीगशी संबंध जोडले होते. तेवढय़ावर न थांबता कासीम रिझवीच्या नेतृत्वात दीड लाख रझाकारांची सशस्त्र संघटना स्थापन करून तिच्यामार्फत हैदराबाद संस्थानातील जनतेला धमकावण्यात व धाकात ठेवण्यातही त्याचा पुढाकार होता. १५ सप्टेंबर १९४८ या दिवशी भारताने निजामाविरुद्ध पोलीस कारवाई केली आणि त्याचे संस्थान १७ सप्टेंबर या दिवशी भारतात विलीन केले. त्याच दिवशी इत्तेहादूल मुस्लिमीन या संस्थेवर भारत सरकारने बंदी घातली. ती १९५७ मध्ये उठविण्यात आली. कासीम रिझवीच्या कारावासाचा काळही हाच होता. आपल्या सुटकेनंतर तो पाकिस्तानच्या आश्रयाला गेला व तेथेच मृत्यूही पावला. इत्तेहादूलचा मूळ इतिहास येथे संपला असला तरी तिची पाळेमुळे जिवंतच राहिली. १९७४ मध्ये तिच्या उर्वरित अंशांना एकत्र करून आपल्या नियंत्रणात आणण्याचे काम सुलतान सलाऊद्दीन ओवेसीने केले. ओवेसीने इत्तेहादूलच्या जुन्या भूमिका पुनरुज्जीवित करण्याचे आणि इस्लामी राजवटीच्या प्रस्थापनेचे राजकारण आखले. त्यातले अपयश त्याला दिसत असतानाही त्याची व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा व सत्ताकारणाची उबळ यातून त्याने ते राबविले.

१९५६ साली हैदराबादमध्ये एमआयएमची पुनरस्थापना

१९५६ साली हैदराबादमध्ये एमआयएमची स्थापना झाली. अकबरुद्दीन ओवेसी आणि त्यांचा भाऊ असादुद्दीन ओवेसी यांचा जुन्या हैदराबादमध्ये मोठा दबदबा आहे. नेहमी वाद निर्माण करण्यात या दोघा भावांचा हातखंडा आहे. आंध्रप्रदेशात त्यांचा एमआयएम हा पक्ष लहान असला तरी, त्याचा प्रभाव मात्र मोठा आहे.

ओवेसी बंधूंची जुन्या हैदबादमध्ये सत्ता चालते. इथल्या लोकांमध्ये त्यांच्याबद्दल दहशत आहे. आणि त्यांना विरोध करण्याची हिंमतही कोणी दाखवत नाही. त्यांचा पक्ष मजलिस-ए इत्तहदुल मुस्लिमीन म्हणजेच एमआयएमचा हैदराबादमध्ये दबदबा आहे.

मोठा भाऊ असादुद्दीन ओवेसी हे हैदराबादमधून खासदार आहेत. तर लहान भाऊ अकबरुद्दीन ओवेसी आमदार आहेत. हे दोघेही उच्चशिक्षित आहेत. पण स्थानिक घाणेरडं राजकरण करण्यात माहीर आहेत. चुकीच्या कारणांसाठीच नेहमी त्यांची चर्चा होते. पण त्यांची आंध्रप्रदेशातल्या मुस्लीम समाजावर मात्र पकड तितकीशी पकड नाही. तरी पण ते नेहमी सरकारला त्यांच्या कृत्यांकडे डोळेझाक करायला भाग पाडतात.

अनिष्ट व देशविरोधी प्रवृत्ती

अकबरुद्दीन, त्याचा थोरला भाऊ असदुद्दीन आणि त्यांची इत्तेहादूल ही संघटना ही राजकारणातील एक अनिष्ट व देशविरोधी प्रवृत्ती आहे. तिच्या मागे १९२७ पासूनचा प्रदीर्घ इतिहास आहे. इत्तेहादूलसारख्या संघटनांपासून स्वत:ला दूर ठेवणारा व देशाच्या एकूण भवितव्याशी आपले भविष्य जोडून घेणारा मोठा वर्ग मुस्लीम समाजात पूर्वी होता आणि आजही आहे. असदुद्दीन, अकबरुद्दीन किंवा त्यांची इत्तेहादूल ही संघटना या समाजाची दिशाभूल करण्याचा, त्याला देशाच्या मुख्य प्रवाहापासून दूर नेण्याचा आणि जमेल तेथे त्यांच्यात संघर्ष उभा करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांमध्ये आहेत. या प्रयत्नांचा कायदेशीर व कठोर बंदोबस्त करीत असतानाच त्यांच्या प्रचार यंत्रणांनाही प्रभावीपणे तोंड देणे गरजेचे आहे. जातीय तणाव, तेढ निर्माण करण्याबरोबर हा देशही धुळीला मिळवू, देशातील बहुसंख्याकांना १५ मिनिटात छाटून टाकू, अजमल कसाबसारख्या 'मुलाला' फाशी द्यायला नको होती, त्याचबरोबर मी फक्त मुस्लिमांचाच प्रतिनिधी आहे, अशी प्रक्षोभक विधाने करत भारतीय राज्यघटना, देशातील लोकशाही आणि संपूर्ण देशाच्या मानसन्मालाच पायदळी तुडवण्याची कामे 'एमआयएम'चा आमदार अकबरुद्दीन ओवेसी याने वारंवार केले आहे. २००९ मध्ये आमदार म्हणून निवडून आलेल्या अकबरुद्दीनने त्याच्या पक्षाला साजेशा विचारधारेनुसारच जाहीर भाषणातही देशाविरोधात विखारी भाषणांची मालिका सुरू ठेवली. देश स्वातंत्र्याच्या उंबरठयावर उभा असताना बॅरिस्टर जीनांनीही हिंदू-मुस्लीम तेढीबरोबर देशाचे तुकडे करण्याचे, वक्तव्ये जाहीर भाषणातून केली होती व देशाची फ़ाळणी केली होती. 'मजलिस-ए-इत्तेहाद-अल-

मुसलमीन' (एमआयएम) या हैदराबादस्थित जहाल विचारसरणीच्या मुस्लीम पक्षाचा आमदार अकबरुद्दीन ओवेसी याला बॅरिस्टर जीनांच्या पावलावर पाऊल ठेवण्याची घाई झालेली दिसते.

ऑपरेशन एक्स आणि अजमल कसाबला फ़ाशी

November 29, 2012 ब्रिगेडियर हेमंत महाजन (नि) नियमित सदरे, राजकारण, राष्ट्रीय सुरक्षा

ऑपरेशन एक्स ओव्हर

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील एकमेव जिवंत पाकिस्तानी अतिरेकी मोहम्मद अमीर अजमल कसाब याला आज फासावर लटकण्यात आले. पुण्याच्या येरवडा मध्यवर्ती कारागृहात सकाळी ठीक ७.३० वाजता क्रूरकर्मा कसाबचा "हिशेब" करण्यात आला. त्यानंतर डॉक्टरांनी कसाबला मृत घोषीत केले. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी ५ नोव्हेंबर रोजी दयेचा अर्ज फेटाळल्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालय आणि महाराष्ट्र सरकारने कसाबच्या फाशीची तयारी सुरू केली. त्यानंतर कसाबला मुंबईच्या आर्थर रोड तुरुंगातून पुण्याच्या येरवडा तुरुंगात मंगळवारी मध्यरात्री गुपचूपपणे नेण्यात आले. तिथेच सकाळी कसाबला फाशी देण्यात आली. कसाबच्या फाशीला "ऑपरेशन एक्स" असे सांकेतिक नाव देण्यात आले होते. सुरक्षेसाठी ही गुप्तता पाळण्यात आली होती. सकाळी फाशी झाल्यानंतर काही वेळातच डॉक्टरांनी कसाबला मृत घोषित केले. त्यानंतर ठीक ७ वाजून ४६ मिनिटांनी गृहमंत्र्यांना फोन करून "ऑपरेशन एक्स ओव्हर" असे कळविण्यात आले. त्यानंतर काही वेळाने ही बातमी जाहीर करण्यात आली.

काय होता कसाबचा गुन्हा ?

कसाब आणि त्याच्या नऊ साथीदारांनी २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला केला होता. कसाब आणि त्याच्या नऊ साथीदारांनी २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला केला होता. या कारवाईत ओंबळे शहीद झाले . अटकेनंतर कसाबची रवानगी मुंबईच्या आर्थर रोड जेलमध्ये झाली होती. कोर्टात केस सुरू असताना कसाबला कडेकोट बंदोबस्तात आर्थर रोड जेलमध्ये ठेवण्यात आले होते. कसाबचा गुन्हा कोर्टात सिध्द केला. कोर्टाने कसाबला दोषी ठरवून फाशीची शिक्षा दिली . या शिक्षेवर हायकोर्टाने शिक्कामोर्तब केले. त्यानंतर कसाबने फाशीचे रुपांतर जन्मठेपेत व्हावे म्हणून सुप्रीम कोर्टात अर्ज केला. मात्र सुप्रीम कोर्टाने शिक्षा कायम ठेवली . निरपराधांवर गोळीबार करणाऱ्या कसाबने फाशीची शिक्षा माफ व्हावी यासाठी राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज केला होता. हा अर्जही फेटाळण्यात आला होता. '२६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहिद पोलीस व निष्पाप नागरिकांना ही खऱ्या अर्थाने श्रद्धांजली आहे' अशी प्रतिक्रिया राज्याचे गृहमंत्री आर.आर. पाटील यांनी दिली. कसाबला त्याची शेवटची इच्छा विचारण्यात आली. मात्र, आपली शेवटची कोणतीही इच्छा नाही

असे कसाब म्हणाला. कसाबचे मृतदेह पाकिस्तानला दिला नाही. कसाबला २१ नोव्हेंबर रोजी फाशी देण्याचा निर्णय आठ नोव्हेंबर रोजीच घेण्यात आला. अजमल कसाब याला येरवडा मध्यवर्ती कारागृहामध्येच दफन करण्यात आले.

<u>ऑपरेशन ब्लॅक टोर्नेडो</u>

छत्रपती शिवाजी टर्मिनस, ताज पॅलेस, ओबेरॉय ट्रायडण्ट, कॅफे लिओपोल्ड, कामा हॉस्पिटल, छाबड हाऊस या भागांना दहशतवाद्यांनी टार्गेट केले होते. हल्ल्याचे स्वरुप इतके भीषण होते की एनएसजीच्या कमांडोंना ऑपरेशन ब्लॅक टोर्नेडो ही मोहीम हाती घ्यावी लागली. छत्रपती शिवाजी टर्मिनसवर रात्री सव्वा नऊच्या सुमारास दोन दहशतवादी घुसले. कसाबही त्यात होता. एके ४७ रायफलने त्यांनी अंदाधुंद गोळीबार सुरु केला. पावणे अकरा पर्यंत दहशतवाद्यांचे हत्यासत्र सुरु होते. या गोळीबारात ५८ जण ठार झाले तर १०४ जखमी झाले. हे दहशतवादी सीएसटी स्थानकावरुन कामा हॉस्पिटलच्या दिशेने जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर एटीएसचे तत्कालिन प्रमुख हेमंत करकरे, विजय साळस्कर, अशोक कामटे हे अधिकारी त्या दिशेने धावले. कामा हॉस्पिटलच्या परीसरात कसाब आणि खान या दोघांशी झालेल्या चकमकीत हे तिघेही अधिकारी शहीद झाले. खानचा खात्मा झाला. आधी पोलिसांच्या जीपने आणि नंतर एका कारने पळ काढण्याचा प्रयत्न करणाऱ्या कसाबला सह सब इन्सपेक्टर तुकाराम ओळंबे यांनी जिवंत धरले. या प्रयत्नात जखमी झालेल्या ओळंबे यांना वीरमरण आले.

कुलाबा येथील लिओपोल्ड कॅफे येथे झालेल्या हल्ल्यात काही परदेशी नागरीकांसह दहा जण ठार झाले. ताज पॅलेस येथे झालेला हल्ला सर्वात भीषण होता. ताजमध्ये सहा बॉम्बस्फोट झाले. फायर ब्रिगेडच्या जवानांनी जीवाची बाजी लावून हॉटेलमधून २०० जणांची सुटका केली. ताज आणि ओबेरॉय ट्रायडण्टला एनएसजी कमांडो, आणि सैन्याने वेढा घातला होता. एनएसजीचा तरुण कमांडो मेजर संदीप उन्नीकृष्णन या हल्ल्यात शहीद झाला. छाबड हाऊसमध्ये झालेल्या चकमकीत एनएसजी कमांडो हवालदार गजेंद्रसिह शहीद झाले. ९ दहशतवादी ठार झाले. आयएसआयच्या देखरेखीखाली लष्कर ए तय्यबा या दहशतवादी संघटनेने हा हल्ला घडवून आणला. तय्यबाचा सदस्य असलेल्या डेव्हीड हेडली याने मुंबईतल्या टार्गेट्सची रेकी केली. आयएसआयचा मेजर इक्बालने हेडलीला या कामासाठी रसद पुरवली होती.

कसाबचा लटकलेला मृतदेह पाहण्यासाठी जनता उतावीळ होती. असे असतानाही कसाबच्या फाशीला चार वर्षे लागावीत हे दुर्दैव आहे. खरे म्हणजे एवढे धडधडीत पुरावे असताना कसाबचा खटला दोन-चार महिन्यांत संपवून त्याला आतापर्यंत फासावर लटकवायला हवे होते. पाकिस्ताने आतापर्यंत दोन-तीन पुण्यतिथ्या साजऱ्या करायला हव्या होत्या. तरी पण आपले कर्तव्य पार पाड्ण्या करता राष्ट्रपती प्रणव मुखर्जी आणि केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे

यांचे अभिनंदन. असेच न्यायालयीन सोपस्कार संसदेवरील हल्ल्याचा सूत्रधार अफजल गुरू याच्या खटल्यातही पार पडले आहेत . त्यालाही आधी खालच्या न्यायालयाने, मग उच्च न्यायालयाने आणि नंतर सर्वोच्च न्यायालयानेदेखील फासावर लटकवण्याचाच निर्णय दिला.? हे महाशय तिहार तुरुंगात आरामात आहेत. संसदेवर हल्ला होऊन ११ वर्षे झाली. त्यावर सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येऊनही सहा वर्षे उलटली. तरीही अफजल गुरू जिवंत आहे. पण राज्यकर्ते मतांसाठी हा दोरखंड हाती घेऊन दोरीवरच्या उड्या खेळत आहेत. अतिरेक्याला पोसणे म्हणजे देशाशी आणि देशातील जनतेशी केलेली प्रतारणाच आहे. आता तरी सरकारने 'व्होट' बँकेचा मोह सोडून देशातील जनभावना ओळखायला हवी. देशातील जनता उतावीळ झाली आहे. कोणतीही दया-माया न दाखवता, अर्ज-फाट्याची संधी न देता अफजल गुरूला फासावर लटकवा! आज..आत्ता..आणि ताबडतोब!!

<u>अफझल गुरूबद्दल चुकीचा निर्णय घ्याल तर घातपात घडवू</u>

अफझल गुरूच्या फाशीबद्दल जर काही चुकीचा निर्णय घ्याल तर देशभर घातपातांची मालिका घडवली जाईल, अशी धमकी फुटीरतावादी जम्मू काश्मिर लिबरेशन फ्रंटचा नेता यासिन मलिक याने दिली आहे. जेकेएलएफचा संस्थापक मकबूल भट्ट याला फाशी देऊन केलेली चूक सरकारने पुन्हा केल्यास देशभर घातपात घडवले जातील, असे मलिकने प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. कसाबला फाशी दिल्यानंतर अफझल गुरूच्या फाशीची मागणी भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसमधील काही नेत्यांनी केली होती.

<u>'सरबजीतला फाशी द्या'</u>

कसाबच्या फाशीची प्रतिक्रिया पाकिस्तानात उमटू लागली असून माजी क्रिकेटपटू इम्रान खान याचा पक्ष तेहरीक ए इन्साफ या पक्षाने पाकिस्तानच्या कैदेत असणारा भारतीय कैदी सरबजीत सिंग याच्या फाशीची मागणी केली आहे. मुलतानमध्ये झालेल्या निदर्शनांमध्ये पक्षाचे नेते निमूल्लाह खान यांनी ही मागणी केली. भारताने कोर्टाचा अंतिम निर्णय आल्यानंतर महिन्याच्या आत त्याची अमलबजावणी केली, आम्ही मात्र गेले आठ वर्षे 'दहशतवाद्यांचे' रक्षण करीत आहोत, असे खान म्हणाले.

<u>अतिरेक्यांना फाशी द्यायलाच हवी होती</u>

कसाबच्या फाशीवर सुप्रीम कोर्टाने शिक्कामोर्तब करताच काहीजणांनी या फाशीला विरोध केला आहे. कसाबला फाशी देऊन 'शहीद' करू नका, या फाशीने दहशतवादी हल्ल्यांचा धोका वाढेल; असे मत विरोधक व्यक्त करत होते.

कसाबला फाशी दिली काय किंवा नाही दिली काय?, भारतावरील दहशतवादी हल्ल्याचा धोका कमी होणार नाही. उलट कसाबला तुरुंगात ठेवले तर भविष्यात त्याच्या सुटकेसाठी अपहरणाचे प्रयत्न होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. शिवाय आपल्या सरकारने कसाबला तुरुंगात

ठेवण्यासाठी कोट्यवधींचा खर्च केला . कसाब शिंकला तरी बातमी होईल अशी आज परिस्थिती झाली होती. कसाबच्या सुनावणीला सतत प्रसिध्दी देणाऱ्या माध्यमांना चाप लावण्यासाठी कायदेशीर चौकटीत प्रयत्न का केले नाहीत?

दहशतवादी कृत्याला मिळणारी अतिप्रसिध्दी ही दहशतवादाला खतपाणी घालते. पण आपल्या सरकारने तसेच प्रसारमाध्यमांनी २६ नोव्हेंबर २००८ च्या रात्रीपासून आजवर ही चूक अनेकदा केली आहे. देशाच्या सुरक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्याचा वेग अद्याप खूप कमी आहे. भविष्यात २६/११ च्या मुंबई हल्ल्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी संरक्षण व्यवस्थेत आमुलाग्र बदल करणे हे जास्त हिताचे आणि आवश्यक आहे

ब्रिगेडिअर हेमंत महाजन, युद्ध-सेवा-मेडल, यांची व्यक्तीरेखा

ब्रिगेडिअर हेमंत महाजन, इंडियन-मिलिटरी-अकादमीत, जुलै १९७३ मध्ये, डेहराडून येथे रुजू झाले. १५ जून १९७५ रोजी त्यांनी “कमिशन्ड ऑफिसर” म्हणुन पायदळातील ७-मराठा-लाईट-इन्फन्ट्रीत प्रवेश केला. जम्मू-आणि-काश्मीरच्या सिमावर्ती भागात व दहशतवादी क्षेत्रांत, पंजाबात आणि ईशान्य भारतातील राजद्रोह-विरोधी-कार्यवाहीत त्यांनी सविस्तर सेवा केली. तसेच १९७५ पासूनच्या लष्कराने हाती घेतलेल्या सर्व महत्त्वाच्या दहशतविरोधी कार्यवाहींमध्ये त्यांचा सहभाग होता.

त्यांच्या कामगिरीची ठळक वैशिष्ट्ये

१९९५ ते १९९८ त्यांनी पूँछ क्षेत्रात काम केले. पूँछ आणि राजौरीच्या सर्वात अवघड क्षेत्रातील, सर्वाधिक दहशतवादाच्या काळात, त्यांनी “ऑपरेशन रक्षक” मधे,७-मराठा-लाईट-इन्फन्ट्रीचे नेतृत्व केले . त्यांची बटालियन, पाकिस्तानमधून जम्मू-आणि-काश्मीरमध्ये होणारी घुसखोरी रोखण्यास जबाबदार होती. त्यांच्या बटालियनला "युनीट सायटेशन आणि १८ शौर्य-पदके" प्राप्त झाली.

“ऑपरेशन पराक्रम” च्या दरम्यानच्या निरनिराळ्या युध्द-हालचालींत त्यांचा सक्रिय सहभाग होता. भारतीय लष्कराने केलेली ही सर्वात मोठी जमवाजमव होती, ज्यामुळे त्यावेळी पाकिस्तानसोबत युद्ध परिस्थिती निर्माण झालेली होती. त्यांच्या कठोर परिश्रमांची पावती म्हणून, त्यांना लष्कर-प्रमुखांकडून प्रशस्ती-पारितोषिक प्राप्त झाले.

पुन्हा एकदा जम्मू-आणि-काश्मीर मधील पूँछ, कृष्णाघाटी, सुरणकोट आणि राजौरी इलाख्यांतील “ऑपरेशन रक्षक” ह्या कार्यवाहीत त्यांनी ब्रिगेडच्या नेतृत्वाची धुरा वाहिली.त्यांच्या एका युनिटला युनीट-गौरव घोषित झाला. त्यांची बॉर्डर-सिक्युरीटी-फोर्स (बी.एस.एफ.) बटालिअन ही देशातील सर्वोत्कृष्ट बटालिअन म्हणून घोषित झाली आणि ब्रिगेडमधील एका अधिकार्यास २००६ सालचे सर्वोच्च पारितोषिक अशोक चक्र प्राप्त झाले.

फेब्रुवारी २००६ मध्ये ते, “हायर कमांड विंग” चे अध्यापक -डी.एस.- म्हणून, आर्मी-वॉर-कॉलेजमध्ये रुजू झाले. तिथे त्यांनी प्राविण्यासह तीन वर्षे सेवा केली. हायर कमांड अभ्यासक्रम, भूदल, नौदल व हवाईदलाच्या सर्वोच्च ७० कर्नल व समकक्षांचा असतो. अध्यापक ह्या नात्याने, राष्ट्रीय सुरक्षेचे निरनिराळे पैलू समजून घेण्यासाठी, अधिकारी-विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी त्यांचेवर होती. नियोजनात्मक तयारीत आणि शत्रुराष्ट्राविरुद्धच्या युद्धांत, मोठ्या संख्येतील युद्धखेळ खेळले जातात.त्यांनी अधिकारी-विद्यार्थ्यांना; युध्दव्यवस्थापनाचे विविध पैलू, आण्विक-जैव-रासायनिक-युद्धसेवा, काश्मीर व ईशान्येतील विद्रोह, डाव्या-पक्षांचा-अतिरेक, दहशतवाद, सागराकडूनचा विद्रोह इत्यादींसारख्या विषयांत; मार्गदर्शन केलेले आहे.

सेवाकाळात त्यांना खालील पदके प्राप्त झालेली आहेत.

अ) जी.ओ.सी.-इन.-सी. सेंट्रल कमांड कमेंडेशन कार्ड

आ) युद्धसेवा मेडल

अतिरिक्त अनुभव

अ) **माध्यम अनुभवः** इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून ते अनेकदा वावरलेले आहेत.

आ) **लेखन अनुभवः** “आर्मी-वॉर-कॉलेज-जर्नल”, “इन्फन्ट्री”, “प्रतिविद्रोही” इत्यादी व्यावसायिक भूदल नियतकालिकांतून ते नियमितपणे लेखन करत असतात.

इ) **मास्टर-ऑफ-फिलॉसॉफी करता मार्गदर्शनः** भूदल, नौदल आणि हवाईदलाच्या अधिकार्यांना, देवी-अहिल्या-विश्व-विद्यालय, इंदौर-विद्यापीठाच्या “मास्टर-ऑफ-फिलॉसॉफी (एम.फिल.)” पदवीप्रत नेणार्या त्यांच्या संशोधनाच्या कामांत ते मार्गदर्शन करत असतात.

ई) **परदेशांतील लष्करी मुत्सद्देगिरीः** लष्करी दूतकर्म -आणि सुरक्षा-सहकार्य सुधारण्याकरता त्यांनी अनेकदा, परदेशांतून प्रतिनिधिमंडळांचे नेतृत्व केलेले आहे. त्यांनी भेट दिलेल्या काही देशांत, भूतान, म्यानमार, थायलंड, मलेशिया, सिंगापूर, यू.ए.ई., इजिप्त, कजाखस्तान, किरघिस्तान इत्यादींचा समावेश होतो.

उ) **वृत्तपत्रीय लेखनः** राष्ट्रीय सुरक्षेवरील त्यांचे लेख आघाडीच्या सर्व मराठी वृत्तपत्रांतून नियमितपणे प्रकाशित होत असतात. त्यांनी ३५०० हून अधिक लेख निवृत्तीनंतरच्या ९ वर्षांत प्रकाशित केलेले आहेत.

ऊ) **अतिथी-प्राध्यापकः** महाराष्ट्रातील अनेक विचार-मंथनांत ते राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विषयांवर, सरासरीने दर-महा पाच ते सहा व्याख्याने देत असतात. त्याकरता ते नागपूर, मुंबई, कोल्हापूर, बेळगाव, सोलापूर इत्यादी शहरांत भेटी देत असतात.

ऋ) सेंटर-फॉर-ऍडव्हान्सड-अँड-स्ट्रॅटेजिक-स्टडीजचे ते सभासद आहेत. त्यांनी “पाक-मिलिटरी-स्ट्रॅटेजी”, “नक्षलिझमः पास्ट, प्रेझेंट अँड फ्युचर”, आणि “काश्मीरः स्टेटस ऑफ प्रॉक्सी वॉर” हे शोधनिबंध सादर केलेले आहेत.

ऌ) जुलै-२०१२ मध्ये त्यांनी "**नक्षलिझमः चायनाज प्रॉक्सी वॉर ऑन इंडिया**" हे पुस्तक प्रकाशित केले आणि ऑक्टोंबर-२०१३ मध्ये त्यांनी **"आव्हान चीनी ड्रॅगनचे**" हे मराठी पुस्तक प्रकाशित केले.१० मे २०१४ मध्ये त्यांनी "**आव्हान काश्मीरमधील छुप्या युध्दाचे"** हे पुस्तक मध्ये प्रकाशित केले. मे २०१५ मध्ये त्यांनी "**देशासमोर सुरक्षेची बहुआयामी आव्हाने आणि भारताची सरंक्षणसिध्दता" हे पुस्तक प्रकाशित केले."PROXY WAR IN JAMMU & KASHMIR:A WINNING STRATEGY"** हे पुस्तक ईग्रजी भाषेत ऑक्टोंबर-२०१३प्रकाशित केले. आव्हान जम्मू-आणि-काश्मीर मधील छुप्या युद्धाचे- **हे पुस्तक 2015** मध्ये **प्रकाशित केले** (Won an award in November 2016).

आक्रमक परराष्ट्रधोरण आणि **भारताची बाह्य,अंतर्गत व सुरक्षा हे पुस्तक** जुलै २०१५ मध्ये प्रकाशित केले. बांगलादेशी घुसखोरी भारताच्या सुरक्षेस सर्वात मोठा धोका.२०२१ पूर्वी आसम.प बंगालच्या मुख्यमंत्रिपदी दोन बांगलादेशी ?(First edition sold off in six months) **हे पुस्तक प्रकाशित 2016** मध्ये **प्रकाशित केले**

INDIAS COASTAL SECURITY:CHALLENGES & WAY AHEAD_ईग्रजी भाषेत ओक्टोबर २०१७ मध्ये प्रकाशित केले.

ऍ) दूरदर्शनच्या वृत्त-वाहिन्यांवरील वाद-विवादांत ते भाग घेत असतात. **मराठी वाहिन्याःमी मराठी,टीव्ही ९ मराठी,जय महाराष्ट्र,डिडि सह्याद्री,** आय.बी.एन.-लोकमत, झी-२४-तास, ए.बी.पी.माझा, दूरदर्शन. **हिंदी वाहिन्याः** सहारा समय, न्यूज एक्सप्रेस-२४, इंडिया-टी.व्ही. **इंग्लिश वाहिन्याः** टाईम्स नाऊ.ANI.मिरर नाऊ

त्यांना दमण दिव,दाद्रा नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशाचे सुरक्षा सल्लागार म्हणुन २०१७ मध्ये नियुक्त केले आहे.

त्यांना पुणे विद्द्यापिठाने 2018 मध्ये "स्वातंत्र्यवीर सावरकर अध्यासन" ,राष्ट्रिय सुरक्षा आणी सामरिक अभ्यासाचे अतिथी प्राध्यापक म्हणुन नियुक्त केले आहे.